Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

नोव्हेंबर २०१८/पाने ९२/किंमत ₹१०

# लोकराज्य



## दीपोत्सव महाराष्ट्राच्या प्रगतीचा

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

सत्यमेव जयते

कृषीपंपांपासून विद्युत वाहनांपर्यंत
महावितरणच्या सेवांचा स्वागतार्ह विस्तार

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## सौरकृषी वाहिनी / उच्चदाब विज वितरण प्रणीली / विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स

# या अभिनव योजनांचा शुभारंभ

### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी



- सौरऊर्जा प्रकल्पाद्वारे शेतकऱ्यांच्या कृषीपंपांना सौरऊर्जा
- शेतकऱ्यांना दिवसाही मुबलक प्रमाणात वीज
- राज्यातील सुमारे ७ लाख ५० हजार शेतकऱ्यांना लाभ
- दर्जेदार वीजपुरवठा व पर्यावरणाचा समतोल
- वीजनिर्मिती व वीजवितरण यामधील अंतर कमी करून वीजहानीत घट

### विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स

PowerUP
A MSEDCL Initiative

- वाहनांमुळे होणारे प्रदुषण कमी करण्यासाठी विद्युत वाहनांना प्रोत्साहन
- महावितरण राज्यात ५०० विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स उभारणार
- पहिल्या टप्प्यात ५० विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्स उभारण्यास सुरूवात
- मोबाईल ॲपवर चार्जिंग स्टेशन्सची माहिती उपलब्ध

### कृषीपंपाला नवीन वीज जोडणी देण्याकरिता उच्चदाब वितरण प्रणाली (एचव्हीडीएस)



- योजनेत एक किंवा दोन कृषीपंपासाठी स्वतंत्र रोहित्र
- शेतकऱ्यात रोहित्राबद्दल स्वामीत्वाची भावना निर्माण होणार
- रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण घटेल
- वीजचोरी व अपघाताचे प्रमाणही कमी होण्यास मदत
- योजनेचा लाभ राज्यातील २ लाख २४ हजार शेतकऱ्यांना

## विजेमुळे शेती, शेतीमुळे प्रगती

www.mahadiscom.in

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88




गेल्या चार वर्षात महाराष्ट्राने विविध क्षेत्रात अतिशय उत्तम कामगिरी केली. महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर घातला. विविध क्षेत्रात असलेला पहिला क्रमांक कायम ठेवण्यात यश मिळाले. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, पर्यटन, पायाभूत सुविधा यांमध्ये महाराष्ट्राने केलेली प्रगती लक्षणीय ठरली. 'सर्वांची साथ आणि सर्वांचा विकास' या तत्त्वाचा अंगीकार करत राज्याची विकासाच्या दिशेने चौफेर घोडदौड होत आहे. भारताच्या नवनिर्माणाच्या महत्त्वाकांक्षी संकल्पनेमध्ये महाराष्ट्र अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

गेल्या चार वर्षात विविध क्षेत्रामध्ये जो विकास झाला, त्याचा मुख्यमंत्री व मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी घेतलेला हा लेखाजोखा...

























# समृद्ध, सक्षम, समर्थ महाराष्ट्र

वर्ष ७० वे | अंक ५ | नोव्हेंबर २०१८

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन — मीनल जोगळेकर
- वितरण — मनीषा पिंगळे, मंगेश वरकड, अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, धनश्री पाठारे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# शेतकरी सन्मान योजनेंतर्गत एक वेळ समझोतासाठी मुदतवाढ

**छत्रपती** शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत एकवेळ समझोतासाठी ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून या संदर्भातील शासन निर्णय २९ सप्टेंबर २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला.

'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७' या योजनेंतर्गत मुद्दल व व्याजासह रु. १.५ लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एक वेळ समझोता (वन टाईम सेटलमेंट) योजनेखाली पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची संपूर्ण रक्कम भरण्याचा कालावधी १ ऑक्टोबर २०१८ ते ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत वाढवण्यात आला आहे. राज्यामध्ये २००९-१० पासून असलेल्या सततच्या दुष्काळ व नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी २४ जून २०१७ च्या मंत्रिमंडळ बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार शासन निर्णय २८ जून २०१७ अन्वये 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७' घोषित करण्यात आली. या योजनेंतर्गत 'एक वेळ समझोता' योजनेत पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची संपूर्ण रक्कम ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत बँकेत जमा करण्यास मुदत देण्यात आली होती. ही मुदत वाढवण्यात आली आहे. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०९२९१२३७००३८०२ हा आहे.




# 'महामदत' संकेतस्थळ

**राज्यातील** विविध तालुक्यातील पर्जन्यमान, पीक परिस्थिती, भूजल पातळी आदींची माहिती एकत्रित करून त्याचे विश्लेषण करण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन मदत व पुनर्वसन विभागाने 'महामदत' या नवीन संकेतस्थळाची व ॲपची निर्मिती केली आहे. मदत व पुनर्वसन विभागाने महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरच्या मदतीने हे संकेतस्थळ तयार केले आहे. केंद्र शासनाने २०१६ मध्ये दुष्काळ जाहीर करण्यासाठी निकष ठरवून दिले आहे. या निकषांनुसार दुष्काळ जाहीर केला जातो. या निकषांमध्ये सलग २१ दिवस कमी पर्जन्यमान, जमिनीची आर्द्रता, पिकांची स्थिती, भूजल पातळी आदींचा समावेश आहे. या निकषांनुसार मिळालेली माहिती या संकेतस्थळावर ठेऊन त्याचे विश्लेषण करण्यात येईल. यामुळे अचूक विश्लेषणद्वारे दुष्काळ जाहीर करून नागरिकांना तातडीने साहाय्य करण्यास मदत होईल.

केंद्र शासनाच्या दुष्काळविषयक पहिल्या निकषानुसार राज्यातील २०१ तालुक्यांमध्ये सलग २१ दिवस पाऊस पडलेला नाही. दुसऱ्या निकषाची पाहणी लवकरच पूर्ण होऊन त्याचा अहवाल आल्यावर ज्या तालुक्यांमध्ये दोन्ही निकष पूर्ण होतील, अशा तालुक्यात दुष्काळी सदृश्य परिस्थिती जाहीर करून तातडीने विविध उपाययोजना करण्यात येतील. त्यानंतर जिल्हाधिकारीस्तरावर प्रत्यक्ष पाहणी करून दुष्काळी तालुके जाहीर करण्यासाठी केंद्र शासनाकडे अहवाल पाठवण्यात येईल.

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88



# नव्या महाराष्ट्राची उभारणी



**गिरीष महाजन**
मंत्री, वैद्यकीय शिक्षण,
जलसंपदा व लाभक्षेत्र विकास

चार वर्षांपूर्वी विविध क्षेत्रात महाराष्ट्राची पीछेहाट झाली होती. जनतेमध्ये मोठे नैराश्य होते. महाराष्ट्रात उत्साह जाणवत नव्हता. अशा परिस्थितीत नागरिकांनी आमच्या हातात सत्ता सोपवली. गेली चार वर्षे आम्ही निष्ठेने आणि परिश्रमपूर्वक कार्यरत राहून महाराष्ट्राला वेगळ्या उंचीवर नेले आहे. पुन्हा एकदा महाराष्ट्राने विविध क्षेत्रात आघाडी मिळवली आहे. विकास कामांचा झपाटा सर्वत्र सुरू आहे. अनेक प्रकल्प मार्गी लागले आहेत. पायाभूत सुविधांची कामे गतीने पूर्ण होत आहेत. महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलल्याचे स्पष्टपणे दिसते आहे.

गेल्या चार वर्षात अखंड परिश्रम करत असतानाच निसर्गाची फारशी साथ मिळाली नाही. कधी अतिवृष्टी तर कधी अवकाळी पाऊस, गारपीट अशा कारणांमुळे शेतकऱ्यांना मोठ्या हालअपेष्टांना सामोरे जावे लागले. मात्र, आमचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. आजपर्यंतची राज्यातीलच नव्हे तर देशातील ऐतिहासिक कर्जमाफी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण– गाळयुक्त शिवार, सूक्ष्मसिंचनावर भर, शेती क्षेत्रात दुप्पट वाढ, कृषी स्वावलंबन योजना, कृषी संजीवनी योजना अशा योजनांची सुरुवात करून शेतकऱ्यांच्या उत्पन्न आणि उत्पादनात वाढ व्हावी, यासाठी आम्ही प्रयत्न केले.

सुशिक्षित बेरोजगार तरुणतरुणींना रोजगार आणि स्वयंरोजगाराची संधी मिळावी यासाठी कौशल्यशिक्षण आणि प्रशिक्षणावर भर दिला. या तरुणतरुणींना प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे कर्ज व इतर वेगवेगळ्या कर्ज योजनांमधून अर्थसाहाय्य दिले. त्यामुळे त्यांना आपला रोजगार सुरू करता आला. सर्व स्तरांवरील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, निर्वाहभत्ता, वसतिगृहाची व्यवस्था, दर्जेदार शिक्षण, परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती अशा विविध बाबींद्वारे प्रगती आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

समाजातील उपेक्षित घटकांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करून त्यांना घरकुले, उद्योगासाठी, शिक्षणासाठी साहाय्य दिले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या भव्य स्मारकाचे काम आम्ही इंदूमिलमध्ये सुरू करू शकलो याचा विशेष आनंद आणि अभिमान आहे.

सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किमतीत घरे मिळावीत, यासाठी वेगवेगळ्या योजनांमार्फत गृहबांधणीचा व्यापक कार्यक्रम राबवला जात आहे. महिलांना सक्षम व समर्थ करणाऱ्या विविध योजना राबवण्यात आल्या. माझी कन्या भाग्यश्री, अस्मिता अशा योजनांनी महिलांना प्रगतीच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या. आदिवासी क्षेत्रातील कुपोषणास आळा घालण्यावर विशेष प्रयत्न केले.

अन्नधान्याच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्यात आला. त्यात पारदर्शकता आणण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर करून बनावट खातेदारांची नावे वगळण्यात आल्याने, धान्याची बचत झाली. ९९ लाख अतिरिक्त लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभ देण्यात आला. बऱ्याच काळापासून अपूर्ण राहिलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देण्यात आले. प्रवाशांच्या सुरक्षेला एसटीने प्राधान्य दिले. ऑटोरिक्षा, टॅक्सीच्या माध्यमातून महिलांना रोजगार मिळावा यासाठी परवान्यांवरील निर्बंध उठवले. प्रवास अधिक सुखकर होण्यासाठी शिवशाही बसेस आणल्या. समाजातील सर्व घटकांना एसटी प्रवासात सवलती दिल्या. पर्यावरणाचे रक्षण व प्रदूषण मुक्तीसाठी प्लास्टिक बंदीचा निर्णय घेतला. सरकारने गेल्या चार वर्षात सर्वत्र अखंडित वीज उपलब्ध करून दिली. भारनियमनापासून महाराष्ट्रास मुक्ती दिली. प्रत्येक गावाला स्वच्छ पाणी पुरवठा होण्यासाठी प्रयत्न केले. आयुष्मान भारत या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील अधिकाधिक जनतेला आरोग्याच्या सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात यावर लक्ष केंद्रित केले. समाजातील सर्व घटकांना न्याय देण्यासोबतच त्यांना प्रगती, समृद्धी आणि सर्वांगीण विकासाच्या संधी गेल्या चार वर्षात उपलब्ध करून दिल्या.





लोकराज्यच्या या अंकात विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीचा लेखाजोखा आम्ही विस्तृतपणे मांडला आहे. हा अंक आपणास आवडेल याची खात्री आहे.

दिवाळीच्या आपणा सर्वांना मंगलमय शुभेच्छा.

**गिरीष महाजन**
**(अतिथी संपादक)**

# पूर्वीपेक्षा अधिक,
# पूर्वीपेक्षा उत्तम...



Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

**देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

अनेक आव्हानांना तोंड देत आम्ही चार वर्षात विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचा लेखाजोखा मांडणे मला चतुर्थ वर्षपूर्तीच्या निमित्ताने आवश्यक वाटते. कारण या विकास प्रयत्नांवरच उद्याचा सुरक्षित, समृद्ध आणि आरोग्यसंपन्न महाराष्ट्र साकारणार आहे. येत्या दशकांत महाराष्ट्र उद्योग, शेती, शिक्षण, सेवा आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये संपूर्ण देशाचे दिशादर्शन करेल, असा मला दृढ विश्वास आहे.

विकासाचे प्रयत्न लोकाभिमुख असलेच पाहिजेत पण त्यासोबतच ते शाश्वत असले पाहिजेत, असे मला वाटते. शाश्वततेची कल्पना गेली हजारो वर्षे भारतीय संस्कृतीने जनमानसात रुजवली आहे. 'सर्वेपि सुखिन: सन्तु असो' किंवा 'सबका साथ – सबका विकास' यामध्येही हीच शाश्वतता अपेक्षित आहे. ज्यातून समाजामध्ये, माणसामाणसांमध्ये तसेच माणूस आणि पर्यावरण यांच्यात सुसंवाद निर्माण होईल. यासाठी सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे, हे लक्षात घेऊन या क्षेत्रांमध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आम्ही मागील चार वर्षात केला. यासाठी दारिद्र्य निर्मूलन, शाश्वत कृषी उत्पादने, शिक्षण, आरोग्य, लिंग समानता, स्वच्छ पाणी, स्वच्छ गावे, स्वच्छ शहरे, परवडणारी वीज आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सामाजिक सलोखा यांसारख्या १७ विषयांना राज्याच्या मुख्य अजेंड्यावर ठेवत राज्य शासनाने कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य या क्षेत्रात परिवर्तनात्मक पावले उचलली आहेत.

## कृषी क्षेत्राकडे विशेष लक्ष

राज्यातील ५० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे रोजगारासाठी शेतीक्षेत्रावर अवलंबून आहे. असे असले तरी या क्षेत्राचे राज्याच्या सकल उत्पादनात हे प्रमाण अवघे १०.५ टक्के एवढे आहे. त्यामुळे पर्यायी रोजगाराच्या संधी निर्माण करून शेती क्षेत्रावरचा बोजा कमी करणे, हे राज्यासमोरचे मोठे आव्हान आहे. साधारपणे असे मानले जाते की, सेवा क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तीची उत्पादकता ही शेतीवर उपजीविका करणाऱ्या व्यक्तीपेक्षा १० पट आणि उत्पादन क्षेत्रात रोजगार असणाऱ्या व्यक्तीपेक्षा ७ पटीने कमी असते. हे लक्षात घेतले तर शेतीक्षेत्रावरचे मनुष्यबळ इतर क्षेत्रात गुंतवणे किती महत्त्वाचे आहे हे लक्षात येईल.

कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे, दीर्घ कालावधीच्या उपाययोजना राबवणे महत्त्वाचे आहे, हे आम्ही सत्ता स्थापन केल्याबरोबरच सांगितले होते. त्यानुसार २०१६–१७ मध्ये ५६,५७६ कोटी एवढी गुंतवणूक तर २०१७–१८ मध्ये ७३ हजार ४४० कोटी एवढी लक्षणीय गुंतवणूक कृषी क्षेत्रात करण्यात आली. पावसाच्या लहरीवर अवलंबून असणाऱ्या शेतीला शाश्वत सिंचनाखाली आणून, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शेती आणि कृषिप्रक्रियेला चालना देणे हा भविष्यातील कृषिविकासाचा मंत्र असेल. त्यादृष्टीने जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण–गाळयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे यांसारख्या योजना राबवण्यात आल्या. यापैकी 'मागेल त्याला शेततळे' या योजनेला राष्ट्रीय स्तरावर १० नावीन्यपूर्ण उपक्रमांमध्ये प्रधानमंत्री पुरस्कार मिळाला असून याच योजनेच्या ऑनलाइन ॲप्लिकेशन मॉडेलला 'स्कॉच ॲवॉर्ड प्लॅटिनेम' मिळाले.

## विशेष कार्यक्रम

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या जलद विकासासाठी उपाययोजनांचा विशेष कार्यक्रम– २०१८

> **लोकाभिमुख आणि पारदर्शक सुशासनाच्या संकल्पासह सुरू केलेल्या महाराष्ट्राच्या नवबांधणीच्या प्रयत्नांना चार वर्षे पूर्ण होत आहेत. या चार वर्षांमध्ये कृषी उत्पादनात दुपटीने वाढ करण्यासाठी आखण्यात आलेली ध्येयधोरणे, शिक्षण क्षेत्रातील बदल, उद्योगवाढीसाठी आखण्यात आलेली धोरणे, विदेशी गुंतवणूक, वाहतूक व्यवस्था आणि पायाभूत सुविधांमध्ये घडवून आणण्यात येत असलेले क्रांतिकारी बदल हे विविध सामाजिक घटकांच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचाच भाग आहेत.**

अंतर्गत एकूण २२ हजार १२२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. ज्यामध्ये १३ हजार ४२२ कोटी रुपये या भागातील ८९ सिंचन प्रकल्पासाठी देण्यात आले आहेत.

हवामानाचा अचूक अंदाज मिळावा ज्यामुळे शेतीबाबतचे निर्णय घेणे सोपे होईल, ही शेतकऱ्यांची साधी अपेक्षा असते. परंतु विभागीय स्तरावर देण्यात येणारे हवामानाचे अंदाज खरे ठरत असले तरी स्थानिक पातळीवर ते फारसे उपयोगाचे ठरत नसल्याचा अनुभव येतो. यावर उपाय म्हणून महावेध प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व २०६० महसूल मंडळांमध्ये सार्वजनिक-खासगी भागीदारीतून स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यात आली आहेत. यामुळे गावपातळीवर हवामानाचा अचूक अंदाज प्राप्त होईल. ही माहिती गावागावांमधून डिजिटल किऑस्क बोर्डाच्या माध्यमातून मिळणार असल्याने शेतीचे नियोजन अधिक सुलभ होईल.

## कृषी यांत्रिकीकरण

कृषी यांत्रिकीकरण हा शेतीच्या शाश्वत विकासासाठी येत्या काळातील परवलीचा शब्द असेल. २००२ ते २०१४ या १२ वर्षात ३०१ कोटी रुपये असणारा कृषी यांत्रिकीकरणावरचा खर्च मागील ४ वर्षात दुप्पटीहून अधिक म्हणजे सुमारे ८०९ कोटी रुपये एवढा वाढला आहे. आतापर्यंत १७ हजार ७२१ ट्रॅक्टर्स, ८ हजार १०५ पॉवर टिलर्स, १२ हजार १५८ रोटा वेटर्स, ४० हजार ८७७ ट्रॅक्टरचलित अवजारे, तर ८ हजार ९१६ पीक संरक्षण अवजारे वितरित करण्यात आली. याशिवाय फळे-भाज्यांवर प्रक्रिया करणे सुलभ व्हावे, यासाठी ९६२ प्रक्रिया संयंत्रे देण्यात आली आहेत.

राज्यामध्ये आजघडीला शेतकऱ्यांना शेती अवजारे सहज उपलब्ध व्हावीत म्हणून १७२ अवजार बँका निर्माण करण्यात आल्या आहेत.

जास्तीत जास्त कृषी क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. या योजनेत सहभागी होण्यासाठी करावयाच्या अर्जाबरोबर आधी २४ कागदपत्रे जोडावी लागत होती, ही संख्या आता अवघ्या ९ पर्यंत खाली आणली. २०१४ पासून ७.२० लाख हेक्टर कृषी क्षेत्रावर सूक्ष्म सिंचन संचांची उभारणी करण्यात आली. त्यामुळे ८.४१ लाख शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत झाली. याशिवाय मागच्या वर्षीपासून अनुसूचित जाती व जमातीच्या शेतकऱ्यांना विहिरींकरिता देण्यात येणाऱ्या अनुदानात १ लाखावरून अडीच लाख रुपयांपर्यंत एवढी वाढ करण्यात आली. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत हरितगृह आणि शेडनेट उभारण्यासाठी आतापर्यंत २९८ कोटी ६२ लाख एवढा निधी वितरित करण्यात आला आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना व पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. तसेच या योजनेंतर्गत मराठवाड्यातील जालना आणि बीड या जिल्ह्यांना प्रधानमंत्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## औद्योगिक गुंतवणुकीत लक्षणीय वाढ

या साऱ्या प्रयत्नांचे एकमेव उद्दिष्ट २०२२ पर्यंत शेतीचे उत्पन्न दुप्पट करणे हे आहे. हे सारे जरी असले तरी उद्योग क्षेत्रातील एकूणच गुंतवणूक वाढली तरच कृषी क्षेत्रावरचे अवलंबित्व कमी होऊन शेती फायद्याची होणे शक्य आहे, हे लक्षात घेऊन गेल्या चार

## जलयुक्त शिवार

जलयुक्त शिवार अभियान राबवण्यासाठी गेल्या तीन वर्षात निवडण्यात आलेल्या एकूण १६ हजार ५१९ गावांपैकी १५ हजार ८५९ गावे दुष्काळमुक्त झाली आहेत. हे अभियान यावर्षी ६ हजार २०० गावांमध्ये लोकसहभागातून तेवढ्याच उत्स्फूर्तपणे राबवले जात आहे. यातून आतापर्यंत ५ लाख ३९ हजार ९१ कामे पूर्ण झाली असून एकूण २७ लाख ३७ हजार हेक्टर जमिनीला एकवेळचे संरक्षित सिंचन लाभले आहे. या कामांमध्ये लोकसहभागातून आतापर्यंत ९०७ लाख घनमीटर गाळ काढण्यात आला असून, या अभियानामुळे टँकर्सच्या संख्येत सुमारे ७५ टक्क्यांहून अधिक घट झाली आहे. या अभियानाचा परिणाम म्हणजे पीक उत्पादकतेत ३० ते ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे तर राज्यातील रब्बी क्षेत्रामध्ये २५ ते ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. भूजलस्तरामध्ये दीड ते २ मीटरने वाढ झाली, हे या अभियानाचे यश म्हणावे लागेल. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेची दीड वर्षापूर्वी सुरुवात झाली असली तरी या योजनेने ५ हजार २७० धरणांना आतापर्यंत गाळमुक्त करत, ३२ हजार २७४ टीसीएम एवढा पाणीसाठा आतापर्यंत या योजनेतून निर्माण झाला. जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण - गाळयुक्त शिवार या योजनांद्वारे आतापर्यंत एकूण ९.२३ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. एवढेच नाही तर मृद् व जलसंधारणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी औरंगाबाद येथे मृद् व जलसंधारण आयुक्तालयाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

वर्षात उद्योग क्षेत्रात अनेक नावीन्यपूर्ण धोरणांची आखणी करून तसेच प्रक्रियांच्या सुलभीकरणातून परिवर्तन घडवून आणण्यात आले आहे.

सध्याचे देशातील औद्योगिक परिवर्तन हे अनेक अर्थतज्ज्ञ आणि विचारवंतांच्या मते सर्वात महत्त्वाचे परिवर्तन आहे. साहजिकच महाराष्ट्रासारख्या औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राज्याला इतर राज्यांशी स्पर्धा करताना आर्थिक विकासासाठी, रोजगार निर्मितीसाठी आणि राज्याचा महसूल वाढवण्यासाठी व्यावसायिक दृष्टिकोन स्वीकारण्याची आवश्यकता होती. आता तो राज्याने स्वीकारल्याने आज महाराष्ट्र १२० दशलक्ष डॉलर्स विदेशी गुंतवणुकीसह देशात क्रमांक एकचे राज्य आहे. पूर्वी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक या सुवर्ण चौकोनापुरता मर्यादित असलेला राज्याचा औद्योगिक विकास या चौकटीपलीकडे जाऊन नागपूर, अमरावती, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नांदेड, जालना असा विस्तारू लागला आहे.

केवळ परकीय गुंतवणूक येऊन महाराष्ट्राचा परिपूर्ण विकास होऊ शकत नाही, याचे भान ठेवत आम्ही जागतिक उद्योगसमूहांना आमंत्रित करतानाच, राज्यातही उद्योजकता रुजावी आणि वाढावी, यासाठी 'मेक इन महाराष्ट्र' या कार्यक्रमांतर्गत राज्याच्या औद्योगिक क्षेत्रात मोठे बदल घडवून आणले. याशिवाय राज्याच्या औद्योगिक, व्यावसायिक वातावरणाशी सुसंगत असे क्लस्टर विकासाचे धोरण राबवून ग्रामीण भागात शहरांतील भौगोलिक वैशिष्ट्यांना अनुसरून, उद्योगघटक स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे. येत्या दहा वर्षात राज्यात ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न साकारण्यासाठी प्रत्येक क्षेत्राचा स्वतंत्र विचार व त्यासाठी विशेष अशा धोरणांची आखणी करून नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येत आहेत.



'मेक इन इंडिया' आणि 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' या कार्यक्रमांमधून राज्याची औद्योगिक क्षेत्रातील प्रतिमा अधिकच तेजोमय झाली आहे. २०१६ मध्ये मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या 'मेक इन इंडिया' अंतर्गत २ हजार १८४ सामंजस्य करार करण्यात आले होते, त्यापैकी ७१ टक्क्यांहून अधिक करार प्रत्यक्षात आले आहेत. तसेच मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स २०१८ यामध्येही राज्यात १२ लाख १० हजार ४६४ कोटींचे ४१०६ करार झाले, ज्यातून भविष्यात ३६ लाखांहून अधिक रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील. या करारांमधून येणारे उद्योग महाराष्ट्रातील अविकसित क्षेत्रात स्थापन होतील. विशेषतः गडचिरोली, हिंगोली, परभणी, नंदुरबारसारख्या औद्योगिकदृष्ट्या अविकसित जिल्ह्यांना यातून सर्वाधिक फायदा होणार आहे.

जगभर कॉर्पोरेट गुड गव्हर्नन्स आणि कायदापालनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, त्यामुळे गुंतवणुकीसाठी परराष्ट्रातील कंपन्यांना महाराष्ट्र जास्त चांगला पर्याय ठरतो आहे. डिजिटल तंत्रज्ञानामुळे जगातील अन्य देशांमध्ये रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. सेवांमध्ये सुधारणा घडून येत आहेत. माहिती–तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अधिकाधिक रोजगारनिर्मिती यापुढील काळात अपेक्षित आहे. माहिती–तंत्रज्ञान आणि माहिती–तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरणानुसार या क्षेत्रात राज्यात १० लाखांपर्यंत रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट राज्याने ठेवले आहे. तसेच दरवर्षी एक लाख कोटींची निर्यात याद्वारे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र स्कील गॅप सर्व्हे २०१२–२२ नुसार २०२२ पर्यंत ३४ लाख कौशल्यपूर्ण नोकरीच्या संधी राज्यात निर्माण होणार आहेत. यामध्ये १४.५ लाख बँकिंग आणि आर्थिक क्षेत्र, ११.४ लाख आय.टी. आणि ७.५ लाख माध्यमे आणि ॲनिमेशन या क्षेत्रात असतील. त्या दृष्टीने राज्यातील ५० दशलक्ष तरुणाईला रोजगारक्षम बनवण्याचे राज्याचे उद्दिष्ट आहे. आजघडीला २ लाखांहून अधिक तरुणांना कौशल्य विकास अभियानांतर्गत व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले आहे.

राज्य शासनाने फिनटेक, स्टार्ट अप, महिला उद्योग, लॉजिस्टिक, इलेक्ट्रॉनिक्स यासारखी नवी धोरणे आखली असून यामुळे राज्यात उद्योगांना अनुकूल वातावरण तयार होण्यास मदत झाली आहे. दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने जगातील चौथ्या औद्योगिक क्रांतीसाठी स्थापन केलेल्या केंद्राचा मुंबई येथे विस्तार करण्यात आला असून, याद्वारे ज्ञानाचे आदानप्रदान करण्याबरोबरच विज्ञान–तंत्रज्ञानाधारित धोरणांची अंमलबजावणी करणे अधिक सुकर होईल. या केंद्राच्या माध्यमातून रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, शेतीसाठी ड्रोनसारख्या तंत्राच्या वापरावर भर देण्यात येणार आहे.

### पायाभूत सुविधांकडे विशेष लक्ष

अनेक वर्ष रखडलेले मुंबई कोस्टल रोड, मुंबई ट्रान्स हार्बर लिंकसारख्या अनेक प्रकल्पांसाठी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्य शासनाला वेळोवेळी मदतीचा हात दिल्याने केंद्राची परवानगी मिळाली आहे. पायाभूत सुविधांचे विशेषतः

## सर्वसामान्यांना घरे

घर नसलेल्यांना हक्काचे घर देण्यासाठी राज्यातील ३८३ शहरांमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेबरोबरच इतर योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यात सुमारे २० लाख घरांची आवश्यकता आहे. पोलीस, गिरणी कामगार, उपेक्षित-वंचित, आदिवासी या सर्वच घटकांना हक्काचे घर मिळावे, यासाठी विविध उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. २०२२ पूर्वीच या घटकांना घरे देण्याचा शासनाचा संकल्प आहे.

राज्यातील घर घेणाऱ्या नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याबरोबरच बांधकाम व्यवसायातील अनियमित बाबींना चाप लावण्यासाठी गृहनिर्माण नियमन कायदा (रेरा) उपयुक्त ठरतो आहे. विशिष्ट कालमर्यादेत ग्राहकांना घर देण्याचे बंधन तसेच प्रकल्पाशी संबंधित प्रत्येक बाबींचे करावे लागणारे डॉक्युमेंटेशन यामुळे बांधकाम व्यावसायिकांचे उत्तरदायित्व वाढल्याने एकूणच बांधकाम व्यवसायात अधिक पारदर्शकता आली आहे, यात शंका नाही.



मुंबईमधल्या दळणवळणाशी संबंधित अनेक प्रकल्पांची आखणी, नियोजन तसेच कामाची प्रत्यक्ष सुरुवात करणे केंद्राच्या सहकार्यानेच शक्य झाले आहे.

देशात पायाभूत सुविधांची सर्वाधिक गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये झाली असून गेल्या चार वर्षात एक लाख ४४ हजार कोटी रूपयांचे २८४ पायाभूत प्रकल्प मंजूर झाले आहेत. याशिवाय राज्यात २७ हजार कोटींची १०७ राष्ट्रीय महामार्गांची विविध कामे सुरू असून आज २२ हजार कि.मी. राष्ट्रीय महामार्गांचे राज्यात जाळे निर्माण करण्यात आले आहे. केंद्राच्या सहकार्याने महाराष्ट्रातील रेल्वे मार्गांचे जाळे विस्तृत होत आहे. राज्यातील रेल्वे विकासाच्या विविध प्रकल्पांसाठी गत चार वर्षात १ लाख ३५ हजार ५७ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत.

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यातील रेल्वेमार्गांसाठी देशात सर्वाधिक म्हणजे ६ हजार ६५८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुंबईसह राज्यातील नागपूर आणि पुणे येथे मेट्रो मार्गाची कामे वेगाने सुरू आहे. विशेषत: मुंबईत १२ मार्गांच्या माध्यमातून २७६ कि.मी.चे मेट्रो जाळे निर्माण करण्यात येत असून त्यासाठी जवळपास सव्वा लाख कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

समृद्धी महामार्गामुळे मुंबई-नागपूर हे अंतर आठ तासात गाठता येईल तर औरंगाबाद आणि नागपूर ही शहरे चार तासांच्या अंतरावर येतील. हा महामार्ग डीएमआयसी, वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरला तसेच जालना आणि वर्ध्याच्या ड्रायपोर्टला जेएनपीटीशी जोडणार असल्याने राज्याच्या एकूणच व्यापारावर त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल. या महामार्गालगत मराठवाडा, विदर्भात विकसित होणाऱ्या कृषी समृद्धी केंद्र आणि कृषी आधारित उद्योगांमुळे कृषी उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध होऊन अर्थव्यवस्थेला गती मिळेल.

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रिअल कॉरिडॉर (डीएमआयसी) हा जगातला सर्वात मोठा पायाभूत प्रकल्प आहे. या कॉरिडॉरपैकी ४ इंडस्ट्रिअल नोडस् महाराष्ट्रात आहेत. डीएमआयसी या महत्त्वाच्या प्रकल्पांतर्गत शेंद्रा बिडकीन येथे १० हजार एकर क्षेत्रावर ऑरिक सिटी ही भारतातील पहिली इंडस्ट्रिअल स्मार्ट सिटी असेल, ज्यामध्ये २०३० पर्यंत अंदाजे ७० हजार कोटींची गुंतवणूक येणे अपेक्षित असून ३० लाख लोकांना रोजगार मिळण्याचा अंदाज आहे. याशिवाय कोस्टल रोड, मेट्रो प्रकल्प, एमटीएचएल, नवी मुंबई विमानतळ यासारख्या प्रकल्पांमुळे जागतिक दर्जाच्या परिवहन व्यवस्था राज्यात उपलब्ध होतील.

## सर्वस्पर्शी विकास

राज्यशासन आणि खासगी क्षेत्राच्या सहभागाने राज्यातील १००० अविकसित ग्रामपंचायतींमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान (व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन स्किम) राबवण्यात येत आहे. यासाठी आतापर्यंत १९ जिल्ह्यांतील ६५० गावांमध्ये नेमण्यात आलेल्या ३२० मुख्यमंत्री ग्रामपरिवर्तकांनी या गावांमध्ये लक्षणीय परिवर्तन घडवून आणले आहे. रमाई, प्रधानमंत्री आवास, शबरी या घरकूल योजनांमधून ९००० घरे बांधण्यात आली. स्वच्छ भारत अभियानांतर्गत या परिवर्तकांनी २१००० शौचालये बांधली. ५०० शाळा, अंगणवाड्या डिजिटल केल्या. ४२०० घरांपर्यंत वीज पोहोचवली आणि १० हजार गृहिणींना गॅस सिलेंडर देऊन इंधनाच्या त्रासापासून सुटका केली. यातून या योजनेची यशस्विता लक्षात येते. थेट लाभ हस्तांतरण योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होत असून १८ लाखांहून अधिक लाभार्थ्यांची जोडणी करणे यामुळे शक्य झाले. विशेषत: सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या विविध योजनांच्या लाभासाठी १३ लाखांहून अधिक लाभार्थ्यांची नोंदणी झाल्याने नवे डिजिटल तंत्रज्ञान वंचित-उपेक्षितांच्या फायद्याचे ठरले आहे.

## सामाजिक क्षेत्रातही राज्य अग्रेसर

विविध क्षेत्रात महाराष्ट्र देशात अग्रेसर असताना सामाजिक क्षेत्रातही आपले राज्य अग्रेसर असावे या भावनेने या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्ती-संस्थांना सरकारने नेहमीच प्रोत्साहन दिले आहे.

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

### आयुष्मान महाराष्ट्र

आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून देशातील अडीच लाख केंद्रांतून दारिद्र्यरेषेखालील १० कोटी कुटुंबांमधील सुमारे ५० कोटी जनतेला ५ लाखांपर्यंत विनामूल्य उपचार मिळणार असल्याने, आता कोणताही गरजवंत आरोग्य सुविधांपासून वंचित राहणार नाही. एवढी मोठी आरोग्य योजना आजवर कधीही जगात आखली गेली नव्हती. या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील ८४ लाख कुटुंबांना उपचारांचा लाभ मिळणार आहे. राज्याची महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र राज्याच्या योजनेंतर्गत २.२ कोटी कुटुंबांना पूर्वीप्रमाणेच लाभ देण्याची सुविधा कायम राहणार असून आयुष्मानमधून अधिकचे लाभ मिळणार आहेत. महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेतून आतापर्यंत २० लाख रुग्णांवर शस्त्रक्रिया राज्यात करण्यात आल्या आहेत. याशिवाय राज्यात आतापर्यंत १८ हजार आरोग्य शिबिरांच्या आयोजनातून २५ लाख रूग्णांपर्यंत वैद्यकीय सुविधा पोहोचवण्यात आल्या आहेत.

राज्यातील दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध भूमिहीन कुटुंबांना राज्यात दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत १०० टक्के अनुदान देण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती गटासाठीच्या उत्पन्न मर्यादेत (नॉन क्रिमिलेअर) ६ लाखांवरून ८ लाख रुपये एवढी वाढ करण्यात आली. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत अल्पभूधारक शेतकरी तसेच नोंदणीकृत मजुरांच्या मुलांना शहरात राहून उच्च शिक्षण घेणे शक्य व्हावे, म्हणून मोठ्या शहरांमधील विद्यार्थ्यांना दर महिन्याला तीन हजार रुपये तर छोट्या शहरांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन हजार रुपये भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेची उत्पन्न मर्यादा आता ८ लाख करण्यात आली असून, यासाठी शासनाने ६०५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. जात वैधता प्रमाणपत्राभावी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया मुदतीत पूर्ण होण्यासाठी कायद्यात सुधारणेचा अध्यादेश काढण्यात आला आहे. स्वतंत्र ओबीसी विभागाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

### आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक

मुंबई येथील इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक बांधण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे. या स्मारकासाठी १५० कोटींची तरतूद करण्यात आली असून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली असून स्मारकाचे काम तीन वर्षात पूर्ण करण्याचा शासनाचा निर्धार आहे. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याशी संबंधित राज्यातील २८ स्थळांचा विकास करणार येणार असून त्यात चंद्रपूर आणि देसाईगंज येथील दीक्षाभूमी आदींचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अलीपूर येथील निवासस्थान राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकांच्या वस्तीमध्ये मूलभूत सोयीसुविधा पुरवण्यासाठी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास' या नव्या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

### आदिवासी विकास

आदिवासी विकासासासाठी गेल्या आर्थिक वर्षात ११२० कोटी रुपयांचा निधी केंद्राकडून मंजूर करण्यात आला. राज्यात आदिवासी विकास उपयोजनेसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ८ हजार ९६९ कोटी रुपयांचा निधी तर अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ९ हजार ९४९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत प्रवेश देण्यात येत असून त्यासाठी ३७८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. या योजनेंतर्गत आतापर्यंत ५३ हजार ३५३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गातील घटकांना औद्योगिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, राज्यातील २८० एमआयडीसीमध्ये या समाजातील उद्योजकांसाठी २० टक्के भूखंड राखीव ठेवण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष प्रोत्साहन योजनेमुळे १४० हून अधिक उद्योजकांना उद्योग स्थापन करणे शक्य झाले.

विकासाच्या या प्रयत्नांना जनतेची मोठी साथ लाभली आहे. या योजनांमध्ये वाढता लोकसहभाग हे त्याचे द्योतक आहे. कर्जमुक्ती व्हावी म्हणून समाजाच्या विविध स्तरांतील लोकांनी दिलेली आर्थिक मदत असो किंवा जलयुक्त शिवारसारख्या योजनांमधील श्रमदान असो, लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. विकासाच्या प्रयत्नांना लाभणारी ही लोकसहभागाची साथ महाराष्ट्राला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देईल, यात शंका नाही.

**शब्दांकन : कीर्ती पांडे,** मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी



**चंद्रकांत (दादा) पाटील**
मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून)

**"गेल्या अनेक वर्षापासून राज्यातील रस्त्यांची निर्मिती, त्यांची देखभाल याकडे म्हणावे तेवढे लक्ष न दिल्यामुळे वाहतुकीची गती मंदावली होती. मात्र, गेल्या चार वर्षात हे चित्र बदलण्यास सुरुवात झाली. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान वापरून, नव्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू झाले आहे."**

# गतिमानतेतून समृद्धी...

**चंद्रकांत (दादा) पाटील**

राज्य शासनाने गेल्या चार वर्षात रस्त्यांच्या विकासावर आणि त्यांचा दर्जा उंचावण्यावर जास्त लक्ष केंद्रित केले. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच रस्ते विकासासाच्या दृष्टिकोनात मूलभूत बदल केला गेला. २००४-०५ ते २०१४-१५ या वर्षात सुमारे २६९२२.५७ कोटी रुपये इतकी तरतूद रस्ते विकासासाठी केली होती. मात्र २०१५-१६ ते २०१८-१९ या चार वर्षात २४२८८.५१ कोटी एवढी तरतूद करण्यात आली. मागील शासनाच्या काळापेक्षा हा निधी कितीतरी जास्त आहे.

## आधुनिक हॅम प्रणाली

रस्ते सुधारण्यासाठी आधुनिक असे हायब्रीड न्यूइटी मॉडेल स्वीकार केला. या प्रणालीमध्ये शासनाचा सहभाग ६० टक्के असून दोन वर्षांच्या कालावधीत रस्त्यांची दुरुस्ती करून, पुढील दहा वर्षे त्याची देखभाल करण्याची अट आहे. यामुळे रस्त्यांची स्थिती चांगली राहण्यास मदत होईल. या माध्यमातून पहिल्यांदाच ३० हजार कोटी रुपयांच्या किमतीच्या १० हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्यात येत आहे. लाईट डिटेक्शन ॲण्ड रेंजिंग या आधुनिक पद्धतीचा वापर सर्वेक्षणासाठी करण्यात आला आहे. हॅम प्रणालीचा वापर करून आतापर्यंत ३५हून अधिक ठिकाणची कामे प्रत्यक्षात सुरू झाली आहेत. ११० पॅकेजच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. या प्रणालीमध्ये कंत्राटदारांनी सहभागी व्हावे, यासाठी पहिल्यांदाच जगभरातील कंत्राटदारांबरोबर संपर्क साधण्यात आला.

हॅम प्रणालीबरोबरच योजनांतर्गत निधी, नाबार्ड, केंद्रीय मार्ग निधी, योजनेत्तर कार्यक्रम आदींच्या माध्यमातून मे २०१९ पर्यंत १५ हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण पूर्ण करण्यात येईल. राष्ट्रीय महामार्गाची ४८ हजार कोटी रुपयांची कामे सुरू आहेत.

मे २०१९ पर्यंत सहा हजार कि.मी. रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात येतील. रस्त्यांचे कोअर नेटवर्क तयार करण्यात आले, त्यानुसार कामे अर्थसंकल्पित करण्यात आली.

रेल्वे मार्गावर फाटक बसवण्याचा महत्त्वपूर्ण कार्यक्रम हाती घेतला. याद्वारे केंद्र शासनाच्या भूतल परिवहन विभाग, रेल्वे मंत्रालय यांच्या सहयोगाने २०९ रेल्वे मार्गावरील पूल (आरओबी) बांधण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आले. यातील १५९७ कोटी रुपयांची ४५ कामे प्रगतिपथावर आहेत.

## द्विवार्षिक देखभाल दुरुस्ती

सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्य निर्मितीनंतर पहिल्यांदाच रस्ते देखभाल व दुरुस्तीच्या अनुषंगाने किमान १० कि.मी. लांबीसाठी द्विवार्षिक देखभाल दुरुस्तीच्या निविदा निश्चित केल्या. यामुळे देखभाल व दुरुस्तीत परिणामकारकता व पारदर्शकता आली. संनियंत्रण सुलभ झाले. या माध्यमातून ५४ हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यांची द्विवार्षिक देखभाल दुरुस्तीसाठी निवड करण्यात आली. या कामावर नियंत्रण व लक्ष ठेवण्यासाठी मंत्रालयात वॉर रूमची स्थापना करण्यात आली. या कामांची छायाचित्रे जीओ टॅगसह संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असून यामुळे रस्त्यांमधील खड्डे भरण्याच्या कामावर नियंत्रण ठेवणे सोपे झाले.

## टोलमाफीतून दिलासा

खासगी भागीदारीतून बांधण्यात आलेल्या रस्त्यांवर अनेक ठिकाणी टोल शुल्क आकारले जात होते. यामुळे सर्वसामान्य

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

वाहतूकदार व प्रवाशांवर त्याचा बोझा पडत होता. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या आधिपत्याखालील पथकर स्थानके (टोलनाके) बंद करण्याचा व काही ठिकाणच्या पथकर स्थानकांवर कार, जीप, एस.टी., व स्कूल बसेस यांना पथकरांतून वगळण्याचा निर्णय घेतला. ३१ मे २०१५ पासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ३८ पैकी ११ व महामंडळाकडील १ अशी १२ पथकर स्थानके बंद करण्यात आली. मुंबई वगळता उर्वरित सर्व पथकर स्थानकांवर कार, जीप, एस.टी. व स्कूल बसेस यांना पथकरातून सूट देण्यात आली. या निर्णयामुळे सर्व पथकर स्थानकावरील वाहतूक कोंडी व गर्दी कमी झाली. पथकर स्थानकांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पथकर वसुली व तद्‌संबंधीची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात येत आहे.

विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या महामार्गावर प्रवाशांच्या सोईसाठी १६० ठिकाणी स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात येईल.

### हरित इमारतींसाठी पुढाकार

शासकीय इमारती या हरित इमारती संकल्पनेवर असाव्यात यासाठी विभागाने पुढाकार घेतलो. सध्या नवीन बांधण्यात येणाऱ्या शासकीय इमारती व निवासस्थाने ही हरित इमारत संकल्पनेनुसार बांधण्यात येत आहेत. पर्यावरणपूरक व ऊर्जा कार्यक्षम इमारती बांधण्यासाठी हरित इमारती (ग्रीन बिल्डिंग) बांधण्याचा निर्णय घेणारे पहिले राज्य म्हणून महाराष्ट्राने पुढाकार घेतला आहे. या धोरणानुसार सध्या एक प्रकल्प पूर्ण झाला असून ९० कामे प्रगतिपथावर आहेत. २०१८-१९ मध्ये १२५ कामे सुरू करण्यात येतील.

शासकीय इमारतींमधील जुने झालेले बल्ब, पंखे, वातानुकूलन यंत्रे ही काढून त्याऐवजी ऊर्जाक्षम, विजेची बचत करणारी उपकरणे बसविण्यात येत आहेत. यासाठी केंद्र शासनाच्या ऊर्जा कार्यक्षमता सेवा कंपनीसोबत सार्वजनिक बांधकाम विभागाने करार केला. यानुसार आतापर्यंत राज्यातील १४८१ इमारतीमधील ९४,२६० पंखे व २१७८३९ ट्युब बदलण्यात आले. यामुळे वार्षिक १२४ दशलक्ष युनिटची बचत अपेक्षित असून वीज बिलातही दरवर्षी रु. ११९ कोटी बचत होईल.

### सर्वसामान्यांना दिलासा

गेल्या चार वर्षात महसूल विभागाने घेतलेले सर्व निर्णय लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी उपयुक्त असे आहेत. भूमीधारी शेतकरी सिंधी समाजाच्या जमिनी, भाडेपट्टे अशा महत्त्वाच्या प्रश्नांवर विभागाने निर्णय घेतले. विभागाकडे १५० वर्षापासूनच्या जास्त नोंदी आहेत. या सर्व नोंदीचे डिजिटायझेशन करण्यात येत आहे. राज्यातील जमिनींच्या नकाशांच्या डिजिटायझेशनचे काम वेगाने सुरू आहे. प्रत्येक जिल्ह्यातील महसूल खात्यात असलेले सुमारे अडीच कोटी कागदपत्रेही डिजिटल स्वरूपात साठवण्याचे काम करण्यात येत आहे. यामुळे शासकीय व्यवहारामध्ये पारदर्शकता वाढेल.

### मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्कात सूट

पती, पत्नी, मुलगा, मुलगी, नातू, नात, मरण पावलेल्या मुलाची पत्नी यांना निवासी आणि कृषी मालमत्ता बक्षीस दिलेली

## परिवर्तन पर्व

### छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे काम सुरू

छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक असावे, अशी राज्यातील जनतेची इच्छा होती. २००१ पासून अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्याच्या हालचाली होत्या. प्रत्यक्षात २०१४ पर्यंत या कामाच्या अंमलबजावणीत काहीही झाले नव्हते. आमचे शासन आल्यानंतर राजभवनापासून २.५ कि.मी. अंतरावर १५.९६ हेक्टर जागा निश्चित करण्यात आली. स्मारकासाठी आवश्यक ती सर्व ना हरकत दाखले प्राप्त तसेच बांधकामविषयक सर्व परवाने प्राप्त झाले आहेत. स्मारकाचे जलपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २४ डिसेंबर,२०१६ रोजी झाले. हे स्मारक जगातील सर्वात उंच स्मारक होणार असून, त्याची उंची २१२ मीटर एवढी आहे. स्मारकाच्या कामासाठी लार्सन अँड टुब्रो कंपनीला कार्यारंभ आदेश देण्यात आला. सुमारे २५८१ कोटी रुपयांच्या या स्मारक प्रकल्पासाठी २०१८-१९ साठी रु. ५०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली. स्मारकाचे प्रत्यक्ष सर्वेक्षण व बांधकामासाठी चाचणी रंध्रे घेण्याचे काम सुरूही झाले. या स्मारकामध्ये समुद्रभिंत, प्रदर्शन गॅलरी, ॲम्फी थिएटर, हेलिपॅड, लँडस्केप गार्डन यांचा समावेश आहे.


संकल्प चित्र

## इलेक्ट्रिक वाहने वापरणारे पहिले राज्य




शासकीय वाहनांसाठी होणारा इंधनाचा खर्च आटोक्यात यावा तसेच रस्त्यांवरील प्रदूषण कमी होण्यासाठी शासनाने इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरावर भर दिला आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने वाहने भाडेतत्त्वावर घेण्याचा करार केला आहे. नुकतीच पाच वाहने विभागाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते देण्यात आली. टप्प्याटप्प्याने एक हजार इलेक्ट्रिकल वाहने घेण्यात येतील. पर्यावरणपूरक ई–कार उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.

असल्यास त्यासाठी पूर्वी मालमत्ता मूल्याच्या एक टक्का मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क घेण्यात येत होते. मात्र अशा मालमत्ता हस्तांतरणासाठी २०० रुपये मुद्रांक शुल्क व २०० इतकी नाममात्र नोंदणी शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला. यामुळे ३१ जुलै, २०१८ पर्यंत राज्यातील पावणे दोन लाखांहून अधिक नागरिकांनी याचा लाभ घेतला. या निर्णयामुळे मुद्रांक शुल्काची १,३१२ कोटी रुपयांची तर नोंदणी शुल्कापोटी २१८ कोटी रुपयांची सवलत देण्यात आली.

## अकृषिक वापराच्या परवानगीतून सुटका

मंजूर झालेल्या विकास आराखड्यात किंवा प्रारूप प्रादेशिक योजनेत समाविष्ट जमिनीचा, अनुज्ञेय बिनशेती वापर करण्यासाठी स्वतंत्र बिनशेती परवानगीची आवश्यकता नाही, असा निर्णय घेतला. फक्त रूपांतरण कर, अकृषिक आकारणी व आवश्यक तेथे नजराणा किंवा अधिमूल्य भरल्यावर अशा जमिनीचे विकास आराखड्यातील वापर विभागानुसार मानीव अकृषिक रूपांतरणाची तरतूद करण्यात आली. यामुळे घराच्या बांधकामासाठी अकृषिक परवान्यासाठी नागरिकांचे वारंवार घालावे लागणारे हेलपाटे वाचणार आहेत. गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या हद्दीपासून २०० मीटरच्या आत स्थित असलेली जमीन प्रारूप / अंतिम प्रादेशिक योजनेनुसार अनुज्ञेय बिनशेती किंवा निवासी वापर प्रयोजनासाठी अकृषिक वापरात रूपांतरित झाली असे समजण्याची तरतूद करण्यात आली. यामुळे गावाच्या हद्दीपासून २०० मीटरवरील घरांच्या बांधकामांना मोठा फायदा होईल.

## भूमिधारी झाले भूमिस्वामी

विदर्भातील भूमिधारी शेतकऱ्यांच्या जमिनी कोणतीही रक्कम न आकारता निर्बंधमुक्त करण्याचा निर्णय घेतल्यामुळे सुमारे एक लाखांहून अधिक भूमिधारी शेतकरी कुटुंबे भूमिस्वामी होत आहेत. यापूर्वी जमिनीचा धारणाधिकार बदलताना शेतकऱ्यांना भरावी लागणारी रक्कम व त्यासाठी करावा लागणारा अर्ज या बाबी रद्द करण्यात आल्या. एकूण ६,३२९ गावांना याचा फायदा होणार असून आतापर्यंत २,३४६ गावांतील जमिनीचे फेरफार घेण्यात आले व १४,७९५ फेरफार अंतिम करण्यात आले.

मोठ्या प्रमाणात उद्योगांनी राज्यात यावेत, यासाठी अनेक उद्योगस्नेही धोरणे आखली. यामध्ये उद्योगांना जमिनी मिळाव्यात, यासाठी कूळकायद्यांत बदल करण्यात आले. कलम ६३ मध्ये सुधारणा करून प्रादेशिक आराखड्यातील रहिवाशी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा अन्य अकृषिक वापर विभागात सुसंगत बिनशेती वापर करण्यासाठी शेतकरी नसलेल्या व्यक्तींना / संस्थांना शेतजमीन खरेदी करण्यास परवानगीची आवश्यकता असणार नाही, अशी तरतूद करण्यात आली. खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी व एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पासाठी कोणत्याही वापर विभागातील कितीही शेतजमीन खरेदी करण्यास परवानगीची आवश्यकता असणार नाही, अशी तरतूद करण्यात आली. या दोन्ही सुधारणांचा लाभ राज्यातील सुमारे ४३६ उद्योजकांनी घेतला.

## डिजिटल स्वाक्षरीचा सातबारा उतारा

ग्रामीण भागातील जनतेच्या दृष्टीने सातबारा उतारा महत्त्वाचा असतो. या उताऱ्यासाठी शेतकऱ्यांना वारंवार शासकीय कार्यालयात यावे लागते. मात्र, आता शासनाने सातबारा उतारे संगणकीकृत केले आहेत. त्याचबरोबर हे सातबारा उतारे डिजिटल स्वाक्षरीयुक्त करण्यात येत आहेत. आतापर्यंत सध्या चाळीस हजार गावांतील सातबारा उतारे हे ऑनलाइन झाले असून त्यापैकी ८ लाख सातबारा उतारे डिजिटल स्वाक्षरीयुक्त आहेत.

वाढती लोकसंख्या व एका–एका तलाठ्यांकडे असलेला

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

## परिवर्तन पर्व

### मराठा आरक्षणासाठी कटिबद्ध

मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे या भूमिकेवर शासन ठाम असून, त्याकरिता जे शक्य आहे ते प्रयत्न शासन करीत आहे. आरक्षणाच्या न्यायालयीन लढाईबरोबरच मराठा समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, तरुणांसाठी व्याज परतावा योजना आदी निर्णयांचा समावेश आहे. या निर्णयांची अंमलबजावणीही सुरू आहे. आरक्षणासाठी आवश्यक असलेला मागास वर्ग आयोगाचा अहवाल लवकरात लवकर द्यावा, यासाठी शासनाने आयोगाकडे विनंती केली आहे. न्यायालयातही आयोगाने कालबद्ध कार्यक्रम सांगितला आहे. त्यामुळे आरक्षणाचा निर्णय लवकर होईल. आरक्षण मिळेपर्यंत मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासवर्गासाठी अनेक योजना शासनातर्फे सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये नवीन उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहन, कौशल्य विकासाच्या माध्यमातून नवनवीन व्यवसाय प्रशिक्षण, आर्थिक साहाय्य म्हणून ५ वर्ष व्याजाचा भार (स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ) या बाबींचा समावेश आहे. यामुळे समाजातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध झाले. समाजातील कोणताही घटक हा उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी रु. ८ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना ५० टक्के शुल्काची सवलत दिली जात आहे.

१०-१२ गावांचा कार्यभार तसेच इतर शासकीय कामांचा व्याप लक्षात घेऊन, सुमारे ५ हजार नवीन तलाठी कार्यालये व ५०० नवीन मंडळे निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सर्वसामान्य जनतेस तलाठी सहजपणे उपलब्ध होतील. शेतीचे नकाशे डिजिटाईज्ड करण्यात येणार असून उपग्रहाच्या माध्यमातून जमिनीची ई-मोजणी होणार असल्याने, त्यामुळे उद्‌भवणारे वाद संपुष्टात येतील.

### सुधारित वाळू धोरणास मंजुरी

सुधारित वाळू धोरणास मंजुरी दिली असून नव्या धोरणामुळे अवैध वाळू उत्खननास आळा बसेल. वाळू लिलावातील २५ टक्के रक्कम ही ग्रामपंचायतीला देण्याचा निर्णय पहिल्यांदाच घेतल्यामुळे गावांच्या विकासाला चालना मिळेल. राज्यातील वाळू उत्खननामध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालून, महसुलात वाढ होण्यासाठी हे नवीन धोरण उपयुक्त ठरेल. नव्या धोरणानुसार, वाळू लिलावातील स्वामित्वधनाची रक्कम वजा करून उर्वरित रकमेपैकी लिलावाच्या रकमेनुसार १० ते २५ टक्क्यांपर्यंतची रक्कम त्या भागातील ग्रामपंचायतीस मिळेल. यामुळे वाळू उत्खननावर ग्रामपंचायतीचे लक्ष राहील.

### बोंडअळी नुकसानग्रस्तांना भरपाई

गेल्या वर्षी २०१७ मध्ये खरीप हंगामामध्ये कापूस पिकावर बोंडअळीमुळे तसेच धानपिकावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी मदत जाहीर केली. प्रादुर्भावामुळे ३३ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक नुकसान झालेल्या कापूस तसेच धानपिकासाठी कोरडवाहू क्षेत्रासाठी ६८०० रुपये तर बागायत क्षेत्रासाठी १३५०० रुपये प्रतिहेक्टर मदत देण्यात आली. मदतीची रक्कम संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येत आहे. केंद्राकडूनही मदत मिळणार आहे.

नैसर्गिक आपत्तीस प्रतिसाद देण्यासाठी केंद्र व राज्य शासन यांच्या सहभागाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीची स्थापना करण्यात आली. २००९-१० ते २०१३-१४ या ५ वर्षाच्या कालावधीत नैसर्गिक आपत्तीच्या वेळी आपत्ती प्रतिसाद निधीमधील उपलब्ध निधीपेक्षा रु. ५२५४.६ कोटी इतका अतिरिक्त निधी खर्च केला. मात्र, २०१४- २०१५ ते २०१७-१८ या कालावधीत आपत्ती प्रतिसाद निधीमधील उपलब्ध निधीपेक्षा राज्य शासनाचा रु. ६२७६.६ कोटी इतका अतिरिक्त निधी खर्च करण्यात आला.

### दरडग्रस्त माळीण गावाचे आदर्श पुनर्वसन

पुणे जिल्ह्यातील माळीण येथे अतिवृष्टीने २०१४ मध्ये दरड कोसळून १५१ व्यक्तींना प्राण गमावावे लागले. माळीण गावच्या संपूर्ण पुनर्वसनासाठी एकूण १० कोटी एवढा निधी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला. या गावाच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी आमडे येथील गट नं ४५ क्षेत्र ३.११ हेक्टर जागा खरेदी करण्यात आली माळीण परिसर भूकंपप्रवण असल्याने सर्व ६८ घरे नावीन्यपूर्ण भूकंप प्रतिबंधक प्रणाली वापरून बांधण्यात आली. पुनर्वसनाच्या कामात जागा निश्चिती, घरे, रस्ते, पाणी पुरवठा, शाळा, शासकीय कार्यालय, सामुदायिक गोठा, शौचालय इ. सर्व कामांमध्ये बाधित ग्रामस्थांना विश्वासात घेऊन, त्यांच्या सूचना विचारात घेऊन पुनर्वसनाची कार्यवाही २०१७ साली विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आली.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,** विभागीय संपर्क अधिकारी

**चंद्रकांत (दादा) पाटील**
मंत्री, कृषी, फलोत्पादन

शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट होण्यासाठी आणि पारंपरिक शेतीत यांत्रिकीकरणाचा वापर वाढून शेतीच्या उत्पादनात वाढ होण्याकरिता कृषी क्षेत्राच्या यांत्रिकीकरणाला चालना देण्यात आली. अधिकाधिक उत्पन्न मिळाले पाहिजे, यासाठी 'उन्नत शेती, समृद्ध शेतकरी' अभियान राबवण्यात आले. या अभियानात सुमारे पाच लाख शेतकऱ्यांना शेतीची अवजारे वाटण्यात आली. निवडक मोठ्या अवजारांमध्ये ट्रॅक्टर, पॉवर टिलर्स, रोटाव्हेटर आदी १६ प्रकारच्या यंत्रांचा समावेश आहे. विशेष म्हणजे १८ हजार ट्रॅक्टर्स या कालावधीत शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. कृषी यांत्रिकीकरणामुळे शेतीसाठीच्या ऊर्जेच्या वापरातही वाढ झाली. २०१३-१४ म्हणजे कृषीसाठी वीज वापराचे प्रमाण ०.९४४ वरून २०१६-१७ मध्ये १.१८५ (कि.वॅ.) इतके वाढले.

## तरतूद आणि खर्चात वाढ

कृषी विभागात अर्थसंकल्पीय तरतूद गेल्या १५ वर्षांमध्ये जवळपास दुप्पट झाली आणि अंतिम खर्चातदेखील तितकीच वाढ झाली. २००९ ते १४ या कालावधीत कृषीसाठी अर्थसंकल्पीय तरतूद ३९०८ कोटी एवढी होती, ती २०१४ ते १८ या कालावधीत ६७३२ कोटी इतकी करण्यात आली. परिणामी कृषी क्षेत्रात गुंतवणूक दुप्पट झाली त्यामुळे उत्पादन वाढण्यास मदत झाली.

नैसर्गिक आपत्तीत शेतीपिकांच्या होणाऱ्या नुकसानामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडते. अशा परिस्थितीत त्याला आधार देण्यासाठी केंद्र सरकार मार्फत प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू करण्यात आली. केंद्र शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. या योजनेत भाग घेणारे सर्वाधिक बिगर कर्जदार शेतकरी महाराष्ट्रातील आहेत. त्याचबरोबर, 'आपले सरकार' केंद्रातून विमा अर्ज करणारे सर्वाधिक शेतकरीदेखील महाराष्ट्रातील आहेत. आपल्या राज्यातील जालना आणि बीड या दोन जिल्ह्यांना प्रधानमंत्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रतिवर्ष एकूण विमा नुकसान भरपाईमध्ये ५१२ कोटींवरून ३००० कोटी एवढी वाढ झाली आहे. त्याचबरोबर पात्र शेतकऱ्यांची संख्या ७ लाख २५ हजारांवरून ५३ लाख ६२ हजार इतकी वाढली.

शेतकरी बांधवांच्या कल्याणासाठी विविध योजनांची यशस्वी अंमलबजावणी गेल्या चार वर्षांच्या काळात झाली. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेच्या नुकसान भरपाईची रक्कम दुप्पट म्हणजेच एक लाखांवरून दोन लाख करण्यात आली. राज्यातील शेती पावसावर अवलंबून आहे. लहरी हवामानाचा फटका शेतीला नेहमीच बसत असतो. अशाही परिस्थितीत शेतकरी बांधवांना हवामानाची माहिती मिळून जर काही उपाययोजना करू शकलो तर नुकसान टळू शकते, यासाठी महावेध प्रकल्पांतर्गत सुमारे २२०० महसूल मंडळात अत्याधुनिक स्वयंचलित हवामान केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

## सूक्ष्म सिंचनावर भर

शेतीसाठी पाण्याचा नियोजनबद्ध पद्धतीने वापर करण्यासाठी सूक्ष्म सिंचनावर भर देण्यात आला. त्यासाठी ऑनलाइन पद्धतीचा वापर करण्यात येत असून, त्याचे सुलभीकरण करण्यात आले. शेतकरी बांधवांना सादर करावयाच्या कागदपत्रांची संख्यादेखील २४ वरून ९ वर नेण्यात आली. गेल्या चार वर्षात सुमारे आठ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली येऊन त्याचा फायदा ९ लाख शेतकऱ्यांना झाला.

शेती क्षेत्रात पायाभूत सुविधांची उभारणी मोलाची ठरली. कांदा

# दुप्पट गुंतवणूक, खर्चात वाढ...



**"नैसर्गिक आपत्तीमुळे होरपळलेल्या बळीराजाला सावरण्यासाठी गेल्या चार वर्षात अनेक निर्णय घेण्यात आले. कर्जाच्या खाईत लोटल्या गेलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आला. कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा भार उतरवून त्याला कर्जमुक्तीकडे नेण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्राच्या इतिहासातील आतापर्यंतची कर्जमाफीची सर्वात मोठी 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना' यशस्वीरीत्या राबवण्यात येत आहे."**

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

साठवणूक चाळीमध्ये दुपट्टीने वाढ करून त्याची साठवणूक क्षमता ५९ हजार मेट्रिक टनांवरून १ लाख २८ हजार मेट्रिक टनांवर नेण्यात आली. शेडनेट, हरितगृहांची संख्यादेखील लक्षणीयरीत्या वाढवण्यात आली. जमिनीचा पोत ओळखून त्यानुसार पिके घेणे आणि त्यासाठी आवश्यक त्या खतांचा पुरवठा करता यावा, यासाठी मातीचे परीक्षण करून, गेल्या चार वर्षात १ कोटी ८५ लाख शेतकऱ्यांना मृदा आरोग्यपत्रिका वाटण्यात आल्या. शेतीतील पायाभूत सुविधांमुळे कमी पाऊस पडूनही खरीप आणि रब्बीच्या उत्पादनात वाढ झाली. द्राक्ष, कांदा, अन्य फळे, बिगर बासमती तांदूळ या शेतमालाच्या निर्यातीत भरीव वाढ झाली.

### कृषी स्वावलंबन योजना

मागासवर्गीय समाजातील लोकांच्या कृषी विकासासाठी 'डॉ. आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना' राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांना विहीर बांधणी, सिंचन साधनांची खरेदी, मोटर पंप इ. कृषी साधने तसेच शेततळ्यांच्या निर्मितीसाठी २ लाख ३५ हजार रुपयांपर्यंतची मदत दिली जाते. आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या योजनेचे पुनर्विलोकन करून, या योजनेमध्ये काही सुधारणा करण्यास शासनाने नुकतीच मंजुरी दिली आहे. नवीन सुधारणांनुसार नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन इ. घटकांसाठी विशिष्ट मर्यादेपर्यंत १०० टक्के अनुदान आदिवासी शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. योजनेची व्याप्ती वाढवण्यात आल्याने ही योजना आदिवासी शेतकऱ्यांना दिलासा देणारी आहे.



### अपेडा फार्मर कनेक्ट मोबाइल ॲप

शेतमालाच्या निर्यातीला चालना देण्यासाठी ट्रेसिबिलिटीनेटची सुविधा १४ वरून ३४ जिल्ह्यांसाठी कार्यान्वित करण्यात आली. जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या सहभागाकरिता अपेडा फार्मर कनेक्ट मोबाइल ॲप तयार करण्यात आले. प्रमुख फळे व भाजीपाला पिकांकरिता इस्त्राईल तंत्रज्ञानावर आधारित ६ पिकांकरिता सेंटर ऑफ एक्सलन्स तयार करण्यात आले. केंद्रीय भौगोलिक चिन्हांकन विभागाकडून राज्यातील २० पिकांना गुणवत्तायुक्त फळे, भाजीपाला व कृषी पिकांकरिता भौगोलिक मानांकन प्राप्त झाले.

देशी बियाणांचा वापर वाढावा, त्यासाठी मोठ्या प्रमाणात बीजनिर्मिती राज्यात व्हावी, यासाठी मराठवाड्यातील जालना जिल्ह्यात 'सीड पार्क'च्या निर्मितीचा प्रकल्प शासनाने हाती घेतला. या प्रकल्पांमुळे देशी बियाणे निर्मितीचा दर १२ टक्क्यांहून १८ टक्क्यांपर्यंत नेण्यास मदत होणार आहे. बी-बियाणांच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने राज्याने टाकलेले हे पाऊल आश्वासक आहे. अन्नप्रक्रिया उद्योगास चालना देण्यासह शेतीमालाच्या मूल्यवर्धनासाठी 'मुख्यमंत्री कृषी व अन्नप्रक्रिया योजना' राबवण्यात येत आहे. या योजनेमुळे अन्नप्रक्रिया उद्योगासाठी पोषक वातावरण तयार होत आहे. कृषिप्रक्रिया उद्योगांच्या निर्मितीमुळे बाजारपेठ शेतकऱ्यांच्या हातात येत असून, त्याचा शेतकऱ्यांना फायदा झाल्याचे दिसून येते.

### फळबाग लागवड

मंत्रिमंडळातले आमचे सहकारी दिवंगत पांडुरंग फुंडकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना' नव्याने सुरू करण्यात आली. या योजनेमध्ये केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जे लाभार्थी फळबाग लागवड बाबीचा लाभ घेऊ शकत नाही, त्यांना लाभ देण्यात येईल.

### कृषी संजीवनी योजना

मराठवाडा आणि विदर्भ या दुष्काळग्रस्त विभागावर देखील शासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेची' सुरुवात या विभागातील गावांसाठी करण्यात आली. योजनेंतर्गत मराठवाड्यातील ४००० गावे आणि विदर्भातील क्षारयुक्त जमीन असणाऱ्या १००० गावांमध्ये शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढवण्यासाठी आणि गावातील जमिनीचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. या योजनेसाठी शासनाने ४००० कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे. यवतमाळ आणि उस्मानाबाद या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी 'मोतीरामजी लहाने कृषी समृद्धी योजनेची' सुरुवात केली आहे. या योजनेच्या माध्यमातून उपरोक्त दोन जिल्ह्यातील आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यांना सर्व शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी, आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासन नेहमीच त्यांच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही मी या निमित्त देऊ इच्छितो.

**शब्दांकन : अजय जाधव,** विभागीय संपर्क अधिकारी



**प्रकाश महेता**
मंत्री, गृहनिर्माण

> विकास आराखड्यामध्ये सामाजिक परवडणारे गृहनिर्माण ही तरतूद प्रथमच करण्यात आली. परवडणाऱ्या गृहनिर्माणास चालना देण्यासाठी विशेष विकास क्षेत्राची तरतूद केली गेली. गृहनिर्माण विभागाने सर्वसामान्यांसाठी विविध प्रकारच्या योजना मार्गी लावल्या असून, नागरिकांना हक्काचे घर मिळत असल्याचे समाधान लाभत आहे.

# परवडणाऱ्या घराची स्वप्नपूर्ती

**प्रकाश महेता**

गृहनिर्माण विभागाने गेल्या चार वर्षात सर्वसामान्यांसाठी विविध प्रकारच्या योजना मार्गी लावल्या. सर्वसामान्य नागरिकांचे परवडणाऱ्या घराचे स्वप्न साकार होत आहे. मुंबईचे नागरी पुनर्निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला सुधारित विकास आराखडा लागू केल्यानंतर त्यातून वगळलेल्या उर्वरित आराखड्यालाही मान्यता मिळाली आहे. उपनगरांतही समूह पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे ५१ टक्के रहिवाशांच्या सहमतीने जुन्या इमारतींचा पुनर्विकास करता येईल. शिवाय, गिरणी कामगारांना ४०५ चौरस फूट चटई क्षेत्राचे घर मिळेल.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील नियम ३३ (९) मुळे आता उपनगरात नागरी पुनर्निर्माण शक्य होईल. ज्या क्षेत्रात सध्या मूलभूत सुविधा नाहीत तेथे आता या सुविधा निर्माण होतील. सध्या सुरू असलेल्या अथवा पूर्ण न झालेल्या गृहनिर्माण प्रकल्पांनाही नवीन विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी किंवा वाढीव चटई क्षेत्राचा लाभ घेता येईल. शहरात रोजगाराच्या संधी अधिक उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने वाणिज्य विकासास अधिक चटई क्षेत्र निर्देशांक देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

कापडगिरण्यांच्या जागेमधील जुन्या चाळींचा पुनर्विकास करताना रहिवाशांना म्हणजेच गिरणी कामगारांना ४०५ चौरस फूट (कारपेट) घर देण्याची तरतूद करण्यात आली. झोपडपट्टी पुनर्वसन योजना, उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासातूनन उभ्या राहिलेल्या इमारतींच्या (३२ मीटर उंचीच्या) सभोवताली किमान तीन मीटर,

## परिवर्तन पर्व

### महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा)

सदनिका खरेदीदारांना विकासकाकडून फसवणूक झालेल्या तक्रारी येत होत्या. तसेच विकासक मनमानी पद्धतीने ग्राहकांशी वर्तवणूक करीत होते. या बाबी विचारात घेऊन ग्राहक व विकासक यांच्यामधील व्यवहार पारदर्शपणे व्हावा व ग्राहकांच्या हिताचे संरक्षण व्हावे या उद्देशाने राज्यात महारेराची स्थापना करण्यात आली. या प्राधिकरणांतर्गत विकासकास नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. एखादा प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण न केल्यास प्रकल्प खर्चाच्या ५ ते १० टक्के दंड



लावण्याची तसेच एजंटाला देखील दंडाची तरतूद केली आहे. संबंधित गृहनिर्माण प्रकल्पाची सर्व माहिती, उदा. सर्व प्रकारच्या परवानग्या, नकाशे, सदनिकेची वैशिष्ट्ये, सोयी-सुविधा आदी माहिती महारेराच्या वेबपोर्टलवर उपलब्ध आहे. विकासकाविरुद्ध ऑनलाइन तक्रार प्रणालीची तरतूद करण्यात आली आहे. स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ ची अंमलबजावणी करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य हे देशातील अग्रेसर राज्य आहे. महारेराकडे एकूण १७,४७४ प्रकल्पांची ऑनलाइन पद्धतीने नोंदणी झाली असून १५,८९३ एजंटांनी नोंद केली आहे. महारेराकडे ऑनलाइन आलेल्या २,२६० तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

## परिवर्तन पर्व

### प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

राज्यात ३८२ स्थानिक नागरिक स्वराज्य संस्था, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, सिडको, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नैना प्रकल्प, नागपूर सुधार प्रन्यास, सर्व घटक मंडळे या क्षेत्रांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) राबवण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राज्याने २०२२ पर्यंत १९.४० लक्ष घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने आतापर्यंत राज्यातील २७३ प्रकल्पांतर्गत ६,७१,६२० इतक्या घरकुलांना मान्यता दिली आहे. खासगी जमीन मालक व म्हाडा यांच्यामधील संयुक्त भागीदारीच्या माध्यमातून घरकुलांची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक तसेच अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांच्या गृह प्रकल्पांना मोजणी शुल्कामध्ये ५० टक्के सवलत दिले आहे.

म्हाडाच्या अधिकार क्षेत्रातील लेआऊट व पंतप्रधान आवास योजना या प्रकल्पाकरिता म्हाडास नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे. बिल्डिंग मटेरियल्स ॲन्ड टेक्नोलॉजी प्रमोशन कॉन्सिलने शिफारस केलेल्या एकूण १६ प्रकारच्या वेगवान आणि अल्प पाणी व बांधकाम साहित्याचे वापर असलेल्या टिकाऊ आणि पर्यावरणपूरक बांधकाम तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास मान्यता मिळाली आहे.



इमारत व बांधकाम कामगार यांच्यासाठी महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना सुरू केली असून पात्र कामगारांना केंद्र व राज्य सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानाव्यतिरिक्त इमारत व बांधकाम कल्याणकारी मंडळाकडून प्रति लाभार्थी दोन लाख रुपये इतके अनुदान देण्यास मान्यता दिली आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत १ लाख ३९ हजार ५१५ मंजूर घरांपैकी आतापर्यंत ५८ हजार ७१६ घरांची निर्मिती करण्यात आली आहे. मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास, गिरणी कामगारांना द्यावयाची घरे अशा अनेक योजना म्हाडाने राबवलेल्या आहेत. विविध ठिकाणी घरांच्या निर्मितीचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आले आहे.

३२ ते ७० मीटर उंचीच्या इमारतींसाठी सहा, ७० ते १२० मीटर उंचीच्या इमारतींसाठी नऊ तर १२० मीटर पेक्षा जास्त उंचीच्या इमारतींसाठी १२ मीटर मोकळी जागा ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. ३० वर्षांवरील सोसायटीचा पुनर्विकास करताना जुन्या सोसायटीच्या सभासदांना १५ टक्के अथवा १० चौरस मीटर यापैकी जे जास्त असेल तेवढे अतिरिक्त वाढीव चटईक्षेत्र विना-अधिमूल्य देण्यात येईल.

### ऑनलाइन सुविधा

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) नवीन संकेतस्थळ व 'मित्र म्हाडा' हे मोबाइल ॲप सुरू करण्यात आले. संकेतस्थळावर सर्च इंजिनचा पर्याय दिल्याने अपेक्षित माहितीतील शब्द टाकल्यावर ती माहिती तत्काळ उपलब्ध होईल. 'मित्र म्हाडा' हे ॲप अँड्रॉइड व आयओएस या दोन्ही डिव्हाईसवर वापरता येणार आहे. म्हाडाने, 'इनिशिएटिव्ह फॉर ट्रान्सपरन्ट अँड रिस्पॉन्सिव्ह ॲक्शन' या नावे बनवण्यात आलेले हे नवीन मोबाइल ॲप गुगल प्ले स्टोअर व ॲपल प्ले स्टोअरवर उपलब्ध करण्यात आले आहे. म्हाडाची सदनिका सोडत, मित्र कार्यप्रणाली व पोस्ट लॉटरी सॉफ्टवेअर या सर्व प्रणालींची लिंक एकाच ठिकाणी या संकेतस्थळाच्या माध्यमातून नागरिकांना उपलब्ध होणार आहे.

### बी.डी.डी. चाळींची पुनर्बांधणी

मुंबईतील वरळी, ना.म.जोशी मार्ग, नायगाव आणि शिवडी येथील बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास करण्यात येणार असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. अशा चाळीतील रहिवासी १६० चौ. फुटांच्या घरात राहत होते. आता त्यांना नव्या जागेवर ५०० चौ. फुटांची सदनिका मोफत मिळेल. या चाळींचा तातडीने पुनर्विकास होण्याकरिता निर्णय घेतल्याने लवकरच हे सर्व प्रकल्प पूर्ण होतील. त्यासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच कामास प्रारंभ होईल.

### झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सुधारणा

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत २००० पर्यंतच्या झोपडपट्टी धारकांना या योजनेंतर्गत मोफत पुनर्वसन करण्यात आले. २०११ पर्यंतच्या झोपडपट्टी धारकांचे सशुल्क पुनर्वसन करण्यात येत आहे. या योजनेचा लाभ मुंबईतील संरक्षित आणि असंरक्षित अंदाजे ११ लाख झोपड्यांना लाभ होईल. झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन अचूक व गतीने होण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असून संपूर्ण कामकाजाचे संगणकीकरण केले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे कामकाज ऑनलाइन पद्धतीने होण्यासाठी आसरा नावाचे मोबाइल ॲप विकसित केले आहे.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट,** विभागीय संपर्क अधिकारी



**दिवाकर रावते**
मंत्री, परिवहन, खारभूमी विकास

> प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत दळणवळणाची साधने अधिक सुलभ व्हावी, यासाठी परिवहन विभागाने अनेक कल्याणकारी योजना व उपक्रम राबवले. ऑटोरिक्षा, टॅक्सीच्या माध्यमातून महिलांनाही रोजगार मिळावा, यासाठी परवान्यांवरील निर्बंध उठवले. प्रवास सुखकर व्हावा म्हणून शिवशाही बसेस, वाहन चालकांचा रोजगार, प्रवासी हित असे विविध उपक्रम, योजनांच्या माध्यमातून; परिवहन विभाग व एसटीला अधिक सक्षम केले.

# उत्तम सेवा, सुविधा, सवलती...

**दिवाकर रावते**

गेली ६७ वर्षे ग्रामीण आणि शहरी भागासाठी प्रवासाचे महत्त्वाचे साधन असलेल्या एसटीने केवळ सार्वजनिक परिवहनाची यंत्रणाच निर्माण केली नाही तर सामाजिक बांधिलकी जपली आहे.

### १२ वीपर्यंत मोफत प्रवास सवलत

ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी आणि मुलींची महाविद्यालयीन शिक्षणातील गळती रोखण्यासाठी त्यांना १२ वीपर्यंत मोफत प्रवास सवलत पास देण्याचा निर्णय घेण्यात आला. अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत सध्या ग्रामीण भागातील ५ वी ते १० वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी एसटीमार्फत मोफत प्रवास सवलत योजना लागू आहे. ही सवलत आता १२ वीपर्यंतच्या विद्यार्थिनींकरिता राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेत १० वी पर्यंत १९.५४ लाख विद्यार्थिनी तसेच १२ वीपर्यंत २४ लाख विद्यार्थिनी लाभ घेतील.

१९८६ नंतर सुरू झालेले विविध तंत्र व व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमांचा सवलत योजनेत समावेश करण्यात आला. या निर्णयामुळे ५० लाखांपेक्षा जास्त लाभार्थी लाभ घेणार आहेत.

६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणारी सवलत ही सध्या सर्वसाधारण व निमआराम बसेसमध्ये ५० टक्के इतकी लागू आहे. आता वातानुकूलित शिवशाही (आसनव्यवस्था) बसमध्ये ४५ टक्के सवलत लागू करण्यात आली. प्रतिवर्षी कमाल ४ हजार कि.मी. अंतराची मर्यादा लागू केली असून वयाचा पुरावा म्हणून आधारकार्ड ग्राह्य धरले जाणार आहे. या योजनेचे सध्या ७० लाख लाभार्थी आहेत.

क्षयरोगग्रस्त व कर्करोगग्रस्त व्यक्तींना देण्यात येणाऱ्या सवलतीमध्ये वाढ करण्यात आली. वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे सर्वसाधारण बसने राज्यांतर्गत अमर्याद अंतरापर्यंत प्रवास करण्यासाठी ७५ टक्के सवलत देण्यात आली. या योजनेतून ८४ हजार रुग्णांना सवलत मिळत आहे. अधिस्वीकृतिधारक पत्रकारांना सध्या सर्वसाधारण व निमआराम बसमध्ये वर्षभर १०० टक्के प्रवास सवलत लागू आहे. आता वातानुकूलित शिवशाही (आसनी व शयनयान) बसेसमध्येही १०० टक्के सवलत लागू करण्यात आली आहे. या योजनेचे सध्या २८०० लाभार्थी आहेत.

सिकलसेलग्रस्त, हीमोफिलिया आणि एचआयव्ही बाधित रुग्ण यांना १०० टक्के प्रवास सवलत देण्यात येत आहे. सध्या १०० टक्के दिव्यांग असलेल्या व्यक्तीसोबत असलेल्या साथीदारास ५० टक्के प्रवास सवलत आहे. आता रेल्वेप्रमाणे ६५ टक्के अपंगत्व असलेल्या व्यक्तीसोबत साथीदारासही ५० टक्के सवलत मिळेल. या योजनेचे सध्या ८० लाख लाभार्थी आहेत.

दहावीत परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्र ते निवासस्थान यादरम्यान प्रवासासाठी ६६.६७ टक्के सवलत देण्यासाठी कौशल्य सेतू अभियान ही नवी योजना सुरू करण्यात आली. या योजनेचे सध्या २५ हजार लाभार्थी आहेत. पुढे हे एक लाख लाभार्थी होणार आहेत.

लाभार्थ्यांना या प्रवास सवलत योजना लागू करताना

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

आधारकार्ड संलग्न स्मार्टकार्ड देण्यात येणार आहे. सुमारे २ कोटी १८ लाख लाभार्थी या विविध योजनांचा लाभ घेणार आहेत.

## वीरपत्नींना आजीवन मोफत प्रवास

शहीद जवानांच्या वारसांना पात्रतेनुसार एसटी महामंडळात नोकरी तसेच त्यांच्या पत्नींना आजीवन मोफत प्रवासाचा लाभ देण्यासाठी 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे शहीद सन्मान योजना' सुरू करण्यात आली आहे. ६३९ वीरपत्नींना एसटी महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमधून आजीवन मोफत प्रवास सवलत लागू करण्यात आली आहे. त्यांच्या वारसांना नोकरी देण्यात येत आहे. शहीद झालेल्या संरक्षण दलातील जवानांचे वारस इंद्रजित सुधाकर भट यांची प्रभारक या पदावर नुकतीच नेमणूक करण्यात आली आहे.

## महामंडळात नोकरी

नक्षलग्रस्त भागातील आत्मसमर्पण केलेल्या तरुणांना एसटी महामंडळात नोकरी देण्यासाठी 'बिरसा मुंडा आत्मसमर्पण योजना' सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत २६ युवक, युवतींना वाहक म्हणून तर ५ जणांना लिपिक टंकलेखक पदावर नोकरी देण्यात आली आहे. नक्षलवादी तरुणांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी एसटी महामंडळामार्फत प्रयत्न केले जात आहेत. २१ आदिवासी युवतींना एसटी महामंडळामार्फत वाहन चालवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## बसस्थानकांवर स्वच्छता

प्रवाशांच्या आरोग्याच्या दृष्टीने बसस्थानकांवर स्वच्छता असायला हवी हा उद्देश एसटी महामंडळाचा आहे. महामंडळाने आता एकात्मिक सुविधा व्यवस्थापन योजनेंतर्गत सर्व बसस्थानके, कार्यालये, कर्मचाऱ्यांची विश्रांतिगृहे, आगार परिसर यांच्या स्वच्छता व देखभालीची मोहीम हाती घेतली आहे.

## जेनेरिक औषधांची दुकाने

राज्यातील ५३२ बसस्थानकांवर जेनेरिक औषधांची दुकाने सुरू करण्यात येणार आहेत. महामंडळामार्फत विमानतळाच्या धर्तीवर पनवेल, बोरिवली नॅन्सी कॉलनी, नाशिक महामार्ग, धुळे, जळगाव, पुणे शिवाजीनगर, सोलापूर, सांगली कोल्हापूर, औरंगाबाद, नांदेड, अकोला, नागपूर, कल्याण, भिवंडी या ठिकाणी अत्याधुनिक सोयीसुविधा असलेले बसपोर्ट उभारले जातील.

## अपघात साहाय्यता निधी

'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अपघात साहाय्यता निधी योजना' सुरू करण्यात आली आहे. १ एप्रिल २०१६ पासून प्रत्येक प्रवासी तिकिटावर १ रुपया असा नाममात्र अधिभार लावून यातून अपघात साहाय्यता निधी संकलित केला जातो. या निधीतून एसटी अपघातातील जखमी प्रवाशांच्या औषधोपचारासह रुग्णालय खर्च केला जातो. मृत प्रवाशांच्या वारसांना देण्यात येणाऱ्या मदतीच्या रकमेत ३ लाख रुपयांवरून वाढ करून ती आता १० लाख रुपये करण्यात आली. प्रवासी जखमी झाल्यास (अपंगत्व आल्यास) पूर्वी मिळत असलेली ७५ हजार रुपयांची रक्कम वाढवून ती आता ५ लाख रुपये इतकी करण्यात आली. या योजनेंतर्गत अपघातग्रस्तांना ८३.०८ कोटी रूपये मदत म्हणून देण्यात आली. या योजनेमुळे अपघातग्रस्तांचे न्यायालयात अपघात दावा दाखल करण्याचे प्रमाण ७८ टक्क्यांनी कमी झाले. कर्तव्यावर असताना बसच्या अपघातामध्ये कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना १० लाखांचा अपघात साहाय्य निधी अथवा अनुकंपा तत्त्वानुसार

### परिवर्तन पर्व

#### अत्याधुनिक सेवा

शयनयान (स्लीपर कोच) शिवशाही बस सुरू करण्यात आली आहे. परिवर्तन या साध्या बसचे लालपरी हे नवीन डिझाइन तयार करण्यात आले आहे. लालपरी, शिवशाहीसारख्या अत्याधुनिक बसेस आता किफायतशीर दरात सर्वसामान्यांच्या सेवेत दाखल होत आहेत. प्रवाशांना माफक दरात प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी



सेवासुविधांनी सुसज्ज अशा शिवशाही बसेस सुरू करण्यात आल्या आहेत. २०१७ पासून टप्प्याटप्प्यांत ९०१ शिवशाही बसेस सुरू करण्यात आल्या आहेत. अंदाजे ६६ हजार इतके प्रवासी दररोज लाभ घेत आहेत.

आतापर्यंत एकूण १४८ लाख प्रवाशांनी 'शिवशाही' या आरामदायी बसमधून प्रवासाचा आनंद घेतला. या बसेस पूर्णत: वातानुकूलित असून यात प्रवाशांच्या सोयीसाठी मोबाइल व लॅपटॉप चार्जिंग पॉइंट, एलईडी स्क्रिन, पुशबॅक सीट असलेली आरामदायी आसन रचना आहे.

# परिवर्तन पर्व

## आरटीओ सुधारणा

परिवहन विभागाने २०१७ मध्ये महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम लागू केले. याअंतर्गत ओला, उबेरसारख्या विविध संकेतस्थळचलित टॅक्सीला नोंदणी आवश्यक राहील. त्याचप्रमाणे ॲपवर आधारित परवाना दिला जाईल. राज्यात अंदाजे ७० हजार संकेतस्थळचलित टॅक्सी कार्यरत असून त्यामधून सर्वसाधारणपणे ७ लक्ष प्रवासी दररोज प्रवास करतात. या प्रवाशांच्या हितासाठी हे नियम करण्यात आले आहेत. विविध कारणांमुळे परवाने रद्द किंवा व्यपगत झालेल्या परवान्यांचे नूतनीकरण करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. या निर्णयाचा ३७ हजार ऑटोरिक्षा परवानाधारकांनी लाभ घेतला. अनेक रिक्षाचालकांना या निर्णयाने दिलासा मिळाला. शिवाय प्रवाशांनाही यामुळे अधिक रिक्षा प्रवासासाठी उपलब्ध झाल्या. १९९७ पासून ऑटोरिक्षा, टॅक्सीचे नवीन परवाने देण्यावर निर्बंध घालण्यात आले होते. शासन अधिसूचना १७ जून, २०१७ अन्वये हे निर्बंध उठविण्यात आले आहेत. त्यामुळे आता कोणत्याही व्यक्तीला नवीन परवाना घेणे शक्य होत आहे. यातून अनेकांना रोजगाराची दारे खुली झाली आहेत. पुरुषांबरोबरच महिलांनाही या क्षेत्रात संधी मिळावी, त्यांनाही रोजगार सोयीचा व्हावा, यासाठीही परिवहन विभागाने अनेक उपक्रम व योजना राबवल्या आहेत. त्यातील एक म्हणजे महिलांमार्फत चालवण्यात येणाऱ्या टॅक्सी, रिक्षांना अबोली रंग देण्याचा निर्णय होय. ३० जून २०१६ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली. आज राज्यात अशा प्रकाराच्या सुमारे १९३ रिक्षा कार्यरत आहेत.



आतापर्यंत ४.११ लाख इतके रिक्षा, टॅक्सी परवाने देण्यात आले आहेत. जानेवारी २०१६ मध्ये लॉटरी पद्धतीने ४१ हजार २०१७ परवाने जारी करण्यात आले. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबास उदरनिर्वाहाचे साधन मिळावे आणि त्या कुटुंबाचे पुनर्वसन व्हावे, यासाठी अशा कुटुंबांना रिक्षा, टॅक्सीचा परवाना देण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला. राज्यात आत्महत्या केलेल्या १४५० शेतकऱ्यांच्या विधवांना हे परवाने देण्यात आले. परवान्यांवरील निर्बंध उठवल्याने मागील ३ वर्षात १.५ लाख नागरिकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. परवान्यांवरील निर्बंध उठवण्यात आल्यानंतर १ लाख ७ हजार ५७९ इतके परवाने जारी करण्यात आले.

महामंडळामध्ये नोकरी देण्याची हमी आहे.

## कर्मचाऱ्यांचे हित

एसटी कर्मचाऱ्यांसाठी भरघोस वेतनवाढ देण्यात आली. ही वेतनवाढ ४ हजार ८४९ कोटी रुपयांची असून यामुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनात साधारण ३२ ते ४८ टक्के इतकी वाढ झाली. राज्यातील १ लाख ५ हजार ६७९ एसटी कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळाला. आतापर्यंत झालेल्या सगळ्या वेतन करारांपेक्षाही जास्त रकमेची वेतनवाढ कर्मचाऱ्यांना देण्यात आली. एसटी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या विविध भत्त्यांमध्येही वाढ करण्यात आली. त्याचा आर्थिक भार प्रतिवर्षी २५० कोटी रुपये इतका आहे.

महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी सावित्रीबाई जोतिबा फुले शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली. या योजनेतून महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांच्या मुलामुलींना प्रति महिना ७५० रुपये रक्कम देण्यात येते. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांच्या मुलांचे शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण अग्रिम योजना चालू करण्यात येत आहे. कर्मचाऱ्यांना वार्षिक शुल्काची रक्कम अग्रिम म्हणून देण्यात येऊन त्याची प्रतिपूर्ती ठरावीक कालावधीमध्ये दरमहा वेतनातून कपात करण्याचे निश्चित केले आहे.

### कन्यादान योजना

**बाळासाहेब ठाकरे कन्यादान योजनेनुसार १ एप्रिल, २०१६ पासून एसटी कर्मचाऱ्यांच्या घरी जन्मलेल्या कन्येच्या नावे एसटी महामंडळातर्फे तत्काळ विशिष्ट रक्कम मुदत अथवा दामदुप्पट योजनेत एसटी बँकेत ठेवण्यात येते. संबंधित कन्येच्या वयाच्या २१ वर्षानंतर १ लाख रुपये तिच्या विवाहासाठी देण्यात येतात. ४५० कर्मचाऱ्यांच्या कन्यांना या योजनेंतर्गत लाभ देण्यात आला.**

**शब्दांकन : इर्शाद बागवान,**
विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88



विष्णू सवरा
मंत्री, आदिवासी विकास

आदिवासींच्या जीवनात आमूलाग्र बदल व्हावा, त्यांचे आर्थिक जीवनमान उन्नत व्हावे, विविध प्रकारच्या शैक्षणिक सुविधा सुलभतेने मिळाव्यात, यासाठी आदिवासी विकास विभागाने मूलभूत कार्य केले. पेसा कायद्यांतर्गत ग्रामपंचायतींना थेट निधी, वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, आश्रमशाळांची सुधारणा, थेट लाभ हस्तांतरण, मिशन शौर्य २०१८ अशा योजनांच्या अंमलबजावणीचे सकारात्मक दृश्य परिणाम आदिवासी क्षेत्रात दिसून येत आहेत.

# थेट लाभ, सकारात्मक बदल

**विष्णू सवरा**

आदिवासी विकास विभागाने गेल्या चार वर्षात अनेक योजनांद्वारे विविध माध्यमांतून आदिवासी बांधवांच्या विकासासाठीचे शिवधनुष्य उचलले. याद्वारे राज्यातील आदिवासी बांधवांना मोठ्या प्रमाणात मुख्य प्रवाहात आणून त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## ग्रामपंचायतींना थेट निधी

पेसा ग्राम पंचायतींच्या विकासासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी विकास विभागाच्या एकूण अर्थसंकल्पाच्या ५ टक्के एवढा अबंध निधी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या निर्णयांतर्गत ग्रामसभांचे सशक्तीकरण, लोकशाही आणि स्थानिक पातळीवर विकासाचे नियोजन करीत आहोत. याचा लाभ राज्यातील १३ जिल्हे, ५९ तालुके, २८८० ग्रामपंचायती आणि ५ हजार ९७९ गावांना होत आहे.

पेसांतर्गत कामाची वर्गवारी पाहिली असता असे लक्षात येईल २०१५-२०१७ या कालावधीत पायाभूत सुविधांविषयक कामे, वनहक्क व पेसा कायद्यांतर्गत कामाची अंमलबाजवणी, आरोग्य, शिक्षण आणि स्वच्छताविषयक कामे, वन व जलसंधारण आणि वन्यजीव पर्यटनाचीकामे अशी कामे होत आहेत. मंजूर झालेल्या ४६ हजार ३९४ कामांपैकी ३१ हजार २४१ कामे पूर्ण झाली. २०१५ ते २०१९ या चार वर्षात जवळपास ८७७.४३ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. पेसा कायद्याच्या प्रभावी अंमजबजावणीद्वारे ग्रामपंचायतींना थेट निधी उपलब्ध करून त्यांना सशक्त व स्वयंशासनासाठी प्रवृत्त करणारे महाराष्ट्र हे पहिले व एकमेव राज्य आहे.

## वनहक्क

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंमलबजावणीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. या अधिनियमान्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी यांना वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार, मिळण्याचे अधिकार गांव पातळीवर देण्यात आले. २८ जिल्ह्यांच्या ९४ उपविभागांमध्ये १५ हजार २ वनहक्क समित्या आहेत. वनहक्क कायदा व पेसा कायद्यांतर्गत गावांकरिता शाश्वत गौण वन उपज व्यवस्थापनाचा डिप्लोमा अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठाच्या मदतीने तयार केला आहे. ग्रामसभेच्या सदस्यांसाठी असलेल्या या पदविकेसाठी शिक्षणाची कोणतीही अट नाही. तसेच वनहक्क प्रलंबित दाव्यांचे १०० टक्के निराकरण करण्यासाठी वनमित्र मोहीम सुरू करण्यात आली त्यानुसार १,७०,०४१ वैयक्तिक वनहक्काचे दावे निकाली काढले. त्याचे क्षेत्र ३.९२ लाख एकर आहे तर सामूहिक वनहक्काचे ७६२५ दावे निकाली काढले. त्याचे क्षेत्र २८.७७ लाख एकर आहे.

शाश्वत उपजीविकेसाठी वैयक्तिक व सामूहिक वनहक्क मंजूर करून वन जमिनीचे वाटप आणि विकास हा मुख्य हेतू या निर्णयामागे आहे. वन हक्कांचे जे प्रलंबित दावे आहेत तेदेखील या वर्षअखेर निकाली काढले जातील.

## आश्रमशाळांची सुधारणा

आश्रमशाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य आणि पोषण, पायाभूत सोयीसुविधा यासाठी भरीव उपाययोजना केल्या आहेत.

## परिवर्तन पर्व

### थेट लाभ हस्तांतरण अर्थात डी.बी.टी.

थेट लाभ हस्तांतरण (डिबीटी - डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर). विद्यार्थ्यांना असणारा आहार, स्टेशनरी व निर्वाह भत्ता अथवा त्यांना मिळणारी शिष्यवृत्ती तसेच त्यांना मिळणारे लाभ हे त्यांच्या बँक अकाऊंटमध्ये थेट हस्तांतरित करणारी ही योजना आहे. आश्रमशाळा थेट लाभार्थ्यांतर्गत २०१७-१८ पासून जवळपास १.५६ लाख विद्यार्थ्यांना १३८.३१ कोटी अनुदान देण्यात आले. स्वयंसाठी २०१६ ते २०१८ या वर्षात कमाल २७७८ विद्यार्थ्यांना ९ कोटी वाटण्यात आले. वसतिगृह थेट लाभ हस्तांतरण अंतर्गत आहार, स्टेशनरी व निवास भत्यासाठी २०१८-१९ मध्ये ४८६५८ विद्यार्थ्यांना ५६.९५ कोटी रुपये आहेत. मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती २०१४ ते २०१८ पर्यंत १ लाख ५६ हजार ७१९ विद्यार्थ्यांना ८१३.६ कोटी रुपयांचे वाटप या थेट लाभ हस्तांतरण माध्यमातून करण्यात आले.

थेट लाभ हस्तांतर योजनेची परिणामकारकता जाणून घेण्याच्या दृष्टीने त्रयस्थ यंत्रणेमार्फत मूल्यमापन केले. त्यानुसार ८२ टक्के पालकांनी या योजनेला सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच ९१ टक्के विद्यार्थ्यांना पूर्वीच्या वस्तू वितरण पद्धतीपेक्षा सध्याची ही डी.बी.टी. योजना पसंत असल्याचे निदर्शनास आले. विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यामध्ये होणाऱ्या व्यवहारांची चांगली माहिती असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले.



एकलव्य निवासी शाळांमध्ये भरीव सुधारणा. आश्रमशाळा संहितेत आमूलाग्र बदल आणि बालक सुरक्षा धोरण तयार केले.

एकलव्य 'विज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम, कराडी पथ 'इंग्रजी भाषा प्रशिक्षण, नामांकित दर्जेदार शाळा, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना थेट लाभ (डिबीटी), वसतिगृहामध्ये भोजनासाठी थेट निधी, स्वयम, वसतिगृह शैक्षणिक साहित्य थेट निधी, मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, आय.एस.ओ. मानांकन, कायापालट अभियान, विशेष दुरुस्ती मोहीम, वॉश कार्यक्रम, बालकांच्या सोयींसाठी मूलभूत सुविधांमध्ये गुणवत्तावाढ, आश्रमशाळांसाठी अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृह, दुर्गम भागातील आश्रमशाळांसाठी विशेष वैद्यकीय सेवा, वन कौशल्यविषयक प्रशिक्षण, आश्रमशाळांमध्ये तंबाखू नियंत्रण मोहीम, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी यंत्रणा व डिजिटल हेल्थ कार्ड अशा योजना राबवल्या.

### वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम

■ २०१७ पासून अमरावती, नाशिक, नागपूर या आदिवासी विभागात एकलव्य फांऊडेशन यांच्यामार्फत ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना विज्ञानविषयाचे प्रयोगाद्वारे सहज आकलन होण्यासाठी काही उपक्रम राबवण्यात आले. ■ २२ प्रकल्प कार्यालयांतर्गत ४०० आश्रमशाळेमधील १.३२ लाख विद्यार्थ्यांना लाभ. ■ ८१ आश्रमशाळांमध्ये विज्ञान कक्ष उभारले, आश्रमशाळेतील एकूण ६५० शिक्षक, ४०० आश्रमशाळेतील प्रयोगशाळा परिचरांना प्रशिक्षण. ■ पथदर्शी ४ प्रकल्पांतील शाळांमध्ये (जव्हार, डहाणू, शहापूर व नंदूरबार) तसेच सर्व एकलव्य शाळांमध्ये सुरू करण्यात आला. ■ या प्रशिक्षणांची परिणामकारकता बघून हा कार्यक्रम अन्य १० प्रकल्प कार्यालयांतर्गत (पेण, घोडेगाव, धारणी, गडचिरोली, नाशिक, कळवण, राजूर, धुळे, यावल व तळोदा) सुरू करण्यात आला. आजपर्यंत एकूण १०५८ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.

आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी २०१४ पासून १७५ नामांकित शाळा निवडण्यात आल्या असून त्यात ५३,३५३ आदिवासी विद्यार्थी शिकत आहेत. गुणवत्ताधारक मुलांसाठी सीबीएसई इंग्रजी माध्यमिक शाळांचा समावेश आहे. इंग्रजी माध्यमांच्या १४ एकलव्य निवासी शाळा सुरू असून त्या सीबीएसई अभ्यासक्रमाशी संलग्न आहेत. या शाळांची विद्यार्थिक्षमता ३,९६० आहे. त्यात २,५५० विद्यार्थी शिकत आहेत.

आश्रमशाळा सुधारणा व इमारत दुरुस्ती मोहीम याकरिता स्थानिक स्तरावर अधिकार देण्यात आले. १४ जुलै २०१६ पासून आदिवासी विकास विभागाकरिता स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली. आयएसओ मानांकन प्राप्त एकूण १०२ शाळा आहेत. ६ मे, २०१७ पासून आश्रमशाळा 'कायापालट अभियान' राबवण्यात आले. या कायापालट अभियानांतर्गत २३.७० कोटी रुपये खर्च करण्यात आले. हिंगोली येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या गोटेवाडी येथील शासकीय आश्रमशाळेस 'राष्ट्रीय स्वच्छ विद्यालय' म्हणून पुरस्कार मिळाला.

### इतर वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम

■ पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत महाविद्यालयातील

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी निवडीचा पर्याय - भोजन, निवास व निर्वाहासाठी प्रतिविद्यार्थी वार्षिक रु. ४३,००० ते ६०,००० भत्ता पारदर्शक ऑनलाइन पद्धतीने वर्ग. ■ १२० वसतिगृहांमध्ये भोजन डीबीटी (थेट लाभ हस्तांतरण) लागू, विद्यार्थ्यांना त्यांच्या भोजनाच्या आवडी-निवडीनुसार भोजन पुरवठादार निवडण्याचे स्वातंत्र्य. ■ ८३ आश्रमशाळांमध्ये जीवनकौशल्य शिक्षण प्रणालीची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य. ■ ११५ आश्रमशाळत सिकरूमचे बांधकाम. ■ ४४ शाळांमधील सुमारे २१,००० विद्यार्थ्यांना अन्नपूर्णा केंद्रीय स्वयंपाकगृहातून आहार पुरवठा करण्याची योजना सुरू.

### विशेष आरोग्य सुविधा

■ या योजनेच्या माध्यमातून अतिदुर्गम भागातील आश्रम शाळेकरिता २४ x ७ तास आपत्कालीन सुविधा (एआरएआय) प्रमाणित मूलभूत जीवन सेवायुक्त रुग्णवाहिकेच्या माध्यमातून पुरवली जाणार आहे. ■ आश्रमशाळांचे क्लस्टर करून, ५ ते १० किमी अंतरावर रुग्णवाहिका उपलब्ध असेल. ■ डॉक्टर नियमितपणे ५०-६० विद्यार्थांची रोटेशन पद्धतीने तपासणी करतील. ■ वेब पोर्टल, डॅश बोर्ड, मोबाइल ॲप्लिकेशन, डिजिटल आरोग्य कार्ड यासह सुसज्ज नियंत्रण कक्ष. ■ दुर्गम भागातील ३०९ शाळातील १.५ लाख विद्यार्थ्यांना लाभ.

### शालेय आरोग्य व्यवस्थापन पद्धती

■ शालेय आरोग्य व्यवस्थापन पद्धती राबवण्याचा निर्णय घेतला असून यात पुढील बाबींचा समावेश आहे.
■ आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची वार्षिक तपासणी वैद्यकीय तज्ज्ञ (एमबीबीएस), डेंटिस्ट (बीडीएस), दृष्टितंत्रज्ञ (ऑप्टोमेट्रिस्ट), श्रवणतज्ज्ञ (ऑडिऑलॉजिस्ट), वाचा उपचार तज्ज्ञ (स्पीच थेरपीस्ट) प्रयोगशाळा तंत्रज्ञ व डाटा एंन्ट्री ऑपरेटर यांचा समावेश असलेले वैद्यकीय पथक करेल. ■ ही माहिती मोबाइल ॲप संलग्न संगणकीय आरोग्य पत्रिकेद्वारे संकेतस्थळावर अपलोड करून सदर माहितीचे विश्लेषण केले जाईल.
■ तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक २४ x ७ कालावधीसाठी सल्ला देण्यासाठी उपलब्ध. ■ दवाखान्यात दाखल केलेल्या विद्यार्थ्यांच्या आरोग्यामध्ये होणाऱ्या सुधारणेबाबत पाठपुरावा.

### व्यापक तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा असा व्यापक तंबाखू नियंत्रण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये व्यापक दंत तपासणी व उपचार (लेझर शस्त्रक्रिया, वैयक्तिक व्यसनमुक्ती समुपदेशन व तंबाखुमुक्त शाळा) करण्यात येतात. या कार्यक्रमासाठी १२० लक्ष खर्च असून तो प्रतिविद्यार्थी प्रतिवर्ष २०० रुपये होणार आहे. ९० शासकीय आश्रमशाळा व ११० शासकीय वसतिगृहांमधील ३१००० विद्यार्थी याचे लाभार्थी आहेत.

**शब्दांकन : डॉ. पुरुषोत्तम पाटोदकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

## परिवर्तन पर्व

### मिशन शौर्य २०१८

आदिवासी विद्यार्थ्यांना साहसी क्रीडा प्रकारात श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी संधी निर्माण करणे याकरिता 'मिशन शौर्य' ही महत्त्वपूर्ण योजना या वर्षी अमलात आणली.

या योजनेत पर्वतारोहण प्रशिक्षणाकरिता आदिवासी विकास विभागांतर्गत ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. या कठोर प्रशिक्षणानंतर एव्हरेस्ट मोहिमेसाठी १३ विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. देशातील सर्वोत्कृष्ट तज्ज्ञांकडून या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आणि एव्हरेस्टची चढाई या विद्यार्थ्यांनी केली.



राष्ट्रपती रामनाथ कोविंद व प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशाच प्रकारची योजना प्रतिवर्षी राबवण्यात येणार आहे.



**सुधीर मुनगंटीवार**
मंत्री, वित्त आणि नियोजन, वने

> **सामाजिक जाणिवांचा विस्तार करताना अर्थविकासाची गती आणि पर्यावरण रक्षणाचा लोकजागर केला. विकासाची फळे वंचित घटकांपर्यंत पोहोचावीत म्हणून त्यांच्यापर्यंत पोहोचणाऱ्या वाटा रुंद केल्या. हे करताना अनेक अडथळे आले, आव्हानांना सामोरे जावे लागले. म्हणून कारणे देत गेलो नाही. मार्ग काढले. जनतेबरोबर संवाद साधला, त्यांना अपेक्षित असलेल्या बदलाप्रमाणे कृती केली. त्यांच्या मनातील विकासाच्या संकल्पनांना वेग दिला.**

# आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाची नांदी

**सुधीर मुनगंटीवार**

मागच्या चार वर्षात आमची वाटचाल राज्यातील जनतेला आश्वासक वाटणारी आहे म्हणूनच लोकशक्तीचा हा महासागर आमच्या सरकारच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

प्रधानमंत्री जनधन खाते, मुद्रा बँकेसारख्या योजनेतून 'फंडिंग टू अनफंडेड' चा प्रवास सुरू झाला तो आता स्टॅण्डअप, स्टार्टअप सारख्या, मेक इन महाराष्ट्र, मेक इन इंडियासारख्या महत्त्वाकांक्षी टप्प्यावर पोहोचला आहे. पंतप्रधान सुरक्षा योजना, पंतप्रधान जीवनज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना यासारख्या अनेक विमा योजनांद्वारे सर्वसामान्य माणसांना विम्याचे कवच मिळाले. प्रधानमंत्री मुद्रा योजनेने अनेकांच्या स्वयंरोजगाराला आर्थिक पाठबळ मिळाले आहे. प्रधानमंत्र्यांचा 'मेक इन इंडिया'चा नारा जीएसटीच्या एकमताच्या मान्यतेने देशाला मेक इंडिया वनकडे घेऊन गेला. विषमतामुक्त समाजाच्या निर्मितीची ती एक महत्त्वाची पायरी आहे. वस्तू आणि सेवा कर प्रणालीच्या अंमलबजावणीनंतर मूल्यवर्धित कर प्रणालीची अंमलबजावणी सुरू होती तेव्हा नोंदणीकृत करदात्यांची संख्या ७ लाख ७९ हजार २८८ इतकी होती. १५ जून २०१८ च्या स्थितीनुसार ती १४ लाख ४५ हजार ५७४ इतकी झाली. डीलर्सची संख्या २ लाख ६७ हजारांहून २.९३ लाख इतकी झाली.

महसुली उत्पन्नाच्या तुलनेत व्याजाचे प्रमाण २२ टक्क्यांहून कमी होऊन ते या वर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार १२ टक्के होणे अपेक्षित आहे. सकल राज्य उत्पन्नाशी राज्याचे कर्जाचे प्रमाण २५.५ टक्क्यांवरून १६.१ टक्के इतके झाले.

## कौशल्य विकास

युवकांच्या प्रशिक्षणातून कौशल्य विकासाचे काम आणि रोजगारातून सक्षमीकरणाचे काम करण्यावर आम्ही भर दिला. समतोल सामाजिक विकासासाठी आणि दारिद्र्यनिर्मूलनासाठी देशातील पहिली ॲक्शन रूम नियोजन विभागात स्थापन झाली. या ॲक्शन रूमद्वारे पहिल्या टप्प्यात २७ तालुक्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. शासन व्यवहारात पारदर्शकता असावी म्हणून अनेक योजनांमधून दिले जाणारे अर्थसाहाय्य किंवा विद्यार्थिविद्यार्थिनींना द्यावयाचे लाभ, ते सर्व थेट बँक खात्यात जमा करण्यात येत आहेत.

## शेतकऱ्यांना सर्वोच्च प्राधान्य

शेतकऱ्यांना दिलासा देणारे मोठे निर्णय घेतले. शेतकऱ्यांना ऐतिहासिक कर्जमाफी देण्यात आली. पणन व्यवस्थेत रचनात्मक बदल करताना शेतकऱ्यांच्या शेतमालाला अधिक भाव कसा मिळेल यासाठी कायद्यात सुधारणा केली. कृषी मालाचे हमी भाव वाढवले. जलयुक्त शिवारसारख्या कार्यक्रमातून राज्यातील जलसाठा वाढवतांना अपुऱ्या राहिलेल्या जलसंपदा प्रकल्पांचा प्राधान्यक्रम निश्चित करून, ती कामे पूर्णत्वाला नेली. कृषिपंपांसाठी सर्वाधिक अनुदान उपलब्ध करून दिले. मेक इन इंडियाच्या धर्तीवर मेक इन

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

महाराष्ट्राची संकल्पना राबवली. इज ऑफ डुईंग बिझिनेस अंतर्गत राज्यात उद्योग व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना लागणाऱ्या परवान्यांची संख्या कमी केली. सेवा हमी कायदा लागू केला. राज्याचा विकासदर वाढवण्यात आम्हाला यश आले. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग किंवा मुंबई, नागपूर आणि पुणे शहरात मेट्रोचे जाळे विस्तारण्याचा प्रकल्प, कोस्टल रोड, विमानतळ विकास या प्रकल्पांना मोठ्या प्रमाणावर गती देण्यात आली.

## नियोजनाची दिशा

■ **राज्यस्तरीय योजनांना भरीव निधी** – २०१० ते २०१४–१५ या कालावधीत राज्यस्तरीय योजनेसाठी सरासरी निधी उपलब्ध झाला ३१ हजार ५२० कोटी रुपयांचा. यात २०१८–१९ मध्ये ९६.८३ टक्क्यांची वाढ झाली आणि ६७ हजार ८३१ कोटी रुपयांचा निधी विविध राज्यस्तरीय योजनांसाठी उपलब्ध करून देण्यात आला. ■ **अनुसूचित जाती उपयोजनेसाठी** – अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत २०१०–११ ते २०१४–१५ या कालावधीत सरासरी ४ हजार ६७५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. यात २०१८–१९ मध्ये ६४.६१ कोटी रुपयांची वाढ झाली. ९ हजार ९४९ कोटी रुपयांचा निधी सामाजिक न्यायासाठी उपलब्ध करून दिला. ■ **अनुसूचित जमाती उपयोजनेसाठी** – या योजनेंतर्गत २०१०–११ ते २०१४–१५ या कालावधीत सरासरी ३ हजार ९८७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. २०१८–१९ मध्ये यात ८६.२८ टक्क्यांची वाढ होऊन एकूण ८ हजार ९६९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. ■ **जिल्ह्यांना वाढीव निधी** – जिल्हास्तरीय योजनेंतर्गत २०१०–११ ते २०१४–१५ या कालावधीत सरासरी ४ हजार ८३७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. २०१८–१९ मध्ये यात ३९.७८ टक्क्यांनी वाढ होऊन या योजनांना ८ हजार २५० कोटी रुपये इतका निधी मिळाला. ■ **राज्याची योजना वाढली**– २०१०–१ ते २०१४–१५ या कालावधीत राज्य योजनेचे सरासरी आकारमान होते ४५ हजार २० कोटी रुपयांचे त्यात ८५.४६ टक्के वाढ होऊन वार्षिक योजना २०१८–१९ मध्ये झाली ९५ हजार कोटी रुपयांची. ■ विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या जलद विकासासाठी २१ हजार २२२ कोटी रुपयांच्या विशेष कार्यक्रमाची अंमलबजावणी ■ कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या १२५ तालुक्यांच्या विकासाला प्राधान्य. २०१४–१५ च्या २०० कोटी रुपयांच्या निधीत ७५ टक्के वाढ. मानव

## परिवर्तन पर्व

### अर्थकारणाला गती

■ बांधील खर्चाचे महसुली जमेशी असलेले प्रमाण २००३–०४ च्या ८५ टक्क्यांवरून २०१७–१८ मध्ये ५४ टक्के इतके कमी करण्यात यश. ■ महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमाप्रमाणे महसुली व राजकोषीय तुटीत घट. राजकोषीय तूट २००९–१० च्या ३.१ टक्क्यांहून कमी होऊन २०१७–१८ मध्ये १ टक्के इतकी कमी केली. ■ राज्य २०१७–१८ मध्ये २०६८ कोटी रुपयांच्या महसुली आधिक्यात.

**वस्तू आणि सेवा कर:** ■ २००६ ते २०१४ या कालावधीत डीलर्सच्या संख्येत २.६७ लाख इतकी वाढ झाली. पण मागील चार वर्षात डीलर्सची संख्या २.९३ लाखांनी वाढली. ■ वस्तू आणि सेवा करप्रणालीत या वर्षीच्या पहिल्या तिमाहीत कर संकलनात गतवर्षीच्या



तुलनेत ३९.५ टक्के वाढ. २५हजार ७४३ कोटी रुपयांचा कर महसूल पोहोचला ३५ हजार ९१५ कोटी रुपयांवर. ■ वस्तू आणि सेवा कर विभागाने केलेल्या कर सुधारणांमुळे जागतिक बँकेच्या २०१८ च्या इज ऑफ डुईंग बिझिनेस अहवालात देशाचा क्रमांक १७२ वरून ११९ पर्यंत सुधारला. ■ उद्योग व्यापारासाठी अनुकूल वातावरण निर्माण करताना डीलर्सना परतावा देण्यास उशीर झाल्यास व्याज प्रदानाचा कालावधी ९० दिवसांहून ६० दिवसांपर्यंत कमी केला. ■ तपासणी नाकेविरहित वाहतुकीस चालना. अडथळे कमी झाले ■ वस्तू आणि सेवा कर प्रणालीचा अवलंब करताना महानगरपालिकांना जकात व स्थानिक संस्थाना करापोटी शासनाकडून नुकसानभरपाई ■ पेट्रोल आणि डिझेलवरील मूल्यवर्धित करात कपात. सर्वसामान्यांना दिलासा.

## परिवर्तन पर्व

### शासकीय कर्मचाऱ्यांसाठी

■ दिव्यांग बालकांच्या संगोपनासाठी ७३० दिवसांची विशेष रजा. पत्नी नसलेल्या शासकीय पुरुष कर्मचाऱ्यासदेखील या रजेचा लाभ. ■ राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यांना व ज्याची पत्नी असाध्य आजाराने अंथरुणाला खिळली आहे किंवा पत्नी हयात नाही अशा शासकीय कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त १८० दिवसांपर्यंत बाल संगोपन रजा. ■ दत्तक मूल घेणाऱ्या राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यास १८० दिवसांची विशेष रजा. ■ मृत्यू पावलेल्या एकट्या (अविवाहित किंवा कुटुंब अस्तित्वात नसलेला कर्मचारी) शासकीय कर्मचाऱ्यावर संपूर्ण अवलंबून असलेल्या त्याच्या आईवडिलांना कुटुंब निवृत्तिवेतन. कुटुंबाची व्याख्या सुधारली. ■ शासकीय कर्मचाऱ्यांच्या आईवडिलांनाही मिळणार स्वग्राम, महाराष्ट्र दर्शन सवलतीचा लाभ. ■ ज्येष्ठ कर्मचाऱ्यांसाठी– ८० वर्षे व त्यावरील निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांच्या निवृत्तिवेतनात १ एप्रिल २०१४ पासून १० टक्के वाढ ■ सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन १ नोव्हेंबर २००५ पूर्वी राज्य शासनाच्या सेवेत नागरीपदावर पुनर्नियुक्ती झालेल्या माजी सैनिकाचा सेवेत असतांना/ सेवानिवृत्तिनंतर मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबास सैनिकी व नागरी अशा दोन्ही सेवेतील कुटुंबनिवृत्तीवेतन देण्याचा निर्णय. ■ शासकीय कर्मचाऱ्यांच्या विधवा पत्नीने पुनर्विवाह केल्यास तिची पूर्वीच्या पतीची पेन्शन कायम सुरू ठेवणार. ■ शासनाच्या सेवेत भरतीच्या मान्यतप्राप्त माध्यमाने रुजू झालेल्या आणि दोन वर्षांपेक्षा कमी सेवा झालेल्या महिला कर्मचाऱ्यास पूर्णवेतनी प्रसूती रजा. सेवा कालावधीची अट शिथिल.

■ सरोगसी पद्धतीने जन्मलेल्या अपत्याचे संगोपन करण्यासाठी महिला कर्मचाऱ्यास १८० दिवसांची विशेष रजा ■ पदोन्नतीची संधी– राज्य शासनाच्या चतुर्थ श्रेणी वर्गातील पदोन्नतीची टक्केवारी २५ टक्क्यांहून ५० टक्के इतकी वाढवली. ■ सानुग्रह अनुदान– अंशदान निवृत्तिवेतन योजनेंतर्गत काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवा कालावधीत १० वर्षे सेवा होण्यापूर्वी निधन झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास १० लाख रुपयांचे अनुदान ■ मानसिक विकलांग तसेच शारीरिक दुर्बलता असणाऱ्या अपत्याच्या नावाचा शासकीय कर्मचाऱ्याच्या निवृत्तिवेतन प्रदान आदेशामध्ये समावेश.

विकास कार्यक्रमासाठी २०१८–१९ मध्ये ३५० कोटी रुपयांचा निधी.
■ चांदा ते बांदा या पथदर्शी योजनेंतर्गत चंद्रपूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खनिज आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अधिकाधिक उपयोग करत रिसोर्स बेस्ड इंटेन्सिव्ह प्लानिंग आणि डेव्हलपमेंट प्रोग्रॅम. ■ श्रीक्षेत्र भीमाशंकर तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी १४८ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याची अंमलबजावणी. ■ श्रीक्षेत्र घृष्णेश्वरच्या विकासासाठी – ११२. ४१ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मान्यता. ■ महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंती निमित्ताने सेवाग्राम आश्रम परिसरात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १६२.५१ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मान्यता.

## ध्यास हरित महाराष्ट्राचा

भारतीय वन सर्वेक्षण अहवाल २०१८ मध्ये राज्य अनेक बाबींमध्ये देशात पहिले आले. राज्याच्या वनेतर क्षेत्रातील वृक्षाच्छादन २७३ चौ.कि.मी ने वाढले. घनदाट जंगलाचे क्षेत्र ५१ चौ.कि.मी ने वाढले. कांदळवन संरक्षण आणि संवर्धनात राज्य देशात पहिले ठरले.

■ तीन वर्षात ५० कोटी वृक्षलागवड लोकसहभागातून वृक्षलागवडीचा लोकोत्सव. २०१८ मधील पावसाळ्यात १३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट १५ कोटी ८८ लाख वृक्ष लावून पूर्ण. ३८.२७ लाख लोकांचा सहभाग. लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद. ■ २०१९ च्या पावसाळ्यात राज्यात ३३ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प. ■ प्रत्येक जिल्ह्यात दोन याप्रमाणे ६९ स्व. उत्तमराव पाटील वनउद्यानांची निर्मिती. ■ मराठवाड्यातील वृक्षाच्छादन वाढवण्यासाठी राज्यातील पहिली इको बटालियन औरंगाबाद येथे स्थापन.
■ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतात, शेतबांधावर आणि शेतजमिनीवर वन विभागाच्या सामाजिक वनीकरण शाखेमार्फत वृक्षलागवड ■ जिल्हा वार्षिक योजनेच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांतून वृक्ष क्रांती अभियान या वृक्षलागवड कार्यक्रमासाठी निधी देण्याची व्यवस्था ■ प्रत्येक शासकीय विभागास वृक्षलागवड आणि संगोपनासाठी उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीच्या अर्धा टक्का निधी राखून ठेवण्यास मान्यता ■ ज्या शेतकरी कुटुंबात मुलगी जन्माला येईल, त्या मुलीच्या जन्माचे स्वागत व्हावे म्हणून 'कन्या वन समृद्धी योजना'. यामध्ये ५ सागाची आणि ५ फळझाडांची रोपे शेतकऱ्यांना मोफत

### जलयुक्त वन

■ वन विभागाने मागील चार वर्षात ४७ हजार ०७० जलयुक्त शिवाराची कामे केली. ■ २०१५ च्या भारतीय वन स्थिती अहवालात एकूण जलव्याप्त क्षेत्र १११६ चौ कि.मी. होते ते २०१७ मध्ये वाढून १५४८ चौ.कि.मी. इतके झाले. जलव्याप्त क्षेत्रातील ही वाढ ४३२ चौ कि.मी. इतकी आहे.

### हरित सेना

■ राज्यात आतापर्यंत ५६ लाखांहून अधिक लोक आणि संस्थांनी हरित सेनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे. जगातील सर्वात मोठी १ कोटी लोकांची हरित सेना निर्माण करण्याचा वन विभागाचा संकल्प आहे.

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

## परिवर्तन पर्व

### वन्यजीव संरक्षण आणि संवर्धन

वनालगतच्या गावांमधील स्थानिकांचे वनांवरील अवलंबित्व कमी होऊन त्यांना पर्यायी रोजगाराची साधने मिळावीत, गावातील लोकांना किमान पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात व यातून मानव आणि वन्यजीव संघर्ष कमी व्हावा, वन आणि



वन्यजीवांचे रक्षण व्हावे या हेतूने वनालगतच्या गावांमध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखजी जन वन विकास योजनेची अंमलबजावणी ■ वन्यजीवांमुळे मनुष्य हानी, शेतपीक व फळझाडांचे नुकसान झाल्यास देण्यात येणाऱ्या अर्थसाहाय्यात भरीव वाढ.

■ एकूण ३२० निसर्ग पर्यटन स्थळांची निवड करण्यात आली असून ११६ स्थळांच्या विकासाची कामे सुरू.

■ राज्यात कांदळवन संरक्षण आणि उपजीविका विकास योजनेची ५ जिल्ह्यांतील ६० गावात अंमलबजावणी

■ भारतीय वनस्थिती अहवाल २०१५ नुसार राज्याचे कांदळवन क्षेत्र २२२ चौ. कि.मी. होते ते २०१७ मध्ये वाढून ३०४ चौ.कि.मी. इतके झाले. यामध्ये ८२ चौ कि.मी. ची वाढ नोंदवण्यात आली. ही वाढ प्रामुख्याने रायगड, मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्ह्यात आहे.

### हॅलो फॉरेस्ट १९२६

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

■ सामान्य जनतेशी संवाद साधणारी आणि वन आणि वन्यजीव संवर्धनाबरोबर पर्यावरण रक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश देणारी देशातील पहिली 'हॅलो फॉरेस्ट १९२६' ही हेल्पलाईन सुरू करण्यात आली. या हेल्पलाईनवर ५५ हजारांहून अधिक दूरध्वनी प्राप्त झाले आहेत.

### बांबू विकास आणि बांबूतून रोजगार

■ बुरूड समाजातील बांबू कारागिरांना स्वामित्व शुल्कात सूट– राज्यात एकूण नोंदणीकृत बुरुडांची संख्या ७९०० होती. परंतु बांबूवरील स्वामित्व शुल्कात १०० टक्के सूट दिल्याने बुरूड नोंदणीने वेग घेतला आणि ही संख्या ७९०० वरून सध्या ५५ हजार १९२ इतकी झाली. ■ चंद्रपूर जिल्ह्यातील चिचपल्ली येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन. बांबूवर आधारित मान्यता प्राप्त डिप्लोमा अभ्यासक्रम येथे सुरू. ■ पुणे, अमरावती आणि राहुरी कृषी विद्यापीठात बांबू हस्तकला केंद्र मंजूर. पुणे विद्यापीठातील केंद्र कार्यान्वित. ■ नागपूर येथे महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना. वनशेतीला प्रोत्साहन देण्यात मंडळाचे मोठे योगदान. ■ बांबूला वन विभागाच्या वाहतूक परवान्यातून मुक्तता. महाराष्ट्राच्या निर्णयानंतर केंद्र शासनाने देशपातळीवर बांबू केला टीपी फ्री. ■ बांबू क्षेत्राच्या विकासासाठी बांबू प्रमोशन कंपनीची स्थापना ■ वन–धन शॉपमधून बांबू हस्तकला वस्तूंची विक्री.■ भारतीय वन स्थिती अहवाल २०१५ मध्ये बांबूचे क्षेत्र ११४६५ चौ.कि.मी. होते. ते २०१७ मध्ये १५९२७ चौ.कि.मी. इतके झाले म्हणजेच २०१५ च्या तुलनेत राज्यातील बांबू क्षेत्रात ४४६२ चौ. कि.मी. म्हणजे ४ लाख ४६ हजार २०० हेक्टने वाढ झाली.



हे राज्य छत्रपती शिवाजी महाराजांचे सक्षम आणि सामर्थ्यशाली राज्य आहे. या राज्याच्या प्रगतीत जसे सर्वांचे योगदान अपेक्षित आहे तसेच त्याच्या प्रगतीच्या लाभातही सर्वांना समान हक्क आहे. सामान्य जनतेच्या याच हक्काचे रक्षण करताना, त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करताना आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करतांना मी एवढेच म्हणेन...

'हे सरकार अमुचे सदैव देइल सामान्यांना साथ कधी ना सोडू कष्टकऱ्यांचे आपुलकीचे हात विकास अन् प्रगतीची घुमवू जगात द्वाही हे कामच अमुचे इथले देईल तुम्हाला ग्वाही...'

**शब्दांकन : डॉ. सुरेखा मधुकर मुळे,**
विभागीय संपर्क अधिकारी



**रामदास कदम**
मंत्री, पर्यावरण

**पर्यावरणाच्या रक्षणासाठी घेतलेल्या निर्णयामुळे प्रदूषणास चांगला आळा बसला. नदी, सरोवर व जलस्रोतांच्या संवर्धनासाठी नदी संवर्धन योजना सुरू करण्यात आली. विविध उद्योगांना लागणारे संमतिपत्र गतीने देण्यावर लक्षकेंद्रित केले. सीआरझेड मर्यादा ५० मीटरपर्यंत करण्यात आल्याने रखडलेले झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प मार्गी लागतील. पर्यटन प्रकल्प आणि विविध व्यवसायाला चालना मिळेल. प्लास्टिक व थर्माकोलच्या वापरावर बंदी घालण्यात आल्याने प्लास्टिक पिशव्या आणि विविध उत्पादनांच्या वापरात अंदाजे ५० टक्के घट झाल्याचे दिसून येते.**

# पर्यावरणाचे रक्षण, प्रदूषणास आळा...

**रामदास कदम**

पर्यावरण विभागाने गेल्या वर्षभरात अनेक महत्त्वाचे लोकोपयोगी निर्णय घेतले. विविध प्रकल्पासाठी लागणाऱ्या परवानग्या, संमतिपत्रे याबाबत आश्वासक पावले उचलली. त्याचा फायदा राज्यात सुरू असलेल्या हजारो प्रकल्पांना झाला.

केंद्र शासनाने मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गच्या सागरतटीय सीआरझेड नकाशांना मंजुरी दिली. ठाणे व पालघर जिल्ह्यासाठीची मंजुरी अंतिम टप्प्यात आहे. कांदळवन, प्रवाळ, दलदलीचे क्षेत्र, वाळूच्या टेकड्या, कासवांच्या विणीची ठिकाणे, पक्ष्यांच्या विणीची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून त्या क्षेत्रांचे नकाशे तयार करण्यात आले. केंद्र शासनाने नवीन प्रारूप सीआरझेड अधिसूचना २०१८ प्रसिद्ध केली. त्यात खाडी, नदी, उपसागर इत्यादीपासून सीआरझेड मर्यादा ५० मीटरपर्यंत करण्यात आली. त्यामुळे रखडलेले झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प मार्गी लागतील. त्याचबरोबर पर्यटन प्रकल्प आणि विविध व्यवसायाला चालना मिळेल. सीआरझेड क्षेत्रात कोळीवाड्यांचा पुनर्विकास व परवडणाऱ्या घरांची बांधकामे करणे यामुळे शक्य होईल.

## विशेष प्रकल्पांना सीआरझेड परवानगी

महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीने मागील चार वर्षात मुंबई कोस्टल रोड, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प, एलिफंटा बेटाचे विद्युतीकरण, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकास परवानगी दिली. महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीने नवीन संकेतस्थळ विकसित केले असून विकास प्रकल्पांची सीआरझेड मंजूरी प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने करण्यात आली आहे.

## प्लास्टिक व थर्माकोल बंदी धोरण

प्लास्टिक व थर्माकोलच्या वापरामुळे विविध पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यात वापरलेल्या रसायनामुळे सागरी जीव, वन्यजीव व मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आल्याने महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) नियम २००६ मध्ये सुधारणा करून प्लास्टिक व थर्माकोलच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. अशा वस्तूंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी व साठणूक करणाऱ्यांवर तुरुंगवास आणि दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली. या धोरणामुळे प्लास्टिक पिशव्या आणि विविध उत्पादनांच्या वापरात अंदाजे ५० टक्के घट झाल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांना घणकचरा व्यवस्थापन हाताळणीसाठी येणाऱ्या वित्तीय भारात बचतीबरोबरच स्थानिक पर्यावरणातही सुधारणा झाली आहे. यंदाच्या पावसाळ्यात प्लास्टिक कचऱ्यामुळे गटारे आणि नाले तुंबलेले आढळून आले नाही. या धोरणाबाबत समाजात मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली. पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांच्या मागणीत वाढ झाली. कापडी पिशव्यांची गरज मोठ्या प्रमाणात असल्याने अनेक स्वयंसेवी संस्था आणि महिला बचत

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

# परिवर्तन पर्व

## जलस्रोतांचे संवर्धन व संरक्षण

नदी, सरोवर व जलस्रोतांच्या संवर्धनासाठी राज्यस्तरावर राज्य नदी संवर्धन योजना सुरू करण्यात आली. नदीत येणारे सांडपाणी अडविणे व वळविणे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र, स्वच्छतागृहे, स्मशानघाटांचा विकास, नदी-घाटांचा विकास, वनीकरण या बाबी योजनेत समाविष्ट करण्यात आल्या आहेत. नदीकाठावरील शहरातून निघणाऱ्या नागरी सांडपाण्यापासून होणारे नदीचे प्रदूषण रोखणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेंतर्गत तापी, पंचगंगा आणि कृष्णा नदीची ११० कोटी रुपयांची कामे प्रगतिपथावर आहेत. पुणे शहरातील मुळा-मुठा नदीचे पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धन करण्याकरिता केंद्र शासनाने ९९०.२६ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. चंद्रभागा नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी नमामि चंद्रभागा अभियान राबवण्यात येत आहे. त्यासाठी १६.८० कोटी रुपये निर्गमित केले आहेत.



नमामि चंद्रभागा

गटांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली.

राज्यात प्लास्टिक बंदी लागू करण्यात आल्यानंतर आता त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विभागाने कंबर कसली आहे. त्याचाच एक भाग म्हणून छोट्या छोट्या पाऊचमध्ये किंवा प्लास्टिक पॅकिंगच्या माध्यमातून विकल्या जाणाऱ्या ग्राहकोपयोगी उत्पादनामुळे, निर्माण होणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने उत्पादक कंपन्याविरोधात कारवाई केली जात आहे.

कायद्यानुसार प्लास्टिक पॅकिंगमध्ये उत्पादन वस्तूंची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी उत्पादक कंपन्यांची आहे. मात्र टूथपेस्ट, शाम्पू, बिस्किट, विविध खाद्यपदार्थांची छोटी पाकिटे, पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या याची विल्हेवाट लावली जात नव्हती. त्यामुळे विल्हेवाटीसाठी प्रत्येक पॅकिंगला २५ पैसे असा राखीव निधी उभाण्याचे आदेश मंडळाने दिले आहेत. त्यानुसार विविध ३० कंपन्यांनी एकत्र येऊन, एका संस्थेची स्थापना केली असून त्यामार्फत प्लास्टिकची विल्हेवाट लावण्याची हमी प्रदूषण मंडळाला दिली आहे.

## वातावरणीय बदल अनुकूलन धोरण

शासनाने वातावरणीय बदलामुळे उद्‌भवणाऱ्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी वातावरणीय बदल अनुकूलन धोरण तयार केले. शास्त्रोक्त अनुमानांच्या अनुषंगाने सविस्तर कृती आराखडा तयार केला. या संबंधित क्षेत्रातील नामांकित संस्थांशी समन्वयन करण्यासाठी पर्यावरण विभागात स्वतंत्रपणे जलवायु परिवर्तन समन्वय कक्ष स्थापन करण्यात येईल. याचाच भाग म्हणून केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने स्टेट नॉलेज मॅनेजमेंट सेंटर स्थापन करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. सुमारे २ कोटी ६१ लाखाचा निधी मंजूर केला आहे. या संदर्भातील कार्यवाही प्रगतिपथावर आहे. वातारवणीय बदलाच्या अनुकूलनासाठी प्रकल्प तयार करून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांकडून निधी मिळविण्यासाठी पर्यावरण विभागामार्फत दोन प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्यात आले आहे.

## गतीने संमतिपत्र प्रदान

या विभागाने स्वतंत्रपणे संकेतस्थळ कार्यान्वित केले. त्यामुळे इज ऑफ डुईंग बिझनेस अंतर्गत विविध उद्योगांना लागणारे संमतिपत्र गतीने देणे सोपे झाले. विविध मंजुऱ्या देण्यासाठी पूर्वी १२० दिवसांचा कालावधी निश्चित केला होता. तो आता ६० दिवसांपर्यंत कमी करण्यात आला. हिरव्या संवर्गातील उद्योगांना लागणारा संमतिपत्रासाठीचा आठपानी अर्ज दोनपानांत सुलभ करण्यात आला. त्यामुळे राज्यातील ५० टक्के उद्योगांना फायदा झाला असून संमतिपत्र स्वयंनूतनीकरण प्रणाली सर्व उद्योगांसाठी लागू करण्यात आली. ध्वनी प्रदूषण नियम २००० या अधिसूचनेनुसार राज्यात एकूण १५ दिवस सण, उत्सव व कार्यक्रमाच्या वेळी ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यंत्रणा ध्वनीची विविध मर्यादा व वाजविण्याची वेळ यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले. अशा प्रकारे पर्यावरण विभागाने राज्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट,**
विभागीय संपर्क अधिकारी



**विनोद तावडे**

मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ

> **'शिक्षण म्हणजे बालकाच्या शरीर, मन आणि आत्मा या प्रक्रियेमध्ये जे सुप्त उत्तमत्व आहे त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणणे', असे राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणत. याच अनुषंगाने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना कालानुरूप आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यात येत आहे. मराठी भाषेला प्राधान्य देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. मराठी माणसाला अभिमान वाटेल अशा रीतीने सांस्कृतिक वाटचाल चालू आहे.**

# कृतिशील, कालानुरूप आणि गुणवत्तापूर्ण

**विनोद तावडे**

राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत गेल्या चार वर्षांपासून विद्यार्थी केंद्रित शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणाचा आनंद मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात आले. येणाऱ्या काळात शिक्षण फक्त पुस्तकी आणि साचेबद्ध नसून कृतिशील, प्रयोगशील, नैसर्गिक आणि अनुभवशील असण्यावर भर देण्यात येईल.

## शालेय शिक्षण

गेल्या चार वर्षात राज्याने शैक्षणिक क्षेत्रात १३ व्या क्रमाकांवरून तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली. याचाच अर्थ महाराष्ट्रात शैक्षणिक क्रांती होत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना आपला कल कोणत्या शाखेकडे आहे, हे समजण्यासाठी कलमापन चाचणी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. या चाचणीद्वारे ३ वर्षात जवळपास ४८ लाख विद्यार्थ्यांना पुढील दिशा ठरविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले आहे. आवश्यकता जाणवली तिथे पालकांचेही समुपदेशन करण्यात आले.

### तत्काळ फेरपरीक्षा

यापूर्वी मार्च परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑक्टोबरमध्ये घेण्यात येत होती. आता मात्र अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची महिन्याभरातच फेरपरीक्षा घेण्यात येते. यामुळे गेल्या ३ वर्षात एकूण ३,८८,७५० विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही यावरून या निर्णयाची व्याप्ती किती मोठी आहे हे दिसून येते. कौशल्य सेतूसारखी महत्त्वाची योजना अमलात आणण्यात आली. पहिल्याच वर्षी या योजनेमध्ये दहावीत उत्तीर्ण होऊ न शकलेल्या २२,०४१ विद्यार्थ्यांना कौशल्य आधारित अभ्यासक्रमाची संधी मिळाली. दहावीच्या गुणपत्रिकेवरील नापास शिक्का पुसणारे देशातील महाराष्ट्र एकमेव राज्य ठरले असून गुणपत्रिकेवर आता दहावीत उत्तीर्ण किंवा दहावी कौशल्य सेतूला पात्र असा शेरा दिला जातो.

आजच्या विद्यार्थ्यांना पुस्तकी आणि प्रयोगशील अभ्यास शिकविण्यासाठी शिक्षकांनीही प्रयोगशील आणि सर्जनशील असणे आवश्यक आहे. ब्रिटिश कौन्सिल आणि टाटा ट्रस्ट यांच्या मदतीने महाराष्ट्रात इंग्रजीचे ज्ञान देण्यासाठी तेजस (टेक्नॉलॉजी एनॅबल्ड एज्युकेशन थ्रू जॉइंट ॲक्शन ॲण्ड स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्हज) आणि चेस (कंटिन्यूअस हेल्प टू द टिचर्स ऑफ इंग्लिश फ्रॉम सेकेंडरी) या कार्यक्रमाच्या माध्यमातून ३५ हजार शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आखलेल्या उपक्रमांतर्गत आयआयटीच्या माध्यमांतून १२,२४७ शिक्षकांना गणित विषयांचे दर्जेदार प्रशिक्षण देण्यात आले. एनवायएएएस (न्यास) आणि आयआयएसईआर या संस्थांच्या मदतीने २८,३८६ विज्ञान शिक्षकांचे कृतियुक्त विज्ञान अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम राबवण्यात येतो. या कार्यक्रमानुसार विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांची रुजवणूक करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत ४०,२३१ शाळांमधील २२,६५,२४९ विद्यार्थी आणि

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

१,१५,१४६ शिक्षकांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

### क्रीडा

महाराष्ट्रात सर्वोत्कृष्ट व गुणवंत खेळाडू तयार व्हावेत यासाठी सरकार क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देत आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळेला मैदान असणे अनिवार्य आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळांडूना सरकारी नोकरीत प्राधान्य देण्याबरोबरच काही खेळाडूंना त्यांच्या कामगिरीनुसार शासकीय सेवेत थेट नियुक्तीही देण्यात येत आहे. प्रावीण्याप्राप्त खेळाडूंना शासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण. निमशासकीय आणि अन्य क्षेत्रातही नोकरीसाठीही ५ टक्के अग्रक्रम. ■ 'मिशन वन मिलिअन फुटबॉल' अंतर्गत एक लाख फुटबॉलचे वाटप, २६ लाख विद्यार्थी एकाच दिवशी मैदानात अवघा महाराष्ट्र क्रीडामय झाला. ■ मिशन ऑलिम्पिक मिशन ट्वेंटी ट्वेंटीचा प्रारंभ, ५५ संभाव्य ऑलिम्पिक क्वालिफाय खेळाडूंची निवड. ■ संभाव्य ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवडलेल्या खेळाडूंना प्रतिवर्षी १ कोटी ७२ लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य. ■ क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करणाऱ्या ३२ खेळाडूंना थेट शासकीय नोकरी.

## उच्च व तंत्र शिक्षण



राज्यातील विद्यार्थ्यांना कालानुरूप आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे यावर भर देण्यात येत आहे. सध्याच्या शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थी केंद्रित रचना आणि विद्यार्थ्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला आहे. चॉईस बेस्ड केड्रिट सिस्टिममुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला चालना मिळत आहे. विद्यापीठांमध्ये शिकवले जाणारे अभ्यासक्रम आणि उद्योगधंद्याची आवश्यकता यात समन्वय (कनेक्ट) असणे आवश्यक आहे असे मला वाटते.

### शिष्यवृत्ती आणि निर्वाह भत्ता

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती :** या योजनेचा लाभ एकूण ६०५ अभ्यासक्रमांना देण्यात येतो. यामध्ये उच्च व तंत्र शिक्षणचे ५३९ अभ्यासक्रम, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे १० अभ्यासक्रम, कृषी विभागाचे २४ अभ्यासक्रम, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे १६ अभ्यासक्रम आणि अन्य १६ अभ्यासक्रम यांचा समावेश आहे. ६०५ अभ्यासक्रमांचा २,६०,६२७ विद्यार्थ्यांना फायदा झाला असून यासाठी पहिल्या वर्षी ६५८ कोटी रुपये वितरित करण्यात आले. या वर्षी २.५० लाख विद्यार्थ्यांसाठी ५५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता :** या योजनेंतर्गत गेल्या वर्षी २५,६२८ विद्यार्थ्यांना लाभ, यासाठी ५६ कोटी रुपये वितरित करण्यात आले.

**प्रवेश आणि शुल्क नियामक प्राधिकरण :** गेल्या ३ वर्षात मिळून शुल्क नियामक प्राधिकरणाने २५०० संस्थांचे प्रस्ताव तपासून अवाजवी शुल्काला कात्री लावली. यामुळे शासनाचे आणि विद्यार्थ्यांचे गेल्या तीन वर्षात जवळपास २९०० कोटी रुपये वाचवण्यात आले.

### थोर राष्ट्रीय महापुरुषांचे साहित्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

## परिवर्तन पर्व

### प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र

■ ज्ञानरचनावादी पद्धतीचा अवलंब करणाऱ्या शाळा – ६७,८२७ ■ प्रगत शाळा – ४८,५६१ ■ प्रशिक्षणाची मागणी करणारे शिक्षक – ५.२१ लाख ■ डिजिटल शाळांची उभारणी – ६६,४५८ ■ शिक्षकांनी तयार केलेले शैक्षणिक ॲप्स – ४,३७९ ■ शिक्षकांनी तयार केलेली संकेतस्थळे/ब्लॉग – ६,४३७ ■ राज्यातील तंत्रस्नेही शिक्षक – १.७० लाख ■ लोकसहभागातून प्राप्त निधी – ४२४ कोटी रुपये ■ जलदगतीने शिक्षण व स्पोकन इंग्रजीमुळे सुमारे ३० हजार विद्यार्थी इंग्रजी माध्यमातून जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यम शाळेत प्रवेशित.

सरकारी आणि जिल्हा परिषदेतील शाळांमधील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मातृभाषेतून देण्यासाठी महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाची स्थापना. यासाठी मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली 'लोकल टू ग्लोबल' अभ्यासक्रमाची निर्मिती. शिक्षण प्रवाहापासून दूर गेलेल्या, शारीरिक असमर्थतेमुळे शाळेत पोहोचू न शकणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी तसेच इतर विद्यार्थ्यांसाठी क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेत असताना त्याच दिवशी आलेल्या परीक्षांमुळे सहभागी होण्यासाठी येणारी अडचण दूर केली. अशा विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी मुक्त मंडळाची (ओपन बोर्ड)ची स्थापना.

## परिवर्तन पर्व

### राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान



■ २०१४ पासून तीन वर्षांत ४०० कोटी रुपयांच्या विविध योजना केंद्राकडून मान्यता. ■ मुंबईच्या डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता आणि पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा ■ वाशिम आणि नंदुरबार येथे नवीन मॉडेल कॉलेजना मान्यता. ■ सावित्रीबाई फुले विद्यापीठाला १०० कोटी रुपये तर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला ४० कोटी रुपये प्राप्त. ■ नागपूर आणि पुणे येथे आयआयटी तर नागपूर येथे आयआयएम सुरू. ■ राष्ट्रीय विधी विद्यापीठे नागपूर, औरंगाबाद आणि मुंबई येथे सुरू. ■ १३ स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठे स्थापन करण्यास मान्यता.

चरित्र साधने प्रकाशन समिती, राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती,महाराज सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीमार्फत पुस्तके आणि खंड प्रकाशित करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रकाशित साहित्य शासनाच्या संकेतस्थळावर टाकण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली.

## मराठी भाषा

मराठी भाषा विभागाने गेल्या वर्षभरात मराठी भाषेला प्राधान्य देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. जसे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन/अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन यांना यापूर्वी राज्य शासनामार्फत २५ लाख रुपये अनुदान देण्यात येत होते. हे अनुदान दुप्पट करण्यात आले असून, ते ५० लाख रुपयांचे केले आहे. साहित्य क्षेत्रात काम करणाऱ्या मुख्य ७ साहित्य संस्थांना दरवर्षी ५ लाख रुपये अनुदान देण्यात येत होते. २०१८ पासून हे अनुदानही दुप्पट म्हणजे १० लाख रुपये करण्यात आले. इंग्लंडमधील 'हे ऑन वे' च्या धर्तीवर सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वरजवळील भिलार येथे भारतातील पहिले पुस्तकांचे गाव विकसित. गावातील ५० घरांमध्ये पुस्तकांचे दालन सुरू, विविध साहित्य प्रकाराच्या ७५० ते १००० पुस्तकांचा समावेश. मराठी विश्वकोशाचे १ ते २० संहिता खंड संकेतस्थळ आणि मोबाइल ॲपवर उपलब्ध, प्रशासनातील दैनंदिन कामकाजासाठी उपयुक्त अशा शब्दकोशाचे मोबाइल ॲप तयार. राज्य शासनाला युनिकोडचे कन्सॉर्शियम या जागतिक संघटनेचे वार्षिक सभासदत्व मिळाले. २९९ केंद्रीय अधिनियमाचे मराठी अनुवाद/प्राधिकृत पाठ नागरिकांसाठी उपलब्ध. एकूण ६०२ राज्य अधिनियमांचा मराठी अनुवाद संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला.

### भाषा भवन

दक्षिण मुंबई किंवा वांद्रा कुर्ला वसाहत परिसरामध्ये भाषा भवन आणि ऐरोली, नवी मुंबई येथे उपकेंद्र बांधण्यास मान्यता देण्यात आली. या भवनामध्ये मराठी भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था यांची कार्यालये असतील.

## सांस्कृतिक कार्य

महाराष्ट्राला सांस्कृतिक परंपरा आहे. मुंबई ही महाराष्ट्राची नुसतीच आर्थिक, वाणिज्यिक नाही तर सांस्कृतिकही राजधानी आहे. मराठी माणसाला अभिमान वाटेल अशीच सांस्कृतिक वाटचाल सुरू आहे.

### दादासाहेब फाळके चित्रनगरीचा बृहत आराखडा

२०१२-१४ वर्षापासून दादासाहेब फाळके चित्रनगरी पुनर्विकासाची प्रक्रिया रखडली होती. निविदा प्रक्रिया पूर्ण करून आता डिसेंबर २०१८ पासून पुनर्विकासाच्या कामास सुरुवात होणार आहे. त्यामुळे चित्रपट निर्मात्यांना चित्रीकरणापासून ते चित्रपट प्रदर्शित होण्यापर्यंतच्या सर्व सुविधा एका छताखाली उपलब्ध होतील.दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या बृहत प्रकल्पाची किंमत सुमारे २६०५ कोटी रुपये असून हा प्रकल्प २८० एकरावर असेल.

### कलाप्रसार

कलेच्या प्रसारासाठी राज्य नाट्य स्पर्धा, मान्यवर वृद्ध साहित्यिक आणि कलावंत यांना मानधन योजना, विविध कला महोत्सव, शिबिरे यांचे आयोजन करण्यात येत आहे.

### कान्स व गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

प्रादेशिक चित्रपटांना सातासमुद्रापार नेऊन संधी देणारे महाराष्ट्र पहिले राज्य. कान्स आणि गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मराठी चित्रपट प्रदर्शित करून आंतरराष्ट्रीय ग्राहक मिळवले. मराठी सिनेमा निर्मात्यांना चित्रपट विचारांची देवाणघेवाण करण्याकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ मिळत आहे. चित्रपट निर्मिती, टीव्ही मालिका, जाहिरातपट, माहितीपट इत्यादींच्या चित्रीकरण परवानगीसाठी एक खिडकी योजनेमुळे संबंधित शासकीय कार्यालयाने ७ दिवसांत अर्जावर निर्णय घेणे बंधनकारक

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

करण्यात आले.

७ दिवसात निर्णय न घेतल्यास या कार्यालयाची अनुमती असल्याचे गृहीत धरून पुढील ७ दिवसात अंतिम निर्णय याबाबत घेण्यात येईल. संबंधित कार्यालयाने अनुमती नाकारल्यास पुढील १५ दिवसात प्रक्रिया शुल्क वगळून उर्वरित रक्कम अर्जदारास परत करण्यात येईल. चित्रीकरणासाठी आवश्यक असलेल्या सर्व प्राधिकरणांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर चित्रीकरणाची परवानगी अर्जदारास कळविण्यात येईल.

## अल्पसंख्याक विकास

अल्पसंख्याकांच्या विकासाला प्राधान्य देत शासनाने गेल्या चार वर्षात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. महाराष्ट्रात गुजराती साहित्य अकादमी, उर्दू अकादमी, सिंधी अकादमी यानंतर आता पंजाबी साहित्य अकादमी सुरू करण्यात येणार आहे. या अकादमीमार्फत पंजाबी भाषेतील पुस्तकांना महाराष्ट्रातील प्रकाशनासाठी अनुदान देण्यात येईल. तसेच पंजाबी भाषेतील कवी, लेखक आणि विचारवंत यांच्या प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांना पारितोषिक देण्यात येईल. या अकादमीच्या स्थापनेने सुमारे दोन लाख पंजाबी भाषिकांना याचा फायदा होणार आहे.

### राज्य वक्फ न्यायाधिकरण

त्रिसदस्यीय न्यायाधिकरण स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सर्व जिल्ह्यांमधून जनतेला औरंगाबाद येथे सुनावणीसाठी यावे लागत असल्याने जनतेची गैरसोय होत होती. पण आता त्रिसदस्यीय न्यायाधिकरणाच्या स्थापनेमुळे नागरिकांची गैरसोय दूर झाली आहे. या न्यायाधिकरणाने कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद आणि नागपूर अशा सहा महसुली विभागात एकूण २१ बैठका घेऊन आतापर्यंत २,४५५ प्रकरणे हाताळली. त्रिसदस्यीय न्यायधिकरणाच्या निर्णयाने धार्मिक कार्यासाठी असणाऱ्या जमिनीचा गैरवापर होणार नाही, याची काळजी राज्य सरकारने घेतली आहे.

### विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती

२००८-०९ ते २०१३-१४ च्या तुलनेत २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधीत लाभार्थ्यांच्या संख्येत सरासरी ६३ टक्के वाढ तर शिष्यवृत्ती रकमेत ७६.५ टक्के वाढ झाली.

### वसतिगृहे

२०१० ते २०१४ या कालावधीत राज्य योजनेंतर्गत मुलींसाठी ५ वसतिगृहे बांधण्यात आली. त्यांची प्रवेश क्षमता ४३० इतकी आहे. २०१५-१६ ते आतापर्यंत एकूण १७ वसतिगृहे बांधण्यात आली. यांची प्रवेशक्षमता १,५४० इतकी आहे. या प्रवेश क्षमतेमध्ये २५८.१४ टक्के इतकी वाढ झाली आहे. सध्या मुलींसाठी १० व मुलांकरिता ६ वसतिगृहांची बांधकामे प्रगतिपथावर आहेत.

### महिलांसाठी स्वयंसाहाय्यता बचतगट

२००८ ते २०१३ च्या तुलनेत २०१४ पासून आतापर्यंत सरासरी महिला सदस्य संख्येमध्ये प्रतिवर्षी २२१ टक्के वाढ झाली. सरासरी बचतगट निर्मितीमध्ये प्रतिवर्षी ३५८ टक्के वाढ झाली. याशिवाय सरासरी खर्चित निधीमध्ये प्रतिवर्षी २८५ टक्के वाढ झाली.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

## परिवर्तन पर्व

### रायगड किल्ला व परिसर पर्यटन विकास प्राधिकरण

रायगड किल्ल्याचा विकास राज्य शासनामार्फत करण्यात येणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या शिखर समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार रायगड किल्ला आणि परिसर विकास आराखड्यासाठी ५०० कोटी रुपयांची मान्यता. यापैकी ६० कोटी रुपये वितरित करण्यात आले. या निधीतून अद्ययावत प्रसाधनगृहे, पर्यटन सुविधा केंद्र, दगडी मार्गिका आणि पुरातत्त्वीय उत्खनन इत्यादी कामे प्रगतिपथावर आहेत.

### रायगड महोत्सव

छत्रपती शिवाजी महाराज यांचे कर्तृत्व नवीन पिढीला कळावे म्हणून रायगड महोत्सवाच्या धर्तीवर शिवनेरी, सिंधुदुर्ग महोत्सवाचे आयोजन. रायगड महोत्सवास १ लाखांहून अधिक शिवभक्तांची हजेरी लावली होती.

### गडसंवर्धन समिती

राज्यातील एकूण २८ किल्ल्यांच्या संवर्धन कार्यासाठी १२३.८३ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सिंहगडाचे थ्रीडी मॅपिंग पूर्ण व उर्वरित ५ किल्ल्यांचे थ्रीडी मॅपिंग प्रगतिपथावर आहे.





पंकजा मुंडे
मंत्री, ग्रामविकास, महिला व बालविकास

ग्रामीण विकास, बेटी बचाओ अभियान आणि कुपोषण निर्मूलनाची चळवळ मागील चार वर्षात राज्यात गतिमान झाली. 'बेटी बचाओ – बेटी पढाओ' अभियान आता लोकांचे अभियान झाले आहे. या अभियानातून झालेल्या जनजागृतीमुळे मुलींकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टिकोन बदलला आहे. लोक मुलींना शिकवत आहेत, समान वागणूक व समान प्रेम देत आहेत. अनेकजण एक किंवा दोन मुलींनंतर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करीत आहेत. मुलगीसुद्धा आपला वारसदार होऊ शकते ही भावना आता लोकांमध्ये रुजत आहे.

# 'भाग्यश्रींना' दिली अस्मिता आणि मनोधैर्य

**पंकजा मुंडे**

'बेटी बचाओ – बेटी पढाओ' आणि 'माझी कन्या भाग्यश्री' या योजनांमधून करण्यात आलेल्या जनजागृतीमुळे लोकांच्या मानसिकतेत मोठे बदल झाले. ही बाब नमूद करताना मला विशेष आनंद होत आहे. घरकुलांची निर्मिती, स्वच्छता अभियान, रस्ते विकास, जलसंधारण, महिलांचे सक्षमीकरण अशा विविध योजनांना मागील चार वर्षात गती देण्यात आली.

## ग्रामस्थांना हक्काचे घर

केंद्र शासनाने २०२२ पर्यंत 'सर्वांसाठी घर' हे धोरण जाहीर केले. राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेतून १० लाख ५१ हजार ०९० लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. ग्रामविकास विभागामार्फत प्रधानमंत्री आवास योजनेशिवाय रमाई, शबरी, आदीम, पारधी इत्यादी राज्य पुरस्कृत घरकूल योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. या योजनांमधून राज्यात आतापर्यंत ५ लाख ५७ हजार ९२२ इतकी घरे बांधून पूर्ण झाली. याशिवाय ३ लाख ०१ हजार ५१० इतक्या घरांचे काम प्रगतिपथावर आहे. मागील चार वर्षात ग्रामीण भागात झालेले हे अभूतपूर्व असे काम असून यासाठी आतापर्यंत ११ हजार १५६ कोटी रुपये खर्च झाले. पूर्वी या योजनेतून देण्यात येणारे ९५ हजार रुपयांचे अनुदान वाढवून आता १ लाख ५० हजार रुपये इतके करण्यात आले आहे.

पं. दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेतून भूमिहीन लाभार्थ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य देण्यात येते. या योजनेतून १ हजार ५०४ लाभार्थ्यांना जागाखरेदीसाठी अनुदान देण्यात आले.

'सर्वांसाठी घरे' या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय घेतला. अशा अतिक्रमणधारकांची नोंदणी करण्यासाठी संगणक प्रणाली तयार करण्यात आली. ८ नोव्हेंबर २०१८ पर्यंत १ लाख अतिक्रमणांची नोंदणी करून ही अतिक्रमणे नियमित करण्यात येतील.

## गावांना मिळाले दर्जेदार रस्ते

'मुख्यमंत्री ग्रामसडक योजना' योजनेतून आतापर्यंत ५ हजार ९६९ कि.मी. लांबीची ९०० कामे पूर्ण झाली. याशिवाय ८ हजार ८३० कि.मी. लांबीची १ हजार ९६७ कामे प्रगतिपथावर असून ती लवकरच पूर्ण होतील. योजनेच्या कामावर आतापर्यंत २ हजार ६४४ कोटी रुपये इतका निधी खर्च झाला.

## बचतगटांना शून्य टक्के व्याजदराने कर्ज

'सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण' योजनेतून बचतगटांना बिनव्याजी बँक कर्ज उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. या योजनेतून आतापर्यंत ९ हजार ४४० बचतगटांना कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्यात आला. या बचतगटांना २.७ कोटी रुपये इतके व्याज अनुदान देण्यात आले.

'उमेद' अभियानातून २०१४ नंतर २ लाख ४४ हजार ७३४ इतके बचतगट स्थापन करण्यात आले. यातून ग्रामीण भागातील ३२ लाख ८६ हजार १४६ इतकी कुटुंबे बचतगट चळवळीशी

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

## परिवर्तन पर्व

### अस्मिता योजना

किशोरवयीन मुलींना फक्त ५ रुपयांत तर इतर महिलांना स्वस्त दरांत सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देणे तसेच त्याच्या विक्री



व्यवसायातून बचतगटांच्या महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दुहेरी उद्देशाने 'अस्मिता योजना' सुरू करण्यात आली. महिलांमध्ये मासिक पाळीच्या काळात सॅनिटरी नॅपकीन वापराचे प्रमाण फक्त १७ टक्के इतके आहे. जिल्हा परिषद शाळांमधील ११ ते १९ वयोगटातील किशोरवयीन मुलींना २४० मी.मी.च्या ८ पॅडचे एक पाकीट ५ रुपयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येते. किशोरवयीन मुलींना वर्षभरात १३ पाकिटे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महिलांना २४० मी.मी.च्या ८ पॅडचे एक पाकीट २४ रुपयांना तर २८० मी.मी.च्या ८ पॅडचे एक पाकीट २९ रुपयांना उपलब्ध होत आहे.

सॅनिटरी नॅपकीन विक्री करण्यासाठी आतापर्यंत २६ हजार ८३० बचतगटांनी नोंदणी केली आहे. हे बचतगट कार्यरत असलेल्या साधारण २७ हजार गावांपर्यंत ही योजना पोहोचली आहे.

जोडली गेली. या कुटुंबातील फक्त महिलांच्या सक्षमीकरणावर भर न देता बेरोजगार तरुणांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे, ज्यामुळे या कुटुंबाचे आर्थिक सक्षमीकरण गतीने होऊ शकेल. यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना राबवण्यात येत आहे. या योजनेतून आतापर्यंत २७ हजार ६६७ जणांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यापैकी १२ हजार ५६७ जणांना रोजगार उपलब्ध झाला.

### स्मार्ट ग्राम योजना

राज्यातील सर्व गावांचा शाश्वत विकास करण्यासाठी 'स्मार्ट ग्राम योजना', राबवण्यात येत आहे. या योजनेमुळे सर्व विभागातील सर्व गावांना सहभागाची समान संधी मिळत आहे. स्मार्ट ग्राम म्हणजे सॅनिटेशन (स्वच्छता), मॅनेजमेंट (व्यवस्थापन), अकाऊंटॅबिलिटी (दायित्व), रिन्युएबल एनर्जी एनव्हॉयरॉन्मेंट (अपारंपरिक ऊर्जा आणि पर्यावरण) व टेक्नॉलॉजी ट्रान्स्परन्सी (पारदर्शकता व तंत्रज्ञानाचा वापर). या पंचसूत्रांवर आधारित गावांचा विकास करण्याच्या दृष्टीने ही योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. या योजनेतून २०१६-१७ साठी ३५० ग्रामपंचायतींना तालुकास्तर पुरस्कार जाहीर करण्यात आले. या ग्रामपंचायतींना प्रत्येकी १० लाख रुपये प्रमाणे ३५ कोटी रुपयांची रक्कम पुरस्कार स्वरूपात वितरित करण्यात आली. ३४ ग्रामपंचायतींना जिल्हास्तर स्मार्ट ग्राम पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्यांना प्रत्येकी ४० लाख रुपये प्रमाणे १३.६० कोटी रुपयांचा निधी पुरस्कार स्वरूपात वितरित करण्यात आला.

### सरपंचांची थेट निवड

सरपंचांची निवड आतापर्यंत ग्रामपंचायतीच्या सदस्यांमधून केली जात होती. पण आता सरपंचांची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय विधिमंडळात कायदा संमत करून घेण्यात आला आहे. यामुळे सरपंचांना आता पूर्ण क्षमतेने सलग ५ वर्षे काम करता येत आहे. आतापर्यंत ९ हजार ३९५ ग्रामपंचायतींमध्ये सरपंचांची थेट जनतेतून निवड करण्यात आली आहे.

### 'आपले सरकार' सेवा केंद्र

पंचायतीराज संस्थांचा सर्व कारभार ई-पंचायत प्रकल्पांतर्गत संगणकीकृत करून त्यामध्ये एकसूत्रता व पारदर्शकता आणून नागरिकांना विविध प्रकारचे दाखले व सेवा एकाच केंद्रावर त्यांच्या रहिवासी क्षेत्रातच उपलब्ध करून देण्यासाठी आतापर्यंत २० हजार ४८२ ग्रामपंचायतींमध्ये 'आपले सरकार सेवा केंद्रांची' स्थापना करण्यात आली आहे. या योजनेस भारत सरकार आणि एसएपी यांच्या संयुक्त विद्यमाने २०१८ चा जेम्स ऑफ डिजिटल इंडिया पुरस्कार प्राप्त झाला आहे.

### शिक्षक बदल्यांची पारदर्शक प्रक्रिया

शासनाकडे आंतरजिल्हा बदल्यांचे जवळपास १० हजार अर्ज प्रदीर्घ काळापासून प्रलंबित होते. यावर तोडगा काढण्यासाठी विशेष संगणक प्रणाली विकसित करण्यात आली. यातून २०१७-१८ मध्ये शिक्षकांच्या ५ हजार ५०० आंतरजिल्हा बदल्या करण्यात आल्या. २०१८-१९ मध्ये ३ हजार ५०० इतक्या आंतरजिल्हा बदल्या तर ९८ हजार इतक्या जिल्ह्यांतर्गत बदल्या करण्यात आल्या. या माध्यमातून शिक्षक बदल्यांची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने राबवली गेली. बदल्यांमध्ये होणारा आर्थिक गैरव्यवहार रोखला गेल्याने

### माझी कन्या भाग्यश्री

या योजनेतून २०१७-१८ या वर्षात ४ हजार ३७७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. त्यासाठी ११ कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला आहे. २०१८-१९ साठी २१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

अनेक शिक्षकांनी आणि शिक्षक संघटनांनी समाधान व्यक्त केले आहे. या योजनेला मागील दोन्ही वर्षी केंद्रीय स्तरावरील स्कॉच ऑर्डर ऑफ मेरिट पुरस्कार प्राप्त झाला आहे.

### ग्रामपंचायतींना स्वमालकीची इमारत

ग्रामपंचायतींना स्वमालकीची स्वतंत्र इमारत असावी यासाठी 'बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना', सुरू करण्यात आली. यातून राज्यातील ४ हजार २५२ ग्रामपंचायतींना इमारती बांधून दिल्या जातील. २०१८-१९ मध्ये या योजनेसाठी ५५ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला.

'आमचं गाव, आमचा विकास' ही योजना आम्ही हाती घेतली आहे. गावांचा सुनियोजित विकास व्हावा यासाठी प्रत्येक गावाचा पंचवार्षिक व वार्षिक विकास आराखडा लोकसहभागातून तयार करण्यात आला आहे.

### ग्राम बालविकास केंद्र

राज्यातील अतितीव्र कुपोषित बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी २०१७-१८ मध्ये ग्राम, अंगणवाडी स्तरावर ग्राम बालविकास केंद्रे सुरू करण्यात आली. याअंतर्गत अंगणवाडीतील बालकांना किमान २ आणि कमाल १२ आठवड्यांकरिता डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार करण्यात येतो. दररोज नियमित ३ वेळेच्या आहारासोबत अतिरिक्त पौष्टिक आहार ३ वेळा असा एकूण ६ वेळा देण्यात येतो. ही योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांसाठी कार्यान्वित करण्यात आली आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनामार्फत १४ कोटी रुपये निधी जिल्हास्तरावर उपलब्ध करून देण्यात आला. सद्य:स्थितीत ग्राम बालविकास केंद्रांमध्ये ३२ हजार २९८ कुपोषित बालकांना दाखल करण्यात आले असून आतापर्यंत १६ हजार ०६५ (४९ टक्के) बालकांमध्ये सुधारणा झाली आहे.

### अंगणवाडी सेविकांचे मानधन थेट बँक खात्यात

अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे मानधन थेट त्यांच्या बँकखात्यात जमा करण्यासाठी राज्यस्तरावर पब्लिक फायनॅन्शिअल मॅनेजमेंट सिस्टिम (पीएफएमएस) सन्मान प्रणाली जून २०१७ पासून अमलात आणली आहे. सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना पीएफएमएसद्वारे मानधन अदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. अंगणवाडी सेविकांच्या मानधनात ४ हजार रुपयांवरून ६ हजार ५०० रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे.

### अनाथ बालकांना १ टक्का समांतर आरक्षण

२ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णायान्वये राज्यातील अनाथ बालकांना शिक्षण व नोकरीमध्ये १ टक्का समांतर आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.

### मनोधैर्य योजना

बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला आणि बालकांना अर्थसाहाय्य करणे व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मनोधैर्य योजना सुरू करण्यात आली. गंभीर व तीव्र स्वरूपाच्या प्रकरणामध्ये पीडितास १० लाख रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**शब्दांकन : इर्शाद बागवान,** विभागीय संपर्क अधिकारी

## परिवर्तन पर्व

### डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

या योजनेंतर्गत आदिवासी भागातील गरोदर महिला आणि स्तनदा मातांना नियमित पोषण आहाराव्यतिरिक्त प्रतिदिन एक वेळेचे संपूर्ण जेवण (चौरस आहार) देण्यात येतो. नियमित आहाराव्यतिरिक्त शाकाहारी मुलांना २ केळी व



मांसाहारी बालकांना १ उकडलेले अंडे आठवड्यातून ४ दिवस देण्यात येते. या योजनेंतर्गत नियमित पोषण आहारासाठी रु. २८.६२ कोटी तर एक वेळच्या चौरस आहारासाठी रु ७१.५५ कोटी असा एकूण १००.१७ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे. या योजनेचा लाभ आदिवासी क्षेत्रातील १ लाख ५९ हजार गरोदर महिला व स्तनदा मातांना होत आहे.

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88



रस्ते विकास महामंडळाने राज्याच्या प्रमुख रस्ते विकासाला गती दिली. समृद्धी महामार्ग, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू, ठाणे खाडी पूल, मुंबई-पुणे महामार्गावरील नवीन मार्गिका, टिकूजीनीवाडी ते बोरिवली बोगदा अशी महत्त्वाची कामे पूर्ण केली जात आहेत. राज्यात विविध ठिकाणी जवळपास ५५ उड्डाणपूल उभे केले आहेत. लवकरच पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर ट्रामा सेंटर उभारले जाणार आहे. सर्वसामान्य नागरिकांचा प्रवास सुरक्षित आणि गतीने व्हावा, यावर विभागाने लक्ष केंद्रित केले आहे.

**एकनाथ शिंदे**
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)

# सुरक्षित आणि सुखद

**एकनाथ शिंदे**

रस्ते विकास महामंडळाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन राज्याच्या विकासाला चालना दिली आहे. वांद्रे-वरळी सी-लिंकमुळे दळणवळण गतीने सुरू झाले आहे. त्यामुळे वेळेची बचत झाली आहे. राज्यात विविध ठिकाणी जवळपास ५५ उड्डाणपूल उभे केले आहेत. लवकरच पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर ट्रामा सेंटर उभारले जाईल. सर्वसामान्य नागरिकांचा प्रवास सुरक्षित आणि गतीने व्हावा म्हणून विभाग विविध उपाययोजना करीत आहे.

## समृद्धी महामार्ग

समृद्धी महामार्गामुळे नागपूर ते मुंबई दरम्यानचे अंतर आठ तासांमध्ये पार करता येणार असल्याने, कृषिक्षेत्राबरोबर राज्यातील इतर उद्योगधंद्यांच्या वाढीस गती मिळेल. जेएनपीटी बंदरातून मालाची ने-आण करणे सुलभ आणि जलद होईल. म्हणूनच हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या महामार्गाची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ बांधणी करणार असून ५५,३३५ कोटींची गुंतवणूक असलेला हा प्रकल्प राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा असेल.

सध्या नागपूर व मुंबई ही शहरे एक नव्हे तर तीन मार्गांनी जरी जोडले असली, तरी या मार्गावर वेगाच्या मर्यादेमुळे वेगवान पद्धतीने प्रवासी वाहतुकीसाठी १६ तास आणि मालवाहतुकीसाठी ४० तास इतका कालावधी सध्या लागतो. आंतरराष्ट्रीय मानकाप्रमाणे ८०० किलोमीटरचे अंतर गाठण्यासाठी १२ तासांचा कालावधी लागणे अपेक्षित आहे. तर प्रवासी वाहतुकीसाठी हाच कालावधी ६ ते ८ तासांचा गृहीत धरला जातो. सध्या प्रवासी वाहतुकीसाठी १६ ते १८ तासांचा वेळ लागतो.


पुणे, नाशिक, शहर ते मुंबई बंदरामधील अंतर कमी असल्याने मालाची आयात व निर्यात करणे सोपे जाते त्यामुळे उद्योगधंदे व शेतीला पोषक वातावरण असल्याने, त्या भागाचा विकास झाला आहे. प्रस्तावित समृद्धी महामार्गामुळे पूर्व महाराष्ट्रातील शेतीपूरक उद्योगांशिवाय इतर उद्योगधंद्यांची वाढ होणार आहे. एवढेच नव्हे, तर सेवा उद्योग, गोदामे, शीतगृहे यामुळे उत्पादन क्षमता व वाहतूक व्यवस्थेतही भर पडणार असून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल.

या महामार्गाची एकूण लांबी ७०१ कि.मी. असून या मार्गिकेवरील रस्त्यांची रुंदी १२० मीटर असणार आहे. ये-जा करण्यासाठी प्रत्येकी ३ मार्गिका व १ पेव्हडशोल्डर असणार असून वाहन वेग १५० कि.मी. प्रतितास असेल. या मार्गिकेमुळे महाराष्ट्रातील १० जिल्हे, २६ तालुके, ३९२ गावे जोडली जातील. जवळपास २४ नवनगरांची संख्या असेल. सद्य:स्थितीत द्रुतगती महामार्गासाठी आवश्यक असलेल्या एकूण जमिनीपैकी ९० टक्के जमीन खरेदी महामंडळाने केली आहे. त्यामुळे लवकरच कामाचा शुभारंभ होणार आहे.

## ठाणे खाडी पूल

पुणे व गोवा या राष्ट्रीय महामार्गांना जोडणाऱ्या सायन-पनवेल मार्गावरील ठाणे खाडीवर तिसऱ्या पुलाचे बांधकाम करण्याची जबाबदारी शासनाने राज्य रस्ते विकास महामंडळावर सोपवली

## परिवर्तन पर्व




### वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू

मुंबई शहराच्या पश्चिमेस जलद गती मुक्त मार्ग असणे गरजेचे असल्याचे लक्षात आल्याने पश्चिम मुक्त मार्गाची संकल्पना करण्यात आली. त्याचाच भाग म्हणून मुंबई शहराच्या पश्चिम उपनगरीय वाहतूक सुधारणेच्या दृष्टीने वर्सोवा-वांद्रे सागरी मार्ग बांधण्यात येणार आहे.

वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू प्रकल्पांतर्गत अस्तित्वातील -वांद्रे-वरळी सागरी सेतूपासून प्रकल्पाच्या बांधणीचा एकूण खर्च रुपये ११,३३२.८४ कोटी आहे. सागरी पूल व सर्व कनेक्टरसह एकूण लांबी १७.१७ किमी असून किनारपट्टीपासून ९०० मीटर अंतरावर असलेल्या आखणीस मान्यता देण्यात आली आहे. हा संपूर्ण प्रकल्प पाच वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. या सेतू मार्गामुळे उपनगरातील मुंबईकरांना अवघ्या २० मिनिटांत दक्षिण मुंबईत पोहोचता येईल.

आहे. विशेष राज्यमार्गाचा दर्जा असलेला सायन-पनवेल मार्ग मुंबई, नवी मुंबईतील नागरी व औद्योगिक भागातून जातो. या मार्गावर गेल्या दहा वर्षात वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे वाहनांची कोंडी होते. या प्रकल्पाच्या बांधणीचा एकूण खर्च रु. ७७५.५८ कोटी आहे. या प्रस्तावित पुलाची एकूण लांबी १८३८ मी. असून त्याची मुंबई बाजूच्या पोहोच रस्त्याची लांबी ३८० मी. व नवी मुंबई बाजूच्या पोहोच रस्त्याची लांबी ९३० मी. आहे. या प्रकल्पांर्गत अस्तित्वातील सहापदरी ठाणे खाडी पूल-२ च्या उत्तर व दक्षिण दोन्ही बाजूस तीन मार्गिकांचे दोन समांतर नवीन पूल बांधणे प्रस्तावित आहे. त्यामुळे या ठिकाणी १२ मार्गिका उपलबध होतील. ३६ महिन्यांत या खाडी पुलाचे काम पूर्ण होईल असा विश्वास आहे.

### मुंबई-पुणे महामार्गावरील नवीन मार्गिका

मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर खोपोली एक्झिट ते कुसगाव (सिंहगड संस्था) या भागातील १२ कि.मी. च्या राहिलेल्या लांबीसाठी (मिसिंग लिंक) दोन बोगदे व दोन केबल स्टेड पूल (व्हायडक्ट) यासह आठपदरी नवीन रस्ता बांधण्याच्या कामास व खालापूर फूडमॉल ते खोपोली इंटरचेंज दरम्यान आठपदरी उन्नत मार्ग बांधण्यात येत आहे. एकूण ४,७९७.५७ कोटींच्या या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे दरम्यान प्रवासी वेळेत २० ते २५ मिनिटांची बचत होईल. या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे देशात प्रथमच जमिनीखालून १.६६ किमी व ८.९९ किमी लांबीचे (प्रत्येकी चार पदरी) अशी समांतर बोगद्यांची व दोन केबल स्टेड पूल (व्हायडक्ट) यांची बांधणी होणार आहे.

### भिवंडी-कल्याण-शिळफाटा सहापदरी

सध्याच्या चार पदरी रस्त्याची क्षमता कमी पडत असल्यामुळे शिळफाटा ते भिवंडी जंक्शन या २१.०३७ कि.मी. लांबीमध्ये चारपदरी रस्त्याचे सहापदरीकरण, रेल्वेवरील पूल, पुलाचे पोचमार्ग, जंक्शन सुधारणा, सूचनाफलके व तत्सम आनुषंगिक कामे करण्यात येणार आहेत. या प्रकल्पाची किंमत ३८९ कोटी रुपये आहे. या रस्त्यामुळे वाहतुकीच्या कोंडीतून वाहनचालकांची मुक्तता होईल.

### टिकूजीनीवाडी ते बोरिवली बोगदा

ठाणे-घोडबंदर मार्गावर उन्नत मार्ग बांधण्यास प्रारंभ होणार आहे. एकूण ६६७.३७ कोटी रुपयांच्या या प्रस्तावित प्रकल्पांतर्गत उन्नत मार्गाचे बांधकाम, अस्तित्वातील रस्त्याचे २+२ मार्गिकेसाठी मजबुतीकरण व रुंदीकरण, पथकर स्थानकांची क्षमतावाढ करण्याचे नियोजन आहे.

ठाण्यातील टिकूजीनीवाडी ते बोरिवली दरम्यान बोगद्याच्या कामास प्रारंभ होणार आहे. ठाणे ते बोरिवलीदरम्यानचे अंतर अवघ्या १५ ते २० मिनिटांमध्ये होण्यासाठी प्रस्तावित प्रकल्प उपयुक्त ठरेल. सध्या ठाणे ते बोरिवली या लांबीतील अंतर घोडबंदर मार्गे २३ किमी आहे. ते अंतर गाठण्यासाठी एक ते दीड तासाचा अवधी लागतो. या प्रस्तावित भुयारी मार्गामुळे राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ व राष्ट्रीय महामार्ग क्र.८ या राष्ट्रीय महामार्गांना जोडणारी कनेक्टिव्हिटी तयार होईल. बोगदा झाल्यावर हे अंतर २० मिनिटांत कापता येईल. या प्रकल्पांचा अंदाजित बांधकाम खर्च एकूण ३ हजार कोटी रुपये आहे. अशा प्रकारे रस्ते विकास महामंडळ गतीने कामाला लागले असून, त्यामुळे नागरिकांचा प्रवास सुरक्षित आणि सुखद होईल.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट,**
विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88



सुभाष देसाई
मंत्री, उद्योग, खनिकर्म

"औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी उद्योग विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. मेक-इन-महाराष्ट्र, इज-ऑफ-डूईंग बिझनेस, मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन २०१८' यांसारख्या उपक्रमांद्वारे राज्य सरकार महाराष्ट्रातील औद्योगिक विकास वाढीसाठी अनेकविध प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांमुळेच राज्यात उद्योगवाढीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले. त्यामुळे गुंतवणुकीचा ओघ वाढला. प्रगतिशील औद्योगिक धोरणामुळे उद्योजकांची महाराष्ट्राला प्रथम पसंती आहे."

# उद्योजकांची पहिली पसंती!

**सुभाष देसाई**

महाराष्ट्र हे भारताचे ग्रोथ इंजिन आहे. परकीय गुंतवणूक वाढवण्यासोबत उद्योग सुलभ धोरण राबवण्यावर राज्य शासनाचा भर राहिला आहे. नावीन्यपूर्ण कल्पनाशक्तीचा पुरेपूर वापर करून उद्योग क्षेत्रात महाराष्ट्राला अव्वल ठेवण्यात आले आहे.

विदेशी गुंतवणुकीत राज्य नेहमीच अग्रेसर राहिले आहे. डिसेंबर २०१४ ते ऑगस्ट २०१७ या कालावधीत राज्यामध्ये सर्वात जास्त थेट विदेशी गुंतवणुकीचे प्रस्ताव प्राप्त झाले. देशात एकूण झालेल्या विदेशी गुंतवणुकीपैकी ३५ टक्के म्हणजेच २ लाख ०८ हजार ४२९ कोटी रुपयांची गुंतवणूक एकट्या राज्यात झाली आहे. फेब्रुवारी २०१६ मध्ये झालेल्या मेक इन इंडिया सप्ताहादरम्यान रु.८ लाख कोटी एवढ्या गुंतवणुकीचे एकूण २९८४ सामंजस्य करार झाले. त्यामुळे अंदाजे ३० लाख रोजगार उपलब्ध होतील. गेल्या चार वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योजकांनी महाराष्ट्राला पसंती दिल्याचे चित्र आहे.

### 'मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन २०१८'

१८ -२० फेब्रुवारी दरम्यान राज्यात मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन २०१८' या नावाने सर्वात मोठी गुंतवणूक परिषद, उद्योग मंत्रालयातर्फे भरविण्यात आली. २०२५ सालापर्यंत महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी बनवण्याचा रोडमॅप आम्ही उपस्थितांपुढे सादर केला. या परिषदेला ४० हजारांहून अधिक नागरिकांनी भेट दिली.

विविध देशातील आंतरराष्ट्रीय कंपन्या व सरकारांचे प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित होते. या परिषदेत विविध देशातील सरकारांच्या प्रतिनिधी मंडळाबरोबर महाराष्ट्र सरकारने सामंजस्य करार केले. इमर्सन, एल. जी. इलेक्ट्रॉनिक्स यासारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार झाले. एकूण प्राप्त ३ हजार ९६५ करार करण्यात आले असून जवळपास १२ लाख ०७ हजार ८६९ कोटींपर्यंत गुंतवणूक महाराष्ट्रात होईल. यातून महाराष्ट्रात जवळपास ३७ लाखांपर्यंत रोजगार निर्मिती होईल.

### पायाभूत सुविधांवर विशेष भर

राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांचा सखोल अभ्यास करण्यात आला. त्या अभ्यासानुसार काही निर्णय घेतले आहेत. कोणताही उद्योग सुरू करताना तक्रारी नसतात. परंतु उद्योग सुरू झाल्यानंतर प्रदूषण, सांडपाणी, दूषितपाणी यावरून लोकांच्यात प्रक्षोभ जाणवतो. पण आता यावर तोडगा म्हणून सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात आली. सी.ई.टी.पी.मधून मोठ्या किंवा छोट्या प्रकल्पातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाणी सोडण्याचे काम शासनाकडून केले जाते.

याबरोबरच औद्योगिक विकासाच्या बाबतीत त्या त्या क्षेत्रातील रस्तेदुरुस्ती करणे, नवीन रस्त्यांची निर्मिती करणे, वीज-पाणी उपलब्ध करून देणे अशी कामे हाती घेण्यात आली. वीज पुरवठा आणि इतर बाबतीत आय.टी.सी.ची मदत घेऊन, औद्योगिक क्षेत्रात विजेचे आधुनिकीकरण केले जात आहे.



## परिवर्तन पर्व

### महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण

५० टक्के इलेक्ट्रॉनिक वस्तू या देशातच बनवाव्यात. त्यासाठी सर्व राज्यांनी सहभाग द्यावा असा निर्णय केंद्र शासनाने घेतला. त्याप्रमाणे राज्याने इलेक्ट्रॉनिक धोरण आखले आहे. या धोरणाप्रमाणे राज्याच्या क्षमतांचा व संसाधनाचा पुरेपूर वापर करून औद्योगिकदृष्ट्या अविकसित भागात फॅब उद्योग स्थापित होण्यासाठी जे उद्योजक हा उद्योग करतील त्यांना शासनाकडून भांडवल, व्याजावर सबसिडी, स्टँपड्यूटीवर सवलत, वीज दरात सवलत अशा औद्योगिक सवलती दिल्या जाणार आहेत. विकास महामंडळातर्फे आयटीच्या धर्तीवर इलेक्ट्रॉनिक पार्क बनवण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत पात्र असलेल्या घटकांना स्थिर गुंतवणुकीवर १५ ते २५ टक्के भांडवली अनुदान मंजूर करण्यात येणार आहे. या धोरणांतर्गत आतापर्यंत १८ इलेक्ट्रॉनिक प्रकल्पांतर्गत रु.६ हजार ३०० कोटीची गुंतवणूक झाली असून अंदाजे १२ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. साल २०२० पर्यंत या क्षेत्रात २३ हजार कोटी पर्यंतची गुंतवणूक मिळवण्याचे लक्ष्य असून यातून १ लाखांपर्यंत रोजगार निर्मिती होणार आहे.

### माहिती तंत्रज्ञान

माहिती तंत्रज्ञान हा उद्योग दहा ते पंधरा वर्षांपूर्वी महाराष्ट्रात सुरू झाला. तो पुणे, मुंबई शहरात विस्तारला. याचा शेजारील राज्यांनी स्वीकार केला. यामुळे राज्याराज्यांत स्पर्धा वाढली. यामुळे अधिकाऱ्यांना गुडगाव, नोएडा, हैद्राबाद आणि बंगळुर येथे पाठवून शासनाने माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा अभ्यास केला. या अभ्यासानुसार येथे बदल करण्यात आले. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी नवी धोरणे राबवल्यानंतर राज्यात नव्याने ४२ माहिती व तंत्रज्ञान पार्क तयार केले आहेत. या पार्कमध्ये १५०० कोटी गुंतवणूक अपेक्षित असून १ लाख तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याची क्षमता यात आहे. या धोरणांतर्गत येत्या काळात ५० हजार कोटी गुंतवणूक आणि १० लाख रोजगार निर्मितीचा उद्योग मंत्रालयाचा मानस आहे. नवीन माहिती तंत्रज्ञान कंपन्या याव्यात म्हणून प्रयत्न सुरू आहेत. पुणे व मुंबई या शहरांव्यतिरिक्त नागपूर, नाशिक व औरंगाबाद ही नवीन शहरे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये पुढे येत आहेत.

### स्वयंपूर्ण व स्वावलंबी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त, राज्यातील अनुसूचित जाती/ जमाती प्रवर्गातील उद्योजकांना स्वयंपूर्ण व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबीकरण्याच्या उद्देशाने आणि त्यांना औद्योगिक वाढीच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्याच्या दृष्टिकोनातून, शासनाने २०१६ मध्ये 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्योजकांसाठी विशेष प्रोत्साहन योजना' जाहीर केली. या धोरणांतर्गत एमआयडीसी क्षेत्रात उपलब्ध भूखंडापैकी २० टक्के भूखंड या उद्योजकांसाठी राखीव, एमआयडीसी तसेच अन्य भागातील उद्योगाला लागणाऱ्या भूखंडावर अनुक्रमे ३० टक्के (अधिकतम रू.१० लाख) आणि २० टक्के (अधिकतम रू.५ लाख) भूखंड अनुदान शासकीय भूखंड दराच्या किमतीत देण्यात येत आहे. आतापर्यंत १६ एम.आय.डी. सी.मध्ये ५२ भूखंड या प्रवर्गातील उद्योजकांना हस्तांतरित करण्यात आले आहे. ४५ लघू, मध्यम उद्योगांना ६ कोटींपर्यंत अनुदान देण्यात आले.

### किरकोळ व्यापार धोरण

किरकोळ उपक्रमांमध्ये झालेली वाढ व राज्याची अर्थव्यवस्था व रोजगार यास चालना देण्याची किरकोळ व्यापार क्षेत्राची क्षमता याचा विचार करून, राज्याचे किरकोळ व्यापार धोरण–२०१६ जाहीर केले. या धोरणामध्ये कामगार कायद्याचे सुलभीकरण, अन्न व किराणा रिटेलिंगचा 'अत्यावश्यक सेवा' (ईएसएमए)मध्ये समावेश, जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत (ईएसएससीओएम) असलेल्या साठवणूक मर्यादेमध्ये (स्टॉकिंग लिमिट्स) शिथिलता आणणे, किरकोळ उपक्रमांमध्ये मानव संसाधन विकास आणि कौशल्य विकास करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. 'मेक इन इंडिया' कार्यक्रमात शासनासोबत झालेल्या सामंजस्य करारामध्ये किरकोळ व्यापार करणाऱ्या एकूण ७ प्रकल्पांमध्ये रुपये ५,०८५ कोटीची गुंतवणूक प्रस्तावित असून, त्यात अंदाजे २२,३४० रोजगार निर्मिती होईल.

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

### वस्तू व सेवांच्या खरेदीमध्ये पारदर्शकता

केंद्र शासनाने शासकीय खरेदीदार विभागांकडून वस्तू व सेवांच्या खरेदीसाठी गव्हर्नमेन्ट ई-मार्केटप्लेस हे पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलवर सद्य:स्थितीत महाराष्ट्रातील ८,३७८ उत्पादक/पुरवठादार नोंदणीकृत आहेत. जेम (जीईएम) पोर्टलवर खरेदी करताना खरेदीदार विभागाच्या गरजेनुसार निविदा फॉर्म तयार करण्याची सुविधा असून जास्तीत जास्त पर्याय उपलब्ध होऊन खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे. वस्तू व सेवा प्रचलित बाजारभावापेक्षा कमी किमतीत खात्रीशीर रीतीने उपलब्ध होणार असल्यामुळे सूक्ष्म, लघू उद्योजक यात सहभाग घेऊ शकतात. या प्रणालीमुळे पारदर्शकता आली असून त्याचबरोबर स्पर्धेमुळे शासनाचे पैसेही वाचत आहेत. शासनाच्या ई-मार्केट प्लेस या पोर्टलचा ग्राहक आणि उत्पादकांना मोठ्या प्रमाणावर फायदा होत आहे.

### सुधारित खरेदी धोरण

राज्याच्या सुधारित खरेदी धोरणामध्ये नोंदणीकृत सूक्ष्म व लघू उद्योगांकडून खरेदी करण्यासाठी २४१ वस्तू राखीव ठेवण्यात आल्या. अशा राखीव वस्तूंची खरेदी १०० टक्के सूक्ष्म व लघू उद्योगांकडून करताना त्यापैकी २० टक्के खरेदी अनुसूचित जाती /जमाती उद्योजकांसाठी राखीव ठेवण्यात आल्या. सर्व साधारण खरेदीमध्ये सूक्ष्म व लघू उद्योजकांसाठी २० टक्के आरक्षण ठेवण्यात आले असून, त्यापैकी अनुसूचित जाती /जमाती उद्योजकांसाठी ४ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. तसेच सूक्ष्म व लघू उद्योगांनी निविदेत सहभाग घेतल्यास निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.

### पारदर्शी प्रक्रिया

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाची वाटप प्रक्रिया अधिक पारदर्शी करण्यात येत आहे. त्यासाठी विशेष निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये औद्योगिक विकास महामंडळाच्या ज्या वसाहतीमधील ८० टक्क्यांपेक्षा जास्त भूखंड वितरित झाले आहेत, अशा क्षेत्रातील उर्वरित भूखंड वितरणासाठी निविदा पद्धती राबवण्यात येणार आहे. तसेच ८० टक्क्यांपेक्षा कमी भूखंड वितरित झालेल्या क्षेत्रातील वाटप थेट पद्धतीने वाटप समिती करेल. या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेसाठी १५ दिवसांचा अवधी देण्यात येईल.

### महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण

महाराष्ट्रातल्या उद्योगक्षेत्रात महिलांचा वाटा सध्या ९ टक्के आहे, पुढील पाच वर्षात तो २० टक्क्यांपर्यंत नेण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. महिला उद्योजकांच्या १० टक्के कर्जातील ५ टक्के व्याज शासन भरणार असून विविध ठिकाणी भरविल्या जाणाऱ्या प्रदर्शनाला जाण्या-येण्याच्या खर्चाची तरतूद धोरणात केली आहे.

### क्लस्टर्सची उभारणी

एकाच प्रकारचे उत्पादन करणाऱ्या उद्योजकांना एकत्र करून त्यांच्या उद्योगास आवश्यक अशा सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून उद्योगाचे क्लस्टर उभे केले जात आहेत. एकत्रित प्रक्रिया

## परिवर्तन पर्व

### ईज ऑफ डूईंग बिझनेस

जागतिक बँक सध्या जगातील १८९ अर्थव्यवस्थांचे सर्वेक्षण करून व्यवसाय करण्यासाठी सुलभतेच्या निकषावर गुणानुक्रम निश्चित करते. हा गुणानुक्रम जागतिक गुंतवणूकदारांना एखाद्या अर्थव्यवस्थेत गुंतवणूक करण्याचा निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शक ठरतो. सध्या भारताचा गुणानुक्रम १३० आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारांनी मा. पंतप्रधानांच्या आदेशान्वये हा गुणानुक्रम किमान ५० पर्यंत सुधारण्यासाठी युद्धपातळीवर सुधारणा हाती घेतल्या आहेत. गुंतवणूकदारांना साहाय्य करण्यासाठी राज्य शासनाने मुंबई येथे मैत्री (महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष) नावाने एक खिडकी परवाना यंत्रणा विकसित केली आहे. महाराष्ट्रात उद्योगांना परवाने व ना हरकत एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी एक खिडकी योजना कार्यान्वित आहे. उद्योग विभागाच्या मैत्री प्रकल्पाच्या माध्यमातून ३८ विविध प्रकारच्या औद्योगिक परवानग्या दिल्या जातात. आतापर्यंत प्राप्त अर्जांपैकी ११ हजार ५७५ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत, यामुळे ९० हजार कोटींच्या गुंतवणुकीस मदत झाली आहे.



केंद्र, प्रयोगशाळा, ट्रेनिंग सेंटर यांच्या उभारणीसाठी केंद्र सरकारच्या मदतीने ७०% खर्च उचलला जातो. काही विशेष क्षेत्रांसाठी ९०% पर्यंत अनुदान केंद्र सरकार देते. भारत सरकारने महाराष्ट्रातील एकूण ४६ शहरांतील क्लस्टरची निवड केली असून यातून ५ लाखांपर्यंत रोजगार निर्मिती शक्य होईल. रत्नागिरीतील आंबा प्रक्रिया, येवल्यात पैठणी, सांगलीत हळद प्रक्रिया यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

भारत सरकारच्या या योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारने २०१४ साली स्वतंत्र क्लस्टर धोरण जाहीर केले. आतापर्यंत या धोरणांतर्गत ११६ क्लस्टरची निवड करण्यात आली. ५० कोटींपर्यंत खर्च राज्य सरकार या क्लस्टर्ससाठी करेल. यामुळे महाराष्ट्रातील १० हजार लघू आणि माध्यम उद्योगांना फायदा मिळाला आहे. महाराष्ट्रात विविध भागात उत्पादित होणाऱ्या शेतमालावर प्रक्रिया त्याच ठिकाणी व्हावी यासाठी आंबा, काजू, केळी, कापड, चामडे, छपाई यासारख्या विविध प्रक्रिया उद्योगांची यासाठी निवड करण्यात आली.

पारंपरिक उद्योगक्षेत्राला आधुनिकतेची जोड देत काही नवीन क्षेत्रात महाराष्ट्र आगेकूच करत आहे. त्यासाठी उद्योग मंत्रालयाने विशेष धोरणे आखली आहेत. संरक्षण आणि विमाननिर्मिती उद्योगासाठी नुकतेच धोरण आखले. पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद आणि अहमदनगर या शहरात संरक्षण क्षेत्रातील उद्योगाचे क्लस्टर तयार करण्यात येईल. ५ महिन्यांच्या कालावधीत रिलायन्स आणि सोलार या २ कंपन्यांकडून ७ हजार ५०० कोटींची तर टाटा समूहाकडून देखील संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक करण्यास उत्सुकता दाखवली. पुढील ५ वर्षात १३ हजार कोटींपर्यंत गुंतवणूक या क्षेत्रात अपेक्षित आहे.

## इलेक्ट्रिकल गाड्यांचा उद्योग

येत्या काळातील इलेक्ट्रिक गाड्यांची आवश्यकता भागवून, फेब्रुवारी २०१८ मध्ये या उद्योगाला चालना देण्यासाठी उद्योग मंत्रालयाने धोरण निश्चित केले आहे. महाराष्ट्रात इलेक्ट्रिकल गाड्यांची संख्या ५ वर्षात ५ लाखांपर्यंत



नेण्याचा प्रयत्न आहे. यासाठी उद्योगांना विशेष प्रोत्साहन देण्यात येते. महिंद्रा, मित्सुबिशी यासारख्या कंपन्यांनी यात गुंतवणूक करण्यासाठी स्वारस्य दाखवले आहे. जडजवाहीर, हिरे, माणिक–मोती, रेडिमेड कपडे यासाठी फेब्रुवारी २०१८ मध्ये या क्षेत्राच्या वाढीसाठी धोरण निश्चित केले. कोकणात मोठ्या प्रमाणावर नारळाची झाडे आहेत. यापासून काथ्या निर्माण केला जातो. यासाठी देखील सरकारने धोरण आखले असून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ येथे यासाठी 'संशोधन केंद्र' विकसित केले आहे. काथ्या निर्मिती उद्योगाला सरकारकडून अनुदान दिले जाते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाबरोबरच 'स्मार्ट इंडस्ट्रीज क्षेत्र' करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे औद्योगिकक्षेत्र निर्माण करण्याचे काम हाती घेतले. डीएमआयसी (दिल्ली–मुंबई इंडस्ट्रीज कॉरिडोर) अंतर्गत औरंगाबाद मधील शेंद्रा तसेच अमरावती टेक्सटाईल पार्क तयार होत आहे.

## खनिकर्म

राज्यातील एकूण १२ जिल्ह्यांतील खनिज प्रतिष्ठानमधील कार्यकारी परिषदेची स्थापना करण्यात आली. तसेच उर्वरित जिल्ह्यातील जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या कार्यकारी परिषदेच्या स्थापनेची कार्यवाही सुरू आहे. जिल्हा खनिज प्रतिष्ठानकरिता राज्यातील प्रमुख खनिजांच्या खाणपट्टाधाराकांकडून स्वामित्वधाव्यतिरिक्त स्वामित्वधनाच्या ३० टक्के आणि गौण खनिजाच्या बाबतीत खाणपट्टाधाराकांकडून स्वामित्वधाव्यतिरिक्त स्वामित्वधनाच्या १० टक्के इतके अंशदान निश्चित करण्यात येत आहे. खाणबाधित क्षेत्र व व्यक्तींच्या विकासाकरिता जिल्हा खनिज प्रतिष्ठानकरिता जमा होणाऱ्या अंशदानामधून योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## खनिजांच्या खाणपट्ट्यांचा ई–लिलाव

राज्यातील प्रमुख खनिजांच्या खाणपट्ट्यांच्या वितरणाकरिता खाण मंत्रालय, भारत सरकार यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने ई–लिलाव पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. ई–लिलावात बॉक्साईड व चुनखडक या खनिजांच्या २ खाणपट्ट्यांचे वितरण करण्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे. या लिलावापोटी शासनास २५८४.९५ कोटी रुपये निधी स्वामित्वधनाव्यतिरिक्त पुढील ५० वर्षात प्राप्त होईल.

**शब्दांकन : सुरेश चित्ते,**
मंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88



**गिरीश बापट**
मंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्ये

> **सार्वजनिक वितरण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्यात आला. संगणकीकरणाचा अधिकाधिक वापर करण्यात येत असल्यामुळे अन्नधान्याच्या वाटपात पारदर्शकता आली. खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत अन्नधान्य तातडीने पोहोचवता आले. बनावट शिधापत्रिका बंद करणे शक्य झाले. त्यामुळे अन्नधान्याची मोठी बचत झाली. सार्वजनिक वितरण, अन्न व औषध प्रशासन, ग्राहक संरक्षण किंवा वैधमापन या विभागातील निर्णयांचा परिणाम हा सामान्यांच्या जीवनावर होत असल्याने यंत्रणेच्या बळकटीकरणावर भर दिला.**

# पारदर्शक अन्नसुरक्षा

**गिरीश बापट**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील बदलामुळे प्रत्यक्ष लाभार्थ्याला मदत देता आली. नव्याने लाभार्थी जोडता आले. लोकांच्या दैनंदिन जीवनमानाशी संबधित हा विभाग आहे. सार्वजनिक वितरण किंवा अन्न व औषध प्रशासन, ग्राहक संरक्षण किंवा वैधमापन. या विभागातील निर्णयांचा परिणाम हा सामान्यांच्या जीवनावर होत असतो. यासाठी सर्वप्रथम मी या सर्व यंत्रणेच्या बळकटीकरणावर भर दिला. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात आले. यामुळे कामकाजात सुसूत्रता तर आली शिवाय राज्यातील सुमारे १० लक्ष शिधापत्रिका ह्या बोगस/चुकीच्या आढळून आल्याने रद्द करण्यात आल्या. यामुळे अन्नधान्याची मोठ्या प्रमाणात बचत झाली त्याशिवाय लाभार्थ्यांना आता या नवीन प्रणालीमुळे दरमहा खात्रीशीर व योग्य दराने धान्य मिळण्याची हमी मिळाली.

१ मे, २०१८ पासून–आधार आधारित सार्वजनिक वितरण सेवेचा वापर करून ई–पॉसद्वारे धान्य वितरण सुरू करण्यात आले. या प्रणालीमुळे लाभार्थ्यांना कोणत्याही दुकानात धान्य घेण्याची सुविधा शक्य झाली. ई–पॉस मशीनमधून धान्यवितरणामुळे एकूण धान्य उचलीमध्ये सुमारे ३,६४,८०० मे.टन एवढी घट २०१७–१८ मध्ये झाली. ई–पॉसद्वारे केरोसीन व तूरडाळ विक्रीची सुविधा देऊ केली आहे. ई–पॉसवर केरोसीन वाटप केल्याने मोठ्या प्रमाणावर अपात्र लोक वगळले जात असून त्यामुळे मोठी बचत होताना दिसून येते. यावर चालणारे विक्री व्यवहार आता सामान्य जनतेला http://mahaepos.gov.in/या संकेतस्थळावर बघता येतात.

## नवीन गोदामे

मागील ४ वर्षात १.७४ लक्ष मे.टन क्षमतेच्या ११२ गोदामांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. साठवणूक क्षमतेत ३६ टक्के इतकी वाढ झाली. त्यामुळे धान्य साठवणुकीकरिता मोठ्या प्रमाणात (६०टक्के) स्वंयपूर्णता आली. आणखी १.२३ लक्ष मे.टन क्षमतेच्या ६९ गोदामांच्या बांधकामाबाबत कार्यवाही सुरू आहे.

## द्वार पोहोच

राज्यात यापूर्वी भारतीय खाद्य महामंडळाच्या बस डेपोमधून शासकीय गोदामापर्यंत, आदिवासी महामंडळामार्फत शासकीय गोदामांपासून शिधावाटप दुकानापर्यंतची वाहतूक करण्यात येत होती. ज्यामध्ये धान्याचा अपहार, नासधूस, इत्यादी अडचणींचा सामना करावा लागत होता. २३ फेब्रुवारी २०१२ मध्ये द्वार पोहोच ही सुधारित धान्य वितरण प्रणाली अमलात आणण्यात आली.

## ग्राहक संरक्षण

ग्राहक धोरण तयार करण्यासाठी प्रथमच तज्ज्ञ समितीची स्थापना करण्यात आली. ऑनलाइन पद्धतीने ग्राहक मंच व राज्य आयोगात ग्राहकांच्या तक्रारी करण्याकरिता मान्यता देण्यात आली. पेट्रोल व डिझेलची चोरी रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या. त्यामुळे पेट्रोल पंपावरील फसवणुकीच्या तक्रारीमध्ये सर्व संबंधितांची संयुक्त जबाबदारी आली व तक्रारीत घट झाली.

## वैधमापन शास्त्र यंत्रणेचे संगणकीकरण

राज्यात वैधमापन शास्त्र यंत्रणेची संपूर्ण संगणकीकरण प्रक्रिया सुरू

## परिवर्तन पर्व

### शेतकऱ्यांना अन्नसुरक्षेचा लाभ

अन्नसुरक्षा कायदा लागू झाल्यानंतर ऑक्टोबर २०१६ मध्ये शासनाने नव्याने ३० सप्टेंबर २०१६ अखेर पात्र ९२ लाख लाभार्थ्यांचा समावेश करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर पुन्हा एप्रिल २०१८ मध्ये संगणकीय प्रणालीमुळे पुन्हा ९९ लाख लाभार्थ्यांचा समावेश करणे शक्य झाले.

औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा अशा एकूण १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) मधील सर्व शेतकऱ्यांना १५ ऑगस्ट,२०१५ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो या परिमाणात गहू २ रु. प्रतिकिलो व तांदूळ ३ रु. प्रतिकिलो या दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात आला. (दरमहा ६८ कोटी) यासाठी, एपीएल (केशरी) मधील सर्व



शेतकरी लाभार्थ्यांकरिता आवश्यक २७,२३६मे. टन अन्नधान्याची (१७,२७२ मे. टन गहू व ९,१६४ मे. टन तांदूळ) केंद्र शासनाकडून खरेदी करण्यात येत आहे. त्याकरिता आजपर्यंत सुमारे २१०० कोटी एवढा खर्च झाला. हंगाम २०१६-१७ पासून विकेंद्रित खरेदी योजना राबवण्यात येते. या योजनेमध्ये पूर्वी भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यात येणारे धान्य आता थेट सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये वितरित करण्यात येते. त्यामुळे धान उत्पादक जिल्ह्यात तयार होणाऱ्या तांदळाची तत्काळ विल्हेवाट लावता येणे शासनास शक्य झाले. परिणामी यापूर्वी योजना राबवताना होणारा कालापव्यय टाळता आला. तत्काळ खरेदी केलेल्या धान्याची भरडाई करून त्या-त्या व लगतच्या जिल्ह्यात तांदुळाचे वाटप केल्याने साठवणुकीचे होणारे नुकसान टळले असून, गतवर्षी धानाची २६,७१,२२५.६९ मेट्रिक टन इतकी उच्चांकी खरेदी झाली. ९२.७० टक्के इतकी भरडाई झाली. याशिवाय धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल रु.२०० इतका बोनसही शासनाकडून देण्यात येत आहे.

करण्यात आली. ग्रास (GRAS) यंत्रणेमधून ऑनलाइन पद्धतीने शासकीय शुल्क भरता येणार आहे. त्यामुळे रांगेत उभे न राहता प्रत्येक उपयोगकर्त्यांना कोणतेही परवाने/नोंदणी/नूतनीकरण अशी सर्व कामे ऑनलाइन करता येतील.

### अन्न व औषध प्रशासन विभाग

संपूर्ण कार्यालय संगणकीकृत व पेपरलेस करण्यात आल्यामुळे कागदविरहित पारदर्शक पद्धती अंगीकारणारे महाराष्ट्र हे देशामध्ये पहिले राज्य ठरले. औषधी परवाने व विविध दाखले आधार लिंकिंग, डिजिटल स्वाक्षरीद्वारे ऑनलाइन उपलब्ध झाले आहेत. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत औषधे निर्यात करण्यासाठीचे प्रमाणपत्र संगणकीय पद्धतीने देण्यात येते.

अखाद्य बर्फामध्ये शासनाने निळा रंग घालण्याचा नियम अन्नसुरक्षा व मानके अधिनियम अंतर्गत करून तो केंद्र शासनानेही अंगीकृत केला. अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत अन्नछत्रे, मंगल कार्यालये, रस्त्यावरील पदार्थ विक्री करणारे अशा लोकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबवून २३६ प्रमुख मंदिरांमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. त्याचा लाभ ३५०० हून अधिक लोकांनी घेतला. याव्यतिरिक्त हॉटेल व्यवसायिकांसाठी प्रशिक्षण आयोजित करून १५,१९९ जणांना प्रशिक्षित केले आहे.

### स्टेन्ट व गुडघे बदल

कार्डिक स्टेन्टच्या किंमती सुमारे १.५० लक्ष ते ८.० लक्ष होत्या तर गुडघे बदलाच्या शस्त्रक्रियांसाठी सुमारे २.७५ ते ६.० लक्ष खर्च यायचा. केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केल्याने स्टेन्टच्या किमतीमध्ये लक्षणीय घट होऊन ७,२६० ते २९,००० इतक्या अल्प किंमतीत स्टेन्ट उपलब्ध झाले आहेत. गुडघे बदलाच्या सामग्रीच्या किंमती ६५ टक्क्यांनी घटल्याने ६२,७७० ते १.५८ लक्ष इतक्या अल्प किमतीत उपचार करणे आता शक्य झाले आहे.

### विभागीय स्तरावरील सुनावण्या

मागील ३ वर्षांपासून सर्वसामान्य जनतेला शासनाकडील अपिलांसाठी वकिलासह मुंबई येथे हेलपाटे घालण्यास लागू नयेत म्हणून विभागीय पातळीवर अपिलांची सुनावणी घेण्याची पद्धत सुरू केली गेली. या पद्धतीने आतापावेतो सुमारे २०३२ अपील प्रकरणांचा निकाल लागला.

### मंत्री कार्यालयाकरिता आयएसओ नामांकन

कार्यालयीन काम करत असताना अधिकाधिक लोकाभिमुख काम व्हावे म्हणून आणि कार्यालयीन कामकाज पद्धतीचे प्रमाणिकीकरण व्हावे यासाठी माझ्या मंत्रालयीन कार्यालयासाठी आयएसओ २०१७ प्रमाणपत्र मिळाले आहे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,** विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88



गिरीष महाजन
मंत्री, वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास

> बऱ्याच काळापासून अपूर्ण राहिलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्राधान्याने लक्ष केंद्रित केले. त्यामुळे अपूर्ण सिंचन प्रकल्पाच्या कामांना गती मिळाली. हे प्रकल्प वेळेत पूर्ण होतील, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यामुळे हजारो शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होईल आणि राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला निश्चितच उभारी येईल.

# नवी भरारी...

**गिरीष महाजन**

जनसामान्यांच्या जीवनाशी निगडित असलेल्या पाण्याशी संबंधित हा विभाग असल्याने विविध निर्णय आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर दिला. त्यामुळे चार वर्षात जलसंपदा विभागाने केवळ कात टाकली नसून पुन्हा नव्याने भरारी घेतली आहे.

## कल्याणकारी निर्णय

जलसंपत्ती विकास क्षेत्रापुढे असलेल्या आव्हानांना सामोरे जात विभागाने अनेक लोककल्याणकारी निर्णय घेतले. अनेक वर्षे रखडलेल्या २०५ पाटबंधारे प्रकल्पांना या कालावधीत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. पाटबंधारे प्रकल्पांना गती देण्यासाठी १६,४१४ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली. यापैकी ७,६७५ हेक्टरचे संपादन थेट खरेदी करून करण्यात आले. भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना सुमारे रु. ७,००० कोटी नुकसान भरपाई देण्यात आली. विभागाच्या दूरगामी नियोजनामुळे राज्यात प्रथमच ४१ लाख हेक्टर इतके प्रत्यक्ष विक्रमी सिंचन झाले. उच्चांकी क्षमतेच्या हे २५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. डिसेंबर २०२२ पर्यंत १२ लाख ४० हजार ४७६ एवढी संभाव्य वाढीव सिंचन क्षमता निर्माण करण्याचे लक्ष्य विभागाने निर्धारित केले.

## समस्या आणि आव्हान

२०१५ ते २०१८ या कालावधीत आम्ही घेतलेल्या निर्णयांची फलश्रुती आता दृश्य स्वरूपात दिसू लागली आहे. जलसंपत्ती विकास करण्यासाठी जलसंपदा विभागास अनेक समस्यांना आणि आव्हानांना सामोरे जावे लागले. सिंचन क्षेत्रातील अनियमितता सातत्याने चर्चेचा विषय झाला होता. एखाद्या निर्णयापर्यंत पोहोचण्यासाठी अनेक क्लिष्ट अशा प्रक्रियेमुळे यात अनेक अडचणी येत होत्या. याशिवाय निधीचा अभाव, पाणी वापराबाबत आंतरराज्यीय समन्वयाचा अभाव यामुळे अपेक्षित विकास साध्य करण्यास अडथळा येत होता. मात्र, या सर्व अडचणींवर मात करत विभागाने पुनर्भरारी घेतली.

## कालबद्ध कृती आराखडा

अडचणींवर मात करत पुढे जायचे ठरवल्यावर यातून मार्ग काढण्यास सुरुवात केली. यासाठी विभागाला नियोजन तयार करायला लावले आणि कालबद्ध कृती आराखडा तयार करून ठोस व धाडसी निर्णय घेण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या प्रकल्पांपैकी मागील २ वर्षात २०५ पाटबंधारे प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्या. मागील अडीच वर्षामध्ये



आंद्रा धरण, (ता. मावळ, जि. पुणे)

## परिवर्तन पर्व

### तांत्रिक सक्षमता

तांत्रिकदृष्ट्या विभाग सक्षम करण्यासाठी वेगवेगळे प्रयोग करण्यात आले. यात कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याद्वारे निडल्स फॅब्रिकेशनची मोहीम ५० हजार निडल्स निर्मिती सुरू केली. विविध पाटबंधारे प्रकल्पांवर या कोल्हापूर पद्धतीच्या निडल्स बसवण्यात आला, त्यामुळे ५० हजार हेक्टरचे वाढीव क्षेत्र सिंचनाखाली येऊन ३५ लाख ग्रामीण लोकसंख्येला पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे. गिरणा नदी परिसरातील न्यूमॅटिकली ऑपरेटेड (बलून) बंधारे उभारणी अंतर्गत गिरणा नदीच्या पात्रात सहा मीटर उंचीचे १६७ कि.मी लांबीचे सात रबर धरण बांधारे उभारण्यात येणार आहेत,यामुळे २१.४९ द.ल.घ.मी. इतकी अतिरिक्त साठवण क्षमता तयार होणार आहे. सुमारे ४४३२ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. मध्यप्रदेशातून उगम पावणारी आणि मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांमधून वाहणारी तापी नदीतील पाण्याची पातळी चिंताजनक वेगाने कमी होत होती. आता पावसाळ्यात वाहून जाणाऱ्या पाण्याचा उपयोग करून तापी महापुनर्भरण योजना आखण्यात आली आहे.

एकूण १६,४१४ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली. यापैकी ७,६७५ हेक्टरचे संपादन थेट खरेदीच्या माध्यमातून करण्यात आले. प्रकल्प कामांना गती देण्यासाठी भूसंपादनाकरिता शेतकऱ्यांना सुमारे रु.७,००० कोटी नुकसान भरपाईचे वाटप करण्यात आले.

### नावीन्यपूर्ण संकल्पना

धोरण प्रक्रिया गतिमान करण्यासाठी आणि नावीन्यपूर्ण संकल्पना राबवण्यासाठी कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली. 'नलिका वितरण प्रणालीद्वारे सिंचन', 'पाटबंधारे प्रकल्पांच्या पाणीपट्टीतून देखभाल दुरुस्तीचा खर्च भागविणे', 'सूक्ष्म सिंचनाचा विस्तार', थेट खरेदीद्वारे भूसंपादन, ई-गव्हर्नन्स व माहिती तंत्रज्ञानाचा वापर या नावीन्यपूर्ण संकल्पना राबवण्याची सुरुवात करण्यात आली. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, आत्महत्याग्रस्त जिल्हे व अवर्षणप्रवण क्षेत्रातील प्रकल्प इ. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र व राज्यशासनाकडून सुमारे रू.५९,१६२ कोटी उपलब्ध करून देण्यात आले.

### ऐतिहासिक करार

महाराष्ट्र व तेलंगणा राज्यांमध्ये गोदावरी नदीच्या पाण्याचा ऐतिहासिक आंतरराज्यीय करार करण्यात आला. महाराष्ट्र व गुजरात राज्यांमध्ये देखील आंतरराज्यीय नदी जोड प्रकल्पाबाबत सामंजस्य करार प्रस्तावित आहे. सर्व नदीखोऱ्यांसाठी एकात्मिक राज्य जल आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे, अशा प्रकारचा आराखडा तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे. विभागाने केलेल्या कार्याची दखल केंद्र सरकारकडून घेण्यात आली असून केंद्रातर्फे 'कार्यक्षम सहभागी सिंचन व्यवस्थापन' हा प्रतिष्ठित पुरस्कार विभागास प्रदान करण्यात आला.

### वैद्यकीय क्षेत्रातील कामगिरी

■ जळगाव येथे सर्व पॅथींचे महाविद्यालय एकत्रितरीत्या पहिल्या मेडिकल हब अंतर्गत सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. हे मेडिकल हब, 'पंडित दीनदयाळ उपाध्याय शासकीय एकात्मिक वैद्यकीय शैक्षणिक संकुल' या नावाने ओळखण्यात येईल. ■ राज्य शासन, टाटा कॅन्सर इन्स्टिट्यूट तसेच चंद्रपूर जिल्ह्याचा खनीज निधी या माध्यमातून १०० खाटांचे कॅन्सर हॉस्पिटल चंद्रपूर येथे सुरू करण्यास मान्यता दिली. ■ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ३५० पेक्षा अधिक पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा केंद्र शासनाच्या मान्यतेने निर्माण करण्यात शासन यशस्वी झाले आहे. ■ नागपूर येथील जेरीयॅट्रिक मेडिसीन डिपार्टमेंट केंद्र शासनाच्या सहकार्याने सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे वार्धक्यविषयक समस्यांवर रुग्णांना स्वतंत्रपणे उपचार पुरवणे व त्यावर संशोधन करणे शक्य होणार आहे. त्याप्रमाणे औरंगाबाद येथे जेरीयॅट्रिक मेडिसीन या विषयातला पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास यश आले. ■ वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत रिक्त असलेल्या शिक्षकांच्या पदांमुळे ५०० पेक्षा अधिक वैद्यकीय शिक्षणाच्या जागा धोक्यात आल्या होत्या. त्या जागी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे दुरापास्त झाले होते. यावर तोडगा म्हणून राज्य लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून शिक्षकीय पदे बाहेर काढून निवड मंडळामार्फत ही पदे भरण्याचा शासनाने निर्णय घेतला. त्यामुळे सुमारे ३०० पदांवर शिक्षकांची नियमित भरती झाली आहे. तसेच सुमारे १९९ शिक्षकांना नियमित करण्यात आले. ■ अवयवदानाबाबत वाढलेल्या जनजागृतीमुळे राज्यातील कॅडाव्हर डोनेशनमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. यामुळे गरजू रुग्णांना आवश्यक असणारी किडनी/लिव्हर इत्यादींसारखे अवयव मिळण्याचे प्रमाण वाढले. या अभियानामुळे राज्याचा अवयवदानामध्ये देशात द्वितीय क्रमांक आला. लठ्ठपणामुळे निर्माण होणाऱ्या विविध आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी त्यास अभियानाचे स्वरूप देण्यात आले. मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र अभियानाच्या माध्यमातून मोफत मोतीबिंदू सर्जरी राज्यभर करण्यात येत आहे. महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून आजपर्यंत ग्रामीण दुर्गम भागातील १४ लाखांपेक्षा अधिक रुग्णांना मोफत आरोग्य सुविधा पुरवण्यात आली.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,** विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88



बबनराव लोणीकर
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता

"महाराष्ट्रातील प्रत्येक गावाला पाणीपुरवठा योजना देऊन गाव टंचाईमुक्त आणि टँकरमुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला. त्याअनुषंगाने गेल्या चार वर्षात अनेक योजना सुरू करण्यात आल्या. प्रत्येक गाव, खेडे, वाड्या, वस्त्यांना शाश्वत पाणीपुरवठा व्हावा, हे उद्दिष्ट ठेवण्यात आले."

# स्वच्छ जल, सुंदर जीवन...

**बबनराव लोणीकर**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) कार्यक्रमांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८ अंतर्गत देशातील पहिल्या १० जिल्ह्यांमध्ये सातारा, नाशिक आणि सोलापूर या तीन जिल्ह्यांनी स्थान मिळविले असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्री उमा भारती यांच्या हस्ते या जिल्ह्यांचा २ ऑक्टोबर २०१८ रोजी दिल्ली येथे राष्ट्रीय सन्मान करण्यात आला.

## स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)

२ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या कार्यक्रमाची सुरुवात झाली. राज्याने या अभियानात सहभाग घेतला. २ ऑक्टोबर २०१९ ऐवजी १८ एप्रिल २०१८ रोजी ग्रामीण महाराष्ट्र हागणदारीमुक्त घोषित करण्यात आला. ग्रामसेवक ते मुख्य सचिव व सरपंचापासून ते मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. ३४ जिल्हे, ३५१ तालुके व २७ हजार ६६७ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त घोषित करण्यात आल्या. स्वच्छ भारत मिशनअंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी आता बारा हजार इतके अनुदान देण्यात येते. गेल्या चार वर्षात ६० लाख शौचालयाची बांधणी करण्यात आली. २२ ऑगस्ट ते २ ऑक्टोंबर २०१६ या कालावधीत 'स्वच्छ महाराष्ट्रासाठी १८ लाख गृहभेटी' हा राज्यव्यापी गृहभेटीचा कार्यक्रम राबवला गेला. या कालावधीत १८ लाखांपेक्षा जास्त घरांना भेटी दिल्या. केंद्र शासनाचा २०१६-१७ चा स्वच्छता दर्पण पुरस्कार सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, सांगली व वर्धा जिल्ह्यांना मिळाला. दक्षिण भारतातील सर्वात स्वच्छ जिल्हा २०१६-१७ चा पुरस्कार सिंधुदुर्गला मिळाला. 'स्वच्छता ही सेवा' २०१७-१८चा पुरस्कार महाराष्ट्र राज्याला मिळाला आहे.

केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्यावतीने 'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८' मोहिमेंतर्गत १ ते ३१ ऑगस्ट २०१८ पर्यंत देशभरातील सर्वच ७१८ जिल्ह्यांमध्ये स्वच्छतेच्या विविध निकषांवर सर्वेक्षण करण्यात आले. या मोहिमेंतर्गत विविध निकषांवर सर्वेक्षण करून देशातील १०० सर्वोत्तम जिल्ह्यांची निवड करण्यात आली. यात पहिल्या १० मध्ये तीन तर एकुणत: महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांचा समावेश आहे. हे जिल्हे व त्यांचे गुणांकन पुढीलप्रमाणे : सातारा (१), नाशिक (६), सोलापूर (१०), कोल्हापूर (११), सिंधुदुर्ग (१२), सांगली (१६), रायगड (२६), अहमदनगर (३७), रत्नागिरी (३९), पुणे (५१), उस्मानाबाद (८३). या जिल्ह्यांचा समावेश आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मध्येही महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर आले. सातारा जिल्ह्यात १०० पैकी ९७.९०, नाशिक जिल्ह्याला ९६.३३ गुण आणि सोलापूर जिल्ह्याला ९५.५५ गुण मिळाले.

## मराठवाड्यात ग्रीड पद्धतीने पाणी पुरवठा

मराठवाडा विभागातील टंचाई परिस्थितीवर मात करून, विभागात कायमस्वरूपी पिण्याच्या पाणी पुरवठ्याच्या व्यवस्थेसह, औद्योगिक पाणी पुरवठा तसेच शेतीसाठी पाणी पुरवठ्याचादेखील या योजनेत समावेश आहे.

मराठवाडा विभागासाठी ग्रीड पद्धतीने पाणी पुरवठा करण्याच्या योजनेस ६ डिसेंबर, २०१६ रोजी मंजुरी दिली आहे. यामध्ये मराठवाड्यातील भूपृष्ठावरील पाणी, भूजल, पर्जन्यमान या सर्व गोष्टींचा समग्र अभ्यास करून मराठवाड्यातील पिण्याचे पाणी,

# परिवर्तन पर्व

## ग्रामीण भागाला पाणी

ग्रामीण भागातील पाणी पुरवठा क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने व ग्रामीण जनतेस पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी 'मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम' राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत १६०० कोटी किमतीच्या ७८० नवीन नळ पाणी पुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आली असून, त्याचा फायदा सुमारे ३८ लाख इतक्या लोकसंख्येस होणार आहे. बंद असलेल्या ८३ प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यासाठी १३१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. रुपये २५ कोटी किमतीच्या १८ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन करण्यात आले. राज्यातील प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी प्रोत्साहन अनुदान म्हणून या कार्यक्रमा अंतर्गत २०१६-१७ ते २०१९-२०२० या वर्षाकरिता प्रतिवर्षी रुपये १०० कोटी प्रमाणे ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.



## राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा केंद्र शासनाचा 'फ्लॅगशीप कार्यक्रम असून त्याची अंमलबजावणी राज्यात २००९-१० पासून करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस राज्यातील वाड्या/वस्त्यांची संख्या व त्यांची पेयजल स्थिती अद्ययावत करण्यात येते. त्यानुसार अंशत: हाताळलेल्या व गुणवत्ता बाधित गावे/वाड्यांसाठी उपलब्ध निधी विचारात घेऊन कृती आराखडा तयार करण्यात येतो. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नव्याने ६०५३ योजना ९६९१ गावे/वाड्या वस्त्यांसाठी प्रस्तावित आहेत. याची एकूण किंमत ६,६८६.५३ कोटी रुपये आहे.

उद्योगासाठीचे पाणी व सिंचनासाठी लागणारे पाणी याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्यात येणार आहे.

## पाणी गुणवत्ता सनियंत्रण

ग्रामीण जनतेस स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्धा करून देण्याच्या उद्देशाने पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच पाणी गुणवत्ता प्रयोगशाळांच्या कामात सुसूत्रता येण्यासाठी व योग्य प्रकारे सनियंत्रण होण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सनियंत्रणाखाली असलेल्या १३८ प्रयोगशाळा या विभागाकडील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे सोपवण्यात आल्या आहेत.

## जलस्वराज्य

प्रत्येक गावाला पाणीपुरवठा योजना देऊन गाव टंचाईमुक्त आणि टँकरमुक्त करण्याचा निर्धार असून, त्या दृष्टीने गेल्या चार वर्षात अनेक पाणी पुरवठा योजना सुरू करण्यात आल्या. त्याचाच एक भाग म्हणून जागतिक बँकेच्या साहाय्याने जलस्वराज्य-२ कार्यक्रम ६ वर्ष (२०१४-२०२०) कालावधीसाठी राबवण्यात येत आहे. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सेवासुविधांचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व शाश्वतता इत्यादी बाबी साध्य करणे हे जलस्वराज्य-२ कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत सहा महसूल विभागातील प्रत्येकी २ याप्रमाणे १२ जिल्ह्यांत हा कार्यक्रम राबवला जात आहे. रायगड, रत्नागिरी, अहमदनगर, जळगाव, पुणे, सातारा, औरगाबाद, नांदेड, अमरावती, बुलडाणा, नागपूर व चंद्रपूर या बारा जिल्ह्यांची निवड क्षेत्रीय आव्हानांनुसार पारदर्शकरीत्या निकषांद्वारे केलेली आहे.

## भूजल व्यवस्थापन

भूजल व्यवस्थापनातील भूजल प्रस्तराच्या पुनर्भरणाबाबत कृती आराखडा तयार करण्यात आला. १२ भूजल प्रस्तरांची निविदा पूर्ण करून त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ७ भूजल प्रस्तरांचे कार्यादेश निर्गमित करून एका भूजल प्रस्तराचे काम सुरू करण्यात आले. पाणी पुरवठा व स्वच्छतेशी संबंधित क्षमता बांधणीसाठी महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेची स्थापना करण्यात आली. ही संस्था या क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट संस्था म्हणून विकसित करण्यात येत आहे.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामीण स्वच्छतेची व्याप्ती तसेच ग्रामपंचायतींचा सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने प्रत्येक ग्रामपंचायतीअंतर्गत उत्कृष्ट प्रभाग स्पर्धा तसेच जिल्हा परिषद गटांमधील ग्रामपंचायतीमध्ये स्पर्धा आयोजित करणे व तद्नंतर त्यांना सुधारणा करायला कालावधी देऊन जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर ग्रामपचायतींची निवड करण्याबाबतचा सुधारित शासन निर्णय २५ एप्रिल, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला.

**शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,** विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88



**डॉ. दीपक सावंत**
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

> आरोग्य विभागाने राबवलेल्या अनेक योजना आणि उपक्रमांमुळे राज्याची आरोग्यसेवा सक्षम होण्यास मदत झाली. त्याचा थेट फायदा नागरिकांना झाला. सर्व आरोग्य संस्थांमध्ये दर्जात्मक व गुणात्मक वाढ करण्यासाठी सर्वाधिक प्राधान्य दिले. आरोग्य संस्थांचे उत्तम जाळे असून ग्रामीण पातळीवरच्या तळागाळातल्या माणसाला आरोग्यसेवा देण्याचा प्रयत्न केला.

# आयुष्मान भारत.. निरोगी महाराष्ट्र

**डॉ. दीपक सावंत**

आरोग्य विभागाने राबवलेल्या अनेक योजना आणि उपक्रमांमुळे राज्याची आरोग्यसेवा सक्षम होण्यास मदत झाली. त्याचा थेट फायदा नागरिकांना होत आहे. गेल्या वर्षी दोन कोटी नागरिकांची मौखिक आरोग्य तपासणी करण्यात आली. प्राथमिक टप्प्यात १० जिल्हा रुग्णालयात केमोथेरपीची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आली. कर्करोगाविरुद्ध लढा देण्यासाठी शासन सज्ज झाले.

## बाईक ॲम्ब्युलन्स

मुंबईत गेल्या वर्षभरापूर्वी 'बाईक ॲम्ब्युलन्स' सेवा सुरू करण्यात आली. १० मोटरसायकलच्या मदतीने सुरू करण्यात आलेल्या या सेवेला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर वर्षभराच्या आतच अजून नव्याने १० बाईक ॲम्ब्युलन्स मुंबईत सुरू केल्या. पालघर, मेळघाट येथे प्रत्येकी पाच आणि गडचिरोली येथे एक बाईक ॲम्ब्युलन्स दुर्गम भागात भागात सुरू करण्यात आल्या. मुंबईत काही भागात ज्येष्ठ नागरिकांच्या शुश्रूषेसाठी सायकल ॲम्ब्युलन्स सुरू करण्याचा मानस आहे.

## आयुष्मान भारत योजना

राज्यातील जवळपास २ कोटी २७ लाख कुटुंब महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेच्या कक्षेत आहेत. त्याच्याच जोडीला आता 'प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' म्हणजे 'आयुष्मान भारत योजना' सुरू झाली आहे. नुकताच या योजनेचा शुभारंभ झाला असून महाराष्ट्रातील सुमारे ८३ लाख कुटुंबांना तिचा फायदा होईल. महाराष्ट्रात या योजनेसोबतच राज्य शासनाची महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनादेखील एकत्रित राबवली जाणार आहे. त्यामुळे ९० टक्के लोकांना आरोग्यविम्याचे छत्र मिळेल.

## दर्जात्मक व गुणात्मक वाढ

नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये असलेल्या परंतु अनेक वर्ष नादुरुस्त असलेल्या उपकरणांची दुरुस्ती मोहीम हाती घेतली. वर्षभरात सुमारे ११ हजार विविध उपकरणांची दुरुस्ती झाल्याने सुमारे ७० कोटी रुपयांची बचत झाली. शिवाय उपकरणांच्या माध्यमातून नागरिकांना वैद्यकीय सुविधादेखील मिळाली. राज्यात जिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅनची सुविधा नाही. ही बाब लक्षात घेऊन ३१ जिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅन बसवण्यासाठी मंजुरी मिळाली. दोन टप्प्यांत ही यंत्रे बसवली जातील. राज्यातील २३०१ आरोग्य संस्थांमध्ये मोफत वैद्यकीय चाचण्यांची सोय करण्यात आली. त्याद्वारे आतापर्यंत ५२ हजार रुग्णांना लाभ झाला. दिवसाला सरासरी २० हजार रुग्णांच्या चाचण्या होत आहेत.

## आरोग्याची निगा

गर्भवती मातांच्या आणि नवजात अर्भकांच्या आरोग्याची निगा राखण्यासाठी विशेष उपक्रम राबवण्यात येत आहेत. देशामध्ये माता मृत्युदर कमी करण्यामध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो. यासाठी राज्यात २४८ संदर्भ सेवा केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. राज्यात शासकीय आरोग्य संस्थांमध्ये एप्रिल २०१७ पासून

## परिवर्तन पर्व

### प्रेरणा प्रकल्प



मानसिक आरोग्याशी संबंधित आजारांशी लढण्यासाठी शासन गांभीर्याने प्रयत्न करत आहे. मराठवाडा आणि विदर्भ या भागातील १४ जिल्ह्यांमध्ये 'प्रेरणा प्रकल्प' सुरू करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे समुपदेशन करण्यासाठी व्यावसायिक समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली. तसेच १४ जिल्ह्यांमध्ये जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम व दीर्घकालीन आजारी असणाऱ्या परंतु ज्यांची काळजी घेण्यास कुणीही नाही, अशा मानसिक रुग्णांसाठी ठाणे, पुणे, नागपूर व रत्नागिरी या ४ जिल्ह्यांमध्ये मनोरुग्णालयात उपचारांची सुविधा करण्यात आली. १०४ हा 'मानसिक आरोग्य हेल्पलाइन' क्रमांक सुरू करण्यात आला. नैराश्याच्या गर्तेत अडकलेल्या शेतकरी बांधवाला त्यातून सावरण्यासाठी या प्रकल्पाच्या माध्यमातून मोठा आधार मिळत आहे.

आतापर्यंत सुमारे दीड लाख सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

### टास्क फोर्स

पालघर जिल्ह्यातील कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूंवर उपाययोजना करण्यासाठी माझ्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स स्थापन करण्यात आला. त्या माध्यमातून होत असलेल्या उपाययोजनांमुळे बालमृत्यू रोखण्यात यश येत आहे. महाराष्ट्राने निती आयोगाच्या निर्देशांनुसार २०२५ चे उद्दिष्ट गेल्या वर्षीच पूर्ण केले असून एरआरएस सर्व्हेनुसार २०१६ मध्ये महाराष्ट्राचा अर्भक मृत्युदर १३ एवढा नोंदवला गेला. महाराष्ट्राच्या कामगिरीची निती आयोगाकडून दखल घेण्यात आली.

विशेषज्ञांची कमतरता लक्षात घेता काही स्पेशालाईज्ड अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. विभागात कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी १३ विशेष सेवांचा या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला. या सेवेच्या माध्यमातून १८८ विशेषज्ञ उपलब्ध झाले. अवयवदान मोहिमेस गती देण्यात आली आहे. अवयव प्रत्यारोपणांतील गैरप्रकार दूर करून, त्यात सुसूत्रता आणण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आली आहे. खासगी रुग्णालयात करण्यात येणाऱ्या सोनोग्राफी चाचणीच्या प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी रेडिओलॉजीचीदेखील कृती आराखडा तयार करण्यात आला.

राज्यात या वर्षी स्वाईन फ्लूचा प्रादुर्भाव आहे. त्याला रोखण्यासाठी विभागामार्फत आवश्यक त्या प्रभावी उपाययोजना राबवण्यात येत आहे. खासगी डॉक्टरांच्या बैठका घेऊन त्यांना स्वाईन फ्लू संशयित रुग्णांची तातडीने माहिती देण्याबाबत आणि ऑसेलटॅमीवर औषध देण्याबाबत सातत्याने मार्गदर्शन करण्यात येत आहे. जोखमीतील जे रुग्ण आहे त्यांना मोफत स्वाईन फ्लू प्रतिबंधक लस देण्यात येत आहे.

### मेमरी क्लिनिक

अल्झायमर आणि स्मृतिभ्रंशाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ जाणवत आहे. यासाठी जिल्हा रुग्णालयांमध्ये 'मेमरी क्लिनिक' सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार २८ जिल्ह्यांत मेमरी क्लिनिक सुरू करण्यात आले आहेत. त्यामध्ये विविध प्रकारचे शारीरिक व मानसिक व्यायाम रुग्णांना शिकविले जातील. त्याचबरोबर रुग्णांची काळजी घेण्याबाबत नातेवाइकांना विशेष प्रशिक्षण देण्यात येईल. ठाणे येथील मनोरुग्णालयात बेंगळुरू येथील राष्ट्रीय मनोविकास संशोधन संस्थेचे सॅटेलाईट केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### आपत्कालीन वैद्यकीय सेवा

'आपत्कालीन वैद्यकीय सेवा' (क्रमांक १०८) सुरू करण्यात आली. वैद्यकीय आणीबाणीच्या काळात ही सेवा खूप उपयुक्त ठरली. अशा प्रकारच्या ९३७ रुग्णवाहिका कार्यरत असून नागरिकांना चोवीस तास मोफत आपत्कालीन आरोग्यसेवा पुरवली जाते. १०८ हा क्रमांक जनतेला मोठ्या प्रमाणात माहीत झाल्याने अनेक वेळा गरोदरपणात उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीसाठी देखील या क्रमांकावर संपर्क केला जातो. त्यामुळे महाराष्ट्रातील मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यात या सेवेचा हातभार लागला आहे. लक्षणीय बाब म्हणजे २०१४ मध्ये प्रतिरुग्णवाहिका प्रतिदिवस ०.५ रुग्ण हे प्रमाण होते ते २०१८ मध्ये ४.६ म्हणजे ९ पटीने वाढले आहे.

टाटा मेमोरियल हॉस्पिटलमधून कॅन्सरचे प्रशिक्षण घेतलेल्या आणि सद्य:स्थितीत राज्यात वैद्यकीय व्यवसाय करत असलेल्या डॉक्टरांच्या मदतीने कॅन्सरबद्दल जनजागृती करण्यासाठी 'कॅन्सर वॉरियर्स' प्रकल्प राबवण्यात येत आहे.

**शब्दांकन : अजय जाधव,**
विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88



**चंद्रशेखर बावनकुळे**
मंत्री, ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा,
राज्य उत्पादन शुल्क

> **गेल्या चार वर्षात ऊर्जा क्षेत्राला निश्चित दिशा दिली. त्यामुळे राज्याचे भारनियमन संपले आणि अधिकची (सरप्लस) वीज असलेले राज्य म्हणून महाराष्ट्र देशात ओळखले जाऊ लागले. राज्यात सर्व भागांमध्ये अखंडित वीजपुरवठा करण्यात येतो. कृषी ग्राहकांना चक्राकार पद्धतीने दररोज ८ ते १० तास वीजपुरवठा करण्यात येतो. मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनींतर्गत कृषिपंपांना सौर ऊर्जेद्वारे दिवसासुद्धा वीज उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

# सर्वत्र वीज, शेतकऱ्यांना दिलासा...

**चंद्रशेखर बावनकुळे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने सूत्रे स्वीकारली तेव्हा ऊर्जाक्षेत्राची घडी विस्कटलेली होती.

सरकार सत्तेवर आल्यानंतर सुमारे ४ वर्षात या क्षेत्राला निश्चित दिशा देण्यात आली. तसेच ऊर्जा क्षेत्रासमोरील आव्हानांचा सामना यशस्वीपणे केला. त्यामुळे राज्याचे भारनियमन संपले आणि अधिकची (सरप्लस) वीज असलेले राज्य म्हणून महाराष्ट्र राज्य देशात ओळखले जाऊ लागले.

२०१४ ते २०१७ या कालावधीत वीज निर्मिती क्षमतेमध्ये एकूण ३२८० मे.वॅट वाढ झाली आहे. राज्यात सर्व भागामध्ये अखंडित (२४ X ७) वीजपुरवठा करण्यात येत आहे व कृषि ग्राहकांना चक्राकार पद्धतीने दररोज ८ ते १० तास वीजपुरवठा करण्यात येतो.

कोळसा वाहतुकीच्या धोरणात बदल करण्यात आले. जवळच्या कोळसा खाणीतून वीजनिर्मिती केंद्रांना कोळसा पुरवठा केला गेला त्यामुळे ९४५ कोटींची बचत झाली. केंद्र शासनाच्या मदतीने गरेपालमा ही मोठी कोळसा खाण महानिर्मितीला मिळाली. वीज उत्पादनाचा दर ३० पैशांनी कमी झाला. औष्णिक वीजनिर्मिती केंद्राच्या कामात सुधारणा करण्यात आली. इंधन तेलाचा वापर कमी करण्यात यश मिळाले.

नागपूरचे सांडपाणी प्रक्रिया करून कोराडी येथील सुपरक्रिटिकल वीजनिर्मिती केंद्राला पुरविले जाते. १३० दशलक्ष लिटर पाणी या प्रकल्पाला मिळते. हा देशातील पहिला यशस्वी प्रयोग आहे.

वीजनिर्मिती केंद्रातून निघणाऱ्या राखेचा वापर काळाची गरज होती. राखेपासून होणाऱ्या प्रदूषणाचा स्तर कमी करण्यासाठी राख धोरण आणले गेले. पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमेला हातभार म्हणून २ जून २०१६ रोजी महाजेम्स ही महाजेनकोची उपकंपनी स्थापन करण्यात आली.

## महावितरण

ऊर्जा मंत्री म्हणून पदाची सूत्रे हातात घेतली त्या वेळेस राज्यात भारनियमनाची स्थिती होती. सौरऊर्जेबाबत राज्याची कामगिरी समाधानकारक नव्हती. मात्र गेल्या ४ वर्षात ऊर्जा विभागाने प्रभावी काम केले. राज्यात अतिरिक्त वीज उपलब्ध असून महावितरणच्या बहुतेक सर्व ग्राहकसेवा ऑनलाइन झाल्यामुळे ग्राहकसेवेत चांगला बदल झाला आहे.

## घारापुरी (एलिफंटा) बेटाचे विद्युतीकरण

मुंबईनजीक असलेल्या व युनेस्कोद्वारे जागतिक वारसा मान्यताप्राप्त घारापुरी (एलिफंटा) बेटाच्या विद्युतीकरणाचे कार्य महावितरणने पार पाडले. विशेष म्हणजे मागील ७० वर्षांपासून या बेटावर वीज नव्हती. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी घारापुरी बेटावर वीज पोहोचवण्यासाठी समुद्रतळाखालून ७.५ किलोमीटर लांबीची केबल टाकली. देशात प्रथमच अशा पद्धतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधाराने वीज पोहोचवण्याची उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली. अवघ्या दीड वर्षात काम पूर्ण करण्यात आले.

ऊर्जा विभागाने केलेल्या या ऐतिहासिक कामगिरीची दखल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी घेतली. त्यांनी आपल्या २५ फेब्रुवारी २०१८ च्या 'मन की बात' या कार्यक्रमात घारापुरी बेटाच्या विद्युतीकरणाबद्दल तेथील जनता व प्रशासनाचे कौतुक केले.

### प्रथम क्रमांक

केंद्र शासनाच्या 'उदय' योजनेच्या उद्दिष्टपूर्ततेत मे-२०१७ मध्ये महाराष्ट्राने प्रथम क्रमांक पटकावला. या योजनेत महावितरणने २०१६-१७ या आर्थिक वर्षात विविध उपाययोजनांद्वारे ऊर्जा अंकेक्षणात देशात लक्षणीय कामगिरी केली. योजनेत २ लाख नवीन वीजजोडणी देण्याचे उद्दिष्ट असताना महावितरणने ७ लाखांपेक्षा अधिक ग्राहकांना वीजजोडणी दिली. ऊर्जा संवर्धनासाठी ८० लाख एलईडी बल्ब वाटपाचे उद्दिष्ट होते, महावितरणने सुमारे ९१ लाख ग्राहकांना एलईडी बल्बचे वाटप केले.

सहज बिजली हरघर योजना 'सौभाग्य' या योजनेंतर्गत महावितरणच्यावतीने ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत विद्युतीकरण न झालेल्या कुटुंबांना वीज देऊन राज्यात १०० टक्के विद्युतीकरण

## परिवर्तन पर्व

### कृषिपंपांना सौर ऊर्जा

मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनींतर्गत राज्यातील कृषिपंपांना सौर ऊर्जेद्वारे दिवसाही वीज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनेत कृषिप्राबल्य असलेल्या २० जिल्ह्यांतील सुमारे २१८ तालुक्यांत २ ते १० मे.वॅ. इतक्या क्षमतेचे सौरप्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत. हे प्रकल्प महावितरणच्या उपकेंद्रांशी जोडण्यात येणार असून त्यामुळे कृषिपंपांना रात्रीप्रमाणेच दिवस वीज उपलब्ध होणार आहे. तसेच महावितरणच्या वितरण व्यवस्थेवरील भार कमी होऊन वीजहानी कमी होण्यासही मदत होणार आहे.



■ **मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी :** ग्रामीण भागात गावठाण व कृषी वाहिनी वेगळी झाली आहे, अशा ठिकाणी कृषी वाहिनीचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्यासाठी ही योजना शासनाने जाहीर केली. राळेगणसिद्धी (अहमदनगर) व कोळंबी (यवतमाळ) येथे प्रायोगिक तत्त्वावर ही योजना सुरू होत आहे.

### महाऊर्जा

■ २०२५ पर्यंत राज्यातील सर्वच सुमारे ४५ लाख कृषिपंपांना टप्प्याटप्प्याने सौरऊर्जेद्वारे वीजपुरवठा करण्याचे राज्य शासनाचे नियोजन आहे. त्यामुळे कृषिपंपांना दिवसा तसेच पुरेशी व स्वस्त वीज मिळावी ही शेतकरी बांधवांची मुख्य मागणी पूर्ण होईल, सोबतच क्रॉस सबसीडी कमी झाल्याने प्रामुख्याने औद्योगिक व वाणिज्यिक वीजदरसुद्धा कमी होतील. ■ कृषिपंपांसोबतच राज्यातील नळयोजना व उपसा जलसिंचन योजना संपूर्णपणे सौर ऊर्जेवर आणण्याची अंमलबजावणी सुरू आहे. गावांमधील सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचे ७.५ एचपीपर्यंतचे पंप लवकरच सौर पंपांनी बदलण्याचे काम हाती घेण्यात येत आहे. राज्यात १४,४०० मेगावॉटचे अपांरपरिक ऊर्जा निर्मिती करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. येत्या डिसेंबर २०१९ पर्यंत हे उद्दिष्ट पूर्ण होणार. ■ आगामी काळ सौर ऊर्जानिर्मितीचा काळ. शाश्वत, स्वच्छ वीज ग्राहकांना देण्याची गरज.■ पाच वर्षात १४४०० मेगावॉट सौर ऊर्जा निर्मितीचे महाऊर्जाचे लक्ष्य. ऊर्जानिर्मितीचे आव्हान असले तरी ऊर्जाक्षेत्रासाठी मोठी संधी आहे.

### ऊर्जा संवर्धन

अटल सौर कृषिपंप योजना ही ज्या शेतकऱ्यांना वीज जोडणी मिळाली नाही व ज्यांच्याकडे पाण्याचा शाश्वत स्त्रोत उपलब्ध आहे, अशा शेतकऱ्यांना सौर कृषिपंप देऊन शेतजमीन ओलिताखाली आणण्याच्या दृष्टीने राज्यात एकूण ५६५० सौर कृषिपंप आस्थापित करण्यात आले आहेत. यात केंद्र शासनाकडून ३०% राज्य शासनाकडून ५% अनुदान देण्यात आले आहे. लाभार्थी शेतकऱ्यांकडून सौर कृषिपंपाच्या किमतीच्या केवळ ५% व १५% रक्कम घेण्यात आली. उर्वरित रक्कम अतिरिक्त वीज विक्री करारातून उपलब्ध करून देण्यात येत आहे. लवकरच एक लाख सौर कृषिपंपाची योजना राज्य शासनाकडून राबवण्यात येणार आहे. सुमारे एकूण १२८४० हेक्टर शेतजमीन ओलिताखाली आली. पारंपरिक विजेची बचत होऊन शासनाकडून महावितरण कंपनीला द्यावयाच्या शेतकऱ्यांच्या वीज बिलापोटी अनुदानात तसेच क्रॉस सबसिडीत बचत त्यामुळे औद्योगिक व वाणिज्यिक वीज दर कमी होण्यास मदत.

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

## परिवर्तन पर्व

### महापारेषण

■ वीजनिर्मिती आणि महावितरण यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून महापारेषणची भूमिका महत्त्वाची आहे. राज्यातील २.७५ कोटी वीज ग्राहकांना वीजपुरवठा. ■ वितरण कंपनीपर्यंत वीज वाहून आणण्यासाठी पारेषण प्रणालीत ७६५ केव्ही, एचव्हीडीसी



प्रणाली, ४०० केव्ही, २२० केव्ही, १३२ केव्ही वाहिन्यांसाठी ७०० अति उच्चदाब उपकेंद्राचा यात समावेश. येत्या ५ वर्षात पारेषण प्रणाली अधिक मजबूत करण्यासाठी १०० नवीन उपकेंद्रे निर्माण करणार. ■ २०१२-१३ मध्ये १८२६८ मेगावॅट राज्याची मागणी. सन २०१६-१७ मध्ये २३०५५ मेगावॅट मागणीएवढी वीज कोणत्याही अडचणींशिवाय यशस्वी पारेषित करण्यात आली जेणेकरून या यंत्रणेवर कुठेही ताण आला नाही.

करण्यात येणार आहे. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०१८ ते ५ मे २०१८ पर्यंत 'ग्रामस्वराज अभियान' राबवण्यात आले. या अभियानात 'सौभाग्य' योजनेतून ज्या १९२ गावांत ८० टक्क्यांपेक्षा अधिक दलितवस्ती आहे व आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या अधिक आहे, अशा सर्व लाभार्थ्यांना १०० टक्के वीजजोडणी देण्याचे उद्दिष्ट होते. त्यानुसार २३ जिल्ह्यांतील १९२ गावात वीजजोडणी नसलेल्या लाभार्थ्यांना ५ मे २०१८ पर्यंत वीजजोडणी द्यावयाची होती. मात्र महावितरणने हे उद्दिष्ट १ मे २०१८ रोजी पूर्ण केले असून या १९२ गावांतील ८ हजार ८२० लाभार्थ्यांना वीजजोडणी दिली. देशात महावितरणने सर्वात प्रथम उद्दिष्टांची पूर्तता केली.

पैसे भरून प्रलंबित असलेल्या सुमारे २ लाख २४ हजार कृषिपंप ग्राहकांना आता उच्चदाब वितरण प्रणालीतून वीज कनेक्शन देण्यात येत आहे. यामुळे २ शेतकऱ्यांना एक रोहित्रातून वीजजोडणी मिळणार आहे. या योजनेवर ४ हजार ४९६ कोटी व नवीन उपकेंद्रासाठी लागणारा अंदाजे खर्च ५५१ कोटी इतक्या खर्चालाही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

### ग्राहक संपर्क

राज्यात जिल्हानिहाय जनता दरबार घेण्यात आले. यात त्या विभागातील सर्व लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेण्यात येते. या दरबाराच्या माध्यमातून संबंधित विभागातील ऊर्जा व इतर विषयाशी संबधित प्रश्नांची सोडवणूक करण्यात येते. ग्राहक संपर्क अभियान जुलै २०१७ मध्ये राज्यात राबवण्यात आले. अनेक ठिकाणी अशा ग्राहक संपर्क अभियानात उपस्थित राहून लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्या तत्परतेने सोडवण्यासाठी यंत्रणेला निर्देश दिले. महावितरणतर्फे जुलै २०१७ मध्ये ग्राहकसंपर्क अभियानात एकूण १,७४७ मेळावे घेतले. यात एकूण २२,९६६ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी १८,५५५ तक्रारींचा निपटारा करण्यात आला. उर्वरित ४,४११ प्रलंबित तक्रारी निर्धारित मुदतीत सोडवण्यात आल्या.

ग्रामपातळीवरील वीजसेवा सुरळीत व्हावी यासाठी तसेच विजेची कामे विनाअपघात व गतीने व्हावीत, यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीत एक वीज सेवक नेमण्याची अभिनव संकल्पना आणली.

### राज्य उत्पादन शुल्क

■ गैरप्रकार रोखण्यासाठी नियंत्रण कक्ष २४ तास सुरू ठेवण्यात आले. ■ जनतेच्या सहभागातून ग्रामीण भागातील अवैध मद्याच्या धंद्यावर कारवाईसाठी कायद्यात दुरुस्ती करून ग्रामरक्षक दल नियमावली २०१७ तयार करण्यात आली. ■ द्राक्ष किंवा इतर फळे आणि फुले किंवा केळी इ. पासून वाईनसाठी परवानगी. ■ मधासोबत मसाले किंवा फळे यांचे मिश्रण करून किंवा न करता मीड वाईन तयार करण्यास परवानगी. ■ छोट्या वाईनरीमध्ये तयार केलेली वाईन इतर वाईनरीमध्ये हस्तांतर करण्यास परवानगी. ■ मळीपासून उत्पादित होणारे स्पिरीट / मद्यार्क औद्यागिक घटक तसेच पेय मद्य निर्मात्यांना देता येईल. ■ ग्रामसभा ठरावामुळे अनुज्ञप्त्या बंद करतेवेळी मतदानाची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत (पूर्वी दु. २ वाजेपर्यत) करण्यात आली. ■ लोकांना सहज लक्षात यावे म्हणून अनुज्ञप्ती बंद व्हावी म्हणून आडवी बाटली या चिन्हाचा मतपत्रिकेत वापर. ■ मद्य सेवन परवान्यावरील देशी दारूचे युनिट कमी केले:- देशी मद्य दोन युनिटपर्यंत प्रतिमहिना खरेदी / बाळगणे इ. करता येते. (यापूर्वी बारा युनिट प्रतिमाह बाळगता येत होते)

**शब्दांकन : डॉ. पुरुषोत्तम पाटोदकर,**
विभागीय संपर्क अधिकारी



**राजकुमार बडोले**
मंत्री, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

**“अनुसूचित जाती आणि दुर्बल वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गेल्या चार वर्षात अनेक निर्णय घेतले. त्यांचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक असा सर्वांगीण विकास करून जीवनमान उंचवण्याचा प्रयत्न केला. इंदू मिलच्या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यात येत असून, बांधकामास सुरुवातही झाली आहे. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत अनुसूचित जातीसाठी नव्याने काही योजना सुरू करण्यात आल्या.”**

# न्याय आणि आधार

**राजकुमार बडोले**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त २०१५-१६ हे वर्ष समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. त्या अनुषंगाने पुढील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. ■ मुलींची नवीन ५० वसतिगृहे ■ अनुसूचित जातीच्या काम करणाऱ्या महिलांकरिता मुंबई, पुणे व नागपूर येथे ३ वसतिगृहे ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या ५० ऐतिहासिक स्थळांचा विकास ■ अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या १२५ निवडक वस्तींचा विकास, त्यापैकी ४० वस्त्यांना मंजुरी ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानची स्थापना.

## दिव्यांगांचे कल्याण

■ दिव्यांगांच्या १२३ शाळा/कर्मशाळांना अनुदान तत्त्वावर घेण्यासाठी मान्यता ■ दिव्यांगासाठी राखून ठेवण्यात आलेला ३ टक्के निधी खर्च करण्याकरिता जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्या गठित ■ २०१४-१५ ते २०१७-१८ या कालावधीत ३ टक्के प्रमाणे ५८६.६९ कोटी इतकी तरतूद, त्याअंतर्गत ७२,४७२ व्यक्तींना लाभ ■ दिव्यांगांच्या विषेश सुधार शाळा संहिता २०१८ मंजूर ■ १९८५ पासून दिव्यांगांची शाळा संहिता ८ जुलै २०१८ पासून लागू ■ मिशन झिरो पेन्डन्सी अंतर्गत दिव्यांगांचे प्रमाणपत्र घरपोच देण्याचा निर्णय ■ त्या अनुषंगाने प्रायोगिक तत्त्वावर गोंदिया जिल्ह्यातील ६ हजार दिव्यांगांना घरपोच प्रमाणपत्र वितरित ■ नागपूर जिल्ह्यात १४ हजार दिव्यांगांना घरपोच प्रमाणपत्र वितरित ■ व्यंग असलेल्या व्यक्तीसोबत सुदृढ व्यक्तीने विवाह केल्यास ५०,०००/- अनुदान देण्याचा निर्णय ■ राज्यात २१४ ठिकाणी कॅम्प घेऊन ३०,३०३ दिव्यांग व्यक्तींना साहित्य वाटप.

## शैक्षणिक निर्णय

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना** – शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या तसेच उच्च शिक्षण घेऊ न शकणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी ही योजना राबवण्यात येते. त्याअंतर्गत शासकीय वसतिगृहातील मुलामुलींप्रमाणे भोजन, निवास व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी ठरवण्यात आलेली रक्कम अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते. इयत्ता ११ वी, पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मुंबई, पुणे व नागपूरसारख्या शहरात वार्षिक खर्चासाठी ४८ हजार ते ६० हजार रुपये अनुदान देण्यात येते. या योजनेचा २०१६-१७ मध्ये २७६७ व २०१७-१८ मध्ये ७९२८ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

## जात प्रमाणपत्र पडताळणी

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जात पडताळणी समितीची स्थापना करण्यात आली. ही प्रमाणपत्रे देताना रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाइकांचे उपलब्ध वैधता प्रमाणपत्र सादर केल्यास, या वैधता प्रमाणपत्रास महत्त्वाचा पुरावा समजून, इतर पुराव्यांची मागणी न करता या अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देण्यात येण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, वरील निर्णयांमुळे अर्जदारास जात पडताडणी प्रमाणपत्र मिळवणे सुलभ झाले. २०१४-१५ ते २०१७-

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

## परिवर्तन पर्व

■ **अनुसूचित जातीच्या मुलामुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना –** या योजनेत २०१५–१६ पर्यंत ५० विद्यार्थ्यांची परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड केली जात होती. परंतु २०१६–१७ पासून परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेशित ७५ विद्यार्थ्यांना (पीएच.डी. २८ व पदव्युत्तर पदवी ४७) शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. योजनेंतर्गत विद्यार्थ्यांच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. ६.०० लाख इतकी आहे. सर्वोच्च १०० नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणाऱ्या तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न मर्यादेची अट काढण्यात आली आहे. योजनेंतर्गत विद्यार्थ्याला विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या शिक्षण शुल्काची पूर्ण रक्कम, वार्षिक निर्वाह भत्ता अमेरिका इतर राष्ट्रांसाठी अमेरिकन डॉलर १४००० तर ब्रिटनसाठी पौंड ९००० व आकस्मिक खर्चासाठी अमेरिका व इतर देशांसाठी यु.एस.डी. १३७५ व यु.के. साठी पौंड १००० इतके देण्यात येतात. तसेच पुस्तके, अभ्यासदौरा व विमानप्रवास खर्च इत्यादी खर्च देण्यात येतो.



■ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना – २०१८–१९ पासून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा रुपये २ लाखांवरून रुपये २.५० लाखांपर्यंत वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार केंद्र पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत रु.२.५० लाख मर्यादेपर्यंत पालकाचे उत्पन्न असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल व रु. २.५० लाखांपेक्षा जास्त पालकांचे उत्पन्न असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यास राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क योजनेचा लाभ मिळेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत स्पर्धापरीक्षेकरिता, यशदा, पुणे प्रशिक्षण कार्यक्रम, एसआयएसी, मुंबई आणि प्री आएएएस शिक्षण कार्यक्रम. मुख्य परीक्षा आर्थिक साहाय्य योजना, २०१५–१६ पासून अनुसूचित जातीच्या उमेदवारांना युपीएससी स्पर्धापरीक्षेच्या पूर्वतयारीकरिता दिल्ली येथील नामवंत कोचिंग क्लासेसमध्ये बार्टीमार्फत प्रायोजित करण्याची योजना सुरू झाली आहे. बार्टी संस्थेमार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता बँकिंग, रेल्वे व इतर लिपिकवर्गीय स्पर्धात्मक परीक्षा कार्यक्रम राबवला जातो. तसेच रोजगारासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध व्यक्तींकरिता बार्टीमार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवला जातो.

१८ या कालावधीत १६,७५,७७५ इतकी प्रकरणे निकाली काढण्यात आली.

### महत्त्वाचे

■ डॉ.बाबासाहेब आंबेडकर लंडन येथे शिक्षण घेत असताना वास्तव्यास असलेले घर शासनाने विकत घेऊन त्याचे स्मारकात रूपांतर केले. ■ महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळास उत्कृष्ट कार्यासाठी २०१६–१७ या वर्षाचा राष्ट्रपती पुरस्कार ■ स्वच्छ भारत अभियानांतर्गत २०१७–१८ करिता निवड झालेल्या २ शाळा सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या निवासी शाळा ■ या विभागांतर्गत कार्यरत सर्व निवासी शाळांना आयएसओ मानांकित प्रमाणपत्र ■ रमाई आवास घरकूल योजनेमध्ये आमूलाग्र सुधारणा, उत्पन्न मर्यादा व अनुदानाच्या रकमेत वाढ ■ रमाई आवास योजना (ग्रामीण) प्रतिघरकूल (शौचालय बांधकामासह) साधारण क्षेत्र अनुदान रु. १,३२,०००/– नक्षलग्रस्त आणि डोंगराळ क्षेत्रासाठी रु. १,४२,०००/– ■ रमाई आवास योजना (शहरी) नगरपालिका, नगरपंचायत आणि महानगरपालिका क्षेत्रातील लाभार्थ्यांना २.५० लाख रुपये अनुदान ■ कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना जमीन खरेदीसाठी १०० टक्के अनुदान ■ जमीन खरेदीसाठी अनुदानाच्या रकमेत वाढ ■ स्वतंत्र बौद्ध विवाह कायदा करण्याकरिता गठित करण्यात आलेल्या मसुदा समितीचा अहवाल अंतिम करून शासनास सुपुर्द ■ आंतरजातीय विवाहाकरिता छत्रपती शाहू महाराजांनी १९२० साली कायदा केला होता. त्या धर्तीवर मागासवर्गीय समाजातील व्यक्तींनी सवर्ण व्यक्तीशी विवाह केल्यास प्रोत्साहन व संरक्षण देण्याकरिता नवीन कायदा तयार करण्यासाठी मसुदा समिती गठित ■ अनु. जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा विकास करण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या प्रस्तावांना शासन स्तरावरून थेट मान्यता ■ संत रोहिदास भवन, परेल, मुंबई या वास्तूच्या बांधकामाकरिता ११ कोटी रुपये, कामठी, नागपूर येथील ड्रॅगन पॅलेससाठी आतापर्यंत ३७.२० कोटी रुपये, दीक्षाभूमी, नागपूरकरिता ४० कोटी रुपये वितरित ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी स्व.वामनराव गोडबोले यांच्या चिंचोली येथील जागेवर बाबासाहेबांच्या वैयक्तिक वापरातील वस्तूंचे जतन, संरक्षण व संवर्धन, वस्तुसंग्रहालयाचे आधुनिकीकरण व परिसर सुशोभीकरण करण्यासाठी ४०.७६ कोटी मंजूर, त्यापैकी ३३ कोटी रुपये वितरित ■ डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेशन सेंटर, नागपूर याकरिता आतापर्यंत ५१.८२ कोटी रुपये वितरित.

**शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,** विभागीय संपर्क अधिकारी ■■



**प्रा. राम शिंदे**
मंत्री, मृद व जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण

> विमुक्त जाती, जमाती तसेच इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील नागरिकांच्या हक्कांचे रक्षण व्हावे, त्यांच्या उन्नतीकडे अधिक चांगल्या प्रकारे लक्ष देता यावे, यासाठी शासनाने या प्रवर्गासाठी वेगळा विभाग सुरू करण्याचा निर्णय घेतला. या समाजासाठी असलेल्या योजनांचा सखोल आढावा घेतला. त्यामध्ये तांडा वस्ती सुधार योजना व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनांना प्रतिसाद कमी असल्याचे दिसून आले. त्यामुळे या योजनांचा फायदा लोकांपर्यंत अधिकाधिक कशा प्रकारे पोहोचवता येईल, यावर लक्ष केंद्रित केले. त्यातून या योजनांच्या निकषांमध्ये बदल करण्यात आले.

# विकास आणि स्थैर्य

**प्रा. राम शिंदे**

नागरिकांच्या मागणीची दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतंत्र विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्रालयाची स्थापना केली आणि या मंत्रालयाची धुरा माझ्याकडे दिली. १ एप्रिल २०१७ पासून या नव्या मंत्रालयाचे काम सुरू करण्यात आले. त्यानंतर या वंचित प्रवर्गासाठी काय काय करता येईल, याचा सर्वांगीण व परिपूर्ण अभ्यास करून कामे सुरू केली.

## तांडा वस्ती सुधार

दलित वस्ती सुधार योजनेच्या यशस्वी अमंलबजावणीनंतर भटक्या समाजातील नागरिकांसाठी वसंतराव नाईक तांडा/वस्ती योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त वस्त्यांना होण्यासाठी त्यामध्ये सुधारणा केल्या. या योजनेतून ग्रामीण भागातील तांड्यामध्ये विद्युतीकरण, पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, गटारे, शौचालये, समाजमंदिर किंवा वाचनालय व शक्य असेल तेथे मुख्य रस्त्याला जोडणारे रस्ते यांची कामे होणार आहेत.

पंचवार्षिक आराखडा तयार करून ही कामे करण्यात येतील. या कामांच्या निवडीचे अधिकार हे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला असतील. या योजनेतून लोकसंख्येनुसार अनुदान वितरित करण्यात येईल. त्यानुसार ५० ते १०० लोकसंख्या असलेले तांडे/वस्त्या यांना ४ लाख रुपये, १०१ ते १५० लोकसंख्या असलेल्या तांड्यांना ६ लाख रुपये तर त्यापुढील लोकसंख्येच्या तांड्यांना १० लाख रुपये अनुदान देण्यात येईल. या योजनेसाठी २०१८-१९ आर्थिक वर्षासाठी ११० कोटी रुपये एवढा निधी प्राप्त झाला. या निर्णयामुळे यापुढील काळात या योजनेच्या माध्यमातून राज्यातील लमाण, बंजारा, वंजारी, धनगर, पारधी समूहाच्या तांडे /वस्त्या यांचा विकास होणार असून या समाजास स्थिर जीवन जगण्याची शाश्वती मिळेल.

## मुक्त वसाहत

ग्रामीण भागातील विमुक्त जाती व भटक्या जमातींमधील अनेक कुटुंबे ही पालात किंवा कच्च्या घरात राहतात. अशा कुटुंबांसाठी, 'यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना' राबवण्यात येत होती. मात्र, त्यामधील अटींमुळे ही योजना तळागाळापर्यंत पोचत नव्हती. यासाठी आता ही योजना रमाई आवास योजनेच्या धर्तीवर राबवण्याचा निर्णय घेतला. या योजनेचा लाभ आता ग्रामीण भागात सामूहिकतेबरोबरच वैयक्तिक लाभार्थ्यांनादेखील मिळेल.

योजनेतील २० कुटुंबांसाठी एक हेक्टर जमिनीची अट शिथिल करून दहा लाभार्थी कुटुंबांसाठी जमीन उपलब्ध होत असल्यास या योजनेचा लाभ देण्यात येईल. स्थानिक परिस्थितीनुसार जमिनीची अट शिथिल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीस देण्यात आले आहेत. प्रत्येक जिल्ह्यात ग्रामीण भागात पुरेशी जागा उपलब्ध होत असल्यास सामूहिकरीत्या आणि जागा उपलब्ध होत नसल्यास वैयक्तिकरीत्या या योजनेचा लाभ देण्यात येईल. ज्या लाभार्थ्यांकडे स्वतःची जमीन असूनही केंद्र अथवा राज्य शासनाच्या कोणत्याही आवास योजनेचा लाभ घेतला नसल्यास त्याला या योजनेचा

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

लाभ मिळणार आहे.

शासकीय जमीन उपलब्ध होत असल्यास किमान १० कुटुंबांसाठी सामूहिक योजना राबवण्यात येणार असून प्रतिलाभार्थी घर बांधण्यासाठी निधी तसेच वसाहतीमधील पाणी पुरवठा, वीज पुरवठा, मलनिस्सारण प्रकल्प, गटार, अंतर्गत रस्ते आदी नागरी सुविधांसाठी प्रतिवसाहत ४४.३१ लाख रुपये देण्यात येईल. वैयक्तिक लाभार्थ्यांना देण्यात येणारी रक्कम ही थेट आधार संलग्नित बँक खात्यात जमा होईल.

यवतमाळ जिल्ह्यातील राजुरा व माणिकवाडा (ता. दारव्हा) आणि लातूर जिल्ह्यातील गौरतांडा व ताजपूर येथे भटक्या जाती व भटक्या जमातीतील कुटुंबांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत उभारण्यास मान्यता दिली आहे. २०१६-१७ ते २०१७-१८ या कालावधीत सहा वसाहती उभारण्याचे उद्दिष्ट विभागाने निर्धारित केले.

### आश्रमशाळांच्या दर्जामध्ये सुधारणा

विजाभज, इमाव, विमाप्र कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत शासनमान्य खासगी शैक्षणिक संस्थेमार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, विद्यानिकेतन आणि ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी आश्रमशाळा चालवण्यात येतात. या शाळांच्या संचलनामध्ये एकसूत्रीपणा यावा, या शाळांची गुणवत्ता वाढावी, यासाठी आश्रमशाळा संहिता लागू करण्याचा निर्णय घेतला. या संहितेमुळे आश्रमशाळांच्या दर्जामध्ये सुधारणा होऊन वंचित समाजातील विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळण्यास मदत होणार आहे. आश्रमशाळांमधील सोयीसुविधांवर लक्ष ठेवण्यासाठी पालक समित्यांची स्थापना करण्यात येत आहे.

विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनी, शाळा, विद्यालय, महाविद्यालये यांच्या तसेच यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी व दाद

## परिवर्तन पर्व

### जलयुक्तचे यश

जलयुक्त शिवार अभियानामध्ये २०१५ ते २०१९ पर्यंत एकूण २२,४३० गावे निवडण्यात आली. दरवर्षी ५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. गेल्या तीन वर्षात टप्प्याटप्प्यांत घेण्यात आलेली कामे पूर्णत्वाला आली आहेत. २०१५-१६ मध्ये ६ हजार २०२ गावे निवडण्यात आली होती. त्यामध्ये २ लाख ५५ हजार १३५ कामे पूर्ण झाली. २०१६-१७ मध्ये निवडण्यात आलेल्या ५ हजार २८८ गावांमध्ये १ लाख ७५ हजार ८७२ पूर्ण झाली. २०१७-१८ मध्ये ५०३१ गावांमध्ये १ लाख २५ हजार ७६७ कामांपैकी १ लाख ०९ हजार ०२७ कामे पूर्ण करण्यात आली. या तीन वर्षांमध्ये १६ हजार ५२१ गावांमध्ये ५ लाख ४० हजार कामे झाली. सुमारे १६७४० हजार कामे अंतिम टप्प्यात आहेत. २०१८-१९ या वर्षासाठी ६२०० गावे निवडण्यात आली. एकूण २२,४३० गावांपैकी १५८५९ गावे जलपरिपूर्ण झाली.

गेल्या दोन वर्षात जलयुक्तमधून शासकीय सहभागाने ८२२.०१ लक्ष घन मीटरहून अधिक व लोकसहभागातून ९०३.०८ लक्ष घन मीटरहून अधिक गाळ काढण्यात आला. २०१५-१६ ते २०१७-१८ या कालावधीत नाला खोलीकरण व रुंदीकरणाची सुमारे ३९७९.८३ कि.मी. इतकी कामे शासकीय माध्यमातून तर १९७५.६९ कामे लोकसहभागातून झाली. जलयुक्तच्या कामामुळे २२ लक्ष ०७ हजार टिएमसी एवढ्या पाणीसाठ्याची क्षमता निर्माण झाली. २७ लक्ष ५० हजार हेक्टर क्षेत्र संरक्षित सिंचन क्षमता निर्माण झाली. जलयुक्त शिवारची कामे झालेल्या गावांमध्ये पूर्वी ऑक्टोबर महिन्यापासूनच टँकरची मागणी होत होती त्या गावांमध्ये यंदा एप्रिल व मे मध्ये सुद्धा टँकर सुरू झाले नव्हते. मे २०१६ मध्ये ५४२३ टँकर लागले होते. मे २०१८ मध्ये १०४७ टँकर लागले होते. एकूण ४३७६ टँकरची मागणी कमी झाली. गेल्या वर्षी पर्जन्यमान कमी असतानाही भूजल स्तरामध्ये १.५ ते २ मीटरने वाढ झाली यंदा चारा छावण्यांची संख्याही लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे दिसून आले आहे.



मागण्यासाठी अर्धन्यायिक सुनावणीसारखी व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे न्यायालयीन प्रकरणे कमी होऊन शासनाचा वेळ, पैसा व श्रम यांची बचत झाली.

विभागाच्या अखत्यारीत असलेल्या राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या विविध योजनांमध्ये मार्च,२०१८ पर्यंत ३४ हजार ७६६ लाभार्थ्यांना एकूण १९५.६५ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या माध्यमातून ८४ हजार ६९३ लाभार्थ्यांना एकूण २६७.६९ कोटी रुपयांच्या कर्जाचे वाटप करण्यात आले.

### 'जलयुक्त'मुळे पाणीसाठ्यात वाढ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पनेतून शासनाच्या विविध विभागांनी एकत्र येऊन पाणी टंचाईमुक्तीचे आव्हान पेलले. या योजनेतून गावागावांमध्ये, शिवारांमध्ये मोठ्या प्रमाणात कामे झाली. या महत्त्वाकांक्षी योजनेची जबाबदारी मृद व जलसंधारण विभागाकडे दिली आहे. जलयुक्त शिवार ही फक्त एक शासकीय योजना नसून लोकांची चळवळ झाली.

### फलनिष्पत्ती

गेल्या तीन वर्षात राबवलेल्या जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, गाळमुक्त धरण अशा अनेक योजनांमुळे अनेक गावात मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले. कधी काळी दुष्काळाशी झगडणाऱ्या गावांमध्ये आज मोठ्या प्रमाणात कृषी उत्पादने घेणे सुरू झाले. उत्पादकतेमध्ये ३० ते ५० टक्के वाढ झाली असून, रबी पिकाच्या क्षेत्रामध्ये २५ ते ५० टक्के वाढ झाली. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत मृद व जलसंधारणाची कामे पूर्वी फक्त शासकीय सहभागातून होत होती. मात्र, राज्य शासनाने यामध्ये खासगी संस्था व जनतेचा सहभाग घेण्याचा निर्णय घेतला. यामध्ये खासगी संस्था व लोकसहभाग मिळून किमान ४५ टक्के व शासन कमाल ५५ टक्के या प्रमाणात निधी उपलब्ध करण्यात येतो. मृद व जलसंधारण विभाग व भारतीय जैन संघटना यांच्या सामंजस्य करारानुसार बुलडाणा (६० लाख घन मी. काम पूर्ण), वाशिम, अकोला, लातूर, उस्मानाबाद या जिल्ह्यांत कामे सुरू झाली आहेत.

जलयुक्तच्या कामामुळे गावातील नद्या, नाले पुनरुज्जीवित झाली आहेत. तर शेततळ्यांमुळे शेताला मुबलक पाणीपुरवठा होतो आहे. उदा. येवला तालुक्यातील अंदरसूल गावचा मेळानाला दुथडी भरून वाहतोय. बांधावरून पाणी वाहतांना पाहून शेतकरी आनंदित झाले आहेत. परिसरात हिरवीगार पिके उभी राहिली आहेत. विहिरींना जमिनीलगत पाणी लागल्याचे चित्र परिसरात दिसते आहे. ही सर्व किमया जलयुक्त शिवार अभियानामुळे झाली. अशी अनेक यशस्वी कामे झाल्याचे व या माध्यमातून परिवर्तन घडल्याचे राज्यात दिसून येते. मुख्यमंत्री महोदयांच्या दूरदृष्टीमुळे गावातील पाणीटंचाई दूर होऊन पीकपद्धतीमध्ये बदल झाला. त्यामुळे शेकऱ्यास दिलासा मिळाला.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,** विभागीय संपर्क अधिकारी

## परिवर्तन पर्व

### गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार

शासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून एकूण ५२७० धरणामधून सुमारे ३.२३ कोटी घनमीटर गाळ काढण्याचे उद्दिष्ट आतापर्यंत साध्य केले. जलयुक्त शिवार अभियान व गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेतून एकूण ९.२३ कोटी घनमीटर इतका गाळ काढण्यात आला. लोकसहभागातून आतापर्यंत ६५० कोटी इतक्या रकमेची कामे झाली.

राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या विविध जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करण्याचे काम हाती घेण्यात आले. २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षात माजी



मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन करण्याकरिता विशेष कार्यक्रमांतर्गत १५०४ तलावांचे पुनरुज्जीवन करण्यात आले. त्यामुळे १९०६६ इतकी सिंचन क्षमता पुनस्थापित करण्यात आली. सध्या ३५९ इतकी कामे प्रगतिपथावर आहेत. २००१ ते २०१४ या कालावधीत ३२,७३४ हेक्टर सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित करण्यात आले. मात्र, २०१४ ते २०१८ या कालावधीत २.८४ लक्ष हे. सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित करण्यात आले.

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88



सुभाष देशमुख
मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग

> शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने शेती, पतपुरवठा आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेला विशेष प्राधान्य दिले. ग्रामीण विकास हा सहकार, पणन, बाजार नियामक बाबींशी संबंधित आहे. त्यासाठी ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाची अर्थवाहिनी असलेल्या सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करण्यात आले. 'मेक इन महाराष्ट्र' आणि 'मेक इन व्हिलेज' ही संकल्पना समोर ठेवून आर्थिक सक्षमीकरणाचे कार्य सुरू झाले. शेतकऱ्यांना दुष्काळाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढून कर्जमुक्त करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेंतर्गत देशातील सर्वात मोठी कर्जमाफी केली.

# ग्रामीण विकासाची अर्थवाहिनी

**सुभाष देशमुख**

देशाच्या इतिहासातील अभूतपूर्व असा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय शासनाने घेतला. सर्वात मोठी, पारदर्शक, शेतकरी हिताची देशातील सर्वात मोठी कर्जमाफी आहे. यात एकराचे बंधन नाही, शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा होते. त्याचबरोबर जे शेतकरी नियमित कर्ज भरतात त्यांच्या बँक खात्यात २५ टक्यांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान जमा करण्यात येत आहे. आतापर्यंत ४७.३९ लाख शेतकऱ्यांची कर्जखाती पात्र झाली असून २२ हजार ३९९ कोटी रुपयांच्या कर्जमाफीला मंजुरी देण्यात आली. ३९.१३ लाख शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर १६ हजार १०७ कोटी रुपयांची रक्कम जमा झाली. ही प्रक्रिया अजून सुरू असून सुरुवातीला कुटुंब हा घटक ग्राह्य धरल्यामुळे कुटुंबातील दीड लाखापर्यंतच कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा होत होती. त्यात बदल करून व्यक्ती हा घटक ग्राह्य धरण्यात येत आहे. त्यामुळे प्रत्येक कर्जदारास वैयक्तिकरीत्या दीड लाखापर्यंतची कर्जमाफीची रक्कम कर्ज खात्यात जमा होईल.

## पतसंस्थांना दिलासा

सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या १३,३७९ पतसंस्था असून जवळपास १ कोटी ३५ लक्ष सभासद आहेत.यात ५७,००० कोटी रुपयांच्या ठेवी पतसंस्थांमध्ये आहेत. ४६९ पतसंस्था अडचणीत आल्याने ठेवीदारांचे १८७० कोटी रुपये बुडण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. ही परिस्थिती बदलण्यासाठी सहकार कायद्यात पतसंस्थांसाठी स्वतंत्र प्रकरणाचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. यात बोगस कर्ज वाटपाद्वारे निधीचा अपहार,एकूण ठेवीच्या ५ टक्क्यांपर्यंत रोख राखीव निधी ठेवणे बंधनकारक,एकूण ठेवीच्या किमान २५ टक्के तरलता राखणे बंधनकारक, पतसंस्थेचे संचालक किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना कर्ज देण्यावर प्रतिबंध. संस्थेचे संचालक अथवा कुटुंबातील सदस्यांनी घेतलेले कर्ज माफ करण्यास प्रतिबंध, प्रशासकीय खर्च करण्यावर मर्यादा व ठेवींवर किती टक्के व्याजदर असावा यावर बंधन घातले.

## खातेदारांना सभासदत्व

सहकार चळवळ अधिक बळकट व्हावी, यासाठी सर्व पात्र खातेदारांना प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थेचे सभासदत्व देण्यासाठी काम सुरू आहे. ३१ ऑगस्ट, २०१८ पर्यंत राज्यातील ५ लाख १८ हजार खातेदारांना प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थेचे नवीन सभासदत्व देण्यात आले आहे.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना अर्थसाहाय्य

सहकारी चळवळ वाढवण्यासाठी तसेच व्यापक शेतकरी हित लक्षात घेऊन राज्यातील बँकिंग परवाना नसलेल्या नागपूर, वर्धा व बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी (जि.म.स.) बँकांना त्यांचे बँक भागभांडवल पर्याप्तता (सीआरएआर) किमान ७ टक्के होण्यासाठी ४४५.६५ कोटी एवढे अर्थसाहाय्य देण्यात आले. त्यामुळे बँकांना बँकिंग व्यवसाय करण्यासाठी आरबीआयचा बँकिंग परवाना मिळाला. तसेच अशक्त जि.म.स बँका असलेल्या जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत कर्जपुरवठा करण्याबाबतची

## परिवर्तन पर्व

### शेतमालास चांगला भाव

खरीप हंगाम २०१६-१७ मध्ये सोयाबीनचे ऑक्टोबर ते डिसेंबर,२०१६ या कालावधीत कृषीउत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबिन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल २०० रुपये व जास्तीत जास्त २५ क्विंटल प्रति शेतकरी या प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले. २०१५-१६ मध्ये कांद्याचे जुलै ते ऑगस्ट,२०१६ या महिन्यांमध्ये कृषी



उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल १०० जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति-शेतकरी या प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले. २०१६-१७ मध्ये राज्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने ज्या शेतकऱ्यांनी तूर उत्पादनासाठी ऑनलाइन नोंदणी केली. ज्यांची तूर खरेदी केली नाही अशा शेतकऱ्यांना एक हजार प्रति क्विंटल याप्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले.

### तूर खरेदी

२०१६-१७ मध्ये राज्यात चांगला पाऊस झाल्याने तुरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले. तूर उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, त्यासाठी तुरीला ५ हजार ५० रुपये हमी भाव देऊन देशातील एकूण खरेदीच्या ५० टक्क्यापेक्षा (६५ लाख क्विंटल ) अधिक विक्रमी तूर खरेदी महाराष्ट्रात गतीने करण्यात आली.

मागणी होती त्यात उस्मानाबाद, बीड, जालना, बुलडाणा, वर्धा, नागपूर, सोलापूर या जिल्हा सहकारी बँकांना राज्य सहकारी बँकेमार्फत कर्जमर्यादेत भरीव वाढ करण्यात आली.

### सॉफ्ट लोन

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या फेअर ॲण्ड रिम्युनेरेटिव्ह प्राईज (एफआरपी)ची रक्कम देता यावी, यासाठी २२०९ कोटी रुपयाचे सॉफ्टलोन मंजूर करण्यात आले. त्याकरिता ४६८ कोटी व्याज अनुदान राज्य शासन देणार आहे. सॉफ्टलोनसाठी पात्र न ठरलेल्या साखर कारखान्यांसाठी कच्च्या साखरेच्या उत्पादनानुसार कर्ज मंजूर करण्यात आले आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या प्रशासकीय कामात पारदर्शकता यावी म्हणून सहकारी साखर कारखान्यांना आवश्यक असणारा गाळप परवाना ऑनलाइन करण्यात आला आहे.

### सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सुलभ व्यवस्थापन

राज्यात सुमारे १ लाखापेक्षा जास्त गृहनिर्माण संस्था आहेत. सहकारी संस्थांपेक्षा गृहनिर्माण सहकारी संस्थांची गरज वेगळी असल्याने त्यांच्याकरिता नवीन कायदा असावा अशी अनेक दिवसांपासूनची मागणी होती.त्यानुसार अनेक बदल करून नवीन प्रकरणाचा समावेश करण्यात आला. यात नोंदणीसाठी किमान सभासद संख्या १० वरून ५ करण्यात आली, निवडणूक प्रक्रियेचे सुलभीकरण, २०० पेक्षा कमी सभासद असणाऱ्या संस्थांसाठी सोपी प्रक्रिया, गणपूर्तीसाठीचे नियम सोपे (रिक्त, राखीव संचालकांची संख्या गणपूर्तीसाठी वगळली) अस्थायी सभासदाबाबत व अवैध सभासदास काढण्याच्या प्रक्रियेचा नव्याने समावेश. कोणताही सभासद संस्थेसाठी झालेल्या खर्चाचा तपशील मागू शकेल. असे महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे नोंदणी सुलभ झाली आहे.

### पतसंस्था ठेव संरक्षण

सहकारी पतसंस्थांच्या ठेवींना संरक्षण मिळावे, यासाठी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय पतसंस्था ठेव संरक्षण योजना सुरू करण्यात आली. सहकार विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य पतसंस्था महासंघ यांच्या संयुक्त प्रयत्नांतून पतसंस्थांच्या ठेवींना संरक्षण देण्यात येईल. त्यामुळे राज्यातील नागरी, ग्रामीण बिगरशेती, महिला व पगारदार सहकारी पतसंस्था तसेच मल्टिस्टेट पतसंस्थांतील एक लाख रुपयांपर्यंतच्या ठेवींना आता शासनाचे संरक्षण मिळेल. या योजनेमुळे राज्यातील ८ हजार ४२१ पतसंस्थांच्या ४० हजार कोटी रुपयांच्या ठेवींना संरक्षण मिळेल.

### शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार

बाजार समिती संचालक मंडळात शेतकरी कुठेच नव्हते. समित्यांच्या कामकाजात शेतकरी हीत पाहिले जात नव्हते. त्यासाठी शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय घेण्यात आला. किमान १० आर इतकी जमीन धारण करणाऱ्या व बाजार समित्यांच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीतील मागील पाच वर्षांमध्ये किमान तीन वेळा ज्या शेतकऱ्याने आपल्या कृषी उत्पन्नांची विक्री केली आहे अशा शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये मतदानाचा अधिकार देण्यात आला.

### अडतमुक्ती

अडते व व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबावी यासाठी शेतकऱ्यांच्या

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

शेतमालाची अडतमुक्त करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अडते व व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबली. भाजीपाला नियमनमुक्त केल्यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल विकण्यासाठी बाजार समिती बरोबरच इतर पर्याय उपलब्ध झाले. शेतमालास चांगला भाव मिळत आहे.

## निर्यात सुविधा केंद्र

भाजीपाला निर्यातीसाठी ४५ निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात आली. फळे व भाजीपाल्यासाठी ४२ सुविधा केंद्रे व फुलांसाठी ३ सुविधा केंद्रांचा यात समावेश. विकिरण सुविधा, व्हेपर हीट ट्रीटमेंट सुविधा, हॉट वॉटर ट्रीटमेंट केंद्र अशा केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. युरोप येथे भाजीपाला निर्यातीसाठी आवश्यक असणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील एकमेव अशा व्हेजिटेबल प्रक्रिया केंद्राची उभारणी वाशी येथे करण्यात आली.

## नवीन वस्त्रोद्योग धोरण

वस्त्रोद्योगाला चालना देण्याच्या दृष्टीने नवीन वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ तयार करण्यात आले. यात ३६ हजार कोटींची गुंतवणूक आणि १० लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. राज्यात उत्पादित होणाऱ्या सर्व कापसावर येथेच प्रक्रिया होऊन, मूल्यवर्धनाचा फायदा महाराष्ट्रास मिळावा, यासाठी कापूस ते कापड असे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## सहकारी सूतगिरण्यांना भागभांडवल

सूतगिरण्यांना दिलेले भागभांडवल बँकेमध्ये असल्यामुळे त्यावर मिळणारे व्याज भागभांडवल अदा करताना समायोजित करण्याऐवजी ही रक्कम सूतगिरण्यांना परत करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर आर्थिक अडचणीत आलेल्या सुतगिरण्यांना उर्जितावस्थेत आणण्यासाठी खेळत्या भांडवलासाठी प्रतिचाती रु. ३ हजार याप्रमाणे कर्ज घेतल्यास त्या कर्जावरील दरवर्षी कमाल १२ टक्के दराने व्याज ५ वर्षासाठी शासन भरणार आहे. आतापर्यंत रु. ७७८.८७ लाख इतके व्याज सूतगिरण्यांना अदा करण्यात आले.

## टेक्सटाइल पार्क

महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ व कापूस मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. त्यामुळे उत्पादित होणाऱ्या सर्व कापसावर येथेच प्रक्रिया व्हावी, यासाठी अमरावती येथे सर्व सुविधायुक्त टेक्सटाइल पार्क उभारण्यात आला. या टेक्सटाईल पार्कला उद्योजकांकडून मिळालेला प्रतिसाद विचारात घेऊन कापूस उत्पादक जिल्ह्यात टेक्सटाइल पार्क स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या टेक्सटाइल पार्कमध्ये संबंधित जिल्ह्यातील कापसावर तेथेच प्रक्रिया होऊन मूल्यवर्धनाचे फायदे राज्याला मिळतीलच शिवाय तेथील स्थानिकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील.

## महारेशीम अभियान

शेतकऱ्यांना रेशीम शेतीची माहिती व्हावी, रेशीम उद्योगाचा विकास आणि विस्तार व्यापक प्रमाणात व्हावा यासाठी राज्यात महारेशीम अभियान राबवण्यात आले. आतापर्यंत १३,००० एकरहून अधिक जमीन रेशीम शेतीखाली आली आहे. रेशीम शेतकऱ्यांना कोष उत्पादन झाल्यानंतर कोषांच्या विक्रीसाठी बेंगळुरू येथे जावे लागत होते त्यासाठी जालना येथे कोष खरेदी केंद्र सुरू केले.त्यामुळे शेतकऱ्यांचा प्रवासासाठीचा लागणारा वेळ व वाहतूक खर्चात मोठी बचत झाली.

**शब्दांकन : काशीबाई थोरात,** विभागीय संपर्क अधिकारी

## परिवर्तन पर्व

### शेतकरी आठवडी बाजार

शेतकरी ते ग्राहक या योजनेंतर्गत 'श्रीसंत शिरोमणी श्रीसावता माळी शेतकरी आठवडी बाजार' सुरू केला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा माल थेट मुंबई, पुणे, नागपूर अशा मोठ्या महानगरापासून ते जिल्हा स्तरावरील ग्राहकांपर्यंत पोहोचावा, त्यासाठी ११४ ठिकाणी आठवडी बाजार सुरू केले. दर आठवड्याला सुमारे ४१००० मे. टन शेतमालाची व २०५ कोटी रुपयांची उलाढाल होते. शेतमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार थेट शेतकऱ्यांना प्राप्त झाला. ग्राहकांनाही थेट शेतीतून आलेला भाजीपाला ताजा, स्वस्त, स्वच्छ, उपलब्ध होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची दलालांपासून सुटका झाली. शेतीमालाच्या विक्रीसाठी सक्षम पर्याय उपलब्ध झाला.





**जयकुमार रावल**
मंत्री, पर्यटन आणि रोजगार हमी

> ग्रामीण महाराष्ट्रात लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेने महत्त्वाची भूमिका बजावली. मागील चार वर्षात या योजनेमध्ये काही महत्त्वपूर्ण बदल करत, राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. सिंचन विहीर योजना आणि मागेल त्याला शेततळे योजनांनी उत्कृष्ट कामगिरी केली. पर्यटन विभागामार्फत देशविदेशातील पर्यटकांना महाराष्ट्रात आकर्षित करून येथील पर्यटनाला चालना देण्यासाठी व्यापक उपाययोजना हाती घेण्यात आल्या. महाराष्ट्र हे पर्यटकांचे आवडते ठिकाण ठरावे, यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

# सिंचन समृद्धी आणि पर्यटनाला चालना

**जयकुमार रावल**

गेल्या चार वर्षात ग्रामीण भागातील विविध पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा)मार्फत वेगवेगळी कामे प्रभावीपणे करण्यात आली. पर्यटन विकासाला चालना देऊन महाराष्ट्रामध्ये अधिकाधिक देशविदेशातील पर्यटक यावे व राज्याच्या आर्थिक समृद्धीत वाढ व्हावी, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

मनरेगा योजनेंतर्गत मागील चार वर्षात राज्यात अभुतपूर्व अशी कामे झाली. विहिरी, शेततळी, गॅबियन बंधारे, नाला सरळीकरण, वनतळे, फळबाग लागवड, शेत बांधबंदिस्ती, अंगणवाडी, रोपवाटिका, ग्रामपंचायत भवन, घरकूल, शौचालय अशी विविध कामे या योजनेतून होत आहेत. २०१४ पासून राज्यात मनरेगामधून ८ लाख १३ हजार १२३ इतकी कामे पूर्ण झाली. यासाठी सुमारे ९ हजार ७६ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, दरवर्षी सरासरी १ हजार ८१५ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

महाराष्ट्रात मनरेगा योजनेसाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून २०१४–१५ पासून निधी उपलब्धतेमध्ये सातत्याने भरीव वाढ करण्यात आली. २०१४–१५ मध्ये १६०१ कोटी रुपये, २०१५–१६ मध्ये १८५३ कोटी रुपये, २०१६–१७ मध्ये २०८८ कोटी रुपये तर २०१७–१८ मध्ये २२९४ कोटी रुपयांची कामे या योजनेतून करण्यात आली. कामांच्या संख्येतही दरवर्षी वाढ झाली. २०१४–१५ मध्ये १ लाख ६१ हजार, २०१५–१६ मध्ये १ लाख १० हजार, २०१६–१७ मध्ये १ लाख ६३ हजार तर २०१७–१८ मध्ये २ लाख ३० हजार इतकी पायाभूत सुविधा निर्मितीची कामे करण्यात आली. मागील चार वर्षात ३,३६५ लाख इतकी मनुष्यदिवस निर्मिती झाली. मनरेगा मजुरांना पूर्वी मजुरी मिळण्यास विलंब लागत असे. पण आता याबाबत काटेकोर नियोजन करून वेळेत मजुरी देण्यात येते. २०१३ –१४ मध्ये पंधरा दिवसांच्या आत मजुरी देण्याचे प्रमाण फक्त ३०.७३ टक्के इतके होते. ते आता ९२.०६ टक्के इतके झाले. बुलडाणा, भंडारा, सातारा, नागपूर, नंदुरबार आदी जिल्ह्यांनी शंभर टक्के मजुरी वेळेत प्रदान केली.

### समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना

राज्याची सामाजिक, आर्थिक, कृषीविषयक स्थिती आणि गरजा लक्षात घेऊन १ ऑक्टोबर २०१६ पासून 'समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना' ११ कलमी कार्यक्रमाच्या स्वरूपात राबवण्यात येत आहे. अहिल्यादेवी सिंचन विहीर, अंकुर रोपवाटिका, निर्मल शोषखड्डा, कल्पवृक्ष फळबाग लागवड, भू–संजिवनी व्हर्मी कंपोस्टिंग, समृद्ध ग्राम योजना, अमृतकुंड शेततळे, भू–संजीवनी नाडेप कंपोस्टिंग, निर्मल शौचालय, समृद्ध गावतलाव, नंदनवन वृक्षलागवड या योजना राबवण्यात येत आहेत.

### ३ लाख ११ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली

मागील चार वर्षात अहिल्यादेवी सिंचन विहीर योजनेतून १

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

लाख ३० हजार ८९८ विहिरी बांधून झाल्या. धडक विहीर योजनेतून १६ हजार ९१३ विहिरी बांधण्यात आल्या. नागपूर विभागात राबवण्यात येत असलेल्या ११ हजार सिंचन विहिरी योजनेतील ८ हजार ०५८ विहिरी बांधून पूर्ण झाल्या. राज्यात मागील चार वर्षात अशा एकूण १ लाख ५५ हजार ८६९ सिंचन विहिरी शेतकऱ्यांना बांधून देण्यात आल्या. यामधून प्रति विहीर २ हेक्टर प्रमाणे एकूण ३ लाख ११ हजार ७३८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले.

### २१ कोटी रोपांची निर्मिती

मनरेगामधून कल्पवृक्ष फळबाग योजनेंतर्गत ८१ हजार ६१२ एकर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली. ३३ कोटी वृक्षलागवड या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमासाठी मनरेगा योजनेतील अंकुर रोपवाटिकांमधून मोठ्या प्रमाणावर रोपांचे वाटप करण्यात आले. यामध्ये आतापर्यंत २० कोटी ७५ लाख २५ हजार रोपांची निर्मिती झाली. नंदनवन वृक्ष लागवड, संगोपन व संरक्षण कार्यक्रमांतर्गत आतापर्यंत ६२ लाख ४५ हजार इतक्या रोपांची निर्मिती करण्यात आली. याशिवाय नाडेप कंपोस्टिंग, व्हर्मी कंपोस्टिंग, शोषखड्डे, गोटशेड, कॅटलशेड, पोल्ट्रीशेड, शौचालय, मग्रारोहयो विहिरी, मग्रारोहयो शेततळे अशी वैयक्तिक लाभाची ३ लाख ४२ हजार कामे मागील चार वर्षात पूर्ण झाली. पालकमंत्री शेतरस्ते तथा पाणंद रस्ते योजनाही विभागामार्फर राबवण्यात येते. या योजनेतून मागील चार

## परिवर्तन पर्व

### शेततळी

शेतकऱ्यांकडे स्वत:ची संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण व्हावी या उद्देशाने शासनाच्या स्वत:च्या अनुदानातून 'मागेल त्याला शेततळे' ही योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत १ लाख ११ हजार १११



शेततळ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्यापैकी ९७ हजार २०१ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली. यासाठी ३९८ कोटी रुपये खर्च करण्यात आले. याशिवाय राज्यात २०१४ पासून राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातून ४ हजार ०२५, पाणलोट व इतर योजनांमधून १० हजार ००८ आणि मनरेगामधून २६ हजार ६१२ इतकी शेततळी बांधण्यात आली. राज्यात अशी एकूण १ लाख ३७ हजार ८४६ शेततळी मागील चार वर्षात विविध योजनांमधून बांधण्यात आली.

### योजनेला पुरस्कार

२०१७ मध्ये देशातील १० नावीन्यपूर्ण योजनांमध्ये 'मागेल त्याला शेततळे' योजनेचा समावेश करण्यात आला. भारतीय प्रशासन सेवेच्या नावीन्यपूर्ण योजनेच्या अभ्यासक्रमातही या योजनेचा समावेश करण्यात आला. योजनेला ऑनलाइन ॲप्लिकेशन मॉडेलकरिता २०१७ मध्ये प्लॅटिनम स्कॉच पुरस्कार प्रदान करण्यात आला.

'मागेल त्याला शेततळे' योजनेची त्रयस्थ संस्थेमार्फत भौतिक तपासणी व मूल्यमापन करण्यात आले. या अहवालात नमूद करण्यात आलेल्या बाबी योजनेचे यश अधोरेखित करतात. या अहवालानुसार शेततळ्यात साठलेल्या पाण्यामुळे तथा होणाऱ्या भूजल पुनर्भरणामुळे जवळपासच्या विहिरींच्या पाणी पातळीत व उपलब्धतेत वाढ झाली. बंद पडलेले पाण्याचे स्रोत शेततळ्यांमुळे पुनुरुज्जीवित झाले. रब्बी हंगामातील सिंचन क्षेत्र वाढले. तपासणीसाठी निवडलेल्यांपैकी ४५ टक्के लाभार्थ्यांच्या सिंचन क्षेत्रात सरासरी ०.४८ हेक्टर इतकी वाढ झाली. सुमारे ४८ टक्के लाभार्थ्यांच्या कृषी उत्पन्नात सरासरी ३२ हजार रुपयांहून अधिक वाढ झाली. रब्बी हंगामातील व काही अंशी बारमाही बागायती क्षेत्रात वाढ झाली.

### निकष शिथिल

'मागेल त्याला शेततळे' या योजनेची आदिवासी उपयोजना क्षेत्रासह कोकणामध्ये व्याप्ती वाढावी म्हणून जमीन धारणेची मर्यादा कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आदिवासी क्षेत्रात ०.६० हेक्टरवरून ०.४० हेक्टर तर कोकणमध्ये ०.६० हेक्टरवरून ०.२० हेक्टर इतकी जमीन धारणेची मर्यादा करण्यात आली. मनरेगामधील वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठीचे अनुदान लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

वर्षात २३ हजार ८९७ रस्ते पूर्ण झाले आहेत.

### मनरेगा उत्कृष्ट अंमलबजावणी – चार पुरस्कार

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अर्थात मनरेगाच्या अंमलबजावणीत उत्कृष्ट काम केल्याबद्दल महाराष्ट्राला नुकतेच चार पुरस्कार मिळाले. गडचिरोली हा मनरेगांतर्गत सर्वोत्कृष्ट कार्य करणारा जिल्हा ठरला. गडचिरोली तालुक्यातील नागरी ग्रामपंचायतीला प्रभावी अंमलबजावणीसाठी गौरवण्यात आले. ठाणे जिल्ह्यात खुटाघर टपाल कार्यालयातील ग्राम डाकसेवक नूतनप्रकाश यांना मनरेगाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता सर्वोत्तम ग्राम डाकसेवक म्हणून गौरविण्यात आले. चौथा पुरस्कार राज्याने जलसंधारणाच्या कामात केलेल्या प्रगतीसाठी प्रदान करण्यात आला.

### देशविदेशातील कंपन्यांबरोबर सामंजस्य करार

देशातील आणि परदेशातील पर्यटकांचा राज्यात ओघ वाढून पर्यटनाला चालना मिळावी आणि विमान कंपन्यांच्या नेटवर्कचा फायदा मिळावा, यासाठी इतेहाद आणि जेट एअरवेज या विमान

## परिवर्तन पर्व

### पर्यटन विकास



२०१६ मध्ये स्वतंत्र पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले. महाराष्ट्राला २०२५ पर्यंत जगातील अग्रगण्य पर्यटनस्थळ बनवून आर्थिक विकासाला चालना देणे आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या धोरणाचे मुख्य लक्ष्य आहे. पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत राज्यात सहा विशाल तथा अतिविशाल पर्यटन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. यातून ४ हजार ७२८ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, साधारण ४ हजार १८९ इतकी थेट रोजगार निर्मिती होईल. मागील चार वर्षात रायगड किल्ला व परिसर, श्रीक्षेत्र निरा नृसिंहपूर (पुणे), म्हैसमाळ-वेरुळ-खुलताबाद (औरंगाबाद), माहुरगड (नांदेड), एलिफंटा, लोणार सरोवर (बुलडाणा), माता जिजाऊ जन्मस्थळ (सिंदखेडराजा, बुलडाणा) या पर्यटनस्थळांच्या १ हजार ७२७ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना मान्यता देण्यात आली. प्राथमिक टप्प्यात त्यापैकी १०२ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला.

वाहतूक कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले. एअर बीएनबी या कंपनीबरोबर सामंजस्य करार करण्यात आला. ही कंपनी देशविदेशातील पर्यटकांना एलिफंटा लेणी परिसरात होम स्टे सुविधा उपलब्ध करून देत आहे. ही कंपनी आता आपला विस्तार राज्याच्या इतर भागातही वाढवणार आहे.

मुंबईतील पर्यटन व्यवसायाला चालना देणे तसेच मुंबईत येणाऱ्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आश्वासित, सुरक्षित आणि खात्रीची वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एमटीडीसी व ओला टॅक्सी कंपनी यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. होम डायनिंग पर्यटनासही चालना देण्यात येत आहे. यासाठी कुलाबा (मुंबई) येथील 'द बोहरी किचन'सारख्या होम डायनिंग उपक्रमांसमवेत चर्चा करण्यात येत आहे. गडकिल्ल्यांची स्वच्छता, डागडुजी आदी कामे रोजगार हमी योजनेमधून करण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत राज्यातील विविध पर्यटनस्थळांच्या विकासासाठी मागील चार वर्षात २८३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

### चेतक महोत्सव, वाईन फेस्टिव्हल

सारंगखेडा (ता. शहादा, जि. नंदुरबार) येथे २०१६ व २०१७ मध्ये चेतक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. जुनी परंपरा असलेल्या या महोत्सवास व्यापक स्वरूप देण्यात मागील दोन वर्षात यश आले आहे. नाशिक येथील वाईन फेस्टिव्हललाही पर्यटकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

### २०० जणांना गाईडचे प्रशिक्षण

नागपूर येथील दीक्षाभूमी आणि दादर (मुंबई) येथील चैत्यभूमी स्थळास 'अ' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. स्वतंत्र पर्यटन संचालनालय स्थापन करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका हा विशेष पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला. पर्यटनस्थळी पर्यटक मार्गदर्शक (गाईड) नियुक्त करता यावेत यासाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे. आतापर्यंत जवळपास २०० जणांना हे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

### मुंबई मेला शॉपिंग फेस्टिव्हल

मुंबईतील पर्यटनाला चालना देण्यासाठी दुबई फेस्टिव्हलच्या धर्तीवर मागील वर्षी मुंबई मेला शॉपिंग फेस्टिव्हल आयोजित करण्यात आला. आता एमटीडीसीमार्फत दरवर्षी या फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात येणार आहे.

**शब्दांकन : इर्शाद बागवान,** विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88



संभाजी पाटील – निलंगेकर
मंत्री, कामगार, भूकंप पुनर्वसन,
कौशल्य विकास, माजी सैनिक कल्याण

> कामगार कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसह कामगार कल्याणासाठी कामगार विभाग कार्यरत आहे. गेल्या वर्षभरातील कामगार कायद्यात महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या. त्यामुळे उद्योजकांना व्यवसाय करणे सोपे झाले. या सुधारणांमुळे कामगारांना सामाजिक सुरक्षा, महिलांना अधिक रोजगार संधी तसेच रोजगारात वाढ होण्यास मदत झाली. ईज ऑफ डुईंग बिझनेससाठी स्वयंप्रमाणिकरण आणि एकत्रित वार्षिक विवरण योजना कार्यान्वित करण्यात आल्याने कारखान्यांना स्वयंशिस्त लागण्यासोबतच आत्मनिर्भर होण्यास मदत झाली.

# सुरक्षा आणि कौशल्य विकास

**संभाजी पाटील – निलंगेकर**

विविध कल्याणकारी कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही कामगार विभागाची प्रमुख जबाबदारी आहे. ती पार पाडत असतानाच कामगार विभागाच्या जास्तीत जास्त सेवा ऑनलाइन पद्धतीने देण्याकरिता संगणक प्रणालीचा वापर करण्यात आला. विभागाने ऑनलाइन अर्ज निकाली काढण्यात आघाडी घेतली. नागरिकांना तत्पर आणि दर्जेदार सेवा पुरवण्याच्या हेतूने सेवा हमी अधिनियम लागू करण्यात आला. त्याअंतर्गत एकूण ४० सेवा अधिसूचित करण्यात आल्या. व्यवसाय धोरण सहजतेने लक्षात घेऊनच नोंदणीकृत, परवाना, नूतनीकरणांतर्गत कामगार विभागाच्या सेवा ऑनलाइन करण्यात आल्या.

## बांधकाम कामगार

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंद करण्यात आलेल्या बांधकाम कामगारांची संख्या वाढावी, यासाठी विशेष अभियान राबवण्यात आले. 'अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत' ७५ दिवसांमध्ये मंडळाच्या एकूण नोंदीत बांधकाम कामगार संख्येपैकी ३२.४७ टक्के म्हणजेच ३ लाख ६८ हजार बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली. सध्या अशा बांधकाम कामगारांची संख्या ११ लाख ३३ हजार २९१ आहे.

## कल्याणकारी योजना

- 'महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना' आता कामगारांनाही लागू करण्यात आली. यामुळे कामगारांना आजारपणाच्या काळात उपचार घेणे शक्य झाले.
- प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना लागू करण्यात आली. यामुळे बांधकाम कामगारांना नैसर्गिक मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास आर्थिक साहाय्य मिळते.
- बांधकाम कामगारांच्या सुरक्षिततेकरिता सुरक्षा संच वाटप.
- बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्या कामगाराला दोन लाख रुपयांचे अर्थसाहाय्य.
- नोंदित बांधणी कामगारास ७५ टक्के किंवा कायमचे अपंगत्व आल्यास दोन लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य देण्याचा निर्णय. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेत पात्र न ठरणाऱ्या बांधकाम कामगारांना या योजनेचा फायदा
- बांधकाम कामगारांची नोंदणी व लाभ वाटपासाठी नोंदणीकृत मजूर संघटनांची मदत घेण्याचा निर्णय
- बांधकाम कामगारांना द्यावयाच्या लाभाच्या रकमेत जून २०१६ पासून दुप्पटीने वाढ.

## सुरक्षा व आरोग्य धोरण

देशामध्ये पहिल्यांदाच महाराष्ट्राने कामगारांकरिता सुरक्षा व आरोग्य धोरण तयार केले. 'लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार सामाजिक सुरक्षा योजना' राबवण्यास मान्यता मिळाली. कामगार विभागामार्फत असंघटित कामगार मंडळ, किमान वेतन सल्लागार समिती, राज्य कंत्राटी कामगार सल्लागार मंडळ, माथाडी सल्लागार समिती, सुरक्षा रक्षक सल्लागार समिती अशा विविध मंडळाची स्थापना करण्यात आली.

### कामगारांच्या कुटुंबीयांसाठी कटिबद्ध

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत कामगार कुटुंबीयांसाठी केंद्रीय लोकसेवा व महाराष्ट्र लोकसेवा आयोग प्रशिक्षण योजना राबवण्यात येते. त्याअंतर्गत नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या १,७३२ आहे. इमारत बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना राबवण्यात येणार आहे.

### इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ

येणाऱ्या काळात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाला अधिक सक्षम करण्यात येणार असून जिल्हा कामगार सुविधा स्थापन करण्यात येईल. एकात्मिक कामकाजाकरिता संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येईल. या मंडळामार्फत मध्यान्ह भोजन योजना राबवण्यात येईल. याच मंडळामार्फत कौशल्य वृद्धीकरण योजना, आरोग्य तपासणी, बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरिता पाळणाघराची योजना, मोबाइल टॉयलेट योजना राबवण्यात येईल.

### 'येस' रोजगार योजना

युवा सशक्तीकरण योजना (युथ एम्पावरमेंट स्कीम (येस)) लवकरच सुरू करण्यात येईल. बदलत्या काळानुसार रोजगारात बदल होत चालले आहेत. त्याप्रमाणे प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. येसच्या माध्यमातून या बदलत्या रोजगाराची माहिती युवकांपर्यंत पोहोचवण्यात येईल.

### स्टार्टअप यात्रा

महाराष्ट्रामध्ये ३ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान स्टार्टअप यात्रा काढली जाणार आहे. यामुळे नवकल्पना असणारे नवउद्योजक तयार होतील. महाराष्ट्रातील नवकल्पना असणाऱ्यांना आणि स्टार्टअप विकसित करण्याची इच्छा असणाऱ्यांना महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेमुळे मोठे व्यासपीठ मिळेल. या यात्रेमुळे नव उद्योजक घडतील असा मला विश्वास वाटतो. स्टार्टअप यात्रेच्या निमित्ताने महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक गुंतवणूक होईल. उद्योग आणि रोजगार क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत.

### आयटीआयचे बळकटीकरण

सामाजिक उत्तरदायित्व निधीतून शासकीय आयटीआयचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. या आयटीआयमुळे ८५ टक्के रोजगार निर्माण होत आहेत. औद्योगिक क्षेत्राशी निगडित ४ लाख तरुणांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले, यासाठी औद्योगिक संस्थांशी करार करण्यात आले. औद्योगिक संस्थांमध्ये होणाऱ्या कामावर आधारित अभ्यासक्रम असल्यामुळे लाभार्थ्यांना याचा थेट लाभ झाला आहे.

कौशल्य विकास आणि उद्योगाशी निगडित नवीन परवानग्या

## परिवर्तन पर्व

### कौशल्य विकास आणि उद्योजकता

बेरोजगार युवकांसाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागमार्फत जिल्हास्तरावर राबवण्यात येणाऱ्या रोजगार मेळाव्याला आता पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा असे नाव देण्यात आले आहे. हे मेळावे व्यवसाय शिक्षण, प्रशिक्षण संचालनालय व कौशल्य विकास आयुक्त, रोजगार स्वयंरोजगार संचालनालयामार्फत राबवण्यात येतात.

### कौशल्य प्रशिक्षण

शेतकरी आणि तरुणांना स्वयंरोजगार आणि व्यवसायाकरिता संधी निर्माण होण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध योजनांच्या माध्यमातून राबवण्यात येते. शेतकऱ्यांना आधुनिक आणि प्रयोगशील शेतीबाबत प्रशिक्षण देण्यात येते. सामूहिक शेतीमधील प्रयोग, आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शेतकऱ्यांना शेती करताना दडपण वाटू नये आणि शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी प्रयत्न केले जातील.

१० ऑक्टोबरपासून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मुलांना कृषी आधारित कौशल्य प्रशिक्षण दिले जात असून, याचा लाभ तीन लाख युवकांना होईल. यामुळे गावामध्येच रोजगार निर्मिती होईल. हे मोफत प्रशिक्षण ३४ जिल्ह्यांत टप्प्याटप्प्याने होणार असून याअंतर्गत शेतीसाठी उपयोगात येणाऱ्या उपकरणाच्या दुरुस्तीचे कौशल्य प्रशिक्षण दिले जाईल.

### कौशल्य विद्यापीठ

राज्यातील उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी सहा कौशल्य विकास विद्यापीठे स्थापन करण्यात येतील. या माध्यमातून



विद्यार्थ्यांना अत्याधुनिक कौशल्य आधारित शिक्षणाची संधी प्राप्त होणार आहे. चंद्रपूर येथे वन आधारित कौशल्य विद्यापीठ तर नवी मुंबई येथे सायबर सुरक्षा विद्यापीठ उभारण्यात येईल.

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

## परिवर्तन पर्व

### कौशल्य विकास

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान, राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान आणि प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना राबवण्यात येते. प्रमोद महाजन कौशल्य आणि उद्योजकता



विकास अभियानामार्फत आतापर्यंत जवळपास ३ लाख ४० हजार उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले असून यामध्ये ५४ टक्के महिलांचा सहभाग आहे. या प्रशिक्षणानंतर १,५९,६३३ उमेदवारांना रोजगार आणि स्वयंरोजगार मिळाला. याअंतर्गत एकूण १४० सामंजस्य करार करण्यात आले. राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियानांतर्गत १,४०,०९७ उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये ७२ टक्के महिलांचा सहभाग होता. प्रशिक्षणानंतर २२,३९७ उमेदवारांना रोजगार आणि स्वयंरोजगार प्राप्त झाला. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेमुळे २०२० पर्यंत १,६७,१२७ उमेदवार प्रशिक्षित होणार आहेत.

येणाऱ्या काळात एककेंद्राभिमुख कौशल्य कार्यक्रम, कौशल्य विकास विद्यापीठाची स्थापना, परदेश रोजगार केंद्र, यूथ कमिशन स्थापन करणे आणि बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवणे यावर भर देण्यात येईल.

यापुढे आता राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषदेमार्फत देण्यात येतील.

### मागास घटकातील उद्योजकांना मदत

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात आली. याबरोबरच रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे या महामंडळाचे मुख्य उदि्दष्ट आहे. www.udyog.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर याबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे. सर्व योजनांकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. वैयक्तिक, गट कर्ज आणि गट प्रकल्प व्याज परतावा या तिनही योजना कृषी, संलग्न आणि पारंपरिक उपक्रम, लघू व मध्यम उद्योग जसे उत्पादन, व्यापार व विक्री आणि सेवा क्षेत्रांसाठी आहेत.

■ **वैयक्तिक कर्ज व्याज परतावा –** यामध्ये कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांच्या मर्यादेत असलेल्या आणि बँकेने १० लाख रुपयापर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्क्यांच्या मर्यादेत) त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. पहिला हप्ता अनुदान (मुद्दल आणि व्याज) स्वरूपात लाभार्थ्यांला देण्यात येईल.

■ **गट कर्ज व्याज परतावा –** शासनमान्य बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, आणि कंपनी हे गट या योजनेंतर्गत पात्र असतील. यामध्ये कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांच्या मर्यादेत असलेल्या उमेदवारांना गटासंदर्भात, बँक कर्ज मर्यादा प्रतिगटास जास्तीत जास्त ५० लाख रुपयांपर्यंतच्या देण्यात आलेल्या उद्योग उभारणी कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी कमी यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त १२ टक्के व्याजाने आणि १५ लाख रुपयांच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. बचत गटांची मयोमर्यादा ४५ वर्षे अशी शिथिल करण्यात आली आहे. ■ **गट प्रकल्प कर्ज योजना –** या योजनेचा लाभ घेण्यासाठी वेब पोर्टलवर नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. एकाच कुटुंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा फायदा घेता येईल. हे कर्ज केवळ मुदत कर्ज असणार असून गट पात्र ठरल्यानंतर गटांना ऑनलाइन मंजुरी दिली जाईल. बिन व्याजी कर्ज रक्कम परतावा वितरणाच्या खात्यात ७ महिन्यापासून ८४ व्या महिन्यापर्यंत (७ वर्ष) समान हप्त्यात देणे आवश्यक असेल. महामंडळामार्फत या योजनेंतर्गत, नॉन क्रिमिलेअरकरिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांच्या आत असलेल्या पात्र शेतकरी उत्पादक गटांना १० लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी दराने कर्ज रक्कम उद्योगाकरिता देण्यात येईल.

### माजी सैनिकांचे कल्याण

धारातीर्थी पडलेले तसेच अपंगत्व आलेले जवान आणि त्यांच्या अवलंबितांना एकरकमी अनुदान शासनामार्फत देण्यात येते. हे अनुदान दुप्पट करण्यात आले आहे. पुण्यातील भोसरी येथील महासैनिक औद्योगिक वसाहत प्रकल्पाचे काम डिसेंबर २०१६ मध्ये पूर्ण झाले. माजी सैनिक/युद्धविधवा/पाल्य तसेच जखमी/विकलांग/त्यांच्यावरील अवलंबित यांना प्रथम प्राधान्याने भाडेतत्त्वावर गाळे देण्यात येईल.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,** विभागीय संपर्क अधिकारी



**महादेव जानकर**
मंत्री, पशुसंवर्धन,
दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय

**"शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय तसेच मत्स्यव्यवसाय विभाग फार मोठी भूमिका बजावत आहे. गेल्या चार वर्षात राज्य शासनाने या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले उचलली. उत्कृष्ट देशी वंशाच्या पशूंचे संवर्धन, पशुवैद्यकीय सेवांचा विस्तार, मेंढीपालन, कुक्कुटपालनाला प्रोत्साहन, दूधदरातील चढ उतारावर उपाययोजना, नीलक्रांतीच्या माध्यमातून मत्स्यसंवर्धन क्षेत्रासाठी पायाभूत सुविधांचा विकास व पुरवठा आदी माध्यमातून शासनाने या क्षेत्राच्या विकासावर लक्ष केंद्रित केले आहे."**

# श्वेतक्रांती ते नीलक्रांती...

**महादेव जानकर**

विदर्भ व मराठवाडा विभागात राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत (आरकेव्हीवाय) राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाच्या (एनडीडीबी) साहाय्याने ११ जिल्ह्यातील २९३६ गावांमध्ये विशेष दुग्ध प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यासाठी १२८ कोटी २९ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला. मराठवाड्यात १० हजार लीटरच्या आत दैनंदिन दूध संकलन होत होते. आता या दोन्ही विभागात मिळून दैनंदिन १ लाख ८२ हजार लीटरचे दूध संकलन होत आहे. या प्रकल्पाचा २२ हजार ७३१ शेतकऱ्यांना लाभ होत असून शेतकऱ्यांना दुधाचा योग्य मोबदला मिळत आहे.

या प्रकल्पात गुणवत्तापूर्ण पशुखाद्य पुरवठा, वैरण विकास कार्यक्रम, शेतकऱ्यांच्या दारात गायी-म्हशींमध्ये कृत्रिम रेतनाच्या सुविधा आणि गावपातळीवर पशुवैद्यकीय सेवा या कार्यक्रमाचा समावेश आहे.

### दुग्धव्यवसायाचे बळकटीकरण

दूध उत्पादकांना योग्य दर मिळावा यासाठी दूध संस्थांकडून विक्री होणारे पिशवीबंद दूध वगळून उर्वरित दुधाला प्रतिलीटर ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय जुलै २०१८ मध्ये घेतला. दूध भुकटीच्या निर्यातीसाठी ५० रुपये प्रतिकिलो व दूध निर्यातीकरिता ५ रुपये प्रतिलीटर अनुदान देण्याचा निर्णय घेतला. ४ लाख दूध उत्पादकांना याचा फायदा होत आहे.

दुधाच्या अतिरिक्त उत्पादनाचा परिणाम शेतकऱ्यांना मिळणाऱ्या दूध दरावर होऊ नये, यासाठी दूध भुकटी प्रकल्पांना भुकटी रूपांतरणासाठी वापरलेल्या दुधास प्रतिलीटर ३ रुपयांचे अनुदान दिले. या योजनेत २१ दूध भुकटी प्रकल्पधारकांनी सहभाग घेतला. त्यामुळे सुमारे १८ कोटी लीटर दुधाचे समायोजन होऊन १५ हजार ५२० मे. टन इतक्या दूध भुकटीचे उत्पादन झाले. दूध भुकटीचे समायोजन तसेच शालेय विद्यार्थ्यांना पोषक तत्त्व या उद्देशाने शालेय पोषण कार्यक्रमांतर्गत दूध भुकटीचे वाटप करण्यात येते. राष्ट्रीय कृषी विकास या योजनेत दूध उत्पादन व दुग्धशाळा उभारणी तसेच दूध भुकटी प्रकल्प उभारणीकरिता ५० टक्के अनुदान या धर्तीवर गेल्या ४ वर्षात १५ प्रकल्पासाठी ७० कोटी ७९ लाख रुपये अनुदान वितरित करण्यात आले. योजनेमुळे राज्यातील दुग्ध व्यवसायाचे बळकटीकरण करणे शक्य झाले आहे.

### कृत्रिम रेतन

देशी वंशावळीच्या गायींमध्ये कृत्रिम रेतनाद्वारे मादी वासरांच्या पैदाशीसाठी निती आयोगाने निवड केलेल्या गडचिरोली, उस्मानाबाद, नंदुरबार व वाशिम या चार जिल्ह्यांमधील प्रत्येकी शंभर गावांची निवड करण्यात आली. या प्रत्येक गावातील १०० याप्रमाणे दहा हजार देशी गायींमध्ये कृत्रिम रेतन करण्यात आले. याद्वारे देशी गायींच्या संख्येत वाढ होण्यास मदत होईल. उस्मानाबाद जिल्ह्याचा लसीकरण व कृत्रिम रेतनाच्या कामामध्ये देशात प्रथम क्रमांक आला.

### महामेष योजना

मेंढी पालनास प्रोत्साहन तसेच भज-क प्रवर्गातील मेंढपाळांची भटकंती थांबवण्यासाठी जून २०१७ पासून 'राजे यशवंतराव होळकर महामेष योजना' सुरू करण्यात आली. याअंतर्गत २०१७-१८ या वर्षात आतापर्यंत २८९ स्थलांतरित मेंढी गटांचे

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

## परिवर्तन पर्व

### 'गोवर्धन गोवंश योजना'

राज्यात महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ लागू करून गोवंशीय पशुधनाच्या कत्तल, विक्रीवर पूर्णत: बंदी घालण्यात आली. त्यामुळे भाकड पशुधनाच्या संख्येत होणारी वाढसंख्या पाहता संगोपनाचे काम करणाऱ्या गोशाळा, पांजरपोळ संस्थांना प्रत्येकी १ कोटी रुपयांचे अनुदान देण्याची 'गोवर्धन गोवंश योजना' एप्रिल २०१७ पासून सुरू करण्यात आली. आतापर्यंत २८ जिल्ह्यातील ३४ गोशाळांना अनुदान मंजूर केले आहे. सर्व बाबींची पूर्तता केलेल्या १५



संस्थांना अनुदानाचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला.

### राज्याचा सन्मान

पशुसंवर्धन विभागास २०१६-१७ मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल केंद्र शासनाकडून 'राष्ट्रीय गोकुळ मिशन' अंतर्गत राज्यास ५ पुरस्कार प्राप्त झाले. 'बेस्ट परफॉर्मिंग स्टेट फॉर वेस्टर्न झोन'- पहिला क्रमांक, 'बेस्ट ऑफ द बेस्ट स्टेट्स'- पहिला क्रमांक, 'बेस्ट फील्ड वेटर व्हेटर्नरीयन अवॉर्ड'- पहिला आणि दुसरा क्रमांक, 'बेस्ट आर्टिफिशिअल इनसिमिनेशन टेक्निशियन अवॉर्ड'- दुसरा क्रमांक.

वाटप करण्यात आले. २०१८-१९ मध्ये या योजनेसाठी ४ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली. त्यापैकी २ कोटी ८० लाख रुपये वितरित करण्यात आले असून, १८४ स्थलांतरित मेंढी गट वाटप करण्याचे प्रस्तावित आहे.

### स्वयम् प्रकल्प

अनुसूचित क्षेत्र व आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील अंगणवाड्यातील मुलांमधील कुपोषणाच्या समस्येवर उपाय म्हणून त्यांना अंड्यांचा पुरवठा करणे व आदिवासी कुटुंबांना स्वयंरोजगार निर्मिती या दुहेरी उद्देशाने परसातील कुक्कूटपालनासाठी 'स्वयम् प्रकल्प' २०१७-१८ ते २०१९-२० या ३ वर्षासाठी राबवण्याचा निर्णय घेतला.

यासाठी २०१७-१८ मध्ये ७ कोटी ७० लाख रुपये एवढा निधी वितरित करण्यात आला. या योजनेत आतापर्यंत लाभार्थ्यांना पक्ष्यांचा पुरवठा करण्यासाठी ८ जिल्ह्यात ३९ मदर युनिट्सची स्थापना करण्यात आली. लाभार्थ्यास पहिल्या टप्प्यातील २० पक्ष्यांचा गट याप्रमाणे रायगड जिल्ह्यातील ८३४ लाभार्थ्यांना पक्षी गटांचे वाटप करण्यात आले. २०१८-१९ करिता ८ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली. ५ कोटी ६० लाख रुपये निधी २४ मदर युनिट्स् स्थापनेकरिता वितरित. ९७,०४० पक्ष्यांचे संगोपन करण्यात आले.



स्वयंरोजगार निर्मितीस पोषक ठरणाऱ्या कुक्कुटपालनास चालना देण्यासाठी सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर ३०२ 'सघन कुक्कुट विकास गट' स्थापना करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### मत्स्यसंवर्धन व उत्पादन वाढ

राज्याच्या सागरी क्षेत्रामध्ये शास्त्रोक्त पद्धतीने मासेमारीचे नियमन करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यामध्ये ट्रॉलजाळीच्या खोलाचा आस निश्चित करणे, पर्ससीन मासेमारीचे कालावधी सप्टेंबर ते डिसेंबर करण्यात आला असून त्याची क्षेत्रनिश्चिती, ट्रॉलनेटच्या वापराबाबत विशिष्ट प्रतिबंध, मासेमारीसाठी एल.ई.डी लाईटच्या वापरास बंदी अशा उपाययोजना राबवण्यात येत आहेत.



छोटे मासे व माशांची पिल्ले यांची मासेमारी टाळणे व या मत्स्यसाठ्याचे जतन करण्यासाठी यांत्रिक नौकेद्वारे वापरण्यात येणाऱ्या ट्रॉलजाळीचा खोलाचा (कॉडएन्ड) आस (मेश) ४० मि.मी. चौरस आकाराचा निश्चित केला असून त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामुळे जाळ्यामध्ये येणारी माशांची पिल्ले

सहजरीत्या निसटून जाऊ शकतात. परिणामी मत्स्योत्पादनात सातत्य राहील. या सर्व उपाययोजनांचा परिणाम आगामी एक-दोन वर्षात सागरी मत्स्यसाठ्यात व मत्स्योत्पादनात वाढ अशा स्वरूपात निश्चितच दिसून येईल.

## सरदार सरोवर प्रकल्प

नंदुरबार जिल्ह्यातील 'सरदार सरोवर' या आंतरराज्यीय प्रकल्पात मत्स्यबोटुकली संचयनाचा कार्यक्रम राबवण्यात आला. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील विस्थापित मच्छीमार आदिवासी समाजातील ५ मत्स्यसहकारी संस्थांची स्थापना करून ४२५ आदिवासी मच्छीमार कुटुंबांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे प्रकल्पबाधित १८०० लोकांना रोजगार मिळाला. पिंजरा पद्धतीच्या मत्स्यसंवर्धनाकरिता नर्मदा प्राधिकरणामार्फत शंभर टक्के अनुदानावर २४० पिंजरे, मत्स्यबोटुकली व मत्स्य खाद्य उपलब्ध करून देण्यात आले.

## नीलक्रांती योजना

मत्स्यव्यवसायाचा एकात्मिक विकास व व्यवस्थापनाद्वारे मत्स्योत्पादनात दुपटीने वाढ करण्याकरिता केंद्र पुरस्कृत नीलक्रांती अंतर्गत ३० योजना शासनामार्फ़त राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. २०१७-१८ मध्ये ६ कोटी ४५ लाख रुपये खर्च करून ३ लाख २८ हजार ४५१ लाभार्थींना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

२०१८-१९ करिता ७० कोटी रुपयांच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिली असून २३७ कोटी ६६ लाख रुपयांचे अतिरिक्त प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवण्यात आले. यामध्ये ३ लाख २९ हजार लाभार्थ्यांना लाभ होईल. गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादनात भरीव वाढ झाली असून सध्या २ लाख मे. टनहून अधिक होत आहे.

## पिंजरा पद्धती

शास्त्रयुक्त व नियंत्रित पद्धतीने मत्स्यसंवर्धन करण्यासाठी राज्यातील विविध जलाशयात २१,१०० पिंजरे स्थापन करण्याची परवानगी देण्यात आली. त्यामधून ५२ हजार मे. टन मत्स्यउत्पादन अपेक्षित आहे. काही प्रकल्पातून मत्स्योत्पादनही सुरू झाले.

राज्यातील १५ ते २०० हेक्टर पर्यंतच्या जलाशयांमधील ०.५ टक्के तर २०० हेक्टरवरील जलाशयांचे १ टक्के जलक्षेत्र पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धनासाठी राखीव ठेवण्यात आले.

## सागरी मासेमारी

सागरी मासेमारीला प्रोत्साहन देण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येत आहे. शासनाने प्राधान्य दिले. त्यामध्ये नवीन मत्स्यबंदरांची निर्मिती, अस्तित्वातील मत्स्यबंदरांचे आधुनिकीकरण, जेट्टींची निर्मिती यांचा समावेश आहे.

मुंबईतील ससून डॉक व भाऊचा धक्का या बंदरात असणाऱ्या मासेमारी नौकांचा भार कमी करण्यासाठी मुंबईजवळील करंजा ता. उरण (जि. रायगड) येथे नवीन मच्छीमार बंदराची उभारणी करण्यात येत आहे. सिंधूदुर्ग जिल्ह्यातील मच्छिमारांच्या सोयीसाठी आनंदवाडी ता. देवगड (जि. सिंधुदुर्ग) येथे नवीन मच्छीमार बंदराची उभारणी करण्यात येत आहे. मिरकरवाडा ता. जि. रत्नागिरी येथे नव्यानेच मत्स्यबंदर बांधण्यात आले. त्याच्या टप्पा २ चे काम पूर्णही झाले. ५२५ मीटर ब्रेकवॉटरच्या भिंतीमुळे बंदरात येणाऱ्या गाळाचे प्रमाण कमी झाले. मच्छीमारांना मिरकरवाडा बंदरात मासळी उतरवण्यासाठी चांगल्या प्रकारच्या सुविधा निर्माण झाल्या.

## मासेमारी बंदराचे आधुनिकीकरण

ससून गोदी, मुंबई हे मत्स्यव्यवसायाचे महाराष्ट्रातील प्रमुख बंदर आहे. या बंदरामध्ये मासळी उतरवण्यासाठी अत्याधुनिक सोयीसुविधांची कमतरता असल्याने, पकडलेली मासळी वेळेत प्रक्रियेसाठी तसेच स्थानिक बाजारपेठेत विक्रिकरिता पाठविण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी येतात.



डिसेंबर २०१५ मध्ये केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण विभागाने या बंदराच्या आधुनिकीकरणाच्या प्रस्तावास मान्यता दिली. राज्य शासन आणि केंद्र शासनाच्या अर्थसाहाय्यातून या गोदीचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. प्रकल्प खर्चातील वाढ तसेच नवीन कामांचा समावेश यामुळे ससून गोदीच्या आधुनिकीकरणाच्या ९६.९२ कोटीच्या अहवालास मंत्रीमंडळाने नुकतीच सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.

**शब्दांकन : सचिन गाढवे,** विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》》https://t.me/Mpscrockers88

# न्याय आणि सन्मान



**दिलीप कांबळे**
राज्यमंत्री, सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य,
मदत व पुनर्वसन, भूकंप पुनर्वसन,
अल्पसंख्याक विकास व वक्फ

**“भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील सामाजिक न्याय हा एकच ध्यास घेऊन गेली चार वर्षे अथक प्रयत्नशील आहे. सर्व सामाजिक घटकांचा विशेषत: मागास व दीनदुबळ्या घटकांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत विविध योजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत.”**

## दिलीप कांबळे

■ मुंबईत इंदू मिलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य आंतरराष्ट्रीय स्मारक. ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील वास्तव्य असलेले ठिकाण खरेदी. ■ १०० कोटी रुपयांचा निधी दीक्षाभूमीच्या विकासासाठी. ■ राज्यभर कौशल्य विकासावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम. ■ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना.■ केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी दिल्लीत नामवंत संस्थांमध्ये मोफत शिकवणी वर्ग ■ स्पर्धा परीक्षेसाठी नागपूर ,पुणे,या शहरात मोफत शिकवणी वर्ग. ■ जात वैधता प्रमाणपत्र समित्यांच्या कामकाजातही पारदर्शकता ■ सर्व जिल्ह्यांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र समित्यां कार्यान्वित ■ उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी परदेश तसेच देशांतर्गत शिष्यवृत्तीच्या संख्येत वाढ. ■ राज्यातील बहुतांश शासकीय वसतिगृहे व निवासी शाळा यांना आयएसओ मानांकन ■ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेली व भेटी दिलेल्या ठिकाणांची ऐतिहासिक वास्तू म्हणून संवर्धन. ■ डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) मार्फत विविध कौशल्य विकासावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम ■ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी दिल्लीतील नामवंत प्रशिक्षण संस्थांमध्ये मोफत शिकवणी ■ नागपूर, पुणे या शहरात स्पर्धा परीक्षेसाठी मोफत शिकवणी वर्ग सुरू.



इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाचे संकल्पचित्र.

### स्वाधार

सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केली. दिवसेंदिवस वाढत असलेली व्यवसायिक, बिगर व्यावसायिक महाविद्यालयांची संख्या आणि तेथे प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या वाढत असून त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृह सुविधेचा जागेच्या उपलब्धतेमुळे त्वरित लाभ देणे शक्य होत नाही. त्यामुळे वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम या योजनेद्वारे जमा केली जाते. दरवर्षी राज्यातील २५ हजार विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल. जात वैधता प्रमाणपत्र समित्यांच्या कामकाजातही पारदर्शकता आणण्यासाठी, शक्यतो सर्व सुविधा, पासपोर्ट कार्यालयप्रमाणे ऑनलाइन करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र समित्या कार्यान्वित करण्यात आल्या. आवश्यक नियमांमध्ये देखील बदल करण्यात आला. कुटुंबातील सदस्याकडे जात वैधता प्रमाणपत्र असल्यास, त्यालादेखील आता जास्त कागदपत्रे देण्याची आवश्यकता नाही. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या परदेश तसेच देशांतर्गत शिष्यवृत्तीच्या संख्येत वाढ करण्यात आली. सर्व शासकीय वसतिगृहे व निवासी शाळा यांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरवण्याबरोबरच, आधुनिकीकरणावर भर देण्यात आला. बहुतांश शासकीय वसतिगृहे व निवासी शाळा यांना आयएसओ मानांकन प्राप्त झाले.

**शब्दांकन : डॉ. पुरुषोत्तम पाटोदकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

# समृद्धीची दिशा



**अर्जुन खोतकर**
राज्यमंत्री, वस्त्रोद्योग,
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय

> **कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसायाला असलेले अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन विविध निर्णय घेतले. त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित केले. दूध उत्पादकांना योग्य दर मिळवून दिला. मत्स्योत्पादनात दुपटीने वाढ करण्यासाठी संबंधितांना प्रोत्साहन दिले.**

## अर्जुन खोतकर

राज्यात महाराष्ट्र प्राणी (सुधारणा) अधिनियम,१९९५ लागू करून गोवंशीय पशुधनाच्या कत्तल, विक्रीवर पूर्णत: बंदी घालण्यात आली. त्यामुळे भाकड पशुधनाच्या संख्येत होणारी वाढ पाहता संगोपनाचे काम करणाऱ्या गोशाळा, पांजरपोळ संस्थांना प्रत्येकी १ कोटी रुपयांचे अनुदान देण्याची 'गोवर्धन गोवंश योजना' एप्रिल २०१७ पासून सुरू करण्यात आली. आतापर्यंत २८ जिल्ह्यांतील ३४ गोशाळांना अनुदान मंजूर केले. सर्व बाबींची पूर्तता केलेल्या १५ संस्थांना अनुदानाचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला.

दूध उत्पादकांना योग्य दर मिळावा यासाठी दूध संस्थांकडून विक्री होणारे पिशवीबंद दूध वगळून उर्वरित दुधाला प्रतिलीटर ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय जुलै २०१८ मध्ये घेतला. दूध भुकटीच्या निर्यातीसाठी ५० रुपये प्रतिकिलो व दूध निर्यातीकरिता ५ रुपये प्रतिलीटर अनुदान देण्याचा निर्णय घेतला. ४ लाख दूध उत्पादकांना याचा फायदा होत आहे. दुधाच्या अतिरिक्त उत्पादनाचा परिणाम शेतकऱ्यांना मिळणाऱ्या दूध दरावर होऊ नये, यासाठी दूध भुकटी प्रकल्पांना भुकटी रूपांतरणासाठी वापरलेल्या दुधास प्रतिलीटर ३ रुपयांचे अनुदान दिलेल्या योजनेत २१ दूध भुकटी प्रकल्पधारकांनी सहभाग घेतला. याद्वारे सुमारे १८ कोटी लीटर दुधाचे समायोजन होऊन १५ हजार ५२० मे.टन इतक्या दूध भुकटीचे उत्पादन झाले. या योजनेत ५४ कोटी रुपये इतका निधी खर्ची पडला. दूध भुकटीचे समायोजन तसेच शालेय विद्यार्थ्यांना पोषक तत्त्व या उद्देशाने शालेय पोषण कार्यक्रमांतर्गत दूध भुकटीचे वाटप करण्यात येत आहे. याचा प्रत्यक्ष लाभ १.१० कोटीपेक्षा जास्त शालेय विद्यार्थ्यांना होईल. हा कार्यक्रम राज्यातील ८६,६०७ शाळांमधून राबवला जात आहे.

### मत्स्यव्यवसाय

मत्स्यव्यवसायाचा एकात्मिक विकास व व्यवस्थापनाद्वारे राज्याच्या मत्स्योत्पादनात दुपटीने वाढ करण्याकरिता केंद्र पुरस्कृत नीलक्रांती योजनेंतर्गत ३० योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. २०१७-१८ मध्ये ६ कोटी ४५ लाख खर्च करून ३ लाख २८ हजार ४५१ लाभार्थींना नीलक्रांती योजनेंतर्गत विविध योजनांचा लाभ देण्यात आला. २०१८-१९ करिता ७० कोटी रुपयांच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिली असून, २३७ कोटी ६६ लाख रुपयांचे अतिरिक्त प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवण्यात आले. यामध्ये ३ लाख २९ हजार लाभार्थ्यांना लाभ होईल. गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादनांत भरीव वाढ झाली असून २ लाख मे.टनहून अधिक मत्स्योत्पादन होत आहे. ससून डॉकचे आधुनिकीकरणही करण्याचा निर्णय घेऊन त्याविषयीची ठोस अंमलबजावणी प्रक्रिया सुरू केली.

### कापूस ते कापड

वस्त्रोद्योग धोरण २०११ ते २०१७ या कालावधीत सुमारे २० हजार कोटींची गुंतवणूक झाली आणि तीन लाखएवढी



रोजगार निर्मिती झाली. २०१८ ते २०२३ या वस्त्रोद्योग धोरणात राज्यात ३६ कोटी रुपयांची गुंतवणूक व दहा लाख प्रत्यक्ष रोजगाराचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. सर्व कापसावर राज्यातच प्रक्रिया होऊन मूल्यवर्धनाचा फायदा महाराष्ट्राला मिळावा यासाठी 'कापूस ते कापड' हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

# चौफेर विकास आणि कुपोषणमुक्ती



**विद्या ठाकूर**
राज्यमंत्री, महिला व बालविकास

> **सक्षम महिला आणि सुदृढ बालक घडवण्यासाठी महिला व बालविकास विभाग काम करत आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) महिला आणि बालकांच्या सक्षमीकरणाचे विविध कार्यक्रम हाती घेण्यासाठी खासगी कंपन्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.**

**विद्या ठाकूर**

महिलांचे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय सक्षमीकरण वेगाने होत असल्याचे दिसून येत आहे. महिलांना समान संधी आणि त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. अनाथ बालकांना शिक्षण आणि नोकरीमध्ये १ टक्का समांतर आरक्षण देण्याचा निर्णय विभागाने घेतला. असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

### राष्ट्रीय पोषण मिशन

पोषण अभियानाचा योग्य परिणाम मिळण्यासाठी या अभियानास चळवळीचे रूप मिळणे आवश्यक आहे, यासाठी मोठा लोकसहभाग अपेक्षित आहे. राष्ट्रीय पोषण मिशनअंतर्गत पोषण महिना म्हणून सप्टेंबर महिना राज्यभरात साजरा करण्यात आला. नव्या भारताच्या निर्माणासाठी कुपोषणाचे समूळ उच्चाटन होणे आवश्यक आहे.

'सही पोषण, देश रोशन' असे पोषण अभियानाला नाव देण्यात आले होते. मुलांच्या वाढीसाठी मुलांचे उत्तम पोषण होणे आवश्यक आहे, हे राज्यभरात विविध कार्यक्रमाद्वारे सांगण्यात आले. बालकांमधील कुपोषण कमी करण्याबरोबरच किशोरवयीन मुली आणि महिलांमधील रक्तक्षय कमी करण्याच्या उद्देशाने पालकांमध्ये जनजागृती करण्याची मोहीम राज्यात राबवली गेली.

### बचतगटांचे जाळे

बचतगटाची चळवळ राज्यभरात व्यापक करण्यात आली. सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेतून महिला बचतगटांना शून्य टक्के व्याजदराने कर्ज देण्याची योजना सुरू करण्यात आली.

मुलींचा जन्मदर वाढविणे व स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी राज्यात माझी कन्या भाग्यश्री योजना सुरू करण्यात आली. एक किंवा दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या दांम्पत्याच्या मुलीचे पोषण, शिक्षण इत्यादीसाठी या योजेनेंतर्गत विविध लाभ देण्यात येत आहेत. ही योजना ७.५ लाख रुपये उत्पन्न असलेल्या सर्व घटकांतील कुटुंबाकरिता लागू आहे.



### बाल विकास सेवा योजना

राज्यातील अतितीव्र कुपोषित बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी गेल्या वर्षी ग्राम आणि अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्र सुरू करण्यात आले. याअंतर्गत अंगणवाडीतील तीव्र, अतितीव्र आणि कुपोषित बालकांना कमीत कमी २ आणि जास्तीत जास्त १२ आठवड्यांकरिता औषधोपचार तसेच गोळ्या देण्यात येतात. बालकांची पूर्व प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्याकरिता आकार बाल शिक्षणक्रम सुरू करण्यात आला आहे.

### अमृत आहार योजना

ही योजना महिला व बाल विकास आणि आदिवासी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येते. या योजनेंतर्गत गरोदर मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहणार नाही यासाठी या विभागामार्फत व्यापक उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत.

### सन्मान प्रणाली

जून २०१७ पासून पब्लिक फायनाशिअल मॅनेजमेंट सिस्टिमद्वारे अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे मानधन आधार संलग्न करून अदा करण्यासाठी सन्मान प्रणाली आणण्यात आली. पब्लिक फायनाशिअल मॅनेजमेंट सिस्टिमद्वारे अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या थेट खात्यावर मानधन अदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# आरोग्य सुविधांच्या विकासावर भर



**विजय देशमुख**
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य, परिवहन, कामगार, राज्य उत्पादन शुल्क

**राज्यातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाने अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम मागील चार वर्षात राबवले. विविध नवीन योजना सुरू करून आरोग्य सुविधा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवल्या. परिवहन विभाग लोकाभिमुख केला आणि कामगारांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले.**

## विजय देशमुख

■ राज्यात गेल्या वर्षी दोन कोटी नागरिकांची मौखिक आरोग्य तपासणी ■ १० जिल्हा रुग्णालयात केमोथेरपीची मोफत सुविधा ■ मुंबईत १० मोटरसायकलच्या मदतीने 'बाईक अँब्युलन्स' सेवा सुरू ■ दुर्गम भागात पालघर, मेळघाट येथे प्रत्येकी पाच आणि गडचिरोली येथे एक बाईक ॲम्ब्युलन्स सुरू ■ प्रधानमंत्री जनआरोग्य योजना म्हणजे आयुष्मान भारत योजना सुरू, सुमारे ८३ लाख कुटुंबांना या योजनेचा फायदा ■ महाराष्ट्रात महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनादेखील राबवली जाणार, त्यामुळे ९० टक्के लोकांना आरोग्य विम्याचे छत्र मिळणार ■ ३१ जिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅन बसवण्यासाठी मंजुरी ■ २३०१ आरोग्य संस्थांमध्ये मोफत वैद्यकीय चाचण्यांची सोय ■ माता मृत्यू दर कमी करण्यासाठी राज्यात २४८ संदर्भ सेवा केंद्र सुरू ■ शासकीय आरोग्य संस्थांमध्ये एप्रिल २०१७ पासून आतापर्यंत सुमारे दीड लाख सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आल्या ■ अवयवदान मोहिमेस राज्यात गती ■ या वर्षी स्वाईन फ्लूचा प्रादुर्भाव आहे. त्याला रोखण्यासाठी विभागामार्फत आवश्यक प्रभावी उपाययोजना ■ अल्झायमर आणि स्मृतिभ्रंशाच्या रुग्णांसाठी २८ जिल्ह्यांत मेमरी क्लिनिक सुरू ■ 'राष्ट्रीय आरोग्य अभियान' अंतर्गत 'आपत्कालीन वैद्यकीय सेवा' (क्रमांक १०८) सुरू, ९३७ रुग्णवाहिका राज्यात कार्यरत असून नागरिकांना चोवीस तास मोफत आपत्कालीन आरोग्य सेवा उपलब्ध ■ थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांची कोणताही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश.



### परिवहन विभाग लोकाभिमुख

■ १९९७ पासून ऑटोरिक्षा, टॅक्सीचे नवीन परवाने देण्यावर निर्बंध घालण्यात आले होते. शासन अधिसूचना १७ जून, २०१७ अन्वये हे निर्बंध उठविण्यात आले आहेत. त्यामुळे आता कोणत्याही व्यक्तीला नवीन परवाना घेणे शक्य ■ आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबास उदरनिर्वाहाचे साधन मिळावे आणि त्या कुटुंबाचे पुनर्वसन व्हावे यासाठी अशा कुटुंबांना रिक्षा, टॅक्सीचा परवाना देण्याचा निर्णय, आत्महत्या केलेल्या १४५० शेतकऱ्यांच्या विधवांना हे परवाने वितरित ■ ग्रामीण भागातील मुलींना १२ वीपर्यंत एसटीचा मोफत प्रवास सवलत पास ■ ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणारी एसटी सवलत ही सध्या सर्वसाधारण व निमआराम बसेसमध्ये ५० टक्के इतकी लागू आहे. आता वातानुकुलित शिवशाही (आसनव्यवस्था) बसमध्येही ४५ टक्के सवलत लागू ■ क्षयरोगग्रस्त व कर्करोगग्रस्त व्यक्तींना देण्यात येणाऱ्या सवलतीमध्ये वाढ ■ सिकलसेलग्रस्त, हिमोफिलिया आणि एचआयव्हीबाधित रुग्ण यांना १०० टक्के प्रवास सवलत देण्यात येत आहे. ■ रेल्वेप्रमाणे ६५ टक्के अपंगत्व असलेल्या व्यक्तीसोबत असलेल्या साथीदारासही ५० टक्के सवलत मिळणार.

■ दहावी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्र ते निवासस्थान यादरम्यान प्रवासासाठी ६६.६७ टक्के सवलत देण्यासाठी कौशल्य सेतू अभियान ही नवी योजना सुरू.

### कामगारांच्या हितासाठी

■ बांधकाम कामगारांच्या हितासाठी स्थापन करण्यात आलेल्या कल्याणकारी मंडळात कामगारांची नोंदणी करण्यासाठी विशेष मोहीम ■ राज्यात आतापर्यंत ११ लाख ३३ हजार बांधकाम कामगारांची नोंदणी ■ कामगार विभागाच्या विविध योजना ऑनलाइन कार्यान्वित ■ कामगारांच्या सुरक्षेवर विशेष भर.

**शब्दांकन : इर्शाद बागवान,**
विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

# आमचं गाव, आमचा विकास

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा



**दादाजी भुसे**
राज्यमंत्री, ग्रामविकास

> **ग्रामपंचायतींना स्वमालकीची इमारत, ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे, शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे यासारखे ग्रामविकासाला चालना देणारे निर्णय घेण्यात आले. गाव समृद्ध झाले तर शहरे समृद्ध होतील आणि त्यानंतर राज्य या उक्तीप्रमाणे निर्णय घेऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.**

**दादाजी भुसे**

राज्य सरकारने 'मुख्यमंत्री ग्रामसडक योजना' सुरू केली आहे. या योजनेतून आतापर्यंत ५ हजार ९६९ कि.मी. लांबीची ९०० कामे पूर्ण झाली आहेत. याशिवाय ८ हजार ८३० कि.मी. लांबीची १ हजार ९६७ कामे प्रगतिपथावर असून ती लवकरच पूर्ण होतील.योजनेच्या कामावर आतापर्यंत २ हजार ६४४ कोटी रुपये इतका निधी खर्च झाला.



ग्रामपंचायतींना स्वमालकीची स्वतंत्र इमारत असावी यासाठी बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना सुरू करण्यात आली. यातून राज्यातील ४ हजार २५२ ग्रामपंचायतींना इमारती बांधून दिल्या जातील. २०१८-१९ मध्ये या योजनेसाठी ५५ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला.

'आमचं गाव, आमचा विकास' ही योजना आम्ही हाती घेतली आहे. चौदावा वित्त आयोग, ग्रामपंचायतीचे स्वत:चे उत्पन्न व इतर योजना, स्रोतांमधून उपलब्ध होणाऱ्या निधीचे नियोजन करून त्यातून गावांचा सुनियोजित विकास व्हावा यासाठी प्रत्येक गावाचा पंचवार्षिक व वार्षिक विकास आराखडा लोकसहभागातून तयार करण्यात आला आहे. पं. दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेतून भूमिहीन लाभार्थ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. या योजनेतून १ हजार ५०४ लाभार्थ्यांना जागाखरेदीसाठी अनुदान देण्यात आले.

'सर्वांसाठी घरे' या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णयही शासनाने नुकताच घेतला. अशा अतिक्रमणधारकांची नोंदणी करण्यासाठी संगणक प्रणाली तयार करण्यात आली असून ८ नोव्हेंबर २०१८ पर्यंत १ लाख अतिक्रमणांची नोंदणी करून ही अतिक्रमणे नियमित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

सर्व गावांचा शाश्वत विकास करण्यासाठी 'स्मार्ट ग्राम योजना' राबवण्यात येत आहे. या निर्णयामुळे सर्व विभागातील सर्व गावांना सहभागाची समान संधी मिळत आहे. पंचसूत्रांवर आधारित गावांचा विकास करण्याच्या दृष्टीने ही योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. या योजनेतून २०१६-१७ साठी ३५० ग्रामपंचायतींना तालुकास्तर पुरस्कार जाहीर करण्यात आले. या ग्रामपंचायतींना प्रत्येकी १० लाख रुपये प्रमाणे ३५ कोटी रुपयांची रक्कम पुरस्कार स्वरूपात वितरित करण्यात आली. ३४ ग्रामपंचायतींना जिल्हास्तरीय 'स्मार्ट ग्राम' पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्यांना प्रत्येकी ४० लाख रुपये प्रमाणे १३.६० कोटी रुपयांचा निधी पुरस्कार स्वरूपात वितरित करण्यात आला.

शिक्षक बदल्यांची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवली गेली. बदल्यांमध्ये होणारा आर्थिक गैरव्यवहार रोखला गेल्याने अनेक शिक्षकांनी आणि शिक्षक संघटनांनी समाधान व्यक्त केले. या योजनेला मागील दोन्ही वर्षी केंद्रीय स्तरावरील स्कॉच ऑर्डर ऑफ मेरीट पुरस्कार प्राप्त झाला.

प्रधानमंत्री आवास योजना, सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना, पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना, किशोरवयीन मुलींना फक्त पाच रुपयांत तर इतर महिलांना स्वस्त दरांत सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देणे तसेच त्याच्या विक्री व्यवसायातून बचतगटांच्या महिलांना रोजगार उपलब्ध करून देणारी अस्मिता योजना यासारख्या योजनांना मूर्त स्वरूप देण्याचे काम करण्यात आले.

**शब्दांकन : अजय जाधव,**
विभागीय संपर्क अधिकारी



**संजय राठोड**
राज्यमंत्री, महसूल

> **महसूल विभागाने संगणकीकरण केल्याने कामात तत्परता आणि पारदर्शकता आली. विविध संगणक प्रणालींचा वापर सुरू केला. विभागाने अनेक कल्याणकारी निर्णय घेतले असून त्याचा मोठा फायदा सर्वसामान्य नागरिकांना झाला. विविध संस्थांना जमिनी देऊन संशोधन आणि विकास कार्यासाठी हातभार लावला.**

**संजय राठोड**

# तत्परता आणि पारदर्शकता

■ दस्त नोंदणीसाठी संगणकीकृत प्रणालीचा वापर सुरू. ■ ई-पेमेंट व ई-सर्च अशा विविध उपक्रमांची अंमलबजावणी ■ विविध करारनामे, भाडेकरार दस्त, नागरिकांना दुय्यम निबंधक कार्यालयात न येता ऑनलाइन नोंदवता येणे शक्य ■ ई-रजिस्ट्रेशन प्रणाली सुरू.

■ वडार समाजातील कुटुंबांना पारंपरिक व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या २०० ब्रास पर्यंतच्या दगडावरील स्वामित्वधन आकारणीमध्ये सूट, ३८७ कुटुंबांना २८,७०२ ब्रास दगड उत्खननास स्वामित्वधन न घेता परवानगी, १.१५ कोटी रुपयाचा संबंधितांना लाभ.

■ मावळ तालुक्यातील चाकण येथे सुमारे १०० एकर जमीन भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था स्थापन करण्याकरिता केंद्र शासनाला दिली. ■ वारंगा जिल्हा नागपूर येथील ३९.९६ हेक्टर शासकीय जमीन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी स्थापन करण्यासाठी दिली. ■ धुटी तालुका नागपूर येथील ४९.०४ हेक्टर जमीन केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्था यांना नवीन संशोधन व परीक्षण प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी दिली. ■ शिलापूर जिल्हा नाशिक येथील १०० एकर शासकीय जमीन केंद्रीय विद्युत अनुसंस्था या संस्थेला इलेक्ट्रिकल टेस्टिंग स्थापन करण्यासाठी दिली ■ नवी दिल्लीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन या संस्थेच्या विभागीय केंद्रासाठी बडनेरा जिल्हा अमरावती येथील ६ हेक्टर आर जमीन दिली. ■ गोंदिया येथील १४४० चौ.मि. शासकीय जागा तेथे समाज भवन बांधण्यासाठी नगरपरिषदेस दिली. ■ केंद्र शासनाच्या भौतिकशास्त्राशी संबंधित प्रकल्पासाठी हिंगोली जिल्ह्यातील दुधाळा, अंजनवाडा, गंगलवाडी येथील १७३.२५ हेक्टर जमीन दिली. ■ मिटमिटा जिल्हा औरंगाबाद येथील ४० हेक्टर जमीन महानगरपालिकेच्या प्राणिसंग्रहालयासाठी दिली. ■ गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत खनिजांच्या बाजारभावाच्या ५ पट दंड आकारून अवैध वाहतुकीसाठी वापरलेली वाहने जप्त, सुमारे २०६८१.६८ लक्ष रुपये एवढ्या दंडाची रक्कम वसूल, एकूण १०९३६ एवढी वाहने, यंत्रसामग्री जप्त ■ वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी अधिनियम १९८१ मध्ये सुधारणा केली. त्यामुळे झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्ये विकणारे, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती यांच्यावर कडक कारवाई करणे शक्य.
■ नागपूर व अमरावती भागातील नझूल जमिनींच्या भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण करताना आकारावयाच्या भुईभाड्याच्या दरात सुधारणा, आतापर्यंत नागपूर विभागातील एकूण ११९५ भाडेपट्ट्यांचे तर अमरावती विभागातील एकूण १४१४ भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण ■ शासकीय जमिनी, संस्था व व्यक्तींना विविध प्रयोजनार्थ अकृषिक वापराकरिता प्रदान करताना त्या जमिनीचे मूल्यांकन निश्चित करताना अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबत नव्याने सूचना निर्गमित ■ पालघर येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारत आणि अन्य शासकीय कार्यालय तसेच अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी ५०० हेक्टर जमीन सिडकोकडे वर्ग, इमारत बांधकामाची कार्यवाही सुरू.

■ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ कलम २९५ अन्वये मुंबई शहरातील शासकीय जमीन हस्तांतरित किंवा हस्तांकित करताना शुल्क आकारण्याबाबत नव्याने तरतुदी ■ सीरसवाडी जिल्हा जालना येथील २०० एकर जमीन रसायन तंत्रज्ञान संस्थेस प्रदान केली असून तंत्र शिक्षण विभागाने जागेचा ताबा घेतला आहे.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट,**
विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

# समर्थ पोलीस, सुरक्षित महाराष्ट्र





**दीपक केसरकर**
राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), वित्त व नियोजन

> **राज्यातील कायदा व सुव्यवस्था उत्तम राहण्यासाठी पोलीसदल सक्षम राहणे महत्त्वाचे आहे. यासाठी पोलीसदलाच्या बळकटीकरणावर भर दिला. न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळांचे बळकटीकरण, पोलिसांच्या घरांचे तसेच इमारतींचे बांधकाम, कर्मचाऱ्यांना स्वतःच्या मालकीची घरे मिळण्यासाठी प्रयत्न, जुन्या पोलीस वसाहतींच्या दुरुस्तीसाठी भरीव तरतूद, शहरांबरोबरच ग्रामीण भागात सीसीटीव्ही बसवण्यासाठी निधीची तरतूद, समुद्रकिनाऱ्यांच्या सुरक्षेसाठी नौका आदी महत्त्वाच्या निर्णयांची अंमलबजावणी सुरू आहे.**

## दीपक केसरकर

■ नांदेड व कोल्हापूर येथे दोन नवीन प्रादेशिक न्याय साहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा स्थापन ■ ४५ पोलीस आयुक्तालये व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी आवश्यक साधनसामग्री व मनुष्यबळासह मोबाईल फॉरेन्सिक सपोर्ट युनिट सुरू ■ न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळातील विषशास्त्र व जीवशास्त्र विभागातील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी ठाणे, रत्नागिरी, सोलापूर, धुळे, चंद्रपूर येथे लघू न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा सुरू ■ सर्व प्रयोगशाळांचे संगणकीकरण व डिजिटायझेशन ■ महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत सध्या २५६ सेवा निवासस्थानांची कामे सुरू, १२१६ सेवा निवासस्थांची निविदा प्रक्रिया सुरू, ४८३९ निवासस्थाने निविदास्तरावर, २०९४० निवासस्थाने ही नियोजनस्तरावर ■ सार्वजनिक खासगी भागीदारीतून ७ हजार ५४ निवासस्थाने मिळणार ■ एकूण ३७ हजार ७४१ निवासस्थाने लवकरच उपलब्ध होणार ■ पोलीस कार्यालयांचे एकूण २१ प्रकल्प सुरू असून ७ कामांच्या निविदा प्रसिद्ध झाल्या आहेत. १७ प्रकल्प हे निविदास्तरावर व नियोजन स्तरावर आहेत. ■ पोलीस कर्मचाऱ्यांना स्वतःच्या मालकीची घरे असावीत, यासाठी मदत ■ खासगी बँकांकडून घरबांधणीसाठी वित्त पुरवठा ■ कर्जावरील व्याज आणि घरबांधणी अग्रिमावरील व्याज यांच्यातील फरकाची रक्कम राज्य शासन देत आहे. ■ जिल्ह्यांमधील पोलिसांच्या शासकीय निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या उपलब्ध निधीतील दहा टक्के रक्कम देण्याची तरतूद, यामुळे जिल्ह्यांमधील शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्तीला वेग ■ मोठ्या शहरांबरोबरच राज्यातील लहान शहरे व ग्रामीण भागात सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसविण्याचा निर्णय, त्यासाठी जिल्हा नियोजन समिती, लोकप्रतिनिधींचा निधी, महानगरपालिकेकडून मिळणाऱ्या निधीमधून खर्च करण्याची तरतूद ■ डोंगरी भागातील विकास कामांसाठी राबवण्यात येत असलेल्या डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत सहा नवीन डोंगरी तालुक्यांची निर्मिती. यामध्ये नांदेडमधील माहूर (किनवटमधून विभाजित), सिंधुदुर्गमधील दोडामार्ग (सावंतवाडीमधून विभाजित), नाशिकमधील त्र्यंबकेश्वर (नाशिक, पेठ व इगतपुरी यातून विभाजन) या पूर्ण गट तालुक्यांची तर नाशिकमधील देवळा (कळवण व बागलाणमधून




विभाजन), पालघरमधील विक्रमगड (पालघर, जव्हार, डहाणू व वाडा तालुक्यातून विभाजन), औरंगाबादमधील फुलंब्री (सिल्लोड, खुलताबाद व कन्नड या उपगटातून विभाजन) या उपगटांचा समावेश. ■ सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी या डोंगरी तालुक्यांतून दोडामार्ग वेगळा तालुका केल्यामुळे या तालुक्यात समाविष्ट ५६ गावांना लहान कामांसाठी निधी मिळून विकास कामे करता येतात. ■ सागरी सुरक्षा पोलिसांसाठी अत्याधुनिक व सुसज्ज बोटी घेण्याचा निर्णय यातील दोन बोटी सुरक्षा दलाच्या ताफ्यात मिळाल्या.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,**
विभागीय संपर्क अधिकारी



**रवींद्र वायकर**
राज्यमंत्री, गृहनिर्माण, उच्च व तंत्रशिक्षण

> **विद्यार्थी केंद्रित व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात आमूलाग्र बदल केले. शिक्षण घेणे परवडत नसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना प्रभावीपणे राबवत आहोत. गृहनिर्माण विभागाने सर्वसामान्यांसाठी विविध घरकूल योजना मार्गी लावल्या. बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाला गती दिली.**

## रवींद्र वायकर

# संधी आणि दिलासा

■ विद्यापीठांना अंतर्गत राजकारणापासून मुक्त करून विद्यार्थी केंद्रित व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात आमूलाग्र बदल. ■ बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास करण्याकरिता रहिवाशांकडून मागील २५-३० वर्षापासून मागणी होती. त्या अनुषंगाने बी.डी.डी. चाळ रहिवाशांना १६० चौ. फुटांच्या घरांऐवजी ५०० चौ.फु. चे घर मालकी तत्त्वावर देण्याबाबत महत्त्वाकांक्षी निर्णय ■ रत्नागिरी जिल्ह्यांचे पालकमंत्री म्हणून जिल्ह्याच्या पर्यटनाला अधिक चालना देण्यासाठी विविध उपाययोजना ■ रत्नागिरी जिल्ह्यात स्व. बाळासाहेब ठाकरे तारांगण उभारण्यात महत्त्वाचा वाटा. ■ गेल्या तीन वर्षात मिळून शुल्क नियामक प्राधिकरणाने २५०० संस्थांचे प्रस्ताव तपासून अवाजवी शुल्काला कात्री लावल्यामुळे, शासनाचे आणि गरीब विद्यार्थ्यांचे गेल्या तीन वर्षात २९०० कोटी रुपये वाचवण्यात आले. ■ शिक्षण घेणे परवडत नसणाऱ्या विद्यार्थ्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना असून, त्यातून २५,६२८ विद्यार्थ्यांना लाभ ■ ५६ कोटी रुपयांचा निधी वितरित ■ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ ६०५ अभ्यासक्रमांना देण्यात आला. ■ थोर राष्ट्रीय पुरुषांचे साहित्य तरुणांमध्ये पोहोचवण्यासाठी हे साहित्य वेब पोर्टलवर टाकण्याची कार्यवाही सुरू. ■ स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठे देण्याचे धोरण अवलंबले. परंतु काही विद्यापीठे अवाजवी प्रवेश शुल्क अकारणी करून नफेखोरी करतात. अशा तक्रारी प्राप्त झाल्यामुळे त्याबाबत शासनाने त्यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठी ठाम भूमिका घेऊन अधिसूचनेत बदल सुचवलेत. ■ स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठांचा उचित शैक्षणिक दर्जा राखणे, पारदर्शकता आणणे व शासनाचे उचित नियंत्रण असण्याकरिता आवश्यक तरतुदींच्या अधिसूचनेत सुधारणा करण्याबाबत आग्रही भूमिका, त्यानुसार या अधिसूचनेत बदल करण्यात येत आहेत. ■ गृहनिर्माण विभागाने सर्वसामान्यांसाठी विविध प्रकारच्या योजना मार्गी लावल्या. ■ मुंबईचे नागरी पुनर्निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला सुधारित विकास आराखडा लागू केल्यानंतर त्यातून वगळलेल्या उर्वरित आराखड्यालाही मान्यता ■ त्यामुळे मुंबई शहराबरोबरच उपनगरातील गृहनिर्माणांना चालना मिळणार ■ उपनगरांतही समूह पुनर्विकासाचा मार्ग मोकळा तसेच ५१ टक्के रहिवाशांच्या सहमतीने जुन्या इमारतींचा पुनर्विकास करता येणार. ■ गिरणी कामगारांना ४०५ चौरस फूट चटई क्षेत्राचे घर मिळणार. ■ प्रधानमंत्री आवास योजनेतील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनांना ३० चौ.मी. चटई क्षेत्रफळ देण्याबाबत आग्रही भूमिका ■ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनांना ६० दिवसात मंजुरी व ही प्रक्रिया नोंदणी ऑनलाइन राबवण्याबाबत प्रक्रियेला सुरुवात. ■ म्हाडाच्या भूखंडावरील अतिक्रमणे रोखण्यासाठी टास्क फोर्स तयार केला. म्हाडास नियोजन प्राधिकारी म्हणून नेमणूक केली. म्हाडाच्या वसाहतीत वाढीव बांधकाम/अतिक्रमणे तातडीने निष्कासनाची कार्यवाही करण्याचे निर्देश. ■ बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाला गती, मास्टर प्लॅन बनवण्यासाठी वास्तुविशारद सल्लागारांची निवड म्हाडा करणार. ■ रत्नागिरी जिल्ह्यातील विविध पर्यटन क्षेत्राला चालना देण्याबरोबरच तेथील प्रेक्षणीय पर्यटनस्थळांना भेटी देणाऱ्या देशविदेशातील पर्यटकांना मार्गदर्शन ठरणाऱ्या व पर्यटनस्थळांची परिपूर्ण माहिती देणाऱ्या एक स्वच्छ मुसाफिर या कॉफी टेबल बुकची निर्मिती व संकेतस्थळास प्रारंभ.



**शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,**
विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》 https://t.me/Mpscrockers88

# सिंचन क्षमता वाढली...



**विजय शिवतारे**
राज्यमंत्री, जलसंपदा,
मृद व जलसंधारण, संसदीय कार्ये

**"जलसंपदा, मृद व जलसंधारण विभागाने विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सिंचन क्षमता आणि पीक उत्पादनात वाढ केली. शेतीच्या विकासासाठी पाणी हा घटक महत्त्वाचा आहे. ही बाब लक्षात घेऊन जलयुक्त शिवार अभियान राबवण्यात आले. एकूण २२,४३० गावे निवडण्यात आली. १५,८५९ गावे जलपरिपूर्ण झाली. या अभियानामुळे पीक उत्पादनात ३० ते ५० टक्के वाढ झाली."**

## विजय शिवतारे

■ गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेच्या माध्यमांतून एकूण ५२७० धरणामधून सुमारे ३.२३ कोटी घन मीटर गाळ काढला. ६५० कोटी इतकी रक्कम लोकसहभागातून जमा ■ गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेतून ५२३४ धरणामधून लोकसहभाग आणि अशासकीय संस्थांच्या मदतीने गाळ काढण्यात आला. ३२३ कोटी घनमीटर काढलेला गाळ हा ७०७३१ एकर हेक्टर क्षेत्रावर पसरवण्यात आला. यामुळे पाणीसाठ्यामध्ये ३२,२७४ टीएमसी वाढ. ■ ३१,१५० शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुपटीने वाढ ■ पाणी फाऊंडेशन– वॉटर कप स्पर्धेत भाग घेणाऱ्या गावास इंधनापोटी प्रतिगाव १.५० लक्षच्या मर्यादेत निधी उपलब्ध ■ या स्पर्धेत ५९६७ गावांचा सहभाग ■ माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन कार्यक्रमांतर्गत १५०४ तलावांचे पुनरुज्जीवन करण्यात आले, १९,०६६ इतकी सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली. त्यासाठी १२४.४६ कोटी रुपये इतका खर्च करण्यात आला. सद्य:स्थितीत ३५९ इतकी कामे प्रगतिपथावर आहेत.

■ मृद व जलसंधारणाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी मृद व जलसंधारण आयुक्तालयाची स्थापना ■ जलसंधारण विभागाचे कार्यक्षेत्र हे २५० हेक्टरवरून ६०० हेक्टरपर्यंत वाढ ■ विविध सिंचन क्षमतेच्या प्रकल्पांची गुणवत्ता अधिक चांगली राखण्याच्या दृष्टीने नवीन संरचनेमध्ये मुख्य दक्षता व गुण नियंत्रण कार्यालय स्थापन ■ राज्याच्या सहाही महसूल विभागांच्या ठिकाणी प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण पथकांचे कार्यालय नव्याने स्थापन ■ प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून १६,६०३



कोटी रुपयांचा निधी प्राप्त, तो २६ प्रकल्पांवर खर्च करण्यात येत आहे. बळीराजा, जलसंजीवनी योजनेंतर्गत विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी १०५२२ कोटी रुपयांचे विशेष पॅकेज, उर्वरित महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यांसाठी ४८०४ कोटी रुपयांचे पॅकेज ■ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ■ या प्राधिकरणामुळे कृष्णा, तापी, नर्मदा, महानदी आदी खोऱ्यांचा जल आराखडा मार्गी लागला ■ विभागाने बंद पाईपलाईनमधून पाणी देण्यासाठीचे धोरण तयार केले असून आता खुल्या कालव्या ऐवजी जलिकाद्वारे पाणी वितरण ■ या धोरणामुळे सर्वांना नियंत्रित पाणीपुरवठा व समन्यायी पाणी वाटप ■ पाटबंधारे प्रकल्पाच्या परीरक्षण, देखभाल व दुरुस्तीचा खर्च प्राप्त होणाऱ्या पाणीपट्टीतून भागवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय, यामुळे दरवर्षी ९०० कोटी रुपये उपलब्ध होणार ■ पाणीसाठा वाढण्यासाठी कोल्हापुरी बंधाऱ्यात निडल टाकण्याचा धडक कार्यक्रम ■ आतापर्यंत ५०५०५ निडल बनवून प्रकल्पस्थळी बसविण्यात आले. त्यामुळे पाणीसाठा १८१.०३७ द.ल.घ.मी. वाढला.

■ आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्पासाठीच्या सामंजस्य करारावर राज्याला एकूण २०७६ द.ल.घ.मी. पाणी वापरण्यास उपलब्ध होणार ■ या प्रस्तावित सामंजस्य करारावर राज्यात १०८०० कोटी किमतीचे एकूण ५ नदीजोड प्रकल्प घेतले जाणार. ■ गोसीखुर्द या राष्ट्रीय प्रकल्पाची सिंचन क्षमता मागील चार वर्षात ३५२४२ द.ल.घ.मी. इतकी निर्माण करण्यात आली. भूसंपादनाअभावी प्रकल्पांचे कामकाज मोठ्या प्रमाणात प्रलंबित होते, परंतु भूसंपादनाच्या किमतीमध्ये पाचपट रक्कम दिल्यामुळे १६,४१६ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन करण्यात विभाग यशस्वी झाला. त्याबदल्यात ७ हजार कोटी रुपये वाटप करण्यात आले.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट,**
विभागीय संपर्क अधिकारी

# स्मार्ट शहरे, स्मार्ट महाराष्ट्र...



**डॉ. रणजित पाटील**
राज्यमंत्री, गृह (शहरे), नगर विकास, विधी व न्याय, संसदीय कार्ये, कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिक कल्याण

**“शासनाने गेल्या चार वर्षात पायाभूत सुविधांच्या विकासावर मोठा भर दिला. मुंबई, पुणे, नागपूरमधील मेट्रो, कोस्टल रोड, विमानतळांचा विकास, ट्रान्स हार्बर सी लिंक, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, स्मार्ट सिटी, स्वच्छ भारत या उपक्रमातून पायाभूत सुविधांचा विकास सुरू केला आहे. ज्या वेळी हे पायाभूत प्रकल्प पूर्ण होतील, त्या वेळी राज्याचा चेहरामोहरा बदललेला असेल.”**

## डॉ. रणजित पाटील

■ गेल्या चार वर्षात मुंबईतील आठ मेट्रो मार्गांना मंजुरी मिळाली असून सात मार्गांची कामे सुरू. ■ देशातील पहिल्या संपूर्ण भुयारी मार्गाच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो या तीन मार्गाच्या पहिल्या टप्प्याच्या पाली ते आंतरराष्ट्रीय विमानतळ या १.२६ किमीच्या भुयारीकरणाचे काम पूर्ण ■ नवी मुंबई, पुणे व नागपूरमधील मेट्रोचे कामेही मोठ्या प्रमाणात मार्गी ■ नागपूर येथे मेट्रोच्या दोन लाईन्स तयार करण्यात येत असून ३८.२२ कि.मी. पैकी ५.४० कि.मी. चे काम पूर्ण ■ पुण्यातील मेट्रो - पहिल्या दोन मार्गावरील २४ टक्के स्थापत्य कामे पूर्ण, पुणे मेट्रो तीनच्या कामाचा कार्यारंभ आदेश निर्गमित. ■ नवी मुंबई येथील विमानतळाच्या कामाला गती, त्यासाठी आवश्यक असलेले सर्व परवाने प्राप्त. ■ शहरांचा सुनियोजित विकास करण्यासाठी पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर आणि कोल्हापूर या शहरांमध्ये प्राधिकरणाची स्थापना ■ प्रधानमंत्र्यांच्या स्मार्ट सिटी संकल्पनेवर आधारित ‘स्मार्ट टाऊनशिप’ धोरणास मान्यता.



■ जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण योजना व नगरोत्थान योजनेत रेंगाळलेले १०० प्रकल्प पूर्ण ■ सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानामध्ये या वर्षी १६० प्रकल्प पूर्ण होतील. ■ स्वच्छ महाराष्ट्र योजनेत नागरी भागात ५.८१ लाख वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण, १.२१ लाख सामुदायिक/सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण ■ १ ऑक्टोबर २०१७ रोजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी राज्यात येऊन महाराष्ट्राचा नागरी भाग हागणदारीमुक्त झाल्याचे घोषित केले. ■ नागरी भागातील कचऱ्याचे वर्गीकरण करण्याची मोहिम २५० शहरांमध्ये राबवण्यात आली. ■ ओल्या कचऱ्यापासून बनवलेल्या खताच्या मार्केटिंगसाठी ‘हरित महासिटी कंपोस्ट’ या ब्रँडची निर्मिती. ■ गुन्ह्यांना पायबंद घालण्यासाठी मुंबई, पुणे व नागपूर या शहरांमध्ये सीसीटीव्ही ■ ४७०० पेक्षा जास्त कॅमेरे व १५०० पेक्षा जास्त स्थळांना व्यापणारा मुंबई सीसीटीव्ही प्रकल्प हा देशातील सर्वात मोठा सीसीटीव्ही निरीक्षण प्रकल्प आहे. सीसीटीव्ही फुटेजमुळे मुंबईत ५२० गुन्ह्यांचा तपास गतीने लागला असून ७०० जणांना अटक करण्यात आली. ■ पुण्यात २१६ गुन्ह्यांचा तपास लागला असून २७२ जणांना विविध गुन्ह्यांत अटक ■ सीसीटीव्हीमुळे कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच नैसर्गिक आपत्ती, मोर्चे, आपत्कालीन परिस्थितीत मोठी मदत ■ मुंबई पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी माहिती यंत्रणा (एमपीआयएस), ऑटोमेटेड बायोमेट्रिक आयडेटिफिकेशन सिस्टिम, एम पासपोर्ट, संवाद ॲप्स, ट्विटर हँडल, मोबाइल सर्व्हेलन्स वाहने उपक्रम सुरू केले आहेत.

### महत्त्वाचे

■ औद्योगिक प्रशिक्षण संस्था उत्तीर्ण उमेदवारांना इ.१० वी व इ.१२ वी समकक्षता म्हणून मान्यता ■ प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानातून ३,४१,९८५ जणांना कौशल्य प्रशिक्षण यामध्ये ५४% महिलांचा सहभाग तर १,५९,६३३ तरुणांना रोजगार/स्वंयरोजगार प्राप्त. ■ ११५ नगरपंचायती, १६ नगरपरिषदांची निर्मिती तर ४ महानगरपालिकांची व ११ नगरपरिषदांची हद्दवाढ ■ थेट नगराध्यक्षांना वित्तीय अधिकार व पदावधीस स्थैर्य ■ नागरी प्रशासनात पारदर्शकता व वित्तीय शिस्तीसाठी नागरी संस्थांमधील सर्व कामांमध्ये ई-निविदेचा वापर ■ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निधीमध्ये अडीचपट वाढ ■ पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळाचा आयआयटीबरोबर सामंजस्य करार.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

# दर्जेदार रस्ते विकास



**प्रवीण पोटे-पाटील**

राज्यमंत्री, उद्योग आणि खनिकर्म, पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)

**“छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाच्या कामाला गती मिळाली आहे. जागतिक पातळीवरील हा सर्वात उंच पुतळा उभारण्याच्या दृष्टीने पुतळ्याची उंची २१२ मीटर निश्चित करण्यात आली. या भव्य स्मारकाची जागा १५.९६ हेक्टर एवढी असून या जागेत सागरी भिंत असेल. या स्मारकासाठी लागणाऱ्या विविध विभागाच्या परवानग्या मिळाल्या आहेत.”**

**प्रवीण पोटे-पाटील**

■ सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्रभर रस्त्यांच्या जाळ्यांची निर्मिती ■ जुन्या अनिवासी इमारतीकरीता ईएससीओ मॉडेलच्या तत्वावर ऊर्जा कार्यक्षम विद्युत उपकरणे बसविण्याकरिता करार, त्यामुळे विजेच्या वार्षिक बिलात ११९ कोटी रुपयाची बचत. ■ महाराष्ट्राचे इलेक्ट्रिक व्हेईकल प्रोत्साहन धोरण जाहीर ■ राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्गावरील रस्त्यांचे रु. १५,४९७ कोटींची ८३२२ एवढी कामे पूर्णत्वाच्या मार्गावर ■ रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी वाहतुकीस होणारे अडथळे, अपघात टाळण्यासाठी रेल्वे उड्डाणपुलांची कामे ■ केंद्र शासनाने ७,८६,९५९.६४ कोटी रुपयांची १००३ कामे मंजूर, या योजनेतून ८८१५.०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा, ६२५ लहान पूल व १०६ मोठ्या पुलांची कामे पूर्ण. ■ नाबार्ड कर्ज साहाय्य योजनेंतर्गत ८२३३.५९ कोटीच्या कर्ज साहाय्यातून ११,२३३ कामे मंजूर, आतापर्यंत ६६१३.९६ कोटी खर्च, २७,४८० कि.मी.चे रस्ते सुधारणा, २८६५ पुल व १४,७२१ मोऱ्यांची कामे पूर्ण.

## समृद्धी महामार्गावरील सुविधा

■ समृद्धी महामार्गाच्या दोन्ही बाजूस असलेल्या गावातील वाहतूक व दळणवळण जैसे थे ठेवण्यासाठी वाहन मार्ग व स्वतंत्र सेवा मार्ग (सर्व्हिस रोड) असणार.
■ इंटरचेंज ठिकाणी व सरासरी दर ५० कि.मी. अंतरावर पार्किंग, ट्रक थांबे, रुग्णवाहिका सेवा, टोइंग, विश्रांतिगृह, पेट्रोल पंप, फूडप्लाझा, रेस्टॉरंट, स्वच्छतागृहे, दुकाने, इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम



आदी सुविधा. ■ वे साईड सुविधांमध्ये ट्रॉमा सेंटर, ट्रक टर्मिनस, रस्ता दुभाजकावरील प्लान्टेशन/ लॅण्ड स्केपिंग, बस-बे, टनेल लाईटिंग, पूल सौंदर्यीकरण, रस्त्यावरील विद्युत दिवे, माहिती फलक तसेच द्रुतगती मार्गावर मोफत दूरध्वनी केंद्र, रस्त्यावरील वाहतुकीचे सनियंत्रण करण्यासाठी सीसीटीव्हीची सुविधा ■ समृद्धी महामार्गासाठी जवळपास ९० टक्के भूसंपादन पूर्ण. शेतकऱ्यांना भरघोस जमिनीचा मोबदला दिला आहे. या पैशाचा विनियोग शेतकरी कशा पद्धतीने करीत आहे याबाबत रस्ते विकास महामंडळाने एक सर्वेक्षण केले. त्यातून समाधानकारक बाबी पुढे आल्या. या सर्वेक्षणात ६ हजार ४०० शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी ३८ टक्के शेतकऱ्यांनी जमीन खरेदीमध्ये पैसा गुंतविला. ६ टक्के शेतकऱ्यांनी कृषिपूरक व्यवसायात म्हणजे ट्रॅक्टर, बैलगाडी खरेदी, विहीर खोदणे, सिंचन व्यवस्था करणे, शेतीला कुंपण घालणे यात गुंतवणूक केली. १० टक्के शेतकऱ्यांनी डेअरी, पोल्ट्री फार्म यामध्ये पैसे गुंतवले. जवळपास ४५ टक्के शेतकऱ्यांनी फिक्स डिपॉझिट, म्युच्युअल फंड, प्रवासी वाहन खरेदी, घर बांधणी, भूखंड खरेदी यामध्ये पैसे गुंतवले. ७४ टक्के शेतकऱ्यांनी मुलांच्या भविष्यासाठी पैशाची गुंतवणूक केली. ५० टक्के शेतकऱ्यांनी पुन्हा दुसरीकडे शेतजमीन खरेदी करण्यात पैसा गुंतविला.

## विशेष नियोजन प्राधिकरण

■ प्रस्तावित नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गालगत (महाराष्ट्र समृद्धी महामार्ग) एकूण २४ नोड्स (नवनगरे) निश्चित, त्यापैकी आतापर्यंत १७ नोड्सला (नवनगरे) शासन स्तरावरून मंजुरी.
■ जमीन एकत्रीकरण योजनेच्या माध्यमातून नवनगरांचा विकास करणार.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट,**
विभागीय संपर्क अधिकारी



**राजे अम्ब्रीशराव आत्राम**
राज्यमंत्री, आदिवासी विकास, वने

> **प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासाला गती मिळावी, यासाठी 'सबका साथ सबका विकास' हे धोरण अंगीकारले. हाच आदर्श ठेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार कार्यरत आहे. मागील चार वर्षात आदिवासी विकास विभाग व वन विभाग यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आणि उपक्रम राबवले. त्यामुळे सामान्य जनतेच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आले.**

**राजे अम्ब्रीशराव आत्राम**



# सकारात्मक बदल

■ आदिवासीबहुल जिल्ह्यात आणि दुर्गम जिल्ह्यात सर्वसामान्यांपर्यंत विकासाची गंगा पोहोचावी, यासाठी अथक प्रयत्न ■ पेसा कायद्यांतर्गत ग्रामपंचायतीच्या विकासाकरिता आदिवासी क्षेत्र उपयोजनेमध्ये ५ टक्के निधी देण्याचा निर्णय ■ अनुसूचित जमातीच्या आदिवासी बांधवांना तसेच इतर पारंपरिक वननिवासी यांना हक्काच्या जमिनीकरिता वनहक्क कायद्याची मान्यता घेऊन अधिनियम २००६ ची काटेकोरपणे अमंलबजावणी ■ गरोदर महिला, स्तनदा माता व बालकांना योग्य आहार देऊन त्यांची आरोग्य सुधारणे व भावी पिढी सुदृढ करणे याकरिता डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना कार्यान्वित. ■ आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न ■ त्यांना दर्जेदार शिक्षण, निवास व्यवस्था, शासकीय वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वरूपाच्या वस्तूंसाठी उदा. छत्री, गणवेश, पुस्तके, स्टेशनरी, चादर, ब्लँकेट, बेडशीट, सतरांजी, उशी इत्यादींसाठी घेण्यासाठी निश्चित केलेली रक्कम, वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजनाकरीता निश्चित केलेली रक्कम थेटपणे त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय ■ ज्या आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही त्यांना वसतिगृहातील विद्यार्थ्यासारखीच सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पं. दीनदयाळ उपाध्याय योजनेमार्फत शहराची वर्गवारी करून योग्य ती रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा ■ विभागामार्फत नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्याकरिता दर वर्षी पाठवण्यात येत असलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येत १० पटीने वाढ ■ या योजनेंतर्गत शिक्षण देण्यासाठी दरवर्षी २५०० वरून दरवर्षी २५,००० एवढा लक्षांक वाढविण्यात आला. ■ आश्रमशाळा सुधारण्यासाठी खास प्रयत्न.

## वन विभाग

डॉ. श्याम प्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत वनाशेजारील गावांमधील लोकांसाठी १०० टक्के कुटुंबांना गॅस सिलेंडर वाटप, अशा कुटुंबाना २ सिलेंडर व प्रथम वर्षाचे ६ सिलेंडर दिले जातील. यासाठी शासनाकडून ७५ टक्के अनुदान व २५ टक्के लाभार्थ्यांचे योगदान राहील. ■ विद्यार्थी हरित सेनेची निर्मिती ■ महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ ■ महाराष्ट्र बांबू विकास महामंडळाची स्थापना ■ सामाजिक वनीकरण संचालनालय वन विभागात समाविष्ट ■ नवीन बुरुडांची नोंदणी निर्गत पासकरिता अर्ज प्राप्तीनंतर ३० दिवसाच्या आत निर्णय ■ कांदळवन संरक्षण व उपजीविकेची निर्मिती. ■ स्व. उत्तमराव पाटील वन उद्यानांची निर्मिती –

■ महावृक्षरोपणाची मोहीम यशस्वी

■ २०१८ मध्ये वन विभागामार्फत १३ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. त्या अनुषंगाने माझ्या पालक जिल्ह्याकरिता दिलेले उद्दिष्ट पूर्ण ■ वन विभागाच्या ५० कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा संकल्प. ■ वन भ्रमंती, जीवनदायी कल्पतरू : बांबू, उत्तम वन, वन्यजीव, जैव विविधता, निसर्ग आणि पर्यावरण यासाठी हरितक्रांती अशा उपक्रमांचा प्रारंभ.

■ कोणतेही आव्हान हे संधी म्हणून स्वीकारले तर निश्चितच चांगले कार्य करता येते. ही बाब या मोहिमेद्वारे सिद्ध. वन व आदिवासी विभाग या दोन्ही विभागांनी विविध योजनांद्वारे जनसेवेची विविध कामे केली आहेत.

**शब्दांकन : भारत वा. वानखेडे,**
विशेष कार्य अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

# पारदर्शक प्रशासन, विनाविलंब सेवा



**मदन येरावार**
राज्यमंत्री, ऊर्जा, पर्यटन, अन्न व औषध प्रशासन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), सामान्य प्रशासन विभाग

> **प्रशासन पारदर्शी करण्यासह जनतेला विनाविलंब सेवा देण्यास राज्य शासन महत्त्व देत आहे. यातूनच विविध विभागांनी जनकल्याणाचे अनेक निर्णय घेतले. त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.**

**मदन येरावार**

■ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कार्यालयासाठी सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे जागा देण्याचा निर्णय. आयोगाच्या सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होऊन उमेदवारांचा वेळ व पैसा वाचणार. ■ मिहान प्रकल्प, नागपूर– 'मिहान' सेझ व 'नॉन– सेझ' मध्ये २०१८ या वर्षात ४ हजार ३४५ कोटी रुपयांची गुंतवणूक. सध्या ६५ प्रकल्प सुरू. त्यातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या ६५ हजार रोजगार निर्मिती. ■ 'मिहान'मध्ये औषध निर्माण क्षेत्रातील कंपन्यांकडून १२०० कोटी रुपयांची गुंतवणूक. त्यापैकी ६ कंपन्यांची कामे सुरू. ■ शिर्डी विमानतळ– २९५ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून विमानतळाची निर्मिती. १ ऑक्टोबर २०१७ पासून विमान उड्डाणाला सुरुवात. ऑगस्ट २०१८ पर्यंत ७० हजार प्रवाशांची वाहतूक. ■ महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१८– पारदर्शक, कार्यक्षम व समायोचित लोकसेवा देण्याकरिता या कायद्याची राज्यात एप्रिल, २०१५ पासून अंमलबजावणी सुरू. ■ विविध विभागांमार्फत ४९२ सेवा अधिसूचित. त्यापैकी 'आपले सरकार' पोर्टलमार्फत ३७७ सेवा ऑनलाइन. ■ प्राप्त ५ कोटी ४७ लाख अर्जांपैकी पूर्णपणे सेवा देऊन ५ कोटी ३१ हजारहून अधिक अर्ज निकाली. ■ ऑनलाइन आर.टी.आय.– ही सुविधा मुख्यमंत्री कार्यालयासह मंत्रालयीन सर्व विभागात जानेवारी २०१५ पासून सुरू. तसेच सुविधेची व्याप्ती जिल्हा स्तरापर्यंत वाढवली. ■ शासकीय सेवानिवृत्त अधिकारी– कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी ओळपत्र देण्याचा निर्णय. ■ २५ जून १९७५ ते ३१ मार्च १९७७ या आणीबाणीच्या काळात कारावास सोसावा लागलेल्या मिसाबंदी व सत्याग्रहींना तसेच त्यांच्या पश्चात पत्नीस/पतीस निवृत्तिवेतन देण्याचा निर्णय. ■ वांद्रे– वरळी सी लिंक व पुणे– मुंबई द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंकचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. ■ शेतकऱ्यांना सलग १२ तास वीज मिळण्यासाठी उच्च दाब प्रणाली (एचव्हीडीएस) योजनेंतर्गत प्रत्येक शेतकऱ्यास स्वतंत्र विद्युत ट्रान्सफॉर्मर देण्याचा निर्णय ■ कृषी पंपांना वीजपुरवठ्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना. ■ एमटीडीसी कडील ८६ रिसॉर्टचा सार्वजनिक–खासगी सहभाग (पीपीपी – पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) मॉडेल तत्त्वावर उन्नतीकरण (अपग्रेडेशन) करण्याचा निर्णय ■ समृद्धी महामार्ग व अन्य महत्त्वपूर्ण महामार्गांवर पर्यटकांसाठी वे–साईड सुविधांची निर्मिती. ■ अन्न व औषध परवाना, नोंदणी ऑनलाइन पद्धती यशस्वीपणे राबवल्याबद्दल केंद्र शासनाकडून महाराष्ट्र शासनाचा सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून गौरव. ■ इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, वि.मा. प्र. तील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे सरकार सर्वसामान्यांना तत्पर, पारदर्शक व गतिमानरीत्या सेवा देण्यासाठी कार्यरत राहील, याची ग्वाही देतो.




**शब्दांकन : सचिन गाढवे,**
विभागीय संपर्क अधिकारी ■■



गुलाबराव पाटील
राज्यमंत्री, सहकार

**गेल्या चार वर्षात सहकार क्षेत्राला सक्षम करण्यासाठी शासनाने अनेक निर्णय घेतले. त्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला. कर्जमाफीचा ऐतिहासिक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेले निर्णय त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी साहाय्यभूत ठरत आहेत.**

# शेतकऱ्यांच्या हितांना प्राधान्य

**गुलाबराव पाटील**

शेतकरी आणि सहकार हा ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचा महत्वाचा घटक आहे. सहकाराच्यामार्फत ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे काम मोठ्या प्रमाणात करण्यात आले. गेल्या चार वर्षात या बाबतीत सहकार विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७'अंतर्गत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. कर्जमाफीसोबत नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यात आला. कर्जमाफीची ही योजना पूर्ण ऑनलाइन राबवण्यात आली. सर्व गरजू शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला. पीक/मध्यम, पुनर्गठित कर्जांसाठी ही योजना होती.

शेतकऱ्यांना सावकारी पाशातून सुटका करण्यासाठी २०१५-१६, २०१६-१७ कर्जमाफी योजना राबवण्यात आली. विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबत शासनाने १० एप्रिल २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला. या निर्णयानुसार विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांतील



जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हास्तरीय समित्यांनी दिलेल्या मंजुरीनुसार ३१ मार्च २०१८ पर्यंत ४२,६८७ शेतकऱ्यांच्या कर्जापोटी एकूण रु.६२८७.२० लाख संबधितांना वितरित करण्यात आले.

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी

ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी २०१४ ते २०१८ या कालावधीत पुढील काही महत्त्वाचे निर्णय घेतले. साखर निर्यात प्रोत्साहन अनुदान व सॉफ्ट लोन योजना. यामध्ये केंद्र शासन रु.४००० प्र.मे.टन , राज्य शासन रु. १००० प्र.मे.टन तसेच सॉफ्ट लोन योजनेंतर्गत २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षात ६५ साखर कारखान्यांना रु.६६.३४ कोटी व्याज अनुदान दिले. २०१६-१७ पासून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रास्त आणि किफायतशीर दरापेक्षा (एफआरपी) जास्त ऊस दर देयके अदा केली आहेत. साखर निर्यात अनुदान, रिव्हेन्यू शेअरिंग फार्म्युलाप्रमाणे (आरएसएफ) ऊसाचा दर दिला.

ऊस पिकांसाठी प्रथमच सूक्ष्म सिंचन योजना अनिवार्य करण्यात आली. ही योजना अनिवार्य करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरले. ३.०५ लाख हेक्टर क्षेत्र २ वर्षामध्ये सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याचे नियोजन केले आहे. शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी १.१२ लाख कर्जमर्यादेपर्यंत २ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यात आले. नाबार्डकडूनही रु.१५०० कोटी पुनर्वित्त उपलब्ध करून देण्यात आले. यामध्ये व्याज सवलत राज्य शासन ४ टक्के व साखर कारखाना १.२५ टक्के अशी आहे. या योजनेमुळे ऊस उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ तसेच पाण्याचीही बचत होणार आहे.

**शब्दांकन : दत्तात्रय कोकरे,**
विभागीय संपर्क अधिकारी



Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88



**रवींद्र चव्हाण**
राज्यमंत्री, बंदरे, वैद्यकीय शिक्षण, माहिती तंत्रज्ञान, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण

> **बंदरे, वैद्यकीय शिक्षण, माहिती व तंत्रज्ञान आणि अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण या विभागांच्या निर्णयाचा सर्वसामान्य जनतेला अधिकाधिक लाभ व्हावा, यासाठी सातत्याने प्रयत्न केले. निर्णयांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी दूर करण्यावर ठळकपणे भर दिला.**

# तंत्रज्ञानातून विकासाकडे...

**रवींद्र चव्हाण**

## बंदरे

■ बंदर विकास धोरण जाहीर ■ खासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन ■ किनारी नौवाहनाला प्रोत्साहन देण्यासाठी सवलतीच्या दराने शुल्क आकारणी. एकाच प्रकारच्या मालासाठी बंदरात एकाच वेळी शुल्क आकारणी आणि बंदरकरातून शंभर टक्के सूट ■ लहान बंदरातील माल हाताळणीमध्ये मागील चार वर्षात ४० टक्के वाढ ■ लहान बंदरातील प्रवासी वाहतुकीत १५ लाखांनी वाढ ■ नवीन बंदरांचा विकास ■ प्रवासी वाहतुकीला तिसरा पर्याय जलवाहतूक निर्माण करण्यात येत आहे. रस्त्याने लागणारे १०९ किलोमीटरचे अंतर जलमार्गाने १८.५२ किलोमीटर कमी होणार ■ जहाज बांधणीचा विकास, याअंतर्गत धरमतर खाडीमध्ये मरीन शिपयार्डची उभारणी ■ पनवेल खाडीत बेलापूर येथे दोन आणि अलिबाग येथे एक शिपयार्डची निर्मिती.

## वैद्यकीय शिक्षण

■ जळगाव येथे पहिले मेडिकल हब पंडित दीनदयाळ उपाध्याय शासकीय एकात्मिक वैद्यकीय शैक्षणिक संकुल सुरू करण्यास मान्यता ■ चंद्रपूर येथे कॅन्सर हॉस्पिटलची स्थापना ■ नागपूर येथील जेरियॅट्रिक मेडिसीन डिपार्टमेंट केंद्र शासनाच्या सहकार्याने सुरू करण्यास मान्यता. यामुळे वार्धक्यविषयक समस्यांवर रुग्णांना स्वतंत्रपणे उपचार पुरवणे व त्यावर संशोधन करणे शक्य. ■ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ३५० पेक्षा अधिक पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागांची निर्मिती.

## माहिती व तंत्रज्ञान

■ भारत नेट प्रकल्पामार्फत तालुका ते ग्रामपंचायत उच्च क्षमतेच्या फायबर केबलने जोडणी ■ पहिल्या भागात १४,७५९ ग्रामपंचायती



फायबर केबलने जोडण्यात आल्या. ■ उच्च क्षमतेची इंटरनेट जोडणी ग्रामपंचायतींना मिळाल्यामुळे टेलिमेडिसिन, ई- शिक्षण यांसारख्या सेवा देण्यास फायदा मिळणार. ■ नागपूर स्मार्ट सिटीअंतर्गत १२०० किलोमीटरचे फायबर आधारित शहरव्यापी नेटवर्क जोडणी करण्यात येईल. ७०० ठिकाणी सीसीटीव्ही आधारित शहर निरिक्षण यंत्रणा. ■ वर्ग ३, वर्ग ४ च्या पदभरती व शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत ऑनलाइन पद्धतीने परीक्षा. ■ शासनाच्या सेवा ऑनलाइन मिळाव्या, यासाठी दूरसंचार धोरणात सुधारणा. ■ राज्यशासनाचे क्लाऊड कंम्प्युटिंग धोरण जाहीर. यात पब्लिक क्लाऊड, व्हर्च्युअल प्रायवेट क्लाऊड आणि गव्हर्नमेंट कम्युनिटी क्लाऊड याचा समावेश असेल. याअंतर्गत तंत्रज्ञान क्षेत्रास प्रोत्साहन मिळावे यासाठी खासगी आणि विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन. या धोरणामुळे खर्चात बचत होऊन डेटा सुरक्षतेला प्राधान्य मिळणार.

## अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

■ सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत केलेल्या डिजिटायझेशनमुळे आमूलाग्र बदल ■ ई-पॉसद्वारे अन्नधान्य विक्री व्यवहारामध्ये पारदर्शकता. ■ या प्रणालीमुळे योग्य लाभार्थ्याला धान्य मिळणे सोपे झाले. लाभार्थ्यांना कोणत्याही दुकानात धान्य घेण्याची सुविधा शक्य. ई-पॉस मशीनमधून धान्यवितरणामुळे एकूण धान्य उचलीमध्ये सुमारे ३,६४,८०० मे.टन एवढी घट २०१७-१८ मध्ये झाली. ई-पॉसद्वारे केरोसीन व तूरडाळ विक्रीचीही सुविधा उपलब्ध. ■ राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत सुमारे ९९ लाख लाभार्थ्यांचा नव्याने समावेश ■ ग्राहक धोरण तयार करण्यासाठी प्रथमच तज्ज्ञ समितीची स्थापना ■ ऑनलाइन पद्धतीने ग्राहक मंच व राज्य आयोगात ग्राहकांच्या तक्रारी करता येणे शक्य.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

# शेतमाल निर्यातीत वाढ



**सदाशिव खोत**
राज्यमंत्री, कृषी व फलोत्पादन,
पणन, पाणीपुरवठा व स्वच्छता

> **"प्रधानमंत्री पीक विमा योजना व पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा योजनेवर लक्ष केंद्रित केले. त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीत राज्य देशात प्रथम क्रमांकावर आले. शेतमालाच्या निर्यातीमध्ये २०१४ ते २०१८ या कालावधीमध्ये भरीव वाढ झाली. फळे व भाजीपाला नियमन मुक्तीच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना शेतमाल चांगल्या व वाजवी दराने कोठेही विकण्याची मुभा मिळाली."**

## सदाशिव खोत

■ शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीची खुल्या बाजारातून औजारे खरेदी करण्याची मुभा, अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा. या योजनेत २००२ ते २०१३–१४ या १२ वर्षात ३ लाख ९० हजार लाभार्थ्यांना ३०१ कोटी २२ लाख रुपयांचा लाभ. २०१४–१५ ते २०१७–१८ या ४ वर्षात ४ लाख ४० हजार लाभार्थ्यांना ५४४ कोटी ८४ लाख रुपयांचा लाभ ■ प्रधानमंत्री पीक विमा योजना व पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा योजना– अंमलबजावणीत राज्य देशात प्रथम क्रमांकावर. प्रतिहेक्टरी विमा संरक्षित रक्कमेत २०१३–१४ मधील रुपये १७ हजार ७८ वरून २०१६–१७ मध्ये रुपये ३१ हजार ५०९ अशी ८४ टक्क्यांची वाढ.■ गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना : लाभ मर्यादा दुप्पट. ■ सूक्ष्म सिंचन योजना– अर्ज स्वीकृती, ऑनलाइन नोंदणी ते अनुदान– संपूर्ण कार्यवाही संगणकीय प्रणालीद्वारे ■ मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांसाठी ३ वर्षाच्या कालावधीकरिता अतिरिक्त ३३७ कोटी रुपये राज्य योजनेद्वारे मंजूर. २०१४ पासून ८.४१ लाख शेतकऱ्यांना ७.२० लाख हेक्टर क्षेत्रावर सूक्ष्म सिंचन संचाच्या उभारणीसाठी लाभ. ■ कांदा चाळ योजना– प्रभावी अंमलबजावणी २०१३–१४ पर्यंतच्या तुलनेत चार वर्षात १७४ कोटी ६३.४५ लाख रुपये इतका दुपटीहून अधिक खर्च. ■ पहिल्यादांच जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन ■ भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना ■ २०६० महसूल मंडळाच्या ठिकाणी स्वयचंलित हवामान केंद्राची उभारणी ■ नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प.

शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल २०० रुपये याप्रमाणे १०८ कोटी ६९ लाख रुपये २०१७–१८ हंगामात NeML पोर्टलवर नोंदणी केलेल्या परंतु खरेदी न झालेल्या तूर उत्पादक शेतकऱ्यांना रु.१००० क्विंटल अनुदान. ■ श्रीसावतामाळी आठवडी बाजार योजना– १६० शेतकरी आठवडे बाजार सुरू ■ फळे व भाजीपाला नियमन मुक्तीचा निर्णय – शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल चांगल्या व वाजवी दराने कोठेही विकण्याची मुभा. ■ शेतकऱ्यांची अडतमुक्ती – या दुरुस्तीमुळे अडत ही शेतकऱ्यांकडून वसुल न करता खरेदीदार व्यापाऱ्यांकडून वसूल करण्याची तरतूद. २०१६–१७ मध्ये ११७५ कोटी व २०१७–१८ मध्ये १११३ कोटी रुपये एवढ्या रकमेची शेतकऱ्यांची बचत ■ अटल महापणन विकास अभियान – किमान ५ हजार सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणाचे उद्दिष्ट. शेतकऱ्यांना कृषी पणनविषयक सुविधा देऊन संस्थांची आर्थिक उलाढाल वाढवणे. ■ मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम – १ हजार ५९५ कोटी रुपये किंमतीच्या ७८० नळ पाणीपुरवठा योजनांना मंजुरी. त्याचा फायदा सुमारे ३७ लाख ८१ हजार लोकसंख्येस होणार. ■ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम – मागील ४ वर्षात ७ हजार १४९ पाणीपुरवठा योजना पूर्ण. ■ २०१८–१९ मध्ये ९ हजार ६९१ गावे/वाड्या वस्त्यांसाठी ६ हजार ५३ नवीन योजना प्रस्तावित. ■ मराठवाडा वॉटर ग्रीड – योजनेस तत्त्वत: मान्यता. बृहत आराखडा तयार करण्यासाठी इस्त्राईल शासनाच्या कंपनीसोबत करार.



■ शेतमालाच्या निर्यातीमध्ये २०१४ ते २०१८ या कालावधीमध्ये भरीव वाढ – द्राक्षे– ५.४२ लाख मे.टन, अन्य फळे– ४.२७ लाख मे. टन, कांदा–३६.१८ लाख मे. टन, बिगर बासमती तांदूळ– १५.९२लाख मे. टन. ■ सोयाबीन अनुदान – प्रथमच ऑक्टोबर २०१६ ते डिसेंबर २०१६ या कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या

**शब्दांकन : सचिन गाढवे,**
विभागीय संपर्क अधिकारी

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

**समाज जसजसा विकसित होत गेला, तशी संपर्क आणि संवादाची साधने बदलत गेली. आज इंटरनेटच्या वापरातून सुरू असलेली विविध समाजमाध्यमे प्रत्येकाच्या दैनंदिन आयुष्याचा एक भाग बनली आहेत. कमी वेळेत अधिकाधिक लोकांपर्यंत माहिती, संदेश पोहोचवण्यासाठी प्रभावी ठरलेल्या समाजमाध्यमांचा वापर आता महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सुरू केला आहे. या माध्यमांना जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून शासनाची अधिकृत, वस्तुनिष्ठ आणि अचूक माहिती जनतेपर्यंत पोहोचवणाऱ्या या समाजमाध्यमांच्या वापराचा घेतलेला वेध..**

होय, प्रगती करतोय महाराष्ट्र माझा

# शासनाचा ‘सोशल’ संवाद

**किशोर गांगुर्डे**

महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी, जनसंपर्क आणि माहिती प्रसारणाची महत्त्वाची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी मुद्रित, दृकश्राव्य आणि वेब या प्रस्थापित माध्यमांच्या बरोबरीने आता समाजमाध्यमेही एक समातंर माध्यम म्हणून काम करू लागले आहे. हातातल्या स्मार्टफोनच्या एका ‘टच’वर जग जवळ येत असतानाच महासंचालनालयाने सुरू केलेल्या समाजमाध्यमांच्या वापरांनादेखील जनतेने भरघोस प्रतिसाद दिला.

### महासंचालनालयाची समाजमाध्यमे–

- **ट्विटर**– (www.twitter.com/MahaDGIPR)

सोशल नेटवर्किंग आणि मायक्रो ब्लॉगिंग संकेतस्थळ असलेल्या ट्विटरचा वापर महासंचालनालयाने शासकीय माहिती–जनसंपर्काच्या दैनंदिन कामासाठी सुरु केला आहे. मंत्रालयस्तरापासून विभागीय आणि जिल्हा माहिती कार्यालये ते नवी दिल्लीच्या महाराष्ट्र परिचय केंद्र अशा कार्यालयांचे ट्विटरवर प्रतिनिधित्व दिसू लागले आहे. राज्य आणि जिल्हा स्तरावरील सर्व शासकीय ताजे अपडेट्स एका क्लिकवर मिळण्याची सुविधा या ट्विटर हॅण्डलमुळे उपलब्ध झाली आहे.

- **फेसबुक** – (www.facebook.com/MahaDGIPR)

ज्या समाजमाध्यमाचा सर्वात अधिक वापर केला जातो. त्यात फेसबुकचा अगदी वरचा क्रमांक असून, शासनाच्या ताज्या घडामोडी, निर्णय या फेसबुकमुळे नेटकऱ्यांना क्षणात कळू लागले आहे.

महासंचालनालयाच्या फेसबुक पेजने १ लाख ८५ हजार फॉलोअर्सचा आकडा पार केला असून, राज्यातील सर्व माहिती कार्यालये देखील फेसबूकचा प्रसिद्धी व जनसंपर्कासाठी प्रभावी वापर करीत आहेत.

- **ब्लॉग** (https://maharashtradgipr.blogspot.com/)

राज्य शासनाचे विविध उपक्रम, घडामोडी अथवा निर्णय–घोषणांची सविस्तर माहिती देण्यासाठी हा ब्लॉग कार्यरत आहे. या ब्लॉगला भेट देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली असून राज्यातील सर्वच विभागीय, जिल्हा माहिती कार्यालये स्थानिक शासकीय घडामोडींची माहिती देण्यासाठी ब्लॉगचा वापर करत आहेत.

- **युट्यूब चॅनल** – (www.youtube.com/MaharashtraDGIPR)

शासनाच्या विविध योजना, जय महाराष्ट्र, मी मुख्यमंत्री बोलतोय कार्यक्रमाबरोबरच दैनंदिन महासंवाद बातमीपत्र, यशकथा आदींचे व्हिडिओ महासंचालनालयाच्या युट्यूब चॅनलवर नियमितपणे अपडेट केले जातात. त्यामुळे या चॅनलच्या सबस्क्राईबर्सची संख्या वाढत आहे.

- **इन्स्टाग्राम** – www.instagram.com/mahadgipr

फोटो शेअरिंगसाठी अल्पावधीतच लोकप्रिय ठरलेल्या इन्स्टाग्राम या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर महासंचालनालय असून विविध योजनांचे, उपक्रमांचे फोटोज, शॉर्ट व्हिडिओज तेथे पोस्ट केले जातात. त्यालादेखील प्रतिसाद चांगला आहे.

- **साउन्डक्लाऊड**– www.soundcloud.com/maharashtradgipr

साउन्डक्लाऊड एक ऑडिओ शेअरिंगची महत्त्वाची सोशल नेटवर्किंग साईटस असून महासंचालनालयाकडून प्रसारित केले जाणारे सर्व ऑडिओज, दिलखुलास कार्यक्रम, जिंगल्स आपल्याला इथे ऐकायला मिळतात.

- **टेलिग्राम चॅनल – महासंवाद :** महाराष्ट्र शासन ‘टेलिग्राम’ या इन्स्टन्ट मेसेजिंग ॲपचा वापर करुन महासंचालनालयाने सुरु केलेले ‘महासंवाद : महाराष्ट्र शासन’ हे टेलिग्राम चॅनल अल्पावधीतच लोकप्रिय झाले आहे. या चॅनलमधून दैनंदिन शासकीय घडामोडींबरोबरच, नोकरीच्या संधी, स्पर्धा परीक्षा आदींची अधिकृत माहिती प्रसारित केली जात असल्याने चॅनलला दिवसेंदिवस प्रतिसाद वाढत आहे.

- **‘व्हॉटसअप’ चा प्रभावी वापर :** व्हॉट्सअप या इन्स्टन्ट मेसेजिंगद्वारे शासनाचे दैनंदिन निर्णय, उपक्रमांची संक्षिप्त माहिती बातमी स्वरूपात लाखो वाचकांपर्यंत पोहोचविली जात असून

■ **जिओ चॅट चॅनल – महाराष्ट्र शासन** (Govt Of Maharashtra)

'जिओ चॅट' या मोबाइल ॲपच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाविषयी सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यासाठी हे चॅनल महासंचालनालयाने सुरू केले आहे. राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिसांचे संपर्क क्रमांक, मंत्रिमंडळ व शासन निर्णय यांची माहिती तसेच लोकराज्यचे अंक, प्रश्नमंजुषा, हवामान अंदाज, सेवा हक्क कायदा, तक्रार निवारण, महायोजना, महालाभार्थी, मी मुख्यमंत्री बोलतोय, सोशल मीडिया आदींबद्दलची सर्व माहिती उपलब्ध आहे. अँड्रॉइड आणि आयओएस मोबाइलवर हे ॲप डाऊनलोड करण्याची सुविधा असलेल्या 'जिओ चॅट महाराष्ट्र शासन' चॅनलने अल्पावधीतच १ लाख १० हजार फॉलोअर्सचा टप्पा पार केला आहे.

राज्यभरातून १३१० पेक्षा अधिक ग्रुप्समध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रतिनिधित्व आहे.

एकूणच, समाजमाध्यमांचा अधिकाधिक वापर करुन शासनाची माहिती, निर्णय, उपक्रम लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय सोशल नेटवर्किंग साईटसवर प्रतिनिधित्व करू लागले आहे. 'सोशल' संवादाचे हे पर्व भविष्यात अधिक गतिमान आणि विस्तृत करण्यासाठी विभागाचे प्रयत्न सुरू आहेत.

**वरिष्ठ सहायक संचालक (माहिती), समाजमाध्यम-महान्यूज कक्ष**



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग



श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

# किमान आधारभूत दराने खरेदी
## पुन्हा मुदतवाढ

**राज्यात खरीप हंगाम २०१८-२०१९ मध्ये विविध जिल्ह्यात 'नाफेड' या संस्थेच्या वतीने मूग, उडीद व सोयाबीन खरेदीची केंद्रे सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या शेतमालाची खरेदी केंद्र शासनाच्या आधारभूत दराने करण्यात येत आहे. मूग, उडीद व सोयाबीनसाठी नोंदणी कालावधी वाढविण्यात आला असून तो खालीलप्रमाणे आहे :-**

| अ.क्र. | तपशील | आधारभूत दर हंगाम २०१८-१९ | नोंदणी कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मूग | ६९७५/- | २४/१०/२०१८ ते १५/११/२०१८ |
| २ | उडीद | ५६००/- | २४/१०/२०१८ ते १५/११/२०१८ |
| ३ | सोयाबीन | ३३९९/- | ०१/१०/२०१८ ते १५/११/२०१८ |

**मूग व उडीदाची खरेदी दिनांक १६/१०/२०१८ पासून सुरु करण्यात आलेली आहे.**

**या योजनेचा लाभ सर्व शेतकऱ्यांनी नोंदणी कालावधीत नोंदणी करुन घ्यावा.**

# ग्रंथसंपदा

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची**
**दर्जेदार व संग्रहणीय ग्रंथसंपदा**






## महाराष्ट्र वार्षिकी

किंमत रु. २५०

## Magnificent Maharashtra

किंमत रु. २००








## महाराष्ट्र आणि महात्मा गांधी

किंमत रु. २००

## महामानव

किंमत रु. १००




**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

Join Telegram》 》https://t.me/Mpscrockers88

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह